म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक

सन

ालय क्रमांक

पुस्तकाचें नांव

१९८

# वाईकर भटजी

# धनुर्धारी

— १८९८ —

श्री.

ती. रा. रा. वासुदेव काशिनाथ किर्लोस्कर,

एल्. एम्. अँड एस्. सोलापुर;

व

ती. वज्रचुडेमंडित सौ. लक्ष्मीबाई किर्लोस्कर

यांस

परोपरीच्या अनेक ममताळुपणाबद्दल

व

हरतऱ्हेच्या उपकार राशीचें स्मरण

ह्मणून कृतज्ञताबुद्धीनें हें पुस्तक

आदरपुरःसर अर्पण

केलें आहे.

धनुर्धारी.

# प्रस्तावना.

[रा. सा. गोविंद वासुदेव कानिटकर बी. ए. एल्. एल्. बी., मुनसफ अलीबाग, ह्या लेखनपटु व मार्मिक विद्वान् गृहस्थांनीं आमच्या 'वांईकर भटजी' साठीं लिहिलेली प्रस्तावना येथें दिली आहे.

प्रकाशक.]

'वांईकर भटजी' चें चित्र ज्या चित्रकारांनीं काढिलें आहे, त्यांचा परिचय मराठी वाचकांस करून देण्यास या माझ्या प्रस्तावनेची अवश्यकता वस्तुतः नव्हती, ही गोष्ट खरी. परंतु, माझे मित्र धनुर्धारी यांनीं महाराष्ट्र वाचकांस आपणापेक्षां कितीतरी पटीनें कमी परिचित अशा माझ्या-सारख्या मनुष्यास 'वांईकर भटजींचा हात धरून त्यांस जगापुढें आणावें' अशी विनंती कां केली, हें मला प्रथम मोठेंच गूढ पडलें. परंतु त्याचें कारण कांहीं जरी असलें तरी 'धनुर्धारी' सारख्यांनीं केलेली विनंती अमान्य कर-ण्याइतकें मन निष्ठुर होईना व शेवटीं महाराष्ट्र वाचकांस उद्देशून 'भटजीं'च्या तर्फे दोन शब्द लिहिण्याचें धाष्ट्यं मीं केलें. 'धनुर्धारी' हे महाराष्ट्र वाङ्मयाचे भक्तांस जितके प्रिय झाले आहेत, तितकी प्रियता मिळविण्याचें भाग्य आधुनिक ग्रंथकारांपैकीं थोडक्यांचेंच असेल. आरं-भींच, प्रचंड आयाळ धारण करणाऱ्या व आपल्या गंभीर

गर्जनेनें जगास हालवून सोडणाऱ्या मृगेन्द्राच्या पृष्ठभागीं आरूढ होऊन, धनुर्धारी यांनीं बरेच दिवस आपलें शरसंधाननैपुण्य जगास दाखविलें, व आपल्या तीव्र वाग्बाणांच्या अविरत वृष्टीनें बरेच वीर जर्जर केले, व बरेच विषयप्रान्त काबीज केले, ही गोष्ट कोणास विश्रुत नाहीं? सामाजिक, व्यावहारिक, औद्योगिक, राजकीय, नैतिक—कोणत्याही प्रश्नासंबंधानें धनुर्धारी यांचें कांहीं तरी म्हणणें आहेच आहे. 'नाण्याचा प्रश्न' 'आमचा व्यापार' वगैरे अर्थशास्त्रासंबंधाचे जे लेख वर्तमानपत्रांतून ह्यांचे सहीनें प्रसिद्ध झालेले आपण वाचतों त्यांवरून अर्थशास्त्रासारख्या गंभीर व गहन विषयांतही त्यांची अलोट गति आहे, हेंही सांगण्याची जरूर नाहीं. त्याचप्रमाणें त्यांनीं राजकारणासारख्या नाजूक प्रकरणींही आपली लेखणी उभारून राजाचा कैवार घेऊन उठल्याचाही प्रकार पुष्कळांस विदित असेल. मनोरंजक व बोधप्रद अशा लहानलहान ऐतिहासिक कथा लिहून आपल्या लोकांच्या मनांत इतिहासप्रसिद्ध पुरुष व स्त्रिया यांच्याविषयीं योग्य अभिमान उत्पन्न व्हावा एतदर्थही यांनीं स्तुत्य प्रयत्न केला आहे. असो.

प्रस्तुतचा त्यांचा यत्न कांहीं अंशानें निराळ्या दिशेनें आहे. प्रख्यात इंग्लिश कवि ऑलिव्हर गोल्डस्मिथ याची सर्वविश्रुत व सर्वमान्य कादंबरी **व्हिकार ऑफ वेकफील्ड** ( Vicar of Wakefield ) त्यांच्या वाचण्यांत येऊन ती त्यांस फारच आवडली असावी असें दिसतें;

आणि ती कादंबरी जो जो लक्षपूर्वक वाचील त्या प्रत्येकास खरोखर आवडलीच पाहिजे अशी ती आहे. डा. आनंदीबाई जोशी यांस ती इतकी आवडत असे कीं, भगवद्गीतेप्रमाणें त्या पुस्तकांतील वाक्येंच्यावाक्यें त्यांस मुखोद्गत असत, व त्यांच्या पत्रांमधून त्यांतील पुष्कळ उतारेही आढळतात. असो. ही मूळची इंग्रजी कादंबरी प्रथमतः सन १७६६ सालीं प्रसिद्ध झाली. गोल्डस्मिथ कवि व लक्ष्मी यांचें अतिशय वांकडें! त्याचा बहुतेक जन्म अत्यंत दारिद्र्यांत व कर्जबाजारीपणांत गेला. त्यानें ही कादंबरी केवळ करमणूकीखातर लिहिली, व आपल्या आयुष्यांतील सर्व अनुभव तींत ओतला. गोल्डस्मिथचे चरित्रकार मि. फॉर्स्टर ह्मणतातः—

"Rather as a refuge from the writing of books was this book undertaken. Simple to very boldness are the materials employed: but he threw into the midst of them his own nature, his actual experience, the suffering, discipline, and sweet emotion, of his chequered life; and he made them a lesson and a delight to all men."

गोल्डस्मिथ एकदां पैशाच्या अतिशय अडचणींत असल्यामुळें ज्यांची त्याजवर पुत्राप्रमाणें प्रीति होती अशा डा. जॉनसन् यांवांनीं मोठी खटपट करून एक गिऱ्हाईक त्या ग्रंथास पाहिलें. तो अर्थात् पुस्तकें प्रसिद्ध करणारा एक

गृहस्थ होता. त्यानें थोडेसे पौंड देऊन ती कादंबरी विकत घेतली, व पुढें कांहीं दिवसांनीं छापून प्रसिद्ध केली. तिची लोकप्रियता दिवसानुदिवस वाढत गेली. प्रसिद्ध कादंबरीकार वॉल्टर स्कॉट, प्रसिद्ध व खरा मुत्सद्दी एडमण्ड बर्क, जर्मनीचा प्रसिद्ध कवि गठे यांच्यासारख्या मोठमोठ्या विद्वानांनीं व ग्रंथकर्त्यांनीं गोल्डस्मिथच्या या लहानशा कादंबरीची फारच थोरवी गाइली आहे. यूरोपांतील दहा बारा भाषांमध्यें त्या ग्रंथाचीं भाषान्तरें झालीं आहेत, व हा ग्रंथ आमच्या इंग्रजी शाळांतून मुलांसही शिकवितात.

वांईकर भटजी ही गोष्ट त्या कादंबरीचें अनुकरण होय. वस्तुतः मूळांतल्या बहुतेक गोष्टी यांत आढळत नाहींत ह्मटलें तरी चालेल. मूळच्या कादंबरीचीं ३२ प्रकरणें आहेत. वांईकर भटजीचीं प्रस्तुत प्रसिद्ध झालेल्या भागांत फक्त ११ प्रकरणें आहेत. पहिल्याच प्रकरणांत पाहिलें तरी बराच फरक दृष्टीस पडतो. मूळच्या इंग्लिश भटजींनीं आपली बायको, आपलीं मुलें, आपले आप्त व इष्टमित्र, व आपली गृहस्थिति या सर्वांचें थोडक्यांत पण चटकदार वर्णन केलें आहे. वांईकर भटजींनीं पहिल्या प्रकरणाच्या बारा पानांपैकीं आठनऊ पानें खर्चून आपल्या 'गुणवती व समजूतदार'. गृहिणीचें शब्दचित्र दिलें आहे, व राहिलेल्या दोन तीन पानांत आपला वडील मुलगा गोविंदा ऊर्फ बाळा याचें थोडेसें वर्णन देऊन आपल्या दोन मुली आवडी व बगडी यांच्या लग्नासंबंधाची हकीकत सांगितली

आहे. इंग्लिश भटजींस सहा मुलें होतीं, चार मुलगे व दोन मुली. आमच्या वांईकर भटजींस पांचच आपत्यें—तीन मुलगे व दोन मुली. वेकफील्ड या गांवाऐवजीं वांईक्षेत्र. डा. प्रिमरोझच्या ऐवजीं त्रिंबकभटजी. ऑलिव्हिया व सोफिया या दोन मुलींच्या ऐवजीं आवडी व बगडी. डा. प्रिमरोझची बायको डिबोरा, तिच्या ठिकाणीं अन्नपूर्णाबाई आली. असें सादृश्य हुडकीत जावें किंवा मूळच्या ग्रंथाची ओळख पटविण्यास जावें, तों पुढल्या प्रकरणांतून मूळां-तील संविधानकाचा पत्ता लागत नाहींसा होतो. परंतु खरोखर पाहिलें तर मूळच्या इंग्रजी कादंबरीशीं धनुर्धारी यांनीं लिहिलेली गोष्ट कितपत जुळते हें पाहण्याचें विशेष कारण दिसत नाहीं. वांईकर भटजी ही गोष्ट बहुतेक स्व-तंत्रच अशी लिहिलेली आहे म्हटलें तरी चालेल. शिवाय 'मूळच्या विषाशीं मराठीवाचकांस काय करावयाचें आहे?' असाही प्रश्न कोणी एखादा करील; आणि तेंही खरेंच आहे. वांईकर भटजी ही एक स्वकपोलकल्पित गोष्ट आहे असें समजून, तिचें संविधानक कसें आहे, तिची भाषा कशी आहे, गोष्ट कितपत मनोरंजक झाली आहे, तींत आणिलेल्या पात्रांचीं चित्रें काढण्यांत ग्रंथकाराचें कौशल्य कितपत दिसत आहे, वगैरे गोष्टींचा विचार हा मुख्य आहे. परंतु, हा विचार विस्तारेंकरून करण्याचें काम टीकाकाराचें अथवा पुस्तकपरीक्षकाचें आहे. हें काम माझें नाहीं. ही प्रस्तावना लिहिण्यांत माझा मुख्य हेतु टीका

करण्याचा किंवा पुस्तकपरीक्षणाचा नसून ग्रंथाच्या संबं-
धानें वाचकांस साधारण माहिती द्यावी एवढाच आहे.

वांईकर भटजी ही गोष्ट विविधज्ञानविस्तार नांवाच्या प्रसिद्ध मासिक पुस्तकांत प्रथम आली. हल्लीं या गोष्टीचीं ११ प्रकरणें कर्त्यांनीं लिहिलीं, तीं पुस्तकरूपानें प्रसिद्ध केलीं आहेत व त्यांस भाग १ ला असें नांव दिलें आहे. वांईकर भटजी ही गोष्ट प्रथम 'विस्तारांत' वाचण्यांत आली, तेव्हांच ती लोकप्रिय होईल असें मला वाटलें होतें. परंतु तिचे कर्ते कोण हें कळलें नव्हतें. पुढें शोधाअंतीं आपले मित्र 'धनुर्धारी' हेच ती गोष्ट लिहितात ह्मणून कळलें. त्यावरून त्यांस अशी विनंती केली कीं, आपला हा प्रयत्न खरोखर चांगला आहे, व ही गोष्ट पुरी करून स्वतंत्र पुस्तक-रूपानें छापली असतां महाराष्ट्रवाङ्मयांत एका चांगल्या पुस्तकाची भर पाडल्याचें श्रेय आपणांस मिळणार आहे. त्यांनीं ती विनंती मान्य करून गोष्ट यथावकाश पुरी कर-ण्याचें अभिवचन दिलें. कार्यव्यापृतत्वामुळें समग्र गोष्ट त्यांस प्रसिद्ध करितां आली नाहीं. परंतु या गोष्टीचा दुसरा भागही ते लवकरच लिहून काढून प्रसिद्ध करितील अशी आशा करून पुढें आलेला घांस गोड करून घ्यावा अशी धनुर्धारी यांचेतर्फे वाचकांस मी विनंती करीत आहें. भटजी मजकूर हे बऱ्याच लोकांची करमणूक करितील, व त्यांनीं जो आपला बोधप्रद वृत्तांत मनोरंजक रीतीनें व उघड्या मनानें सांगितला आहे, त्यापासून मनोरंजन व बोध हे दोन्ही

लाभ वाचकांस होतील, असें मला वाटतें. भटजींचा स्वभाव मोठा विनोदी दिसतो, तथापि त्यांचे अंगीं सहनशीलता व विवेक पुष्कळ दाखविला आहे. आपणांपैकीं बहुतेकांस संसारांत येणारा अनुभव भटजींसही आला आहे. भटजींनीं जें आत्मवृत्त कथन केलें आहे त्याचा हेतु त्यांनीं आरंभींच दिला आहे तो असा:—'मी संसारयात्रेचा बराच लांबवर पल्ला मारिला आहे, त्यामुळें मला पुष्कळ गोष्टी कळलेल्या व नाना प्रकार माझ्या नजरेस पडलेले आहेत. माझ्या संसारयात्रेचें कथन बोधप्रद नाहीं तरी मनोरम असें इतरांस वाटण्याचा संभव आहे.' आणि हा भटजींचा हेतु पुष्कळ अंशांनीं सफल झाला आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

प्रो. म्याकमिलन् (एल्फिन्स्टन् कॉलेजांतील एक अध्यापक) यांनीं व्हिकार ऑफ वेकफील्ड या कादंबरीची एक सटीक आवृत्ती विद्यार्थ्यांच्या उपयोगाकरितां प्रसिद्ध केली आहे. तिच्या प्रस्तावनेंत 'वांईकर भटजी' चा उल्लेख त्यांनीं केला आहे. ते ह्मणतात:—

"Dr. Primrose has also appeared in Indian garb disguised as Waiker Bhatjee or A Prisest of Wai in the pages of a Marathi Magazine called the Vividhadnyan Vistar."

बैबलांत जशी जॉब याची गोष्ट आहे, किंवा आपल्या पुराणांत हरिश्चंद्र राजाची गोष्ट आहे—देवानें त्यांजवर

अनेक संकटें आणून त्या धीर व उदात्त पुरुषांच्या सत्वाची परीक्षा केली आहे, व ते सत्वास ढळले नाहींत तेव्हां शेवटीं परमेश्वरानें त्यांजवर कृपा केली आहे—तशाच प्रकारचा हेतु गोल्डस्मिथ याचा आपली कादंबरी लिहिण्यांत होता. विपत्कालीं धैर्य, ईश्वरावर पूर्णनिष्ठा, अल्पसंतोष, दुसऱ्यांच्या दोषांवर पांघरूण घालणें, परक्याचे गुण थोडे असले तरी त्यांचा पर्वत करणें, अशा प्रकारच्या सौजन्यानें भरलेला पुतळा हा त्या कथेचा नायक होय. वांईकर भटजी एके ठिकाणीं (पृष्ठ १४८) ह्मणतात:—"पण काळजी करून होणार काय? 'होष्यमाण' कधीं कांहीं चुकणारें नाहीं. काळजी करा, किंवा न करा, व्हावयाचें तें होतच असतें, आणि न व्हावयाचें तें घडून येतच नाहीं. पुढें अमुक होईल आणि तमुक होईल याची फाजील काळजी करण्यासारखा दुसरा मूर्खपणा नाहीं. ईश्वरावर भार टाकून स्वस्थ राहावें हाच प्रापंचिकांचा शहाणपणा—"अशी खरोखर ज्या मनुष्याची वृत्ति असेल तो खरा सुखी, व तोच देवमाणूस किंवा भगवद्भक्त!

धनुर्धारींनीं पहिल्या भागांत जी गोष्ट दिली आहे तिचें संविधानक येणेंप्रमाणें आहे. वांईक्षेत्रांत त्रिंबकभटजी या नांवाचा एक गरीब वैदिक ब्राह्मण होता. त्याच्या बायकोचें नांव अन्नपूर्णाबाई. तिजवर भटजींचें फारच प्रेम असे. तिच्याविषयीं खुद्द भटजींचे उद्गार असे आहेत:—'दोन्ही वेळां साधा, पण मिष्ट व स्वच्छ स्वयंपाक, पोराबाळांची

चांगली खबरदारी, आल्यागेल्या पाहुण्यांचा नीट व व्यवस्थित आदरसत्कार, गरीबी प्रपंचांत टापटिपीनें व काटकसरीचा खर्च, शेजाऱ्यापाजाऱ्यांचें वैभव पाहून त्याप्रमाणें आपणही वागावें किंवा असावें असल्या वेडगळ व त्रासदायक समजुतीचा अभाव, इत्यादिकांमुळें तिजविषयींचा माझा प्रेमा जास्त जास्तच वाढत असे.'........' तिची ती सुप्रसन्न मुद्रा, तें गृहदाक्षिण्य व साधारण सुजनपणा हीं माझ्या प्रपंचसुखाचें मुख्य साधन, ही माझी पक्की समजूत ठरलेली.' असो. अन्नापूर्णाबाईपासून भटजींस एकंदर पांच अपत्यें झालीं. तीन मुलगे व दोन मुली. सर्वांत वडील पुत्राचें नांव गोविंद उर्फ बाळा. वडील मुलगा आठ वर्षांचा झाला तेव्हां त्याचा व्रतबंध केला. दुसऱ्या मुलाचें नांव गोपाळा. मुलींपैकीं वडील मुलीचें नांव आवडी व धाकटीचें नांव बगडी. आवडीचा विवाह तिच्या आठव्या वर्षी झाला. पुढें बाळ्याच्या अभ्यासाकरितां भटजी वांईहून पुण्यास आले. तेथें दारिद्र्यानें बेजार होऊन कर्ज काढण्याचा प्रसंग त्यांस आला. त्यांचा एक जिवाचा स्नेही मोरोबा या नांवाचा होता. त्याचा यजमान पुण्यांतच बाळासाहेब नेने म्हणून एक सावकार होता. त्याला म्हातारपणीं लग्न करावेंसें वाटलें. वांईकर भटजींची मुलगी बगडी हिजवर त्याचा डोळा होता. पण तें जमावें कसें ? मोरोबानें यजमानाकरितां मध्यस्ती केली. वांईहून भटजींबरोबर पुण्यास आल्यानंतर मोरोबा आपल्या यजमानाच्याच घरीं राहिला होता.

बगडी बाळासाहेबांस द्यावी असें मोरोबानें सांगि-तल्यावर भटजींस खूप संताप आला व त्यांनीं रागावून मोरोबांस ह्मटलें:—" मी खाटिक नाहीं. माझी पोर असल्या थेरड्यास द्यावयाला ! पोटची पोर थेरड्याच्या गळ्यांत बांधण्यापेक्षां बेधडक तिला विहिरींत ढकलून देणें बरें!" वगैरे बरेच शिव्या शाप दिल्यावर कांहीं वेळानें भट-जींचा राग शांत झाला. शेवटीं बाळासाहेब नेने यांच्या ताव-डींतून कर्मधर्मसंयोगानें बगडी सुटली, व तिला सरंजाम्यांचें स्थळ मिळालें. पोरगी सुस्थळीं पडली. बाळालाही २० रुपयांची स्कॉलरशिप मिळाली, व पुढें मोठी नोकरीही लागली. असे सुखाचे दिवस भटजींच्या दृष्टीस पडले. येथवर ७प्रकरणें संपलीं. ८वे प्रकरणांत सुखदुःख, श्रीमंती व गरीबी, मनुष्याची या जगांतील स्थिति, यांबद्दल भटजींचे विचार आत्मगत भाषणाचे रूपानें मधूनमधून दिले आहेत. वडील मुलगा व सून यांच्या वर्तनाबद्दल अन्नपूर्णाबाई आप-ल्या नवऱ्याजवळ कुरकुर करीत असून त्रिंबकभटजी बायकोचें अनेक प्रकारें शांतवन करीत आहेत. यापुढें भटजींवर बरींच संकटें येतात. प्रथम त्यांची एक मुलगी नाशकास दिली होती, तिजवर वैधव्यप्रसंग येतो. दुसरा मुलगा गोपाळा 'पाद्रीलोकांच्या शाळेंत शिकत होता, त्याला रोज खिस्ती बायबल वाचावें लागे. त्याचा कोणी पाद्रीसाहेब होता त्यानें त्याला काय भुरळ घातली कोण जाणे! शेवटीं आपला गोपाळा बाटला, खिस्ती झाला,

त्याचा बाप्तिस्मा झाला, अशी बातमीचें पत्र पुण्याहून भट-जींस आलें. भटजी घाबरून जाऊन बरोबर [illegible] सासऱ्यास घेऊन ताबडतोब पुण्यास आले. पुण्यास जातांच अद्यापि मुलाचा बाप्तिस्मा झाला नाहीं असें वर्तमान त्यांस कळलें. त्यामुळें भटजींस अंमळ उमेद आली. याप्रमाणें संक्षेपानें सांगितलेल्या निरनिराळ्या प्रसंगांचीं शब्दचित्रें धनुर्धारी यांनीं फार सुंदर काढिलीं आहेत. त्यांत संसा-रांतील गोष्टींचें सूक्ष्म अवलोकन चांगलें व्यक्त होत आहे.

संसारांत प्रत्येक माणसास कांहींनाकांहीं काळजी असतेच. धनवान् असो किंवा भिकारी असो, अपत्यें असोत किंवा एकटा असो, त्याला कांहींना कांहीं काळजी, संसारांत कोठें तरी उणेपणा, व त्यामुळें होणारा मानसिक ताप, या गोष्टी प्रत्येक माणसाला अनुभवाव्या लागतात. गृहस्थितीचें चित्र 'वांईकर भटजीं'त फारच हुबेहुब काढलें आहे. भटजींस पूर्वी द्रव्य मिळत नसल्याकारणानें संसार कसा चालेल ही रात्रंदिवस काळजी होती, व त्यामुळें संसारत्याग व अरण्यवास करावा असें वाटत असे. पुढें मुलगा मिळविता झाल्यावर ती काळजी दूर झाली, तर त्यांच्या अस्वस्थतेला आणखी अनेक कारणें उत्पन्न झालीं. हा अनुभव प्रत्येक मनुष्याचा आहे. जन्मल्यापासून मरे-पर्यंत, जी स्थिति प्राप्त होईल ती नकोशी वाटणें व नसेल ती हवीशी वाटणें, इत्यादि मनुष्यस्वभावाचें चित्र 'वांईकर भटजीं'त फार चांगल्या रीतीनें रेखलें आहे. पुस्तक प्रत्येक

कुटुंबाचे मनुष्यानें आपल्या संग्रहीं ठेवण्यालायक आहे. वांईकर भटजी ही गोष्ट गोल्डस्मिथच्या मूळ गोष्टीसारखीच खास लोकप्रिय होईल असें ह्मणण्यास मला बिलकुल भीति किंवा संशय वाटत नाहीं. ग्रंथाची भाषा साधी व रसाळ आहे. कोठें कोठें 'हपापलेली कृति' 'अप्रातिबंध प्रेम' 'अननुभविकाचे प्रमाद,' 'आशा चेपीत चेपीत आणणें,' 'गर्व तरारून उठे,' 'मुद्दामपणाकडे साम्राज्य गेलें.' 'सुख डळमळूं लागलें' असे किंचित् कर्णकठोर वाटण्यासारखे प्रयोग आहेत. परंतु ते फारच थोडे असून गालबोटांप्रमाणें किंवा चंद्राबिंबावरील डागाप्रमाणें धनुर्धारीच्या एकंदर कृतीस अधिकच शोभा देतात, असें ह्मटलें असतां अयथार्थ होईल असें वाटत नाहीं. शेवटीं या गोष्टीचा दुसरा भागही होईल तितका लवकर तयार करून धनुर्धारी यांनीं प्रसिद्ध करावा अशी पुनः एकवार त्यांस विनंती करून ही लहानशी प्रस्तावना पुरी करितों.

गो. वा. कानिटकर.

# वांईकर भटजी.

## प्रकरण १ लें.

'गृहिणी गृहमुच्यते.'

संसारांत मनुष्याला सुखापेक्षां दुःखेंच जास्त असतात, हा उद्गार सर्वांच्या मुखावाटें निघतो खरा; पण अशा दुःखमय व क्लेशदायक संसाराचा जाणूनबुजून त्याग करणारे हरीचे लाल पाहूं गेलें असतां किती बरें आढळतील? मुळींच आढळणार नाहींत ह्मटलें तरी चालेल. पण चमत्कार असा कीं, तोंडानें मात्र हा संसार क्लेशदायक, दुःखमय, असें ह्मणावयाचें आणि कृती पहावी तर त्या संसाराला मगरमिठी मारण्यासाठीं हपापलेली असावयाची, अशा व्यक्तींचाच भरणा मनस्वी. घटके घटकेला संसारसागरांतील अफाट दुःखें व यातना यांविषयीं तिटकाऱ्याचे उद्गार पश्चात्तापाच्या मुद्रेनें काढावयाचे, आणि लगेच त्याच संसाराचें लिगाड प्रत्यक्ष आपल्या पोटच्या पोरांभोंवतीं आपण होऊन लावून द्यावयाचें, असा प्रकार घरोघर आढळतो. यामुळें संसार क्लेशमय अशी चोहोंकडून ऐकूं येणारी हाकाटी केवळ मिथ्या व पोकळ असें वाटल्याशिवाय राहत नाहीं.

तें कांहीं व कसें कां असेना, शब्दानें संसाराचा धिःकार व कृतींत त्याच संसारावर अप्रतिबंध प्रेम, हे परस्पर-

विरोधी प्रकार प्रत्येक घरीं सारखे आढळतात, ही मात्र गोष्ट खरी आहे. मीं संसारयात्रेचा बराच लांबवर पल्ला मारिला आहे, त्यामुळें मला पुष्कळ गोष्टी कळलेल्या व नाना प्रकार माझ्या नजरेस पडलेले आहेत; माझ्या संसारयात्रेचें कथन बोधपर नाहीं तरी मनोरम असें इतरांस वाटण्याचा संभव आहे. हें कथन करीत असतां मलाही बरीच करमणूक होईल. चढउताराच्या डोंगराळ देशांतून कांटे, खांचा, दगडदुगड, तुडवीत मोठ्या कष्टानें प्रवास केल्यानंतर साफ व खुल्या मैदानावर येऊन उभें राहावें, आणि मग मागें वळून आक्रमिलेल्या कष्टदायक प्रदेशाकडे नजर फेंकावी, म्हणजे थकल्याभागल्या जिवाला देखील एक प्रकारचा आल्हाद वाटतो. तोच प्रकार हें कथन करीत असतां मला वाटणार आहे.

स्वतः माझ्या आवडीनिवडीची फारशी परवा न बाळगितां माझ्या अज्ञान दशेंतच माझ्या तीर्थरूपांनीं आपल्या पसंतीप्रमाणें एक कन्या पाहून तिच्याशीं माझा विवाह लावून दिला. तीर्थरूपच ते. तेव्हां त्यांनीं मला घालून दिलेला हा संसाराचा ‘ ओनामा ’ माझ्या कल्याणासाठीं व सुखासाठीं होता, हें उघडच आहे. माझ्या धर्मपत्नीची पसंती मी स्वतः न करितां ती माझ्या मातापितरांनीं केली ही गोष्ट खरी आहे; पण या पसंतीसंबंधानें माझी कल्पना कधींही वेडीवांकडी आजमित्तीपर्यंत झालेली नाहीं. तरुणपणचे अल्लड व अपक्व विचार आणि अननुभविकतेचे असंख्यात प्रमाद, यांपेक्षां वृद्धापकाळचा पोक्त विचार व पुत्रवत्सलतेची बावनकशी कळ-

कळ, यांचा उपयोग जन्माच्या गांठी बांधते वेळीं जास्त, ही गोष्ट कोणासही नाकबूल करितां यावयाची नाहीं. ह्मणून माझ्या धर्मपत्नीची निवड माझ्या मातापितरांनीं केली, ही गोष्ट चांगली झाली असें मला अद्याप वाटत आहे. आजन्म बऱ्यावाईट प्रसंगांत सुखदुःखाचा खरा वांटेकरी ह्मणून निवडावयाचा प्रसंग मोठ्या जबाबदारीचा आणि काळजीचा, ही गोष्ट खरी आहे. मानवी शहाणपणापेक्षां नियमानियमाचें ईश्वरी सूत्रच या प्रसंगीं जास्त महत्वाचें आणि कार्यकर्तें असतें असें मला वाटतें. मनुष्यप्राणी केवळ प्रसंगानुरोधानें बनणारा पदार्थ आणि त्याच्या स्वभावाचें आविष्करणही प्रसंगानेंच होत असतें. मनुष्यांचे स्वभाव, गुण, मनोधर्म इत्यादिकांची पारख करणें हें सोपें काम नव्हे, किंवा त्याचें ज्ञान कालगतीनेंही पण शक्य नाहीं. या सृष्टींतील अनेक वस्तु व प्रसंग केवळ कल्पनातीत होत; ईश्वरी कौतुकाचें ज्ञान आह्मां मानवांस आगाऊ शक्य नव्हे; किंवा त्या विश्वात्म्याच्या इच्छेचा ठावठिकाण मनुष्यांस कदापि लागावयाचा नाहीं. त्याचप्रमाणें विवाहसंबंधांतील सुखदुःखाचा अजमास मानवी दक्षतेच्या पलीकडला असें निदान मला वाटतें. पतिपत्नीसंबंध कल्याणप्रद व सुखदायक असाच व्हावा ही इच्छा, व तदनुरूप दक्षता, आह्मी सर्वजण बाळगतों खरी; पण तसें घडूं देणें किंवा घडून येणें हें मात्र आह्मां मनुष्यांच्या स्वाधीनचें नव्हे. तथापि माझ्या मातापितरांनीं मला पाहिलेली व पाहून पसंत केलेली पत्नी मला अनुरूप अशीच निघाली, आणि तिचा संबंध मला सदा सुखावह झाला, यामुळें माझ्या

अज्ञान दशेंत आणि माझ्या आवडनिवडीची पर्वा न बाळ-गितां, मला जन्मभरची सोबतीण ह्मणून माझ्या मातापित-रांनीं दिलेल्या पत्नीसंबंधानें कुरकुर करण्याला व मातापितरांच्या निवडणुकीस नांवें ठेवण्याला मला जागा राहिली नाहीं. माझ्या पत्नीचें रूप, माझ्या पत्नीचा शहा-णपणा व तिचे इतर सद्गुण इत्यादिकांबद्दल इतरांचें मत पाहण्याचें मला कारण नाहीं. कारण मी त्या सर्वांबद्दल सदा संतुष्ट असाच आहे. दोन्हीं वेळां साधा पण मिष्ट व स्वच्छ स्वयंपाक, पोराबाळांची चांगली खबरदारी, आल्यागेल्या पाहुण्यांचा नीट व व्यवस्थित आदरसत्कार, गरीबी प्रपंचांत टापटीपीनें व काटकसरीचा खर्च, शेजा-ऱ्यापाजाऱ्यांचें वैभव पाहून त्याप्रमाणें आपणही वागावें, किंवा असावें असल्या वेडसर व त्रासदायक समजु-तीचा अभाव, इत्यादिकांमुळें, तिजविषयींचा माझा प्रेम जास्त जास्तच वाढत असे. जन्माच्याच गांठी पडलेल्या, तेंव्हां एखाददुसरी स्वभावांतली खोड निमूटपणें सोसलीच पाहिजे हा एक माझ्या मनाचा निर्धार, आणि इतरांच्या कुटुंबां-तील गृहिणींशीं माझ्या गृहिणीची मीच आपल्या मनाशीं केलेली तुलना करी यांमुळें माझी गृहिणी मला पु-ष्कळ चांगली वाटे. तिच्यांत कोणते गुण चांगले आहेत, हें मी नीट पाहून त्यांचें कौतुक मानी. तिच्यांत अमुक गुण आहेत, किंवा अमुक नाहींत, याचा मीं फारसा कधीं विचार केला नाहीं. तिच्या नैसर्गिक चांगुलपणाकडे माझी दृष्टि जास्त असे. तिच्यांत नसलेल्या गुणांबद्दल मी खेद करीत बसलों नाहीं, तर त्या गुणांचें तिच्यांत वास्तव्य कसें होईल

ह्मणून विचार करून त्याप्रमाणें प्रयत्नास लागे. त्या गुणांचें अमक्याअमक्या ठिकाणीं असेंअसें वास्तव्य आहे, त्यामुळें अमकें अमकें होतें, इत्यादि, सौम्यपणानें आणि आनंदांत असते वेळीं मीं ह्मणावें, त्यामुळें ते गुण आपणांत आहेत, असें दाखविण्याची तिला सहज स्फूर्ति होई, व तसें दाखविण्याच्या प्रयत्नामुळें ते गुण तिच्यांत सहज येत. आतां केव्हां केव्हां दुराग्रहानें व आमच्या गरीबीचा कांहींएक विचार न करितां ती एखादा दुसरा हट्ट घेऊन बसे, पण तिकडे मीं फारसें लक्ष दिलें नाहीं. तिच्या इतर सद्गुणांकडे पाहिलें म्हणजे— किंवा बोलून चालून स्त्रीजातच ती, हा विचार मनांत आला ह्मणजे—तिच्या अज्ञानजन्य एकाद्या शुष्क खोडीचें मला बिलकुल वाईट वाटत नसे. तिची ती सुप्रसन्न मुद्रा, तें गृहदाक्षिण्य व साधारण सुजनपणा हीं माझ्या एकंदर प्रपंचसुखाचें मुख्य साधन, ही माझी पक्की समजूत ठरलेली. एकंदरींत गृहिणीसंबंधानें माझ्या मनांत पूज्यभाव, खरें प्रेम आणि वास्तविक अभिमान पूर्णपणें वसत असे, शिवाय साधारण नियमानुसार आह्मां दंपत्यांतील प्रेम वयोमानाप्रमाणें दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणावरच असे. नहून कमती कधीं झालें नाहीं. आह्मां उभयतांत एखादा वाद उत्पन्न होऊन तो विकोपास जावा, आणि त्यामुळें कुटुंबांत कांहीं काळपर्यंत चिंता, क्लेश, खेद किंवा वैताग उत्पन्न होऊन सर्वांस काळजी पडावी, असा अलीकडे अलीकडे घडलेला प्रसंग माझ्या तर आठवणींत नाहीं. असंतुष्ट होऊन सदा जळफळ करीत आपणांबरोबर इतरांच्या आनंदाला विरजण घालण्याचा प्रकार, अज्ञान

बायकांत, दागिन्यांचा वेडा सोस फाजील व अनावर असला ह्मणजे, होत असतो. पण तशी माझ्या घरची स्थिति नव्हती, हें माझें मोठें सुभाग्य ह्मणावयाचें. श्रीकृष्णाबाईच्या पवित्र तीरीं वास, स्वतंत्रपणा, लहान पण टुमदार स्वतःचें घर, भाजीपाल्याची आणि तुळशीफुलांची सोय असलेलें छोटेंसें परसूं, फारशी दगदग आणि मेहनत न करितां घरच्याघरीं बसून होणारें अयाचित द्रव्योपार्जन, खेळाडू व सशक्त पोरांच्या निरनिराळ्या लीला, व माझें तिच्यावरील निस्सीम आणि एकनिष्ठ प्रेम, यामुळें तिला बरीच धन्यता वाटे; आणि तिच्या सदा आनंदित मुद्रेवरून तिला ह्या असलेल्या सुखांतच पूर्ण समाधान असावें असें दिसे. तिसऱ्या प्रहरानंतर इकडल्या तिकडल्या कांहीं रिकाम्या गप्पा झोडण्याच्या मिषानें सहज एखादी तपकिरीची चिमूट ओढण्यास मिळेल तर पहावी ह्मणून गांवांतील कांहीं भिक्षुक मंडळी मजकडे येत असे, व सहज बोलतां बोलतां बराच वेळही पण निघून जाई. तथापि त्या गप्पांचा, किंवा परान्नपुष्टतेमुळें बरींच पुढें सरसावलेलीं पोटांचीं डेरकीं सहज तोललीं जावीं ह्मणून जेठे मारून बसलेल्या मंडळीचा, तिला कधीं कंटाळा आला असें माझ्या तर आठवणींत नाहीं. एवढेंच नव्हे तर आमच्या त्या इकडल्या तिकडल्या रिकामटेकड्या गप्पांचें तिला उलट कौतुक वाटावें. व्यंजन पदार्थांवर झोड दिल्यानें किंवा जडान्नाची विशेष भर पडल्यामुळें मंडळीला तृषा विशेष लागे, ह्मणून बांधलेला जेठा जरा ढिला करून आपल्या दोंदिल पोटांची इकडे तिकडे थोडीशी हालचाल कोणी करतो न करतो तोंच लहान

मुलीला आंतून नीटनेटका परकर नेसवून नाक तोंड साफ धुतलेल्या मुलीच्या हातीं स्वच्छ पाण्यानें भरलेला गडवा देऊन तिजबरोबर कांहीं अंतर चालून हळूच 'जा, त्या तिकडे तांब्या नेऊन ठेव.' असें ह्मणत मुलीला माझी बायको बाहेर पाठवी; आणि आपण, आपल्या मुलीच्या स्वरूपाबद्दल किंवा शहाणपणाबद्दल कोणी तरी खास आतां वाहवा करणार ती ऐकून संतोष व धन्यता मिळवावी ह्मणून, दारा आड ती उभी राहत असे. पण मंडळींत कोणी साधारण चलाख मनुष्य नसला ह्मणजे तो तांब्या आणणाऱ्या मुलीबद्दल कोणीच कांहीं उद्गार काढावयाचा नाहीं, आणि काढलाच तर 'काय हो त्रिंबकभटजी! हा नाशिकचा का सांगलीचा गडवा? घाट तर मोठा सुबक आहे बुवा! भाव सव्वा शेरच ना? आपल्यालाही एक असला पाहिजे खरा.' असें ह्मणावें, नाहीं तर, 'वः पाणी मोठें गार आहे! आज गोड फार झालें त्यानें तृषा अधिकच लागत आहे.' असें ह्मणावें; यामुळें तिचा व्यर्थ हिरमोड होई; पण मीं तरी त्याला काय करावें? तथापि त्या मंडळीच्या हमेश येण्याचा तिला तिटकारा कधींही आला नाहीं, यामुळें माझ्या मित्रांच्यासंबंधानें ह्मणजे अर्थात माझ्यासंबंधानें तिचा किती पूज्यभाव होता हें चांगलें व्यक्त होतें. शिवाय माझें राहणें पडलें वांईत, ह्मणून पाहुण्याराउळ्यांचाही नेहमीं रगाडा असावयाचाच. आह्मी जात्या पडलों वैदिक, तेव्हां आमच्या घरीं येणारे-जाणारे वैदिकच असावयाचे, आणि वैदिक पाहुणे ह्मणजे काय? त्यांचें जपजाप्य नेमनिष्ठा पुष्कळ, तीं सारीं संभाळावीं लागतात. त्यांतून येणारे पाहुणे सर्वच ह्मणजे परके असें

नाहीं. कित्येक आप्त भाऊबंद असत. ते कोंकणांतून देशावर आले कीं, बहुशः आमच्या घरीं चार आठ दिवस तरी उतरावयाचेच, आणि येतांनां एक दोन 'हुंड्या' वर आणावयाचे. भाउबंदांपैकीं पाहुणा येऊन उतरला कीं, त्यानें अगोदर सर्वांस एकीकडे व्हा ह्मणून सांगावयाचें आणि नंतर अमक्याचा अमका तो तमक्याचा तमका अशातशानें मेला, आतां फक्त 'स्नानात् शुद्धिः' असें सांगितलेंच. स्नानापेक्षां जास्त त्रासाच्या हुंड्या पाहुण्याबरोबर क्वचितच येत, कारण तशानें त्यांच्याच 'मर्म' ची अडचण पडावयाची आणि उलट आह्मां सर्वांची थोडीबहुत खटपट वर करावी लागणार; तेव्हां येत त्या बहुतेक 'दर्शनी हुंड्या'च येत हें एक बरें असे. मात्र तितक्या वेळां पंचगव्य घेऊन जानवीं घालावीं लागत ह्मणून मुलें कंटाळत! दुसरे पाहुणे येत त्यांपैकीं कोणाचें दीड प्रहर लिंगार्चन, कोणाचें अथर्वशीर्षानें गणपतिपूजन, कोणाचें आवर्तन, असें कोणाचें कांहीं कोणाचें कांहीं असावयाचेंच. तितक्या सर्वांचें आन्हिक आटोपून जेवणाची वेळ व्हावयाची तोंवर पोरें भुकेनें कंटाळून आईला जीव पुरेसा करीत. 'आई मला भूक' ह्मणून त्यांनीं तिचा पिच्छा पुरवावा आणि इनें आतां वाढतें, क्षणभरानें वाढतें, असे वायद्यावर वायदे करीत असावें, पण त्या पाहुण्यांबद्दल कंटाळ्याचा चकारशब्द देखील तिनें तोंडावाटे काढूं नये. एखादे वेळ मी देखील अशा पाहुण्यांबद्दल कंटाळें, पण त्या वेळीं तिनें त्यांचा पक्ष घेऊन माझ्याशीं भांडत असावें. ही खरोखर तिची सुजनताच. 'आपल्या ओळखीदेखीचे नात्यागोत्याचे ह्मणून आपल्या घरीं

येतात, नाहीं तर कोण कोणाच्या घरीं जातें आणि येतें ?' असें ह्मणून मी संतापल्या वेळीं तिनें माझी समजूत काढावी, अशी तिची भलाई. आणखी येणारे पाहुणे तरी सुसंपन्न धट्टे कट्टे ह्मणावें तर तसेंही नाहीं. सुस्थितींत आमची आठवण धरून इतकें लांब येणार तरी कोण? पागोटें आहे तर जोडा नाहीं, तांब्या आहे तर पळी नाहीं, पळी आहे तर पंचपात्री नाहीं, अशी किंवा आम्लपित्तानें बेजार झालेले, संग्रहणीनें खंगलेले, क्षयानें क्षीण झालेले, असली ही मंडळी दूरदूरचें नातें कोरकोरून काढीत येत असे; पण त्या सर्वांबद्दल माझ्या बायकोचा आपला पूज्यभाव. ती ह्मणे कशी झाली तरी ही आपल्या सासरची मंडळी. त्यांची बरदास्त राखणें आपल्या देवाला सुद्धां चुकावयाचें नाहीं. घरीं असलेली भाजीभाकरी करून घालणें माझें काम. व्यर्थ त्यांत टंगळमंगळ कां करावी ? ही तिची समजूत माझ्या लौकिकास बरीच कारणीभूत होत असे.

ह्या गुणवती व समजूतदार स्त्रीपासून मला एकंदर पांच अपत्यें झालीं. तीन मुलगे व दोन मुली. सर्वांत वडील पुत्राचें नांव गोविंदा. प्रथम अपत्याचें नांव आईबापांनीं घेऊं नये ह्मणून मी त्याला 'मुला' ह्मणें आणि त्याची आई त्याला 'बाळा' ह्या नांवानें हांक मारी. एक प्रकारच्या मर्यादेमुळें प्रथमच्या एक दोन मुलांबरोबर बापाची घसट फारच कमी असते; अशांतलाच माझाही प्रकार होता. मुलगा आठ वर्षांचा झाला तेव्हां त्याचा व्रतबंध केला. ब्राह्मणाला अवश्य अशी पुरुषसूक्त वगैरे वैदिक विद्या त्याला मीं स्वतःच शिकविली. माझ्या मनांतून त्याला वैद्य करावयाचें

फार होतें, कारण आपल्या घरांत आजपर्यंत कोणीच वैद्य झाला नाहीं, हें कांहीं ठीक नाहीं; शिवाय हा धंदा मोठ्या प्रतिष्ठेचा, फार फायद्याचा, व अतिशय उपयोगी. नशीबानुसार एखाद्या गुरूचा अनुग्रह होईल, तर आमची पुण्याई मोठी असें मला वारंवार वाटावें. आणि त्यांतून अलीकडे अलीकडे आह्मां वैदिक ब्राह्मणांचें तेज फार कमी झालें आहे. रमणा नाहीं, कांहीं नाहीं. आमच्या वांईतच पूर्वी कोण चंगळ होती, पण आतां कोणी विचारीत नाहीं. तर ह्या उतरती कळा लागलेल्या भिक्षुकी धंद्यापेक्षां वैद्यकीच हजार वाट्यांनीं बरी ही माझी समजूत. मुलाचेंही लक्ष कांहीं तिकडे नाहीं. जन्मापासून ह्याचें सारें वळण पाहतों तों गृहस्थी थाटावर. घेतलेल्या आमंत्रणाला जाण्याचा कंटाळा; गेलाच तर अर्धमुर्धेच जेवी, नाहीं तर दक्षणाच न घेतां तडक हात हालवीत घरीं यावयाचा. असे त्याचे आह्मां वैदिकांस न शोभणारे पुष्कळ दुर्गुण असत. पण आह्मीं ह्मणावें ' पोर आहे, जाऊं द्या. उद्यां समजूं लागलें ह्मणजे आपसुकच शाहणा होईल !' पण ही आमची आशा व्यर्थ ठरली. अगोदर आमच्या पिढीजाद वैदिकीचाच त्याला कंटाळा आहे असें दिसूं लागलें, आमंत्रण आलें तर पत्करावयाचें नाहीं. घरीं शिळी भाकर खाण्यास तयारी, पण घाटावरले लाडू नकोत. भटाब्राह्मणांची निंदा करावी, ते अधाशीच ह्मणावें; खादाड आहेत, दोन तीन वेळचें एकदांच खातात, आगंतुकी लावून अन्न झोडतात, असें ह्मणून त्यांची टवाळकी करावी. दुसरे दोन मुलगे तर लहानच. त्यांच्याबद्दल अधिक काय

बोलावयाचें ? मुलींपैकीं वडील मुलीचें नांव आवडी. एखाद्या पवित्र नदीचें किंवा दुसरें नांव ठेवावें ही माझी इच्छा, पण माझ्या बायकोला ती मुलगी फार आवडे ह्मणून आवडी ह्याच नांवानें तिला हांक मारण्याचा प्रघात पडला. नाशिक येथील वासुदेवभट नांवाच्या एका सात्विक व साधारण खाऊन पिऊन सुखी गृहस्थाच्या वडील मुलाशीं आमच्या आवडीचा तिच्या आठव्या वर्षी विवाह लावून दिला. लग्न झालें ह्मणजे मुलीवरील आमचा ताबा चुकलाच; पण आंतड्याच्या ओढीनें तिला होईल तितकें करून माहेरीं वारंवार आणण्याचा आह्मीं यत्न करावा. आवडी पांचपन्नास बायकांत बायको असे, आणि सासरच्यांनींही आपल्या ऐपतीप्रमाणें तिला पिंवळी केली होती. ह्या आपल्या मुलीचा सुग्रणपणा, व्याह्याची ऐट, जांवयाच्या असत्या नसत्या गुणांचें वर्णन सदानकदा शेजाऱ्यापाजाऱ्यांपाशीं करण्यांत माझ्या बायकोला मोठीच फुशारकी वाटत असे. दुसरी मुलगी बगी, ही वयानें सहा वर्षांची. लग्नाला अद्याप २।३ वर्षें तरी अवकाश होता. वडील बहिणीपेक्षां ही स्वरूपानें कांकणभर अधिकच, आणि बोलण्यासवरण्यांत अगदीं पटाईत व चतुर. बगीला घर गृहस्थाचें पहावयाचें; हुंडा अधिक पडला तरी पुरवला; जांवई शहाणा पाहिजे; तो नाजुक असावा, रांकट असूं नये, दीर फार उपयोगाचे नाहींत, सासू द्वाष्ट नको, असें स्थळ आतांपासून माझ्या बगीला पहा, ही माझ्या डोक्याशीं माझ्या बायकोची नेहमींची कटकट. मी ह्मणें 'अग! अशी गडबड कां ? अजून लग्नाला दोन वर्षें अवकाश आहे. तेवढ्यांत येईल पाहतां.

विधिघटना कांहीं चुकावयाची नाहीं. आदल्या जन्मींच्या गांठी असतील तसें घडून आल्याशिवाय कांहीं रहावयाचें नाहीं.' अशी मीं तिची समजूत काढावी. तेवढ्या-पुरतें तिनेंही हूं-हूं ह्मणावें. पण ती वेळ गेली कीं लगेच कांहीं वेळानें किंवा दिवसांनीं 'सोन्याचा पट्टा मिळेल असंच बगडीला घर पहायाचंना?' हा तिचा प्रश्न असाव-याचाच, अशी तिची उताविळ स्थिति. आतां खुद्द माझ्या-संबंधानें सांगावयाचें उरलें, पण त्याची गरज नाहीं. प्रसं-गोपात्त घडलेल्या गोष्टींत तें सारें अनायासें येतें, मग तें येथें कशाला आणखी निराळें सांगूं?

## प्रकरण २ रें.

### 'परदेशीं भीक बरी'!

आशरतक्री माझ्या कुटुंबाची आणि त्यांतल्या प्रत्येक व्यक्तीची कीडथोडी हकीकत सांगितली. यावरून माझी ऐपत आणि कुटुंबपोषणाचे उद्योग कोणते असत हें साधारणपणें सर्वांस कळलेंच असेल. भिक्षुकी ह्मणजे अगोदर सर्वतोपरी दुस-ऱ्यांच्या द्रव्यावर चालणारा धंदा. धर्म करावा अशी वासना लोकांना व्हावी आणि त्यांची नजर माझ्याकडे यावी तेव्हां चारदोन आणे मिळावयाचे. अध्ययन दशग्रंथांचें. मग एका छत्रपतीकरितां तर दारोदार जावयाचें नाहीं, किंवा पुढें पुढें

करून सोंवळेंभांडें फेंकून आगंतुकी लावावयाची नाहीं, किंवा खोटी खुशामत करावयाची नाहीं. आपण होऊन गुण जाणणारे धर्मात्मे दिवसेंदिवस कमी होत चालले. वांईस श्रीमान पूर्वी येत असत तसे आतां कोणी येत नाहींत. परीक्षा घेऊन दक्षिणा नाहीं, शालजोडी नाहीं, धोतरजोडा नाहीं, कांहीं नाहीं. असें होऊं लागून घरीं संसार चालणें कठिण होऊं लागलें. घरीं चार कच्चींबच्चीं. संसार वाढता, आणि उत्पन्न संपुष्टांत येत चाललेलें. तेव्हां आतां करावें कसें ही काळजी नित्य लागलेली. माझ्या बायकोलाही माझी कशी त्रेधा उडते हें चांगलें कळे. आजपर्यंत कर्ज-वाम नाहीं. आतां तशा नेकीनें दिवस जाणें कठिण. ह्याची रात्रंदिवस मला काळजी होती, तशीच तिला असे. आणि ती आपल्यापरी हात राखून खर्च करवेल तितका करण्याचा यत्न करी, पण तें व्हावें कसें? हात आंखडून धरावयाचा तो कोठें? देवाच्या नीरांजनांत तूप कमी घाल, कोठें नंदादीपाची वात लहान कर, येथून अगोदर सुरवात करावयाची आणि सणाच्या दिवशीं नुसत्या पांढऱ्या पोळीच्या धिरड्यांवर ढकलावयाचें. घरांत जिन्नस असतांनांच नवीन आणावयाला सांगावयाचे ते अगदीं संपल्यावर एकदोन दिवस उसनवारीवर ढकलून, मग 'आणा' माझ्या पाठीस लावावयाचा. अशानें कोठें कांहीं खर्च कमी होतो? तिच्या जिवाची दगदग व मला कोरडी काळजी ही अशीच चाल-लेली. ती आतां किती ह्मणून सांगावी? रोजरोज आमंत्रणें यावयाचीं तीं येईनात. दक्षणा मिळावयाची ती फारशी मिळेना. मग उत्पन्न व्हावें कोठून? होतहोत सुदामपणाच

साक्षात् आतां आमच्या घरीं येतो कीं काय असें वाटूं लागलें. आपली स्थिति लोकांना कळूं नये या हेतूनें, दुसरीं आतांच घेण्याला सवड नाहीं ह्मणून आह्मीं पूर्वीं बासनांत ह्मणून ठेविलेलीं उंची वस्त्रें वापरूं लागलों. त्यामुळें गांवांतही बरीच चर्चा होऊं लागली. कर्ज काढण्याचा जन्मांत संस्कार घडला नव्हता तो आतां कपाळीं आला. आतां कसें करावें ही रात्रंदिवस चिंता. 'फुलें विकलीं तेथेंच शेण्या विकाव्या लागतात' ही भीति. तेव्हां आतां पुढें काय व्यवस्था? असा विचार करीत मी एक दिवस बसलों होतों. उद्यां बाजार, जवळ तर कांहीं नाहीं, आतां काय करावें, कोणापाशीं कसें मागावें, ही विवंचना चाललेली. इतक्यांत पुण्याचा एक पाहुणा आला. घरांत सामानसुमान लावल्यावर त्याला 'पाणी-गूळ' दिलें. नंतर इकडच्या तिकडच्या गोष्टी चालल्या. 'पुण्यास पाठशाळा आहे. तेथें शिकून तयार झालें कीं, मोठमोठ्या नोकऱ्या मिळतात. त्यांतून थोडथोडकें इंग्रजी शिकलें कीं, सदरअमीनी, मामलेदारी, दप्तरदारी, शिरस्तेदारी वगैरे जागा मिळतात. परवां त्या अमक्या भटजीच्या तमक्या मुलाला असली जागा मिळाली, इतका पगार मिळाला. तुह्मी असें कां करतां? बाळ्या तर मोठा चलाख दिसतो, आणि त्याचें घरचें ह्मणणेंही झालें ह्मणतां, तर याना पुण्याच्या पाठशाळेंत पाठवून? तेथें तुमचे यजमानही अनायासें आहेतच. करतील त्याच्या पोटापाण्याची तजवीज, आणि निघाला रोजगारी तर फिटेल तुमच्या जन्माचें दरिद्र. साहेब ते म्लेंछ, त्यांची नोकरी कशी करावी हा नका विचार मनांत आणूं. इंग्रज

प्रभू. हल्लीं पृथ्वीपति आहेत, आणि पृथ्वीपति ह्मणजे तर साक्षात विष्णूचाच अंश. कशाला आणतां रिकाम्या शंका? करा मनाचा धडा आणि द्याच त्याला पाठवून. मी सांगतों ऐका.' असें त्याचें भाषण ऐकून मला तें बोलणें पक्कें रुचलें आणि मग मीं ह्मटलें 'खरेंच कां मोरोबा! मुलास, शिकला तर पांचपंचविसांची नोकरी लागेल? आणि नोकरी लागल्यावर आपलें जाईलना सारें दरिद्र? असे प्रश्न मी करीत आहें तोंच या कल्पनेच्या भावी परिणामाचीं सर्व सुखदायक फळें माझ्या गडबड्या आणि चंचळ मनानें ताडिलीं. माझा मुलगा पुण्यास गेला की शाहणा होणार आणि तसा शाहणा झाला कीं पांचपन्नासांची नोकरी त्याला मिळालीच असें समज, ह्मणून माझें मन मला ठासठासून सांगूं लागलें. मी कोणत्याही गोष्टीचा विचार इतक्या उताविळपणानें आजपर्यंत केला नव्हता; पण आतां फक्त कल्पना किती मनःपूत! मनानें सांगितलेलीं विधानें पक्क्या ज्योतिष्याच्या सांगण्याप्रमाणें सत्य वाटूं लागलीं. हा दोष आहे असें माझा मीच ह्मणतों. पण खुद्द माझा नव्हे, त्या महाप्रतापी दारिद्र्याचा. मोरोबाची ही युक्ति ऐकतांच माझें सर्व लक्ष त्या गोष्टीकडे लागलें. क्रमाला आवृत्ति द्यावयाची ती तशीच राहिली. उद्यांच्या बाजाराची तजवीज कशी, हा विचार पार गेला निघून, आणि मीं मध्येंच मोठ्या स्वरानें ह्मटलें, 'कायग ए! ऐकलंस कां हे मोरोबा काय ह्मणतात तें? मुलाला मग देऊं पाठवून पुण्याला?' ह्या माझ्या प्रश्नाला ती ह्मणाली 'पुण्याला जाऊन करायचं काय? शाळा शिकायचीना? तो विचार पहा मागाहून.

अगोदर मुलगा मोठा होत चालला त्याच्या लग्नाची कांहीं तरी तजवीज कराल कीं नाहीं ? सखुबाई फार गळीं पडते, तिला ह्मटलें द्यावा रुकार. माझे सर्व सोहाळे ती चांगले करील आणि आपल्या जांवयाचेंही पुष्कळ कौतुक करील. मुलगी दिसते आज काळी न विद्री, उद्यां आपल्यापणांत आली ह्मणजे पहा तीच कशी चांगली दिसेल! आतां कांहीं बाई बाळ्याला असाच घोडनवरा फार दिवस ठेवायचा नाहीं. लोकं सारीं हंसतात. घाटांवर गेलें कीं, विचविचारून बायका मला पुरेपुरे करितात. 'काय हो अनपुर्णाबाई बाळ्याचें लगीन तें आतां कधीं करणार? ह्या त्यांच्या प्रश्नाला उत्तरें मी देऊं तरी कितीकदां आणि काय ! तें कांहीं नाहीं. अगोदर करा, यंदां दोन्हीचे आमच्या डोळ्यांदेखत चार हात. मग शिकवा त्याला शाळा न काय हवें तें. हीं दोन वर्षें गेलीं कीं नाहीं, मग मी सांगतें ऐका, माझ्या बाळ्याचें कांहीं लगीन होणार नाहीं.' ह्या तिच्या ह्मणण्याला मीं काय उत्तर द्यावें ? माझा विचार एक तर हिचा भलताच. आणि तेंही खरेंच कीं एकदां तेवढें कार्य आटोपून घेतलें ह्मणजे मग झाली दुसऱ्याच्या मुंजीपर्यंत आणि बगीच्या लग्नापर्यंत निश्चिती. पण एकदां असेंही वाटे कीं आपण मुलाच्या लग्नाच्या भरीस पडूंच नये. ज्याचा तो मिळविता झाला ह्मणजे घेईल करून. ही समजूतही कायम टिकेना. अगोदर हा टाकावयाचा खाक्या उरकून; असाही विचार पुढें तयार. मीं तिला ह्मटलें, 'तुझ्या सखूबाईची लेंक म्हणतेस खरी, पण तीच कीं नाहीं, परवा लाहिपिठाचें गाडगें मागायला आलेली मुलगी? अं: ती तर काळी-

नबिळी कशीशीच आहे.' ह्याला तिनें उत्तर दिलें. 'आहे काळी ह्मणून तिला काय झालें? शाहणी मोठी आहे हो. आणि तिच्या बापाजवळ मायाही बरीच आहे. बनी एकुलति मुलगी, लग्न मोठ्या कडाक्याचें फार हौशीनें होईल, म्हणून म्हणतें.' मीं म्हटलें 'अग होय, तें सारं खरं, पण मुलाला तर ती आवडली पाहिजेना? तुझ्या मनासारखी तूं त्याला बायको केलीस आणि ती त्याला आवडली नाहीं तर?' 'इश्श–मुलाला काय आवडायची,' ती म्हणाली, 'आपणाला पसंत पडली म्हणजे झालें. बाळ्या काय पोर, त्याला कसली आतांच आवड आणि निवड?' ह्या तिच्या बोलण्याला मी बरेंच खरपुस उत्तर दिलें. दुसरीं दोन स्थळें आलींच होतीं, आणि हें तिनें आणिलेलें स्थळ मला बिलकुल पसंत नव्हतें. आपणच अगदीं साफ नको कशाला म्हणा आणि तिचें मन दुखवा, म्हणून मींही तिच्याशीं जास्त वाद घातला नाहीं. घटित पाहतांनां सर्व कांहीं आपल्या हातीं असतें, तर आतांच कां उगीच काथ्याकूट, म्हणून मींच आपलें आवरतें घेतलें. तीही आंतल्या कामाला निघून गेली. मीं तिला विचारिलें एका गोष्टीबद्दल, आणि मध्येंच निघालें दुसरें, म्हणून मला किंचित् आचंबा वाटला, आणि हा लग्नाचा एक नवीन घोर पाठीमागें लागला. काळज्या काळज्या म्हणून कोणकोणत्या तरी मी करूं? पण ह्या सर्व काळज्यांच्या विचारांत मुलाच्या विद्येबद्दल विचार येऊन पुढें असें होईल तसें होईल या कल्पनांच्या योगानें माझ्या त्रस्त मनाला मोठी करमणूक वाटे. भावी सुखाच्या नुसत्या कल्पनेनें जें एक प्रकारचें मानसिक

सुख होतें त्याचा चवथा हिस्सा तरी कल्पिलेली स्थिति प्राप्त झाल्यावर तें सुख अनुभवास येते कीं नाहीं याची मला शंकाच दिसते. मोरोबा जवळ बसलेले; त्यांनीं हें सर्व ऐकिलेंच होतें. ते म्हणाले अप्पा, गोंदूचें लग्न करून घ्यावें हें बरें. दोन तीन स्थळें अनायासें सांगून आलीं आहेत. त्यांतलें करा एक पसंत, आणि घ्या तेवढें कार्य उरकून. मग त्याला पुण्यास पाठविण्यालाही ठीक पडेल. करील चार अक्षरें तर घेईल आपलें आणि आपल्या बायकोचें पोट भरून. मीं म्हटलें ' होय मोरोबा तें सर्व खरें, तुमचा आमचा घरोबा म्हणून ह्या गोष्टी बोलावयाच्या. दिवस पाहतां ना कसे आहेत ते? ' बगीचें लग्न आलें तें अगोदर करून घ्यावें कीं मुलाचें? मुलाचें राहील एकदोन वर्षें; तसें तर मुलीचें नाहींना? आणखी द्रव्याची अडचण काय आहे हें तर तुम्हांला दिसतेंच आहे. मग असें काय म्हणतां? मोरोबा म्हणाले अप्पा तो विचार निराळा. हा वडील मुलगा, याचें घ्या अगोदर उरकून. मुलीचें काय? आहे अजून दोन वर्षें अवकाश; आणि पाहिजे तर मी तिला चांगलें सुस्थळ पाहीन, त्याची नको तुम्हांला काळजी. आला मार्गशीर्षाचा महिना, पहा साधलें तर गडबडींतल्या गडबडींत. हा मोरोबाचा विचार मलाही पसंत पडला; पण तो पसंत पडला म्हणजे काय? काळजी आणि रिकामा घोर पाठीमागें लावून घेतला. एवढें बोलणें झाल्यावर कांहीं वेळानें मोरोबा बाहेर जाण्याला पागोटें घालून तयार झाले, आणि मीही तपकिरीची एक चिमूट ओढून पुनः विचार करावयास लागलों. इकडे तिकडे विचार करतां करतां गोविंदरा-

वाच्या मुलीचा घटितार्थ पाहिलाच होता, आणि मुलगीही चारचौघींसारखी होती, तेंच स्थळ पक्कें ठरवून एवढें कार्य आटपून घ्यावें आणि मग मुलाला घेऊन सर्वांनींच पुण्यास जावें, तेथेंच आपला चरितार्थ चांगला चालेल; मुलांचा विद्याभ्यास होईल आणि बगीला एखादें सुस्थळही तिच्या प्रारब्धयोगानें मिळावयाचें असेल तर मिळेल; एकट्या मुलाला कोठें पाठवावा? सर्वांनींच जाऊन रहावें, झाली उपासमार तर झाली, निदान बाहेर ठिकाणीं होवो असा पक्का विचार शेवटीं ठरला. बेत माझ्या मनानें मीं केला, पण पुढें भवितव्यता कशी काय कोण जाणे? आपापल्यापरी बेत आम्हीं करावे पण पुढें घडून यावयाचें तें येतें. हा अनुभव एकदां दोनदां नव्हे, पुष्कळ वेळां सर्वांना येतो, पण कोणताही नक्की बेत ठरतांच मनाला एका प्रकारची हुषारी येते. चोहोंकडून काळज्यांचें काहूर उठत असतें तें नाहींसें होऊन एकच काळजी राहते. आणि तसें झालें म्हणजे मी म्हणतों तें एका रीतीनें बरें. माझा असा हा बेत ठरतांच मी चटकन् उठून आंत गेलों, व माझी स्त्री घरकाम करीत होती तिला म्हटलें. ‘ मुलाचें यंदां तुझ्या म्हणण्याप्रमाणें लग्न करावें आणि नंतर सर्वांनीं पुण्यास जाऊन राहावें. तें मोठें शहर आहे, विद्या शिकण्याची पण सोय आहे, आणि बगीच्या लग्नाचाही तेथें विचार करण्यास ठीक पडेल. ’ हे माझ्या तोंडांतून उद्गार निघाले मात्र तों तिला कोण आनंद झाला. स्थळ कोणतें, किंवा लग्न कोणत्या महिन्यांत आणि कोठें व्हावयाचें हें विचारून घ्यावयाचें दे-

खील बिचारीला भान राहिलें नाहीं. ‘ खरंच कां असं, बाळ्याच्या लग्नाचं ठरलं ? आईला धाडा बोलावूं, म्हणजे ती येतांच लागूं आम्ही सामानाच्या तयारीला. पहिल्या मुलाचं कार्य. ’ असे उद्गार तिनें मोठ्या लगबगीनें काढिले. मीं म्हटलें ‘ अग हो ! थांब तर खरी; अगोदर स्थळ कोणतें, नंतर मुहूर्त कोणता हें सारें ठरलें म्हणजे तुझ्या आईला पाठवूं बोलावयाला, समजलीस. गोविंदराव, ते निपाणकराच्या पलीकडच्या बोळांत राहतात ते, आहेत कां तुला माहीत ? ‘ त्यांची धाकटी मुलगी कशी काय आहे ? ’ ती म्हणाली ‘ कोण गोविंदराव ? म्हणजे राधाबाईचीच ती दुर्गी, नव्हे ? ’ मी म्हटलें हं-होय-असेल. ती म्हणाली ‘ पण ते सराफभाई. पैसा खर्च करावयाचे नाहींत. एक हौस नाहीं कीं कांहीं नाहीं. राधाबाई आहे बाई भली; तिला हौशी करावयाला पाहिजेत; ती किती म्हटलें तरी केलीसवरलेली बायको, पण तिचा नवरा तो गोविंदराव मात्र मोठा कवडीचुंबक. तो काय खर्च करतो आणि कसच्या आमच्या हौशी फिटतात ? ’ मीं म्हटलें, तें राहो तुझें स्वतःचें एकीकडे. अगोदर तुझ्या हौशीकरितां धडपडूं नको. मुलगी बरी आहे कां हें सांग म्हणजे झालें. ’ ती म्हणाली ‘ हो मुलगी छानदार, नाकाडोळ्यानें सुरेख आहे. सणंगाबद्दल माझी मुळींच तक्रार नाहीं. मानपान ठाकठीक झाला, जांवयाला पुष्कळ दिलें आणि सगळे सोहाळे यथासांग केले म्हणजे माझी कांहीं तक्रार नाहीं. ’ ह्या तिच्या बोलण्यावर मीं बराच वेळ बोलत राहिलों. पुढें गोविंदरावाचे कोणी

स्नेही असत त्यांच्या आणि आमच्या उभयतांच्या सल्ल्यानें लग्नाचा बेत ठरला. गोंदिरावानें सुपारी दिली. तिथि निश्चित झाली. गरिबीचा पडला विचार. उद्यांचं कसं ही भ्रांत, आणि त्यांत हें कार्य ठरविलेलें. माझी कोण त्रेधा उडाली, आणि वडिलांनीं जिवावेगळे करून पुरून ठेवलेल्या पांचशेंच्या रकमेवर आजपर्यंत न गेलेला डोळा अखेरीस गेला. पांचशेंपैकीं तीनशें मुलाच्या लग्नास खर्चावयाचे आणि बाकीचे पुण्यास बरोबर न्यावयाचे हें ठरलें. माझ्या स्त्रीनें 'खर्चाची व्यवस्था करावयाची' असें विचारिलें त्या वेळीं मीं ही युक्ती सांगितली. तिला ती पसंत नव्हती;पण वरमाय होऊन केव्हां एकदांची मिरवेन या वेडगळ आशेला गुंतून तिनें मोठ्या निरुपायानें रुकार दिला. लग्नाची तयारी झाली; मंडळी जमली. चार दिवस सर्व सोहाळे झाले. माझ्या बायकोचा असा असा मानपान झाला, व्याह्यानें अमुकअमुक केलें, मला असें तसें वाटलें वगैरे मी कशाला व्यर्थ सांगूं? ह्मणण्यासारखा तंटाबखेडा न होतां निर्विघ्नपणें कार्य पार पडलें. चार दिवस तूपपोळींत चैन झाली. आप्त इष्ट मंडळी घरीं जमली. सगळें खरें. माझ्यामागें रात्रंदिवस काळजी लागलेली. आतां कसें? पुढें निर्वाह कसा चालावा? पुण्याला जाण्याचें ठरविलें. येत जात भेटत सवरत ते सर्व ह्मणत 'कसेंही करा त्रिंबकभटजी, पण गोंदूला पुण्याच्या पाठशाळेंत पाठवा. तो पहा लौकरच सदरअमीन होईल.' ह्या त्यांच्या वरपांगी भाकिताचा मला खरेपणा वाटावा, ह्मणून पुण्यास जाण्याचें तर

ठरविलेंच होतें. मंडळी ह्मणे मुलाला एकटा तेथें कोणाच्या तरी घरीं ठेवा आणि तुह्मीं सर्व येथेंच रहा; त्याला लागली नौकरी कीं मग हवे तर चला त्याच्याबरोबर. हा त्यांचा विचार योग्य खरा पण आंतली स्थिति कोठें त्यांना माहीत होती? मुलाच्या अभ्यासाच्या निमित्तानें तरी मला हा गांव सोडतां येईल तर पहावें हा माझा विचार. कारण येथल्यापेक्षां पुण्यास चार-दोन पैसे तरी अधिक मिळतील, खर्च येथल्यापेक्षां हवातसा आटोपसर करितां येईल, आणि आपण होऊन कोठें जावयाचें नाहीं हा नियम मोडण्यासही बाहेरठिकाणीं अडचण पडावयाची नाहीं, हा विचार माझ्या मनांतला. माझ्या बायकोलाही हा माझा विचार मान्य होता, कारण तीही वांईला कंटाळली होती. पुणें शहर ह्मणतात तें कसें काय आहे हें तरी एकदां पहावें, तिथल्या बायका मोठ्या कुशळ ह्मणतात त्या कशा काय असतात त्याचा अनुभव बघावा, ही तिची इच्छा. मुलाचें तर काय विचारावयासच नको. घाटावरील आमंत्रणें व एका शिवराईकरितां लोकांच्या दारीं जावयाचें चुकेल तर त्याला पुष्कळ जाहलें होतें. पुण्यास हा वैदिकी धंद्याचा त्रास नसेल ही त्याची समजूत. सोयरेधायरे आप्तइष्ट यांची मात्र संमति मिळेना, पण मुलांच्या अभ्यासाकरितां जातों, स्वतः आह्मी गेल्याशिवाय तो नीट व्हावयाचा नाहीं, ह्या गोष्टी त्यांस समजावून सांगितल्या ह्मणजे ते 'जा हवे तर चार दिवस' असें मोठ्या नाइ-

लाजानें ह्मणत. तेव्हां सर्वांचा सल्ला वगैरे घेऊन पुण्यास जाण्याचा माझा बेत कायम झाला. प्रयाणमुहूर्त उत्तमसा पाहण्यास जोशीबुवांस सांगितलें. यजमानाकडे पुण्यास कोणा जाणाराबरोबर पत्र रवाना केलें, आणि मग निघण्याचा कोणता तो एक दिवस ठरवावयाचा एवढेंच उरलें.

---

# प्रकरण ३ रें.

## ‘ग्रामत्यागासारखें दुसरें दुःख नाहीं.’

उद्यांची पूर्णिमा होतांच द्वितीयेस किंवा तृतीयेस गर्गाचार्यांच्या मुहूर्तानें निघावें असें माझ्या आणि मोरोबाच्या मतें कायम ठरलें. परतभाड्याची गाडी मी पाहून येतों असें मोरोबा ह्मणाले. आमचा झालेला बेत मुलानें ऐकिला. आणि लगेच मोठ्या लगबगीनें आंत जाऊन ‘आई गुरुवारीं गांवाला जायचं ह्मणून बाबा आणि मोरूकाका बाहेर बोलताहेत’ असें इतक्या गडबडीनें आणि मोठ्यानें बोलला कीं, ते त्याचे शब्द आह्मांस बाहेर सदरेवर अगदीं स्पष्ट ऐकूं आले. इतकी गुलामाला गांवाला जाण्याची उत्सुकता. आणि तेवढें ऐकतांच हातचें काम तसेंच टाकून ‘होय कां उद्यांच्या ब्रस्पतवारीं जायचं? अग बाई मग कसं? आवडीच्या सासरचं बोलावणं तरी येऊं द्या कीं, असें ती आंतल्या दारांतून डोकावून पहात बोलली. मीं ह्मटलें ‘ हं. मोरोबा ह्मणतात तोच दिवस बरा आहे. जोशीबुवांनींही तोच मुहूर्त पसंत ठरविला, आणखी जावयाचेंच खरें तर

उशीर कां. चातुर्मासापूर्वीच चार महिने जावें हें बरें दिसतें. तोंवर चारचौघांची ओळखदेख होईल. आतां आवडीच्या सासरीं जाण्याबद्दल इतक्यांत बोलावणें येईल तर बरंच आहे. नाहीं तर ते शंकरदीक्षित जाणार आहेत उद्यांच्या उत्सावाला नाशकास. त्यांजबरोबर सांगूं पाठवून द्याह्यांस कीं, आह्मीं पुण्याला यजमानाकडे गेलों ह्मणून, ह्मणजे झालं.' त्यास मोरोबा बोलले 'होय वहिनी! अप्पा ह्मणतात हेंच बरें दिसतें. आवडीच्या सासरीं जाण्याखेरीज तुमची दुसरी कसली अडचण नाहींना? झालं तर मग काय?' एवढ्यानें तिची समजूत पटली नाहीं. ती ह्मणाली 'तें खरें भावोजी, पण यंदांच लग्न झालेलं. बारा सणांपैकीं दोनचार तरी इथं घ्यावेत. पुण्याला गेल्यावर इतकं लांब येतो कोण आणि आहे काय? सारं मग यथायथाच.' मी बोललों 'काय ती एवढीचना अडचण? नको ते आह्मांस बारा सण. त्या सगळ्या खर्चाच्या गोष्टी. तुमच्या होतात हौशी पण आमचा उडतो हौजा. तिथं गेलों तर शिकेल मुलगा चार अक्षरं जास्ती; मग पाहूं आपले सण आणि बीण. तुह्मी आपल्या लागा कशा बांधाबांधीच्या तयारीस. नेतां येईल आणि अवश्य तेवढेंच सामान घेऊं बरोबर, आणि बाकी सगळं ठेवूं इथंच कुलूप घालून, समजलं.? ठरला बेत हाच कायम.' हें माझें खणखणीत बोलणें ऐकून ती निरुत्तर—नाइलाजानेंच—झाली, आणि आंत आपल्या कामाला गेली. पुढें मी व मोरोबा तसेच बोलत बसलों. जाण्याचा बेत ठरलेला पाहून मुलांना मोठा आनंद झाला. पोरेंच तीं. त्यांना कसची काळजी? कोण-

तीही कां होईना, नवीन गोष्ट झाली कीं त्यांत त्यांचा आनंद. खर्चाची किंवा कसली तरी दगदग त्यांच्यामागें असती तर त्यांना त्याच्या बऱ्यावाइटाबद्दलचा विचार. आवडी आणि बगी, गांवाला जावयाचें असें कळतांच, धांवत मोठ्या लगबगीनें आपल्या आईकडे गेल्या आणि ह्मणाल्या 'आई! आह्मी आमच्या बाहुल्या, खेळणीं, गजगे आणि शिंपा यांचं एक घट्ट बोचकं करून घेतों अं. आणखी आई, वहिनी येणारना ग आमच्याबरोबर?' त्यांचें तें बोलणें ऐकतांच ती ह्मणाली, 'आवडे बाहेर जा, आणि विचार, ह्मणावं, मुलीला बरोबर न्यायचंना?' आवडीनें येऊन विचारण्यापूर्वींच ते शब्द माझ्या कानांवर पडले, ह्मणून आवडी बाहेर येण्याच्या अगोदरच मीं मोरोबांस पुसलें 'कायहो मोरोबा! घ्यावें कां मुलीलाही बरोबर? मी ह्मणतों नको आतांच. तिकडे आमचा चांगला जम बसतांच श्रावणमासीं बोलावणें पाठवून नेऊं ह्मणजे झालें. त्याचें काय इतकें?' मोरोबांनींही 'हं तसेंच' असें ह्मटलें तों इतक्यांत आवडीनें येऊन तिच्या आईनें सांगितलेल्या निरोपांत आपल्या इच्छेची झांक स्पष्ट दिसून येईल असा प्रकार केला. ती ह्मणाली 'बाबा, आई ह्मणते आणखी वहिनीला बरोबर न्यायचं, तर बोलावणं आज पाठवितां कीं उद्यां? मी जाऊं तिच्या घरीं बाबा?' मोरोबांशीं माझें चाललेलें बोलणें माझ्या बायकोनें आंतून ऐकिलें, आणि ती तशीच बाहेर येऊन ह्मणाली 'कायहो भावोजी! तुह्मी श्रावणमासीं बोलावणें पाठवितां येईल ह्मणतां, पण उद्यां चैत्रमासीं कसं? मुलीला माहेरीं कां रहावयाचें? चैत्र-

मासाला काय पूर्णिमा पूर्णिमा एक आणि अमावास्या पंधरा दिवस, दीड महिनाचना सारा अवकाश? मग बरोबर कां न्याना? पहिल्याच खेपेस नेआण करण्याची जिकीर चांगली का दिसते?' ह्या तिच्या नवीन प्रश्नावर मला जास्त विचार करावा लागला. ह्मणून मीं ह्मटलें 'मोरोबा मात्र ती ह्मणते तेंही खरें दिसतें. मग कसें करावयाचें? न्यावें बरोबर झालें, आणखी काय?' मोरोबांचा ह्याला रुकार पडला, आणि तिला थोडासा आनंद झाला. लेकी, लेक, सुना हीं सारीं घेऊन जसें काय लग्नालाच जावयाचें, अशी तिची समजूत होती कीं काय तें मला कळेना. असो. होय नाहीं करतांकरतां गांवाला जाण्याचा दिवस तोच कायम ठरला. तिची तयारी चालली. लग्नांत जमलेल्या खणांपैकीं कांहीं काढून घे आणि शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या घरीं कांहीं निमित्तनैमित्तिक पाहून देववतील तितके दे, असा तिनें क्रम चालविला. त्यांत कांहीं नुकसान नव्हतें. कारण त्याचा मोबदला तर तिला मिळावयाचाच. आपण जावयास निघण्याच्या दिवशीं मला इतक्या जणींनीं बोलबोलावून खणानें ओटी भरली ह्मणून ऐट मिरवितां यावी, हीच तिची इच्छा असावी असें मला वाटतें. कारण असें नसतें तर ती मला विचारून खण देती; पण तसें तिनें केलें नाहीं.

आज इतकीं वर्षें वांईत काढून आतां फक्त पोटाकरितां पोराच्या अभ्यासाच्या निमित्तानें बाहेर जाण्याचा प्रसंग आला हें पाहून मला फार वाईट वाटे.-'उन्हांत गेल्याशिवाय सावलीचें सुख कळत नाहीं' ह्मणतात तें कांहीं

खोटें नव्हे. आप्तइष्ट, सोयरेधायरे, शेजारीपाजारी, स्नेही-सोबती व इतर गणगोत यांच्या बऱ्यावाईट गुणांची, सतत सहवास व निकट सान्निध्य असेतोंपर्यंत, खरी किंमत कळत नाहीं. मी वांईत आज इतके दिवस होतों. त्या मंडळींत कोणांत कांहीं, कोणांत कांहीं व्यंग पाहून मला त्यांचा कंटाळा पुष्कळ वेळां येई. पण आतां मी गांवास जाण्याला निघालों यामुळें, काय चमत्कार आहे कोण जाणे, त्यांचें चांगले तेवढेंच गुण माझे नजरेपुढें येऊं लागत. अशानें घडणारा हा वियोग मला विशेष दुःसह वाटूं लागणें साहजिक आहे. आतां हल्लीं आहे अशी मंडळी पुण्यास कशी मिळेल, आणि ती मिळविण्यास किती वर्षें लागतील ह्या विचारानें पराकाष्ठेची चिंता व एक प्रकारची उद्विग्नता प्राप्त होई. गोविंदभट दोंदल्याचें तें चटकदार आणि थट्टेखोर बोलणें, रामभटाची आमच्याशीं सदा असलेली घसट, शंकररावाची ती माझ्यावरील भक्ति, घांटावर संध्येला जाण्यापूर्वीं आमच्या येथें येऊन चार घटका मजेनें बोलत बसण्याचा भिक्षुक मंडळीचा नित्य संप्रदाय, इत्यादि एकनी दोन गोष्टींची ह्मणून मला आठवण होऊन वाईट वाटे ह्मणून सांगूं? इतक्या काळजीनें व टापटीपीनें आज दिनपर्यंत स्वच्छ राखलेलें आमचें घर आतां तसें कसें राहील? परसांतील फुलझाडांची काळजी कोण घेणार? प्रसंगीं पैसा खर्चून व केव्हां केव्हां अनायासें मिळालेल्या बारीकसारीक जिनसा इतक्या लांब नेतां यावयाच्या नाहींत, आणि त्या येथेंच सोडाव्या तरी कठिण; घरीं उतरावयाला कोंकणचे कोणी येतील त्या वेळीं आह्मी

येथें नाहीं असें पाहून आमच्या जाण्याबद्दल ते बरीवाईट चर्चा करतील, व न जाणों कदाचित् निंदाही पण होईल, इत्यादि प्रकारच्या विवंचनेंत माझें मन सदा गढून गेलेलें असे. त्यामुळें वाटे काय कीं आतां द्वितीया येईल कधीं आणि आह्मी रस्त्याला लागूं केव्हां. मध्येंच, शेजारीं बसलेल्या मोरोबांस मीं ह्मटलें 'पाहिलेंत मोरोबा! या मायेचा काय चमत्कार आहे तो? अहो फार नाहीं चार दिवस पुण्यास जाईन ह्मणतों, पण तोंवर इथून घर सोडण्याचें कसें जिवावर येतें! आतां असें वाटतें, तर हा लोक चिरकाल सोडतांनां कसें वाटेल? आपल्याबरोबर कांहींएक यावयाचें नाहीं, जेथल्या तेथें सर्व पदार्थ तसेच पडून राहावयाचे, हें मीं पुष्कळ वेळां पाहिलें आहे, हें मला पक्कें कळतें. तथापि या तपकिरीच्या डबीचा देखील लोभ सुटत नाहीं, हा काय चमत्कार ह्मणावा? माया मोठी जबरदस्त खरी, आणि तिचा त्याग करणारे खरोखर दैवशाली आणि प्रतापवान! आह्मीं मूढ असेच इच्या कह्यांत सांपडून वारंवार जन्ममरणाच्या फेऱ्यांत अडकून राहणार. वेदपुरुषाच्या कृपेनें काय होईल तें खरें. एवढ्या माझ्या वेदांतविषयाला अनुसरून असणाऱ्या थोड्याशा उद्गारांवरून मोरोबांनीं आपल्या आवडत्या विषयाची केली सुरुवात. त्यांचें वेदांतावर चाललें मोठ्या आवेषाचें भाषण. इतक्यांत नित्यनियमाप्रमाणें मंडळीही लागली जमावयाला. मग काय विचारतां? त्या विषयाची जी काय चर्चा चालली ती 'न भूतो न भविष्यति.' ज्याला त्याला आपण वेदांती, मुमुक्षु, 'वेदांत जाणण्याची इच्छा असलेले', त्या विषयाचा

नाद फार, अशी प्रौढी मिरविण्याची मोठी हौस. कोठें कधीं तरीं ऐकलेला किंचितसा अवघड प्रश्न, केव्हां आणि कोणत्या ओघावर व कशा प्रसंगीं विचारावा याचें ज्ञान नसल्या कारणानें, कोणी मध्येंच विचारीत यामुळें त्या विषयाची आलेली बहार एकदम नाहींशी व्हावी. मी स्वतः वेदांती नव्हें खरा, पण त्यांत काय आहे व त्याची गोडी आणि उपयोग कोणता हें मला चांगलें माहीत असे. माझें ह्मणणें वेदांतविषय अपरिमित, आणि तो आकलन करणाऱ्यांची बुद्धि किती झाली तरी परिमित. अपरिमित विषयांचें परिमित बुद्धीस पूर्ण ज्ञान कसें होईल? तथापि तो जाणवेल तितका जाणून घ्यावा. कूटस्थ, आत्मा, अगोचर, ब्रह्म, इत्यादिकांच्या भानगडीपेक्षां श्रीभगवद्गीतेंत सांगितला आहे तेवढाच वेदांत मला पुष्कळ वाटें. विद्यारण्यस्वामींची पंचदशीच कशाला हवी? प्रबोधचंद्रोदय नाटक आणि गीता एवढाच माझा वेदांत. असो. कांहीं काळपर्यंत घडणाऱ्या वांईच्या वियोगाबद्दल माझ्या मनाला अस्वस्थता प्राप्त झाली होती ती या भाषणामुळें नाहींशीं झाली. तिचा मला विसर पडला. इतक्यांत संध्येस जाणारी मंडळी उठली, तों गोविंदभटानें विचारिलें 'अप्पा, मग केलाच कां तुह्मीं जाण्याचा अखेरीला निश्चय?' नका बुवा आह्मांस सोडून तुह्मी जाऊं. तुह्मी गेलां ह्मणजे आह्मांला चैन पडावयाचें नाहीं. घांटावर जातांना रोज तुमची आठवण येईल.' मोरोबांनीं 'अहो, जाण्याचा दिवस देखील ठरला; गुरुवारीं ह्या वेळीं पुण्याच्या वाटेला ते लागलेले असतील.' असें कळवितांच ज्यांनीं त्यांनीं आपापल्यापरी

मीं जाऊं नये ह्मणून आग्रह केला. त्या सर्वांचें समाधान करतां करतांच त्या दिवशीं मी बेजार झालों. पूर्वी त्या सर्वांस हा माझा बेत कळविला होताच. पण आतां एकदम आमचा बेत नक्की ठरला, तेव्हां त्यांचें ह्मणणें पुन्हां असें असावयाचेंच. तितक्यांचें समाधान करतांनां मला एक प्रकारचा आनंद व कांहींसें दुःख होई. एकंदरींत फार दिवस एका ठिकाणीं राहिल्यानंतर दुसऱ्या ठिकाणीं जावयाचें ह्मणजे फार दुर्घट काम. बरेंच जून झालेलें रोप दुसऱ्या ठिकाणीं लाविल्यानें त्याची जी अवस्था होते तीच फार दिवस राहिलेली जागा सोडून दुसऱ्या ठिकाणीं राहण्यास जाणाऱ्यांची होते; किंवा एका झाडाची फांदी तोडून ती दुसऱ्या झाडाच्या फांदीस कलम करण्याकरितां जोडावयाची ह्मणजे तें तोडलेलें झाड आणि ती फांदी या उभयतांस क्लेश होतात, आणि ती फांदी ज्या झाडास जोडावयाची त्यालाही पण अडचण होते, तशीच अगदीं हुबेहूब माझी अवस्था झाली आहे असें मला वाटे. आणि हें काय सामान्य दुःख? मी ह्मणतों हें फार असह्य आणि महाहानीच्या अगदीं खालोखालचें आहे व तेंही रास्तच, कारण त्यां। अनेक दुःखांचा मुळाशीं संबध असतो. कोणी सुखासुखीं ‘ग्रामत्याग’ थोडाच पत्करितो, आणि पत्करिला तरी तो फारच अल्पकालिक असावयाचा, किंवा तो सडा निघून जावयाचा. सारांश, जन्मभूमि किंवा फार दिवस आपण राहिलों तें गांव सोडून जाते वेळीं जें दुःख होतें तें परम जाज्वल यांत शंका नाहीं.

द्वितीयेला आतां सारा दोन दिवस अवकाश उरलेला. इष्टमित्र आह्मी गांवास चाललों ह्मणून आपापल्या घरीं जेवावयास बोलावीत. जेवणखाण करून आह्मीं घरीं यावें आणि सामानसुमान बांधण्याच्या तयारीस लागावें. तुळेवंदी-वरलीं पुस्तकें खालीं घ्यावीं, व त्यांतलीं कोणतीं बरोबर घेण्याजोगीं हें पहावें हा माझा क्रम. माझ्या बायकोचा, आज थोरलीं भांडीं अडगवलीं, उद्यां लहान, असा क्रम चाललेला. सुपें, टोपलीं, दगड्या, पाळीं, गाडगींमडकीं, भांडीं, पाटावरवंटा, मुसळ, जातें, ह्या जिनसांपैकीं चट-साऱ्या जिनसा बरोबर घ्याव्या असें तिला वाटे; पण त्यांचा जडपणा, किंवा त्यांची थोडी किंमत वगैरे लक्षांत आणून त्यांपैकीं एकेक हळूच नको ह्मणून आंत ठेवावें. फुंकण्या आणि लाटण्या आमच्या घरीं पांच होतीं तीं सारीं तिनें बरोबर घ्यावीं ह्मणून एकीकडे काढून ठेविलीं होतीं. तशींच शिंकींही. इतक्यांत मोरोबा आंत कशालासे गेले तों त्याणीं ही सामुग्री पाहिली. ते बोलले 'वहिनी, हीच का सामुग्री तुह्मी आपल्याबरोबर घेणार? अहो हा सारा दीडदमडीचा माल, यांत काय आहे? द्या सर्व येथें सोडून. भांडींकुंडीं मात्र घेववतील तितकीं घ्या. हा कचरा कशाला घेतां? त्यांत आहे काय—माती? उगीच गप्पाघोळ. तुह्मां बायकांचें या गाडग्यामडक्यांवर आणि जात्याखुंट्यावर कां इतकें मन असतें तें कळत नाहीं. तें लाहीपिठाचें फुटकें गाडगें तुह्मी संभाळून इतकें लांब नेणार कसें आणि त्यांत आहे काय?' ती ह्मणाली 'ह्मणजे! कांहीं तरी भलतंच! तुह्मांला काय? झालं आयतं तयार कीं जेवायला बसायाचं, तसं आमचं

आहे थोडंच. सांगा ह्यांपैकीं कोणतं सामान नको तें ? फुंकणीशिवाय तर चालायचं नाहीं. एक न्हाणीकडे आणि एक स्वयंपाकाकडे खरकट्यामरकट्यांत. तिसरी घेतलेली असूं द्या एक जास्ती ह्मणून. शिंकीं तर हवींतच. दुभतं, विरजणफिरजण नको ठेवावयाला ? मांजरं खालीं देतील कां घटकाभर तरी राहूं ? मुलें 'मला भूक' ह्मणून पुरे पुरे करतील, त्यांना खावयाला चिमूटभर पीठ तरी हवंना ? मग जा कुठं ओळख ना देख अशा ठिकाणीं गाडग्याची भिक्षांदेहि करायाला ?' अशा प्रकारें प्रत्येक जिनसाची उपयुक्तता तिनें मोरोबांस सांगितली. मोरोबाला तिच्या ह्मणण्यापैकीं अमुक एक खोटें असें ह्मणवेना. पण त्या सगळ्या जिनसा अवघा रुपया किंवा पराकाष्ठा दोन रुपये खर्च केले तर मिळतात हें कांहीं तिला माहीत नाहीं. तें मोरोबांनीं सांगितलें त्या वेळीं ती ह्मणाली 'होय, पुण्यास मिळतील, सारें खरें, पण आहेत ह्या टाकून ह्मणे दुसऱ्या घ्या ! काय गाडींत संभाळावयाचीच तेवढी अडचण ? ती पाहतें माझी मी.' असें ह्मणत ती आपला हेका धरून बसली. पण अखेरीला मोरोबांच्याच ह्मणण्याप्रमाणें त्या सटरफटर जिनसा वांईतच सोडाव्या असें ठरलें. निघण्याला एक दिवस अवकाश राहिला. पुण्यास जाणारी परतभाड्याची गाडी मोरोबांनीं फार सोईत पाहून आणिली. आमच्या व्याह्यांच्या घरीं जाऊन मुलीला बरोबर नेण्याचा आमचा मानस असलेला मोरोबा अगोदर कळवून आलेच होते. तेव्हां आपण एकदां समक्ष जाऊन ही गोष्ट आज काढावी, आणि उद्यां बोलावूं पाठवावें असें ठरलें. त्याप्रमाणें प्रथमतः

व्याह्यांच्या घरीं गेलों. पुण्यास जाण्याचा मानस कळविला. तयारी झाली, अवकाश फक्त काय तो उद्यांचा, बरोबर मुलीला नेणार, इत्यादि गोष्टी सांगितल्या. त्यांनीं पहिल्या-पहिल्यांदा किंचित आढेवेढे घेतले, पण ती गोष्ट त्यांस मान्य करणें भागच पडलें. मी परत घरीं येण्यास निघालों. पानसुपारी घेतली. व्याही गोविंदराव ह्मणाले 'अप्पा, मीही घटके दीड घटकेनें आलोंच आपल्या घरीं. बाहेर नाहीं ना कोठें जावयाचें?' मी त्यांस 'नाहीं' असें उत्तर देऊन परत आलों; इतक्यांत ह्मटल्याप्रमाणें गोविंदराव आले. बसल्यानंतर 'उदईक भोजनाला सर्वत्रांनीं तिकडेच यावें अशी तजवीज केली आहे. काय भाजीभाकरी असेल ती खावी, आणि मनीलाही मग बरोबर न्यावें. ताईला देतों बरोबर पाठराखणीला.' असें बोलले. त्यांला मीं उगीच आपलें लौकिकदृष्ट्या ह्मटलें 'कशाला तुह्मी विनाकारण खर्चांत पडतां. आहोंतच कीं आह्मी व्याही. उद्यांच्यानेंच झालें असें नाहीं कांहीं.' आणि ह्या माझ्या ह्मणण्याला त्यांनीं द्यावयाचें तें उत्तर दिलें, आणि घरीं जाण्याकरितां उठले. उभे राहून पुनः बोलले 'मोरोबा, आपण, जांवईबुवा, सर्व यावयाचें. आणखी अंमळशानें मोरोबा आले ह्मणजे मी येईन आणखी एकवार, त्यांस समक्ष सांगण्याला. घरीं बायका आतां येतीलच.' असें ह्मणून ते चालते झाले. ते बाहेर गेले न गेले तोंच माझी बायको धडपडत बाहेर आली, आणि ह्मणाली 'मुलाच्या सासरीं कां उद्यां जेवायला जायचं? वा: बरं केलं घट्ट मन. नाहीं तर असेल घरीं एखादं बोडण भरायचं, आणि त्यांतच वाहल्या गंगेंत घेत

असतील हात धुवून. नाहीं तर कसचीं तीं माणसं खर्च करायला? इत्यादि तिची ठरीव बडबड चाललीच होती तों गोविंदरावाची बायको हातांत कुंकवाचा करंडा व काखेंत एक मूल घेऊन आमंत्रण सांगण्यास आली. आंत बायकाबायकांचें बोलणें चालले होतें बराच वेळ. तिकडे मीं लक्ष दिलें नाहीं, कारण तें रोजचेंच होतें.

दुसरे दिवशीं व्याह्यांच्या घरचें जेवण झालें. रात्रीं तात्याभटाच्या घरीं फराळाचें ठरलें. पहांटे चार घटका दिवसास गाडी जुंपून व्याह्यांच्या घरावरून मुलीला घेतल्यानंतर जावयाचें असा बेत केला. रात्रीं निजानिज कायती फक्त मुलाबाळांची. मोरोबाही मजबरोबर पुण्यास येणार होतेच. बसलों दोघे बोलत. आंत माझ्या बायकोलाही चैन नाहीं. अमकीला भेटून आलें, तमकीला विसरलें, अमकीकडून खण मिळाले, तमकीकडून मिळावयाचे उरले हा मनांत चाललेला तिचा हिशेब संपला, तेव्हां आतां आपण दुसऱ्या गांवीं जाणार इत्यादि गोष्टींचें स्मरण होऊन तिलाही वाईट वाटूं लागलें. सदा भांड्यांकुंड्यांनीं भरलेलें घर आतां कसें ओकेंओकें दिसूं लागलें. जवळपास मुलें निजलेलीं, माजघरांत बरोबर घेऊन जाण्याचा बोजा सर्व एकीकडे करून ठेविलेला, आणखी आंत एक टिकटिक्या दिवा. खरेंच त्या वेळीं तें घर आह्माला फार भयाण दिसलें. माझ्या बायकोलाही चैन पडेना. हें सारें बरें वाटेना, असें तिच्या लांबट व मुद्दाम केलेल्या चपट्या ओंठाच्या चेहऱ्यावरून दिसलें. आह्मां त्रिवर्गांना कांहीं झोंप येईना. सारी रात्र अलोचन जाग्रणानें काढिली. बराच वेळ गेल्यानंतर मोरोबा

ह्मणाले 'मी आतां येतों गाडीवानाकडे जाऊन. ते कधीं वेळेवर यावयाचे नाहींत; उगीच मागाहून त्रास मात्र होईल.' असें बोलून ते झालेच चालते, व घटकेदीडघटकेंत आले गाडीवानाला घेऊन. नंतर मी उभा राहून सर्व सामानसुमान गाडींत भरविलें. 'काय तात्या! हाय तरी किती सामान! भाडं धरलं परतभाड्याचं आणि सामान तर लई!' असें वारंवार तो गाडीवान ह्मणतच होता. आह्मी सामानसुमान भरीतोंपर्यंत मोरोबा आले ज्याह्यांच्या घरीं जाऊन. तिकडची झाली होती तयारी. मुलांबाळांना उठवून गाडींत बसविलें. मागाहून बरोबर ध्यायच्या जिनसांपैकीं गाडींत घालावयाचें कांहीं आंत राहिलें कीं काय तें पाहिलें, व श्रीमंगलमूर्ती गजाननाचें भक्तिपुरःसर नामस्मरण करून कुलदेवतेचें चिंतन केलें. 'तदेव लग्नं सुदिनं तदेव' वगैरे ह्मटल्यानंतर प्रयाणश्लोक ह्मणत ह्मणत मी बाहेर आलों. दाराला कुलुपें लाविलीं. माझ्या बायकोला गाडीवर चढ ह्मटलें, तर 'अमकीला विचारून येतें, तमकीला भेटलें नाहीं, चालूं द्या गाडी, वाटेंतच आहेत तीं सारीं घरें, असें ह्मणत ती चालूंच लागली. मी, मोरोबा, व ती अशीं तिघें गाडीच्या मागोमाग चाललों. ज्याह्यांचें घर जवळ आलें. तों ती तेथेंच एका घराच्या दारापाशीं 'यमनाबाई! अहो यमनाबाई!' ह्मणून हांका मारूं लागली, पण कोणी हां कां चूं करीना. तेंव्हां अखेर नाइलाज होऊन आतां कोणाला जागें करण्याच्या नादीं पडावयाचें नाहा, उगीच आपली उद्यां वाटेनें भावोजी आणखी थट्टा करतील, असा तिनें निश्चय केला. ज्याह्यांच्या घराचें दार उघडेंच

होतें. आह्मी आंत गेलों. तेथें गेल्यानंतर इतका वेळ उद्विग्न झालेलें माझें मन नुक्तें कोठें वाटेकडे लागलें होतें, तें पुनः भडकूं लागलें. प्रथम खेपेला मुलीला सासरीं पाठवायाचें ह्मणजे आईबापांना जें कांहीं दुःख होतें तें खरोखर मोठें भयंकर! मुलींना दुसऱ्याच्या घरीं पाठवितांनां त्यांच्या मनाची जी कांहीं स्थिति होते ती त्यांची तेच जाणत. आह्मीही मुलीचे आईबाप होतोंच. तिला सासरीं पाठविण्याचा प्रसंग आह्मांला अजून आठवत होता. त्याचीच ही पुनरावृत्ति ह्मणण्यास हरकत नाहीं. आणखी खरेंच आपण इतके दिवसपर्यंत प्राणापलीकडे जपून वाढविलेला मांसाचा जिवंत गोळा, ह्मणजे आपल्या पंचप्राणांचा अंशच, सर्वतोपरी दुसऱ्यांच्या स्वाधीन करावयाचा, त्याच्यावर सर्व प्रकारची मालकी त्या बिचाऱ्या आपल्या पोटच्या गोळयाला अगदीं अपरिचित अशा माणसांची, आणि तीं माणसेंही अशा प्रकारचीं, कीं त्या कृत उपकाराबद्दल, आपल्या स्वाधीन आपली पोर केली, कन्यादान केलें असें ह्मणून आभार न मानतां, तो आपल्या गुणांचा, थोरवीचा आणि मानापमानाचा विषय करावयाचा अशा प्रकारचीं. तेव्हां त्या कन्येच्या मातापितरांना तिच्या अल्पकालिक घडणाऱ्या वियोगाबद्दलही काय वाटत असेल याची कल्पना कोणीं करावी? नुस्ती कल्पना करण्यानें देखील किती अपरिमित दुःख होतें, मग प्रत्यक्ष अनुभवास आल्यावर काय विचारावयाचें आहे? आपल्या समक्ष कोणी आपल्या पोरीबद्दल ब्र काढिला कीं रागानें फुणफुणणारी आई, मुकाट्यानें त्याच पोरीला द्वाष्ट सासूच्या स्वाधीन करते त्या वेळीं तिच्या म-

नाला काय वाटत असेल? तिच्या कोंवळ्या अंतःकरणाला इतका कठोरपणा सुखासुखीं कधींही यावयाचा नाहीं हें खचित. शिवाय जनावराच्या शेजारीं जनावर असलें आणि त्यांची तुटातूट थोडा वेळ झाली तर त्यांच्या जिवाला अस्वस्थता होते हें मुकेपणामुळें त्यांना व्यक्त करतां यावयाचें नाहीं, तरी पण त्यांच्या हालचालीवरून स्पष्ट होतें; आणि हे तर बोलून चालून सज्ञान प्राणी. आईला पोरांकरितां काय क्लेश सोसावे लागतात हें का कोणांस सांगावयाचें आहे? आणि त्या पोरांचा वियोग थोडा का दुःसह असेल? तिचा देह, तिचे गुण, आणि फार काय तर तिचें नशीब व एकंदर जीवित्वाचें साफल्य आपण होऊन दुसऱ्याच्या स्वाधीन करावयाचें, आणि असें करण्यांत आपल्याकडे उणेपणा पत्करावयाचा, या ह्या संसारांतल्या अनुपमेय चमत्काराचा संतोषानें कोण वांटेकरी होत असेल तो होवो. माझ्या मतें तर, आणि माझ्यासारखेच इतर प्रापंचिक असतील त्यांच्या मतेंही, या संसारांत अतिशय असह्य आणि पूर्णक्लेशकारक अशा दुःखाला आपण होऊन राजी होणें, तें दुःख धडधडीत दिसत असूनही त्याचाच विभाग पुनः पुनः उचलण्याचा प्रयत्न करणें ह्मणजे, 'यद्यपि लोकं शरणं मरणं तदपि न मुंचति पापाचरणं' असाच प्रकार. असो. परंपरागत रूढि आहे. तिजपुढें इलाज नाहीं हेंच अखेरीस खरें. मुलीला आह्मीं बरोबर पुण्यास नेण्याचें ठरविलें. त्यांत आम्हांला मोठें अवघड तें काय वाटावयाचें? पण आमच्या व्याह्यांस तें परम दुःसह वाटलें असेल यांत नवल नाहीं! मुलीची ओटी भरली

आणि तिला बरोबर घेऊन तिची आई आपल्या डोळ्यांतील आसवांना पदरांत घेत घेत बळेंच तिला हातानें लोटीत आली! तिच्या तोंडांतून शब्द निघेना. दुःख येऊन गळ्यांत बसलेलें. तिचा नवरा गोविंदराव तोही जवळच उभा असून 'हं. आटपा, उशीर होतो आणखी' असें ह्मणत असे. पण ते शब्द दुःखानें कसें ओलेच्चिंब झालेले. 'मने! जा बेटा हां. वैशाखमासीं तुला बोलावणें पाठवितों. काळजी करूं नको. बरोबर गंगुताईही आहेच, समजलीस. शहाणी मुलगी ती! तिथें चांगली सासूसासऱ्यांचें काम ऐकून रहा हां.' हे त्याचे शब्द तोंडावाटे चाललेले, पण आंत पोटांत काय? सारा गलबलाट झालेला! गोविंदरावानें माझ्याजवळ येऊन मोठ्या सद्गद अंतःकरणानें ह्मटलें 'अप्पा तुह्मांला काय सांगावयाचें आहे! तुह्मी कुटुंबवत्सल आहांतच; आणखी मी अधिक तें काय सांगूं? मायापाश महाकठिण आहे.' असे मोठ्या कष्टानें त्यानें शब्द काढिले. त्याच्या बायकोनें तिकडें आपलें रडें सावरण्याचा प्रयत्न करून मोठ्या कष्टानें व तशाच त्या रड्याच्या जोरांतच 'अनपूर्णाबाई, ही माझी मनी तुमच्या स्वाधीन तर केलीच आहे. तुह्मी शाहाण्या आहांत, भल्या आहांत, तुह्मांला सांगावें असें कांहीं नाहीं', असें अर्धेंच बोलून अनावर झालेला हुंदका ती सावरून घेऊं लागली! माझ्या बायकोनेंही 'तिची काळजी सोडा' वगैरे सांगण्यासारख्या गोष्टी राधाबाईस सांगितल्या. इतक्यांत मींही किंचित ह्मटलें 'गोविंदराव! तुह्मी असें काय करतां वेड्यासरखें? मलाही दोन मुली आहेत. मीं तें दुःख अनुभविलें आहे, आणि ह्मणून ह्मणतों कीं तुह्मी मु-

लीची काडीइतकी देखील काळजी बाळगूं नका. माझ्या दोन मुली, तशी ही तिसरी, समजलांत? यांत बिलकुल अंतर आह्मां कोणांकडून येणार नाहीं, हें तुह्मी खास समजा.' इतकें माझें बोलणें ऐकून तेवढ्यानेंच त्यांना मोठें समाधान वाटलें. तें असो. आतां पुढची कथा उगीच कशाला सांगत बसूं. ती व्यर्थ कंटाळवाणी होईल. आह्मीं मुलीला घेण्याकरितां व्यांह्यांच्या घरापाशीं किंचित मुक्काम केला, इतक्यांत कांहीं स्नेही वगैरे पांचपंचवीस मंडळी आह्मांला पोंचविण्याकरितां ह्मणून येणार होती ती आतां सर्व जमली. रात्रीची वेळ, कोणाची व्यर्थ झोंप मोडावी ह्मणून मी कांहीं त्यांना विचारावयास गेलों नाहीं. आधल्या दिवशींच साऱ्यांचा निरोप घेऊन ठेविला होता. पण मंडळी जमावयाची ती जमली. बायकाही आल्या. नंतर बोलत बोलत तसेच आह्मी गणपतीच्या देवळापर्यंत गेलों. देवळांत नारळ पैसा ठेवून सर्वांना त्याच्या पायां पडावयास सांगितलें, आणि आह्मी सारेजण गाडींत बसलों. मागें येणाऱ्या मंडळीचे नमस्कार घेतले व त्यांस परत केलें, आणि 'आतां तुह्मी चला, किती लांब येतां, पहांटेची वेळ, थंडी आहे, आणि अंधेरही थोडा आहेच, तर परता कसे आतां येथूनच' ह्मणून मी ह्मणतच आहें; आणि त्याला 'जातों, आलों दोन पावलें ह्मणून काय झालें? आतां लौकर परत या, तिकडेच रमूं नका, आह्मांला विसरूं नका, पुण्यास तो आमचा अमुक आहे त्याला अमुक निरोप सांगा, असे त्यांचे निरोपावर निरोप येतच होते. त्या सर्वांस एकसहा केव्हां नुस्ती मान हालवून, व केव्हां हां, होय, अशा शब्दांनीं मी

जबाब देत असें. असें करतां करतां बाहेरच्या वेशीनें आमची गाडी रस्त्याला लागली, तशी मंडळी लागली आपोआप परतावयाला. मात्र गोविंदराव आमचे त्याही गाडीचा दांडा धरून अद्याप चाललेच होते. त्यांस मी ह्मटलें 'कोण गोविंदराव! आतां किती लांबवर तुह्मी येणार?अहो परता आतां, आणि नका कशाची तुह्मी काळजी करूं. येणाराजाणाराबरोबर मुलीचा निरोप खुशालीचा आला ह्मणजे झालें ना?' असें सांगून त्यांस एकदांचें परतविलें. झालें माझें मन एकलकोंडें. मोरोबा आणि मी दोघे उभयतां काय ते गाडींत पुरुष. तेंव्हां भाषणें आमचीं काय तीं व्हावयाचीं उभयतांतच. त्यांतून आज पुष्कळ दिवस आह्मी उभयतां एकसारखें बोलत असूंच. तेंव्हां आतां बोलावें तरी कशावर, आणि बोलण्याला विषय तरी आणावा कोठून? अशी आह्मांला फिकीर पडली. अशा प्रकारें आह्मी मार्गास लागलों. वाटेंत उतरलों कोठें वगैरेचें वर्णन हल्लीं आगगाडीनें प्रवास करणारांस कांहीं गोड वाटावयाचें नाहीं. पुण्यास गेल्यावर मला देखील आगगाडीचा प्रवास घडला. आगगाडींतून प्रवास करणारे फार, तेंव्हां त्यांना ह्या खटाऱ्या गाडींतून केलेल्या प्रवासाचें केलेलें वर्णन काय गोड लागावयाचें आहे? रोज घृतकुल्या मधुकुल्या खाणाऱ्याला शिळ्या भाकरीची काय मजा वाटणार? तसाच हा प्रकार. पण एवढी गोष्ट मात्र खचित कीं 'बाळ्या बैला रे' ह्मणून तें सकाळच्या प्रहरीं गाडीवानानें ह्मटलेलें गाणें, बैलाच्या गळ्यांतील तो घाटांचा मंजुळ शब्द, कोठें गचका आला ह्मणजे त्या वेळीं उडणारी गाडीवानाची तारांबळ, तो पार पडला कीं आप-

त्या कर्तबगारीची त्याला वाटलेली फुशारकी, वरंगळीच्या वेळीं गाडींतल्या माणसांस वाटणारी मौज, इत्यादि गोष्टी आणि उन्हाची वेळ होत चालली कीं उतरण्याची सोय पाहण्यांत गुंतलेलें मन, पाहिलेल्या प्रत्येक जागेंत सोईची तक्रार काढण्याचा बायकांचा प्रयत्न, तेथें पकविलेलें अन्न, त्याची गोडी, वाटेंत चोरांची वगैरे खरीखोटी भीति, गाडीवानाच्या काहण्या, वगैरे गोष्टी ह्मणजे खरोखर एक प्रकारची मजा आहे. ती आगगाडींत कांहीं मिळावयाची नाही. पण त्याचा उपयोग काय? ह्मणून मी ती कथा येथेंच पुरी करितों, आणि पुण्यास दाखल झाल्यानंतरचीच हकीकत ह्यापुढें सांगण्यास सुरुवात करितों.

---

# प्रकरण ४ थें.

## "कोंकणांतून देशावर गेला, तरी पळसाला पानें तीनच."

वांई सोडून येतांनां एका प्रकारें मनोवृत्ति क्षुब्ध झाल्या होत्या त्या हळूहळू शांत होत चालल्या. पुणें शहर जवळ येऊं लागलें तसें आह्मां सर्वांच्या मनाला पुनः 'मनचे मांडे' खाण्यास मिळूं लागले असें ह्मणण्यास हरकत नाहीं. त्या शहराचें वैभव, तेथील लोकांची वडेजाव, आमच्या बाळ्याच्या अभ्यासाच्या सोई—त्या जणों काय यथाप्रकारें जमून येऊन त्याचा अभ्यास देखील पुरा झाला, मोठी चाकरी लागेल तेव्हां पुढें आपण काय काय करूं, वगैरे

विचारांची उडालेली घनचक्कर, इत्यादिकांखालीं मी चूर होऊन गेलों. माझ्या स्त्रीच्या तोंडाकडे पाहून मात्र तिला एक प्रकारची काळजी असावी असा भास होई. शेजारी पाजारी कोणी बायका मिळतात किंवा नाहीं, आपल्या यजमानाच्या घरच्या बायका कशा आहेत, आतां जातांच इतकीं धुणीं धुवावयाचीं तेंव्हां पाण्याची वगैरे सोय कशी काय जमते, मुलांबाळांस भूक लागली तर आपलें काम आटोपेपर्यंत त्यांस खाऊं घालण्याची वगैरे सोय कशी होईल, आपलीं भांडींकुंडीं नीट व्यवस्थेनें लावण्यास जागा कशी मिळेल इत्यादि—एक का दोन—शेंकडों प्रकारच्या विवंचना तिच्या मनांत घुटमळत असत. मुलें तर काय विचारावयाचीं? तीं सदा आनंदी! नवीनपणा, मग तो कसाही कां असेना, पाहिला कीं त्यांच्या आनंदास व उत्सुकतेस भरतें हें यावयाचेंच. मोरोबा मात्र कायकीं, या वेळीं जरा सचिंत बसले होते. इतक्यांत तिनें प्रश्न केला ‘ कायहो भावोजी, बाजीरावाचें आतां नाहींना पुण्यास राज्य? बरें चांगलें मेल्याचें तळपट झालें तें! ’ मोरोबा ह्मणाले ‘ छेः, वहिनी हें काय आपण ह्मणावें? अहो तो ब्राह्मण प्रभु ना? केवढा दानशूर! केवढा पट्टीचा विद्वान ब्राह्मण! काय सांगूं अप्पा! ब्राह्मणांचा तर बिचारा केवळ अन्नदाता! पंक्तींत स्वतः आग्रह किती ह्मणून करावा? काय त्याच्या एकेक गोष्टी आठवावयाच्या आहेत! गेलें बिचारें ब्राह्मणांचें राज्य! ईश्वराची मर्जी! पण वहिनी तुह्मांलाहो कां आतां त्याची आठवण झाली, मध्येंचशी?’ ती ह्मणाली “तो मोठा चांडाळ होता. वांईत आला तर पांचशें बायकांनीं विहिरींत जीव

दिला ह्मणून मीं ऐकिलें आहे. आणि असल्याच्या गांवीं आपण आतां चाललों, ह्मणून आठवण झाली. पण नाहींना आतां त्याचं कोणीं पुण्यांत? त्याला झालीं आतां पुष्कळ वर्षे, आमच्या सासूबाई सांगत होत्या त्या पुण्याच्या नायकांच्या आणि बाजीरावाच्या गोष्टी, ह्मणून कायतें मला ठाऊक. अलीकडे मात्र नाहीं ऐकिल्या.'

इतक्यांत आमचा बाळ्या ह्मणाला 'वाः! आतां ग कोठला आई बाजीराव? इ. स. १८१८ ह्मणजे शके १७३९ सांत ब्रह्मावर्ती बाजीराव निघून गेले. त्यानंतर नानासाहेबानें बंड केलें, आणि तो कोठें आहे त्याचा पत्ता देखील नाहीं ह्मणतात. बाबा, स्नानसंध्या करण्यास बाजीराव ब्रह्मावर्ताला हो कां गेले? पुण्यास, नाशकास, आणि नाहीं तर आमच्या वांईस नसती कां ती त्यास करितां आली?' हा त्याचा प्रश्न ऐकून मला मोठी मौज वाटली. हा कालचा पोर आणि आजोबासारख्या गोष्टी सांगतो कशा, आणि त्या त्याला कळल्या कोठून! मला मोठा अंचबा वाटून मी त्याला प्रश्न करणार, तोंच तो पुनः ह्मणाला 'मोरूकाका, बाजीराव बल्लाळ ऊर्फ पहिला बाजीराव हा मोठा शूर देखणा आणि शहाणा होता नाहीं हो? तो असता तर सोनपतपानपतच्या लढाईंत इतके बाजारबुणगे मारले गेले नसते. दुराण्याचाच त्यानें पराभव करून सोडिला असता.' हें त्याचें बोलणें ऐकून तर मला वाटलें कीं हा मुलगा खरोखर बालबृहस्पति आहे. ॐ ह्मणणाऱ्यां अवतारी पुरुषासारखाच माझा बाळ्या आहे असें देखील मला वाटूं लागलें. कारण, कधीं सोनपतपानपतची लढाई

झाली, आणि कोणीं थोरल्या बाजीरावास पाहिलें ! पण तें कांहीं नाहीं, हा आपला टीचभर पोर 'तो देखणा, शूर, शहाणा होता' ह्मणून त्याच्या खाणाखुणा देखील सांगतो. असें मीं मोरोबाशीं ह्मटलें, त्यावर त्यानें उत्तर दिलें. 'अप्पा यांत कांहीं आश्चर्य नाहीं. शाळेंतून या सान्या गोष्टी आतां शिकवूं लागले आहेत. पेशवे, सातारकर, दिल्लीचे बादशहा हें सर्व आतां पोरांना पाठ येतें. माझा भाचा पांडू हा परवां सगळ्या पृथ्वीचेंच वर्णन माझ्या पुढें पाठ ह्मणून दाखवीत होता. नऊखंड पृथ्वीचीं त्यांनीं आतां चार खंडें केलीं आहेत, आणि काय ह्मणे, तांबडा समुद्र, पीत समुद्र, काळा समुद्र, मृत समुद्र, अट्लांटिक महासागर आणि माती आणि दगड तें काय तें अप्पा आतां विचारूं नका.' इतकें ह्मणतात तोंच पर्वतीचें शिखर दिसूं लागलें. तें पहातांच सर्व मुलांनीं हो ! हो ! पुणें आलें ! पुणें ! असें बोलून गोंगाट माजविला. तेव्हां माझीही दृष्टि तिकडे गेली. शहर खोलींत असल्यामुळें चांगलें दिसावें तसें दिसेना. देवळें, शिखरें, उंच माड्या, झाडेंझुडपें स्पष्ट दिसूं लागलीं. तेव्हां मी चटकन् मागल्या बाजूनें खालीं उतरलों. माझ्या मागोमाग मोरोबाही उतरले. तें पाहून पोरेंहि आह्मी उतरतों ह्मणूं लागलीं. त्यांस दटावून आह्मीं बसविलें. पुनः मार्गक्रमण सुरू झालें, आणि आह्मी रास्त्यांच्या पेठेंत गोविंदराव नेन्यांच्या घरीं उतरलों. त्यांची आमची ओळख पुष्कळ, घरोबाही विशेष. आणि त्यांतून ते तर आमचे यजमान. त्यांस पूर्वीं आह्मी येणार असें पत्र घातलें होतेंच. आह्मी गेलों त्या वेळीं १०-१२ घटका

देवस आला होता. त्या वेळीं गोविंदराव जेवावयास बसले होते. मीं ह्मटलें 'मोरोबा, आज हें लौकरसें जेवण चाललें आहे?' त्यास मोरोबांनीं उत्तर दिलें 'दसघंट्याला कचेरी आहेना?' 'यथाविधि स्नानसंध्या करून सावकाशपणें कचेरीस यावें ह्मणून वाटतें ही सोय सरकारानें केली आहे?' असें मी ह्मटलें, त्यास 'होय, होय, तर!' एवढेंच ह्मणून मोरोबा आंत स्वयंपाकघरांत गोविंदरावांस भेटण्याकरितां गेले तों गोविंदरावही आंचवण्यासाठीं बाहेर आले. त्यांची आमची दृष्टादृष्ट झाली, नमस्कार चमत्कार घडले, मग लगेच ते आंत जाऊन 'अग, आज पाहुणे आले आहेत; आपले उपाध्येबुवा त्रिंबकभटजी वांईकर येणार ह्मणून मी ह्मणत होतों ते आले.' असें आपल्या बायकोशीं बोलले. त्या बिचारीलाही आह्मी आलों ह्मणून आनंद झाल्यासारखें दिसलें. किंचित् हास्यमुद्रेनें सलज्ज आंतूनच डोकावून तिनें पाहिलें, त्या वेळीं पाहुण्यांत बायकामनुष्यें पाहतांच तर तिला विशेष आनंद झाला. 'या अशा आंत. लावतील पुरुष सामानसुमान. मुलं भुकेलीं असतील तर मी ह्मणतें त्यांना जेवूं द्या आधीं. मग आपण सारीं मागाहून बसूं. काय या तुमच्या मुलीचं नांव? आणि ही सून का? बरं आहे!' इत्यादि प्रकार चालले त्यांच्यांत. आह्मांस अमुक एक ठिकाणीं सामान उतरवा वगैरे सांगितलें, आणि आपले बंधु गोपाळराव यांस, 'गोपाळा, पाहुण्यांची बरदास्त चांगली ठेव हो, सामानसुमान नीट व्यवस्थेशीर अडगवून जेवणखाण करा तोंगर मीही साहेबाला विचारून आज लौकरच येतों.' असें ह्मणून गोपाळराव कचेरीस निघून गेले.

आमचे ते यजमानच, तेव्हां घरोबा हा असावयाचाच. बायकामुलांची ओळख नव्हती. पण बायकांतला स्नेह ह्मणजे काय विचारावयाचा आहे? तो तेव्हांच जमून येतो; आणि पोरांस तर ओळख नको आणि देख बको. असो; त्या दिवशीं तर सर्व यथास्थित झालें, कशाची कांहीं अडचण पडली नाहीं. पांच एक घटका दिवस असतांनां गोविंदराव घरीं आले. तेव्हां त्यांचीं आमचीं पुष्कळ बोलणीं झालीं. कां आलों, उद्देश कोणता, पुढें कसें काय करावयाचें इत्यादि सर्व खुलासे त्यांनीं कळवून घेतले. माझें करणें गोविंदरावांस फार पसंत पडलें. 'अप्पाभटजी, तुह्मी ही योजना तर बुवा फार नामी काढलीत. मुलगाही हुशार दिसतो. तेव्हां तो कांहीं नशीब काढल्यावांचून खचित राहणार नाहीं.' हें गोविंदरावांचें बोलणें ऐकून मीं ह्मटलें 'असें दिसतें तर खरें वाटेनें शकुन तर कसे ह्मणतां नामी झाले आहेत! मोरोबा, गांवांत येतांच सवत्स धेनु नाहीं का आपल्यापुढें आली?' यावर गोविंदराव फक्त एवढेंच बोलले 'वा:! असें झालें तर एकून? मग तर ठीक आहे बुवा!' तो शनवारचा दिवस, तेव्हां रात्रौ मला तर जेवावयाचें नव्हतें. गोविंदरावांस दुसरे दिवशीं सुटी होती, तेव्हां बिऱ्हाडाची वगैरे सोय उद्यांच स्वतंत्र करावी असें मीं ह्मटलें. त्याला 'कां इतकी गडबड कां? येथें काय कमी आहे.' असें गोविंदरावांनीं उत्तर दिलें. मीं ह्मटलें, 'चार आठ दिवसांची गोष्ट नाहीं, मग उगीच उशीर कां?' हीं असलीं पवित्र्यादाखल भाषणें झाल्यावर दुसऱ्या दिवशीं बिऱ्हाड निराळें करण्याचें मीं नक्की ठरविलें. कारण, अशा

मीं ज्याचा त्यानें विचार केला पाहिजे. आपणाकडेच असतों तर गोष्ट निराळी होती. पाठीमागें एवढें लांबरट घेऊन पाहुणचार घेत बसणें ह्मणजे अपमानकारक गोष्टींसा आपल्या भोंवतीं आपणच गराडा घालून घेणें होय. तेव्हां मीं केला तोच विचार ठीक होता. दुसरे दिवशीं त्याच आळींत एक सोईस्कर घर पाहून घेतलें; आणि तेथें आमचा सगळा संसार पाठविला. भाड्याचें घर घेतल्यावर स्वतःच्या घराची किमत काय असते याचा फारच सुरेख अनुभव आह्मांला येऊं लागला. स्वग्राम, स्वजन इत्यादिकांत स्वत्व कसें असतें हें आह्मां सर्वांस आतां उदाहरणशः शिकण्याची ही शाळाच झाली ह्मटल्यास हरकत नाहीं.

घर वगैरे थाटतांच मुलास शाळेंत घालण्याची तजवीज आमच्या गोविंदरावांनीं फारच सुरेख केली. नादार मुलगा शिकायास घेऊं असें पाठशाळेवरील साहेबानें सांगितलें, आणि पुढें अभ्यास चांगला करून नंबर वर ठेवील तर पुस्तकांकागदांच्या खर्चाकरितां लहानसा पगारही मिळेल असें गोविंदराव बोलले. मुलगा शाळेंत जाऊं लागला. तेथें तो साहेबांकडे शिके. विटाळ वगैरे होतो इत्यादि शंका मनांत येत, पण महदाशा डोळ्यापुढें द्रव्यदर्पण दाखवी, तें त्या सर्व शंका आपणच खोडून काढीत असे. कसेंही होवो आणि कांहींही घडो, मुलाला चार अक्षरें येऊन तो मिळविता झाला ह्मणजे पुरे असें आह्मांस वाटे, आणि तसें घडे तोंपर्यंत मीं तर निश्चय केला होता कीं तिकडे कशाकडे देखील पहावयाचें नाहीं. माझ्या स्त्रीनें रोज एखादी कागाळी मोठ्या कौतुकानें मजपाशीं आणावी. 'पाहिलं?

बाळ्या घरीं पिसं घेऊन बसतो. जळ्ळीं मेलीं कसलीं पिसं कोण जाणे? या इंग्रजी शिकण्यांत पिसं तीं कशाला? घडीघडीला बोटाला थुंकी लावून जळ्ळीं तीं पोथीचीं पानं सारीं उष्टीं करतो. कातड्याच्या पुठ्याची पोथी घेऊन बसतो; काल संध्या केली नाहीं; परवां सूत तुडवून जेवायला बसला; सकांळीं उठून गोमांस—गोमांस—इश् जळ्ळं ग बाई तें—ह्मणून घोकतो. दारूच ह्मण, दगडच ह्मण, असलं कसलं हें मेलं शिकणं? देवाचं नांव नाहीं न कांहीं नाहीं. परवां रात्रीं दिवाभीताचंच नांव घेऊन मेला घोकत बसला होता,' अशा दररोज तिनें किती तरी कागाळ्या सांगाव्या. आणि त्या दुसऱ्याच्या असत्या किंवा त्यांपासून कांहीं पैसे मिळ-ण्याचें साधन होत नाहीं असें जर मला कळतें तर मींच केवढा आकांत केला असता? पण येथें काय दामाजीपं-ताच्या नुसत्या आशेचा प्रभाव! असो. या गोष्टी देऊं सोडून. क्लेशमय संसारांत घडी दोन घडीच अत्यल्प सुख होतें, तरी त्यासाठीं मोठमोठे मी मी ह्मणविणारे देखील घुटमळत गुरफटले जातात, तेव्हां या एवढ्या शुष्क बाबीं-करितां पुढील मनोराज्यांतली भली दांडगी इमारत हस्तगत व्हावी ह्मणून तिकडे कानाडोळा न करतां नाहक्क त्या ला-भास मुकणें मला तरी निदान बरें वाटेना. ह्मणजे काय तर मुकाट्यानें डोळ्यावर कातडें ओढलें आणि पुढील आशेवर स्वस्थ बसलों. ह्या सर्व बाह्योपाधी, प्रापंचिक त्रास, अन्नाची काळजी, पुढल्या तजविजी, पोराबाळांची तर्तूद वगैरे लचांडें, वांई सोडून पुण्यास आलों ह्मणून लवमात्र कमी झालीं नाहींत, उलट जास्तच. 'दुरून डोंगर साजरे' हें मात्र

अगदीं खरें! वांईत असतां मला वाटे काय कीं, पुण्यास गेलों ह्मणजे ह्या साऱ्या दगदगी आपोआप जातील; तेथें चारदोन पैसे जास्त मिळतील आणि डोक्यावरलें संसाराचें ओझें अंमळ हलकें होईल, हें माझें मनांतलें राज्य. मी पुण्यास आल्यानंतर कांहीं दिवसांनीं चातुर्मास सुरू झाला. वांईतला प्रकार तेथें नाहीं. नवीनपणामुळें जरा मानप्रतिष्ठा वाढते हें मात्र खरें. रोजचीं आमंत्रणें आणि त्या दक्षिणा वगैरे पाहून मला वाटलें काय कीं, बरें झालें, आपण पुण्यास आलों तें. एखादटुसरें पारायण केलें तर चारदोनशें अलबत्यागलबत्यास मिळतात, तेंव्हां मला कांहीं तरी जास्त मिळतील असें वाटलें, आणि तसा प्रत्यक्ष अनुभवही आला. उत्पन्न वाढतें ह्मणून आनंद मानावा तर इकडे खर्चेही वाढूं लागला. लंकेंत सोन्याच्या विटा मिळतात, एक हजामत केली कीं एक वीट, तेंव्हां आपण तिकडेच जावें ह्मणून निघालेल्या नापिताची जशी अखेरीस फटफजीती झाली तशीच माझीही झाली ह्मणण्यास हरकत नाहीं! प्राप्तीच्या मानानें खर्चही वाढला. वाढला तर वाढेना कां बिचारा? मनाला तरी स्वस्थपणा असावयाचा होता, पण नाहीं; आणि तो असणार तरी कसा? तिनें एखादा जिन्नस घरीं नाहीं ह्मटलें, आणि तो आणावयाचा, म्हणजे पैसा खर्च केल्याशिवाय गत नाहीं. ती ह्मणे 'हें मेलें काय? शेण देखील विकत घ्यायचें, ही कुठली रीत बाई? भाजी विकत, शेण विकत, सर्पण विकत, दूध विकत, फुलें विकत, घर भाड्याचें, असें यच्चयावत् सर्व कांहीं पैशावर, त्यानें मी फार फार जिकीरीस

आलों. कारण पैसा पैसा पुरेल तरी कोठवर? पैशाशीं बसावयाचें आणि पैशाशीं उठावयाचें. तरी बरें. पाहुण्या-राहुण्यांनीं नाहीं आपला मोर्चा मजकडे फिरविला. वांईत पैसे मिळण्याची पंचाईत, आणि येथें पैसा पुरण्याची पंचाईत, मिळून दोहोंची बेरीज सारखीच! आणि पुण्यांत एक दोन काळज्या जास्त. आह्मीं वांईत होतों तेंव्हां विलासी ह्मणा, श्रीमंती ह्मणा, मौल्यवान्, निरुपयोगी पदार्थ फारसे पाहण्यांत येत नसत; पण तेंच पुण्यास आल्यानंतर काय होऊं लागलें, तर विलासी व श्रीमंती पदार्थ सर्वांच्या नजरे-खालून जाऊं लागले, त्यामुळें ते घ्यावे, ते आपल्याला असावे, अशी त्यांची साहाजिक त्यांस इच्छा होऊं लागली. मुलानें घरीं यावें आणि माझ्यापाशीं नाहीं तर तिच्यापाशीं 'आई, मला एक मेज पाहिजे. जळो हे तुमचे भिकार दिवे आह्मांला नकोत, चिमणीच्या दिव्याचा उजेड कसा चक्क पडतो. अंगांतल्या ह्या भिकार बंड्या पाहून पोरें हंसतात, ह्मणून मला कोट व ज्याकिट पाहिजे. बूट विजार असली ह्मणजे शाळेंत जाण्याला कसें सडसडीत असतें.' इत्यादि टुमणें त्याचें असावयाचें, आणि असले पदार्थ आपला लेक मागतो याचेंच तिला कौतुक वाटून किंवा त्याच्या इच्छा पुरवाव्या ह्मणून कीं काय नकळे, तिनें माझ्या कपाळाशीं 'द्यायचेंना मग बाळयाला तें घेऊन?' असें ह्मणावें. तिला स्वतःला आपलीं लुगडीं जड दणगट वाटत; शेजाऱ्यापाजाऱ्यांचीं पाहून त्यांच्यासारखीं आपण घ्यावीं अशी तिला इच्छा होई. त्यामुळें होई काय तर स्वतः तिनें स्पष्ट मागावयाचें नाहीं, पण दुसऱ्यांनीं कोणीं

कांहीं घेतलें ह्मणजे तिनें तें मागून आणून मला दाखवावें, व याची किंमत अगदीं थोडी आहे इत्यादि स्तुति करावी, ह्मणजे अंतस्थ मतलब फक्त एवढाच कीं मीं तसलें तिला घेऊन द्यावें. लहान मुलांचीही बहुतेक तीच अवस्था. एखादें खेळणें पाहिलें कीं तें त्यांना हवें असेच. शिवाय तें मागावयाचें ह्मणजे रडें हट्ट वगैरे इलाजांनीं. मुलगी माहेरवाशीण; तिच्या तर हौशी पुरविल्या पाहिजेतच. नाहीं ह्मणावयास सुनेचें तेवढें हट्ट किंवा कांहींएक नव्हतें. चुकलेल्या जनावरासारखी बिचारी सदा कावरीबावरी दिसे. पण आह्मीं सर्वांनीं तिला खरोखर अतिशयच ममतेनें वागवावें, यामुळें लौकरच तीही ‘ माणसाळली ’ ह्मणण्यास हरकत नाहीं. पोरापासून थोरापर्यंत रोज सर्वांना कांहीं हवें असावयाचें; पण तें सर्व म्यां पुरवावें कसें हा विचार त्यांच्या स्वप्नांतही नसे. विलासी पदार्थांचें अज्ञान हें वांईस माझ्या फार पथ्यावर पडे; पण येथें तें कांहीं नाहीं. मला केव्हां केव्हां वाटे हीं बायकापोरें माझ्या पाठीमागें इतका तगादा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष लावतात, आणि त्यांस जर दररोज नन्नाचा पाढा मीं वाचला तर न जाणों कदाचित असंतोष आणि अप्रीति कुटुंबांत उद्भवेल कीं काय? आणि खरेंच आहे; संसार ह्मणजे काय? शरीराला जीव, तसा संसाराला पैसा! पैसा नाहीं तर बायको नवऱ्याला विचारावयाची नाहीं, मुलें बापाला मानावयाचीं नाहींत, शेजारी ढुंकून पहावयाचे नाहींत इत्यादि गोष्टी सर्वांच्या अनुभवांतल्या! पैसा मिळविण्याकरतां तर रात्रंदिवस वतवत करावयाची, आणि अखेरीस धन दुसऱ्याचीच, अशा शेंकडो

गोष्टी मनुष्याला वैताग उत्पन्न करणाऱ्या आहेत. त्यांचा आश्रय करावा ह्मणजे झालें, दुप्पट–तिप्पट त्रास! बरें पैसा मिळविणाऱ्यांना ज्या अडचणी असतात, तो मिळवितांना जो त्रास पडतो, किंवा त्याचा विनियोग करण्यांत बिचाऱ्यांची जी त्रेधा उडते, त्यांचा एक लक्षांश अनुभव जरी या परावलंबी वर्गास असता तरी पुष्कळ होतें. अशा रीतीनें काळजी सुरू झाली कीं नंतर मग वेदांत सुचावा, आणि तो सुचूं लागला ह्मणजे वैताग, संसाराचा कंटाळा वगैरे येऊन जीवित दुःखमय व क्लेशमय वाटावें, आणि पश्चात्ताप सुरू व्हावा, असें हें रहाटगाडगें चालावयाचें. पण आशा ही एक कृत्या सर्वांच्या मागें लागली आहे कीं नाहीं? ती सर्वांस गचांड्या देऊन बाहेर काढते. उद्यां अमुक होईल, परवां असें घडेल, तेरवां तें मिळेल, अशा भाकडकथांचें पुराण तिनें आपल्या मनास सांगितलें कीं पुनः आह्मी झालों ताजेतवाने. वेदांत, वैताग, वैराग्य चटसारें जातें कोणीकडल्या कोणीकडे पळून, आणि मग आहेच आपला ‘पुनरपि जननं पुनरपि मरणं’ हा क्रम.

ह्मणजे सारांश काय, माझ्या मनाला स्वस्थता नाहीं, रात्रंदिवस काळजी, खर्चाची अडचण, नाना तऱ्हेच्या संकटांची भीति, परक्या ठिकाणच्या वस्तीमुळें आजदिनपर्यंत माहीत नसलेल्या अडचणींचा यथेच्छ अनुभव, मुलांच्या अभ्यासाची तर्तूद अखेरपर्यंत कशी निभावते याचा विचार, धाकट्या मुलीच्या लग्नाची विवंचना, अशा एक का दोन ह्मणून गोष्टी सांगूं? मनाची काळजी आणि कुटुंबांतलीं संकटें घटकाभर बसून एखाद्या स्नेह्यापाशीं

निवेदन केलीं ह्मणजे थोडासा विसांवा मिळतो, थोडेंसें मनोरंजन होतें. तो स्नेही हिम्मत देतो. दुसऱ्याचीं संकटें सांगून तो आपलीं त्याच्यापुढें कांहींच नाहींत असें दाखविण्याचा यत्न करितो; पण तें देखील सुख मला येथें नाहींसें झालें ह्मणावयास हरकत नाहीं. जिव्हाळ्याचा स्नेही--ह्मणजे दाट परिचयाचा--कायतो एक मोरोबा. पुण्यास आल्यानंतर तो आपल्या यजमानाच्या घरीं राहिला. त्याला स्वतःला पोर ना बाळ. यजमानाच्या घरीं चार कामें करावीं आणि आनंदानें त्यांच्या घरीं राहावें हा त्याचा संसार. त्यामुळें त्याला मजकडे फारसें येण्यास फावत नसे, आणि फावलेंच तर त्याच्या यजमानाची स्तुति, त्याचें वैभव, त्याचा स्वभाव यांचीच त्यानें आमच्या घरीं चर्चा करावयाची. त्याचें खाणें अमुक, श्रीमंती असली, स्वभाव असला, अशा गोष्टींनीं होई काय तर आमचा संसार, आमचें जिणें, आमची स्थिति हीं भिकारडीं वाटावीं. त्यांच्यासारखें असावें, वागावें, आणि करावें, ही इच्छा उत्पन्न व्हावी. एकंदरींत पुनः मनाला अस्वस्थता. मुलाबरोबर त्याचे सोबती केव्हां केव्हां घरीं येत, त्यांचा पोषाख पेहराव पाहून आह्मांला व खुद्द मुलालाही वाटावें कीं तसा पोषाख असावा खरा. पण आणावा कोठून? श्रीमंताच्या एखाददुसऱ्या घराची ओळख किंवा माहिती झाली ह्मणजे वाटावें, आमच्या बगीला तें स्थळ मिळेल तर बरें होईल. ती कोणा शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या घरीं कांहीं निमित्तानें गेली ह्मणजे एखाददुसऱ्या पदार्थाचा नवा अभिलाष घेऊन परत येई. मिळून जिकडे तिकडे आशा आणि हव्यास पाठीमागें

लागलेले, तृप्ति ह्मणून नाहीं; आणि तृप्ति नसली व हव्यास असला ह्मणजे मनाची स्थिति काय विचारावयाची आहे? वास्तविक पाहतां श्रीमंती आणि गरीबी यांतील भेद फक्त काय तो मिजाशींत असावयाचा. गरीबालाही गरजा असतात तशा श्रीमंतालाही असतात. गरीबाला क्षुधानिवारणार्थ अन्न, शीतनिवारणार्थ वस्त्र पाहिजे, त्याचप्रमाणें श्रीमंतालाही हवें. गरीबाला मीठभाकरीनें गरज भागवितां येते, ती श्रीमंताला साखरतुपानें; त्याला साधें धडी धोतर चालतें, तर याला उंची, मऊ कपड्यांशिवाय चैन पडत नाहीं. इत्यादि गोष्टी माझ्या मनांत येत, व मी पोरांबाळांस वगैरे सांगत असें पण त्यांचा उपयोग काय आणि किती वेळ? राग धरूं नये, लोभ सोडावा, मोहाशीं ओळख नसावी, गर्वाची जानपछान नको इत्यादि सर्वसंमत व सदा असाध्य गोष्टींचें नित्य प्रातःस्मरण केलें ह्मणून ऐन वेळीं त्याचा कितीसा उपयोग होतो? तशांतलाच हा प्रकार. तृप्तींत सुख आहे, ती ज्याला आहे त्याच्यासारखा भाग्यवान कोणी नाहीं, तोच खरा श्रीमान, असल्या शेंकडो गोष्टी मला स्वतःला माहीत आहेत. त्या आज नाहीं उद्यां, उद्यां नाहीं परवां, परवां नाहीं तेरवां, केव्हांना केव्हां तरी मनांत ठसतील, आणि तसें आचरण घडेल, ही माझी आशा आतां अगदीं व्यर्थ झाली. बायकोचे, मुलांचे, आणि स्वतः माझे असे तिजोरी हव्यास पाठीमागें लागल्यावर फक्त एकट्याच्या विचारांचें कितीसें प्राबल्य राहणार आहे? तेव्हां अशा तऱ्हेनें मी मोठ्या फिकीरींत पडलों व जिवाला चैन पडेना. मन सदासर्वदा अस्वस्थ होऊं लागलें, व त्यामुळें तर मला माझ्या

संसाराचा पराकाष्ठेचा तिटकारा आला. खरोखर गरीबीसारखें अन्य दुर्भाग्य नाहीं. पैसा जगांत फार चमत्कार करितो. जवानमर्द पुरुष असला तरी पैशापुढें दीन गाय होतो. सारांश, संसारयंत्राचें मुख्य मळसूत्र पैसा, सुखाचा जनिता आणि दुःखाची माता पैसा, तसेंच मानपानाचें मुख्य बीज, अब्रूइभ्रतीचें अधिदैवत, इष्टमित्रांचें प्रेम, गणगोताचा लळा, आणखी प्रत्यक्ष ईश्वराची कृपा देखील या पैशांत! आणि त्यानें तर मला अगदीं दुस्मान लेखिलें ह्मटल्यास हरकत नाहीं. तेव्हां मला सुख तरी कोठून आणि कसें मिळावें? या विवंचनेमुळें मी अगदीं बेजार झालों. नको हा जन्म आणि नको हा संसार असें झालें. वांईहून पुण्यास येण्याला निघालों तेव्हां माझी समजूत काय कीं हा त्रास पुण्याला नसेल, तेथें चार पैसे मिळतील, आणि पाठीमागची ददात तरी चार दिवस चुकेल. पण नाहीं, 'कुठें जाशील दैवा, तर तुझ्यापुढें उभा' अशी गत झाली. ईश्वरनामस्मरण करीत कांहीं काळ सुखानें जाईल, ह्मणावें तर तेंही नाहीं. सकाळीं दहा घटका दिवसास मुलाला शिकावयाला जाण्याची गडबड. पूजानैवेद्य तरी करून दिला पाहिजे? त्याला सांगावें तर त्याला फुरसत कशी व्हावी? रात्रंदिवस घोकण्याखालीं बिचारा जेरीस येई. तेव्हां काय होईल ती आपल्या एकट्याच्या जिवाचीच त्रेधा होवो, असा विचार केल्याशिवाय चालत नसे. असा मी सारखा गांजून गेलों. गांजून गेलों ह्मणून करावयाचें काय? लौकिक, माया, मनलज्जा आणि या सर्वांवर आशा आणि लोभ यांनीं माझ्या मनास पुनः पुनः घुटमळण्यास

लावावें. माझ्या काळजीची किंवा अशा या कुतरओढीची माझ्या स्त्रीला आतां कांहींच क्षिति वाटेनाशी झाली. वांईत तिला थोडी तरी माझ्या प्रपंचाची काळजी होती, पण पुण्यास आल्यावर कांहीं नाहीं. ह्मणजे ती घरीं नासधूस करीत असे असें नाहीं. पण तिचा अवाढव्य हव्यास, दुसऱ्यासारखें आपण कां वागूं नये हा हेका, आतां आपल्या मुलाबाळांच्या तब्बेती संभाळण्यांत किती अर्थ आहे याची मनसोक्त कल्पना, इत्यादिकांमुळें, ती खरोखर भांबावून गेली, असेंच मला वाटे. मुलांना माझ्या स्थितीची कल्पना नाहीं, तिला माझ्या स्थितीकडे पाहण्यास फुरसत किंवा गरज नाहीं, आणि ईश्वराचें मजकडे लक्ष जाईना, व यजमान, मित्र यांच्यांत पोकळपणा येत चालला, तेव्हां आतां पुढें काय गत होईल ह्मणून मी पुष्कळ वेळां मोठ्या विचारांत पडें. पण उपयोग कांहीं नाहीं. ती घडी गेली कीं पुनः आशा हात धुवून पाठीस लागे. हा सारा पसारा अगदीं खरा असें वाटे, आणि त्याच्याकरितां भारवाहकासारखे श्रम करण्याखेरीज जणों अन्य गत्यंतरच नाहीं अशी समजूत होई. तेणेंकरून पुनः मी फसें व आणखी दुप्पट दुःख दुसऱ्या खेपेस होई. अशा प्रकारची कालक्रमणा मी पुण्यास आल्यापासून चालली, त्यामुळें मला वाटे कीं मी मोठा पापी ह्मणून माझी अशी अवस्था झाली. गेल्या जन्मीं कांहीं पातक केलें होतें त्याचीं फळें मी आतां दोन्ही दोन्ही हातांनीं गोळा करीत आहें, तेव्हां आतां तरी कांहीं साधन करावें,

अशा घोटाळ्यांत इतःपर तरी पडूं नये, ईश्वराचें पूजन, भजन, स्मरण यांत काळ जाईल तर तें कांहीं वांया जाणार नाहीं; झाली ती गोष्ट झाली; पण पुढें तरी हे हाल नकोत; आईबापांनीं चार अक्षरें शिकविलीं आहेत त्यांचा तरी उपयोग निरपेक्ष करून घ्यावा. पण या विचारांला तरी कोठें गचांडी मिळाल्याशिवाय राहावयाची आहे? स्वार्थ साधून परमार्थ, प्रपंच साधून ईश्वराप्राप्ति इत्यादि विचार वारंवार आहेतच पुढें दत्त ह्मणून उभे. या कचाव्यांत मी सांपडलों आहें, त्यांतून केव्हां कसा पार पडेन तो खरा, असें मला वाटलें. एकंदरींत ‘कोंकणांतून देशावर गेला तरी पळसाला पानें तीनच’ ही ह्मण अक्षरशः खरी. एक दिलें तर दुसरें नाहीं, दुसरें दिलें तर तिसरें नाहीं, अशी ईश्वराची प्रतिज्ञाच, तेथें काय करणार? असें ह्मणून समाधान मानून घ्यावें झालें, हाच मीं शेवटाच उपाय योजिला.

# प्रकरण ५ वें.

## 'मतलबाशिवाय मनुष्य नाहीं.'

अशा तऱ्हेनें चोहोंकडून गांजलों तेव्हां उगीच मी वांई सोडून इकडे पुण्यास येण्याच्या नादीं पडलों असें मला वाटूं लागलें. आशा ओढून नेईल तिकडे फरफटत जाणें बरें नव्हे, हें आतां मला चांगलें कळून आलें. पण त्याला आतां काय इलाज ? आहे तें बरेंच आहे असा मनाचा धडा करून मी राहिलों. आज रविवार होता ह्मणून घरांत सर्व संथपणें चाललें होतें. जेवणखाण झाल्यावर चार दोन घटकांनीं मोरोबा घरीं आले. आमच्या इकडच्या तिकडच्या पुष्कळ गोष्टी झाल्या. मीं माझ्या सुखदुःखाच्या हकीकती चार घटका सांगितल्या. त्यावर मोरोबा ह्मणाले, 'अप्पा तुह्मी उगीच कां व्यर्थ दगदग करतां ? मी तुह्मांला सांगूं का एक युक्ती ? मला बुवा ती तर फार पसंत वाटते.' यावर मीं ह्मटलें 'काय सांगा तर पाहूं तुमची युक्ती ? पडली पसंत, दिसली उक्त, तर कां न करावी ? माझे इष्ट स्नेही काय ते येथें तुह्मीच; आपला परका का भाव आहे ?'

मोरोबा—तशांतलें नाहीं हो. ज्याचें त्याला कल्याण अकल्याण दुसऱ्यापेक्षां विशेष चांगलें कळतें; तेव्हां त्याच्या पसंतीनें सर्व कांहीं व्हावें हें ठीक, एवढेंच माझें ह्मणणें. मला तर ती गोष्ट फार पसंत वाटते. मी आमच्या यजमानांच्या कानावर ती गोष्ट कधींच घातली आहे. फक्त तुमच्याकडे विचारणें व्हावें, आणि मग तें काम मीं करावें ह्मणूनच

काय तो आजपर्यंत अवधि लागला. मी सांगतों ती युक्ती तुह्मी मुकाट्यानें बेलाशक करा–समजलांत? वहिनी, काय चाललें आहे आंत? ऐकलेंत का आह्मी काय बोललों तें?

मी–जाऊं द्या हो, बायकांला काय विचारावयाचें आहे त्यांत? मला अगोदर सांगा तर खरें तुम्ही काय म्हणतां तें? बायका काय तोबऱ्याला तेवढ्या पुढें.

मोरोबा–तसें नव्हें अप्पा, बायका म्हणजे काय तुम्ही कस्पटाप्रमाणें समजतां होय? सारा संसार कायतो त्यांच्यावर आहे, तेव्हां त्यांस सल्लामसलत आपली उगीच विचारीत असावें.

इतकें बोलणें झालें तों तीही आंतून येऊन कोनाड्याशीं उभी राहिली. तेव्हां मोरोबा पुनः ह्मणाले 'मी ह्मणतों, येथें तुमच्या प्रपंचाचे हाल होतात, शहरची वस्ती, उत्पन्न थोडें, तेव्हां कठिण जायचंच. त्यांतून घरांत चार कच्चींबच्चीं. आतां बाळ्या शिकतो आहे. उद्यां चार अक्षरें झालीं ह्मणजे तो काय पैशाचा नुसता पाऊस पाडील पाऊस! तोंवर काय असतील त्या अडचणी निमूटपणें सोसाव्या. प्रसंगानुसार चार पैसे कर्ज झालें तरी पत्करलें. कर्ज कर्ज काय फिटल्याशिवाय राहतें?'

मी.–मोरोबा, काय गोष्टी सांगतां ह्या? उपासमार पत्करली एक वेळ, पण, बाबा, तेवढें ब्रह्मास्त्र नको. अडचण अडचण ती काय? आज आहे आणि उद्यां नाहीं. तसें कर्जाचें तर नाहींना? नको, माझ्या आई, त्या कर्जाचें नांवदेखील नको!

मोरोबा—होय, तुमचें ह्मणणें खरें, पण कर्ज चुकलें आहे कोणाला? राजा असो, कीं रंक असो, त्याच्या पाठीमागें थोडेंबहुत ऋण हें आहेच. आतां, त्यांतल्या त्यांत युक्तायुक्त विचार पहावा लागतो ह्मणूनच तर तुह्मांस युक्ती कशी ह्मणतां अगदीं नामी सांगतों! तुह्मी ह्मणतां कर्ज नको. होय, मीही ह्मणतों, नको. पण सांगा—आतां गृहन्यून काढतों ह्मणून रागावूं मात्र नका—आतां वहिनीचीं लुगडीं फाटलीं, मुलगा तर पाहतां शाळेंत कशा कपड्यानें जातो तो, मुलीचें लग्न आलें, उद्यां आवडी सासरीं जाईल, सुनेची मंगळागौर आहे, एक का दोन, अशा शेंकडो अडचणी आहेत. या कशा सारणार? श्रावणमासच्या दक्षिणेवर कां पक्षमासच्या पितृतिथींवर? ती—'कसं बोल-लांत बरं भावोजी? उद्यां पंचमी आली. आवडीला एक साडी हवी. धाकटीला मग वगळायचं आहे? माझं आपलं राहूं द्या एकीकडे. बाळ्या तर रोज अमुक हवं तमुक हवं ह्मणून हट्ट घेतोच. त्या पोरावर सगळा आमचा संसार. नको का त्याची एखादी दुसरी तरी हौस पुरवायला? मी काय दागदागिने मागतें? झुळमुळ्याचीं दोन मोत्यें कमी आहेत तेवढीं अगोदर घ्या असं देखील माझं ह्मणणं नाहीं.

मी—बरें तें असो; मोरोबा, तुमची युक्ति तरी कोणती ती सांगा, ऐकूं द्या. सगळ्यांच्या गोष्टी खऱ्या, माझ्याच तेवढ्या खोट्या, असेंच कां होईना?

मोरोबा—हें पहा वहिनी, आमचे ते बाळासाहेब नेने आहेत कीं नाहीं, ते मोठे सावकार आहेत. अगदीं भला गृहस्थ आहे, पुण्यात्मा आहे.

ती—हं. हं. बाळासाहेब तुमचे यजमानच कीं नाहीं? आमची बगी परवां आदितवारीं कुंवार गेली होती. एक चवली दक्षणा, आणि इतकाल्या कांठाचा खण दिला तिला. चांगला गृहस्थ आहे बिचारा. त्याची काकू कीं कोण आहे तीदेखील फार भली बाई ह्मणतात. मला एकदां फुरसत सांपडेल तेव्हां येत जात चला ह्मणून निरोप देखील पाठविलान्. पण मलाच मेलं कुठं फावतं आहे? बाळ्या आला कीं भूक भूक ह्मणून नाचूं लागतो. केव्हां एकदां सकाळीं खाल्लं असतं; आणि त्यांतून मेलं तें शिकणं.

मोरोबा—होयना? पहा अप्पा! तो पुरुषच तसा आहे. गुणवान् काय, श्रीमंत काय, रीतीभातींत काय, कांहीं विचारूं नये.

मी—बरं मग?

मोरोबा—मी ह्मणतों त्यांजकडून तुह्मी दरमहा पंधरा रुपये उसनवार घेत चला; तुमचा बाळ्या झाला उद्यां कर्ता सवरता तर फेडील. व्याजही कांहीं ह्मणण्याजोगें नाहीं. एकोत्रा द्या, चला. काय वहिनी, मी ह्मणतों तें खरें का खोटें?

ती.—होय, रीतीचीच गोष्ट. असं देणार तरी कोण आहे आणि इतकं ह्मणतो तरी कोण?

मी.—बरं आहे. चला तर घ्या रुपये आणि करा कशी काय फेड करतां ती. अग, कर्ज ह्मणजे काय तोंडच्या गोष्टी समजलीस? घेतांनां वाटतं गोड, पण देतांनां कळेल कसें काय सुख आहे तें. तुह्मां बायकांना काय? आयत्या पिठावर रेघोट्या ओढावयाच्या. एक छत्रपति मिळवावयाचा

तर किती आयास पडतात तुला माहीत आहे? खर्चाच्या तेवढ्या गोष्टी तुम्हीं बायकांनीं सांगाव्या. तें कांहीं असो, मोरोबा, कर्जधाम करून असेंतोंपर्यंत माझी, व पुढें पोराबाळांची फजीती करून घेण्याच्या युक्ती तुम्हीं मला सांगूं नयेत, आणि आम्हीं त्या ऐकूं नयेत. तुम्ही आमचे स्नेही म्हणून आमच्या कल्याणाच्या गोष्टी सांगतां, सल्लामसलत देतां, आणि त्या आम्हीं ऐकूं नये हें गैरशिस्त आहे. पण माझा बुवा नाइलाज आहे. कर्ज म्हटलें कीं अंगावर कांटाच उभा राहतो. कर्ज आणि याचना—फार भयंकर मानहानि. त्यांतली, याचना आमच्या पाठीस लागलेली, आणखी त्यांत ही कशाला आणखी दुसरी पीडा हवी? म्हणून मी झालों तरी तुमच्या म्हणण्यास नाक़बूल होतों. तुम्ही आमच्या ऋणानुबंधांतले म्हणूनच तर एवढी तरी खटपट करतां कीं नाहीं?

हें व अशा प्रकारचें अन्य पुष्कळ बोलणें झाल्यावर मोरोबा घरीं गेले. पुढें कांहीं दिवस असेच रडत कढत चालले. घरांतल्या अडचणी मोठ्या नेटानें ती मजपुढें लोटूं लागली. कारण तिला माहीत कीं, रुपये मला कसे तरी मिळत असून, मीच ते नको म्हणतों, हें कांहीं नीट नव्हे. तिचा हा भाव मी जाणून होतों. इतक्यांत आवडीचा सासरा कांहीं कामानिमित्त पुण्यास आला. आम्ही वांईहून इकडे आलों हें त्यांस माहीत, तेव्हां ते उतरले आमच्याच घरीं. व्याही घरीं आलेले, तेव्हां बाहेरून श्रीमंती थाट नसेना का? पण असलेली स्थिती तरी खुलवून दाखविली पाहिजे म्हणून आम्ही उभयतां झटूं. त्यांचें राहणें आठ

दिवस झालें. जातांनां आवडीस नेतों ह्मणत, तेव्हां तिची रवानगी करून देणें भाग. ते घरीं असत तोंपर्यंत आह्मी सर्व आमंत्रणें सोडून घरींच जेवत असूं. मग काय पडली खर्चाची टंचाई. आवडीला एक साडी तरी दिलीच पाहिजे, तिच्या सासूला एक खण हा हवाच, असे निघाले घरांतून तगादे, आणि तेही खरेच. पोरीनें ह्मटलें, बाबा, मला एक पुणेरी घाटाचा गडवा हवा. इतक्यांत तिनें ह्मटलें, खरेंच यंदा तिला बरोबर फणीकरंडा दिला पाहिजे; मग, तेवढा तो आणावा. मीं ह्मटलें, बरें आहे. पोरगी दुसऱ्याच्या घरीं जाणारी; तिनें एखादा पदार्थ मागितला तर नाहीं ह्मणावें कसें? या विचारानें मीं या गोष्टीला कांहीं आढेवेढे घेतले नाहींत. मोरोबा रोज घरीं येतच असत. तेव्हां त्यांजपाशीं पुनः या सर्व अडचणी सांगितल्या. त्यांवर त्यांचें उत्तर–'काय तरी ब्राह्मण आहे पहा, व्यर्थ आपल्या जिवाला कातावून घेत आहे! संसारांत उसनवार केल्याशिवाय एक तरी प्राणी या दुनियेवर असेल काय? वारा येईल तशी पाठ दिली पाहिजे!' इत्यादि त्याचें बोलणें ऐकून मलाही वाटलें कीं तेंही खरेंच. संसार आहे त्यांत कर्जबाजारी व्हावयाचेंच. आह्मी चैनीकरितां वगैरे थोडेच पैसे घेतों आहों? तेव्हां या कर्जाबद्दल कोणी नांवही पण ठेवणार नाहीं. तेव्हां आतां आपण होऊन रुपये द्या असेंच मोरोबा ह्मणतात; घरीं तर नड आहेच; वाण्याची उचापत किंवा उधार कापड घेण्यापेक्षां हातउसनें घेणें काय वाईट? असा विचार करून मीं मोरोबास ह्मटलें, तुमच्या सल्ल्याप्रमाणें वागावें हें मला बरें

दिसतें. पण मला मागण्याचा प्रसंग आजवर नाहीं आला. तेव्हां आजचे रुपये तेवढे तुह्मीच मागून आणा; मग पुढें किंचित् परिचय झाला ह्मणजे पाहतां येईल. त्यावर मोरोबा बोलले, कांहीं हरकत नाहीं, तें माझें काम. एकदांचे संकटांतून मोकळे व्हा ह्मणजे झालें; एवढेंच माझें ह्मणणें. त्यानंतर बोलल्याप्रमाणें मोरोबांनीं पंधरा रुपये आणून दिले. व्याह्याची आणि आवडीची रवानगी केली. पुढें चारपांच दिवस लोटतात न लोटतात तोंच वांईकडील व्याह्याचा निरोप आला कीं परवांच्या दिवशीं सूनबाईस बोलवण्याला मनुष्य धाडून देतों, त्याजबरोबर रवानगी करून द्यावी. बरोबर पाठराखणही एक आलेली, तिला एक खण द्यावा, मुलीला एक साडी घ्यावी, हें टुमणें पुनः मागें लागलें. त्याला पांच रुपये खर्च लागला. तेही मोरोबाकडून घेतले. तिला दोन लुगडीं घेऊन दिलीं. मुलाला कपडे, व मला धोतरें घेतलीं, त्याला पुनः रुपये दहा अशी चालली रक्कम फुगत. इतक्यांत विहीण वारल्याचें नाशकाहून वर्तमान आलें. समाचाराला गेलें पाहिजे. खर्चाची अडचण, तेव्हां पुनः काढले पैसे कर्जाऊ. पहिले फिटले नाहींत, दुसरे काढल्याशिवाय गत्यंतर नाहीं. तेव्हां आतां व्हावयाचें कसें? हां हां ह्मणतां रक्कम फुगली, गेला आंकडा शंभरापर्यंत. मोरोबाच्या यजमानांनीं मला एकवार स्वतः येऊन भेटण्यास बोलाविलें. त्याप्रमाणें मोठ्या खिन्न मनानें मी त्यांच्या घरीं गेलों. बरोबर मोरोबाही होतेच. तेथें गेल्यावर मानपान आदरातिथ्य मात्र माझ्या कल्पनेपेक्षां फारच चांगलें झालें. तेव्हांच मला वाटलें कीं हा प्रकार कांहीं चमत्कारिक खरा. कारण कूळ

ह्मणजे सावकारास जगांतील अतिक्षुद्र प्राणी वाटतो. ऋणकोला मान नाहीं, अक्कल नाहीं, समजूत नाहीं, आणि अब्रूची चाड नाहीं असें धनकोस वाटत असतें आणि वाटतें तेंही रास्तच. मोरोबाबरोबर जातांना मी मुठींत जीव धरून गेलों, पण येतांनां मनांत नाना प्रकारच्या शंकांचें जाळें पसरूं लागलें. "भटजी! हें घर आपलें आहे; लागेल तसा पैसा नेत चला. अनमान नको. फेडण्याची काळजी नको. परस्परांत संबंध जडला म्हणजे मग नसते फारशी परवा." या वाक्याचा मतलब काय हें माझ्या ध्यानांत येईना. कर्ज काढण्याची मला जन्मादारम्य संवय नसल्यामुळें हें माझ्या मनाला फार जाचूं लागलें. रात्रंदिवस तें कसें फिटेल, त्याची व्यवस्था काय करावी, ही काळजी माझ्या डोक्याशीं सदानकदा अगदीं ठेवलेली असे. माझें एवढेंसें कर्ज तर त्याच्याकरितां मला हृद्रोग लागण्याची वेळ आली, मग हजारो आणि लाखो रुपये कर्ज ज्यांस असेल त्यांची दशा काय होत असेल तें परमेश्वर जाणे. 'अति ऊ त्याला खाज नाहीं, आणि अति ऋण त्याला लाज नाहीं,' हेंच खरें. नाहीं तर, कर्जासारखा भयंकर रोग असूनही त्याची परवा न बाळगणारे इतके हरीचे लाल सुखानें कसे जीवंत राहतात कोण जाणे? कर्जबाजारी मनुष्याची लोकांत पत नाहीं, घरांत बोज नाहीं, त्याच्या चित्तांत स्वास्थ्य नाहीं, मनांत आनंद नाहीं, डोळ्यांत झोंप नाहीं, अन्नांत रुचि नाहीं, आणि शरीरांत जीव नाहीं अशीच अवस्था असते; ही सर्वांच्या प्रत्यक्ष किंवा परंपरा या अनुभवास येणारी गोष्ट. तेव्हां वास्तविक पाहतां त्यापासून

राहवेल तितकें दूर राहावें हा शहाणपणा खरा. पण कित्येक प्रसंग असे येतात कीं तेथें अगदीं बिनतोड होते. फार कशाला, माझीच गोष्ट पहाना. एकंदरींत काय! कर्जास वमन मानून दूर राहावें हें शहाण्या माणसाचें काम. रात्र असो दिवस असो, सण असो कीं वार असो, सावकाराचें विचारें व्याज हें चाललेलें असावयाचेंच. एक प्रकारची दगदग कमी करावी ह्मणून मीं ही खटपट केली, तों पहिली-च्या दुप्पट रुखरूख जिवास लागून राहिली हा काय भोग म्हणावा? अशा नाना प्रकारच्या कल्पनांचें भटकणें चाल-लें होतें. तें सर्व डोक्यांत घेऊन मी घरीं आलों. संध्याका-ळची वेळ, संध्या करून कांहीं थोडें ध्यावें, तर मन अगदीं उदास झालेलें. मी उदास असलेला पाहून तीही फार खिन्न व सचिंत होई. माझी काळजी तरी कोणती आहे हें कळून घेण्याचा ती पुष्कळ यत्न करी. माझ्या अनुभवावरून मी खास सांगतों, गृहिणी म्हणजे संसारक्लेश झाडून काढणारी केरसुणीच आहे! पतीला सचिंत पाहून देखील कावरें-बावरें होणारें तिचें नेत्रयुग्म, प्राणप्रियाला संकट काय आहे तें जाणून घेऊन आपण त्याचे विभागी व्हावें या इच्छेचीं पूर्ण दर्शक व सूचक अज्ञानजन्य तिचीं तीं प्रश्नोत्तरें, आ-धींच संतापलेल्या प्रियाच्या जिवास एवढ्याशा गोष्टीपासून देखील जास्त त्रास होईल म्हणून पोटच्या पोरांवर कोणांस न कळत डोळे फिरवून धाक दाखविणें, किंवा प्रसंगीं खसकन् अंगावर धांवून जाणें, खपा झालेली मर्जी तोलावर धरण्याकरितां मनःपूर्वक झटणें इत्यादि गोष्टींनीं ती तेव्हांच नवऱ्याचा राग किंवा त्याची काळजी दूर करून सोडते.

मी संध्या करण्याकरितां म्हणून पाटावर बसलों खरा, पण आंत मनाशीं काय ? सावकार, त्याचें देणें, घरांतलें कांहीं किडूकमिडूक, मुलाच्या नौकरीचें मनोराज्य, या घालमेलींशिवाय कांहीं सुचेना. समईपाशीं फराळाचे पोहे निवडण्याचें निमित्त काढून ती मजजवळ येऊन बसली, आणि मधून मधून हळूच एखाददुसरा प्रश्न दबत दबत विचारूं लागली, त्याला होय नाहीं कांहीं तरी मी उत्तर देत असें. तेव्हां तिनें निराळाच एक प्रश्न काढला. मोरूभावोजी आपल्या बगीला एक नामी स्थळ आहे म्हणत होते. 'जमविण्याचें काम माझें, तुम्ही दोघें अगोदर कबूल तर व्हा. स्थळ म्हणजे काय अगदीं उत्तम. दागदागिने, वस्त्रपात्र, अगदीं कश्शाची कांहीं पंचाईत नाहीं,' असें ते म्हणत होते. माझें मनही तिकडे एकदम गेलें. म्यां म्हटलें, काय मोरोबा ? आपले मोरोबा ? मग त्यांनीं नाहीं मजपुढें कधीं ही गोष्ट काढिली ? ते कधीं तुला सांगत होते !'

तीः—वः, एकचका दिवस ! परवांपासून चारपांच वेळ झाले. ती शेजारची उमा आली होती नाहीं ? त्याच दिवशीं वाटतं ते मला म्हणाले, वहिनी बगीला स्थळ पण कसें सोन्यासारखें पाहिलें आहे !

मी.- हं ? अस्सं ? बरें विचारूं उद्यां त्यांस; पण कुठें इथेंच कां दुसरीकडे कोठें आहे ?

ती—तें बाई नाहीं मला तेवढं ठाऊक; पण म्हणत इथेंच आहे म्हणून. इतक्यांत बगी वेडेंवांकडें तोंड करीत 'बघग ही चिंगी मला बाळासाहेब नेन्यांची बायको म्हणून म्हणते' अशी कागाळी घेऊन आली. तेव्हां मला मोठा चम-

त्कार वाटला. मीं तिला पुसलें, 'बगडे, कोणग बाळासाहेब ते'? त्याला तिनें, 'मला नाहीं माहीत' असें क्षणकाऱ्याचें उत्तर दिलें, आणि तिला खडसून ह्मणाली, 'आई, मी नाहीं बघ अं आतां मोरूकाकाच्या घरीं जेवायला जायची. तोही तिथं मला असंच जेव्हां तेव्हां विचारीत असतो. तुला सोन्याचा पट्टा देववितों बघ, ह्मणतो.' असें ह्मटल्यानंतर पुनः त्या मुलीबरोबर ती भांडावयास चालती झाली, तेव्हां ती ओरडून ह्मणाली, 'कोणग–चिंगे, जा आतां घरीं. आई रागें भरेल बघ. रात्रीं का घर सोडून बाहेर धिंगाणा घालावा? बगडे! चल इकडे ये!'

अशीं हीं बोलणीं ऐकून तर्काच्या वावटळी उठण्यास आरंभ झाला. मला माहीत नव्हतें कीं, मोरोबाचे बाळासाहेब विधुरावस्थेंत आहेत हें. एवढें कळल्यानंतर सर्व गोष्टींचा बरोबर संबंध जुळूं लागला, आणि मनास वाटलें कीं या ठिकाणीं मतलबानें डबडबलेले सर्व व्यवहार आहेत. मला जाळ्यांत पकडण्यासाठीं या एकंदर खटपटी असाव्या, आणि एवढें कळल्यावर मग काय विचारावयाचें आहे? काळजीस एकीकडे सारून शंका पुढें येऊं लागल्या, आणि त्या शंकांच्या पाठोपाठ भीति व भीतीपुढेंच एक एक पाऊल वैताग मजवर चाल करून आला. संध्यास्तोत्रें राहिलींच बिचारीं मधल्यामध्येंच. हें संसारतापाचें स्तोत्र काय कमी आहे? असो. माझी पुरी फजीतीच मांडावी अशी जर विधात्याची मर्जी, तर तेथें आह्मी तरी काय करावयाचें आहे? अशा विवंचनांनीं थोडें समाधान मानून घेऊन मीं ती रात्र कशी तरी लोटली. मोरोबाची भेट

झाली ह्मणजे जास्त खुलासा होईल अशी समजूत काढून मी स्वस्थ बसलों. वास्तविक पाहतां मीं काळजी करावी असा प्रकार कांहीं तूर्तास नव्हता. मुलीचें लग्न करावयाचें, त्याला अजून थोडी अवधिही होतीच. शिवाय अमक्याला देणें किंवा तमक्याला न देणें याचे आह्मी मुखत्यार आहोंच. तर मग आपणांस काळजी ती कशाला, असें वाटे. परंतु बाळासाहेब नेन्यांचे उपकार व मोरोबाचा स्नेह हींच काय तीं लचांडें मध्यें येत. आह्मी पुण्यास परक्या ठिकाणीं आलों ते कोणाचा तरी लोभ संपादावा ह्मणून, एवढ्याच काय त्या शंका. दुसरे दिवशीं मोरोबा आले. त्यांनीं येतांनां हातांत एक कागदही आणला होता. मला पाहतांच 'अप्पा झाली बरें फत्ते. हा मोरोबा तुमचा गेल्या जन्मींचा ऋणकरी खरा. हें पहा दानपत्र' असें म्हणून ते मजपुढें, 'कां कसं आहे आतां? नशीबवान खरे तुम्ही.' एवढ्यावर बोलणें संपवून बसले. तें दानपत्र हातीं घेतलें आणि आरशी लावून वाचून पाहिलें तों तें खरेंच माझ्या नांवचें. 'वहिनी! अहो वहिनी, आपल्या यजमानांनीं एक घर आणि लहानसें एक शेत मिळविलें बरें—पुण्यास येऊन' असें मोरोबा बोलले. त्यासरशीं ओलेत्यांनीं ती हकीकत खरी कीं खोटी हें पाहण्यासाठीं म्हणून ती आम्ही बसलों होतों तिकडे अंगावर पाणी गळत आहे तें तसेंच घेऊन व एका हातांत ओले ओचे आळून धरीत आणि आमच्याकडे पाठ करीत आपली मान मुरडून विचारूं लागली. तेव्हां तिच्या अंगावर मी वस्सकन् गेलों आणि म्हटलें 'अग, हो पलीकडे! काय रीत कीं काय ही? जा लुगडें तरी नेसून ये!' तेव्हां

तिचें उत्सुक मन मोठें खट्टू झालें आणि ती जी आंत गेली ती परत बाहेर आलीच नाहीं. मोरोबा ह्मणाले, 'अप्पा! आमचे यजमान मोठे योग्य पुरुष बरं. ही सारी खटपट तरी त्यांचीच. तुमची तरी त्यांनीं केवढी स्तुती केली, आणि द्यावयाचें तर तुह्मांलाच द्यावें ह्मणून त्यांनीं किती आग्रह केला ह्मणतां, कांहीं बोलून सोय नाहीं.'

मी—मोरोबा, भूमिदान आणि गृहदान घेणें मला बुवा कसेंसेंच वाटतें! हा संस्कार विनाकारण घडतो आहे येथें आपल्याला—नाइलाजास्तव.'

मोरोबा—द्या सोडून. माझा कुठं आग्रह आहे? १०।१९ खण जागा आणि टिपणीभर शेत ह्मणजे काय थट्टा आहे? मला नसतें का तें करून घेतां आलें आपल्या नांवानें? पण ह्मटलें कीं मी काय लंगधडक. पोर ना बाळ. तुह्मी योग्य ब्राह्मण, दशग्रंथी, कुटुंबवत्सल, ह्मणून तर मीं ही खटपट केली, नाहीं तर माझें हो काय अडलें होतें?

ह्याला काय उत्तर द्यावें कळेना. एकीकडे काल रात्रींच्या शंका, पापपुण्याची भीति, आणि दुसरीकडे आशा, संकटस्थिति आणि घरीं चालत आलेलें गमावण्याची भीति. तेव्हां करावयाचें तरी कसें या विचारांत पडलों. अखेरीस होय नाहीं होतां होतां ठरलें तें दानपत्र कबूल करण्याचें, आणि काय? त्या दिवशीं मोरोबा घरीं निघून गेल्यावर दुपारीं तिला मी ही हकीकत सांगूं लागलों तेव्हां ती नीट ऐकेचना. सकाळच्या बोलाण्यचा तिला राग आलेला. ती आंतून ऐकत उभी होती हें मला माहीत होतें. पण आ-

एका राग मला दाखवावा ह्मणून चौकसपणें विचारपूस न करितां ती आपली रागावूनच बसली. तेव्हां मी चिरडीस आलों आणि ह्मणालों, 'या बायकापोरांकरितां तर हीं दानें आणि द्रव्यें मिळवून पापपुण्याचे धनी आपण व्हावें, आणि त्यांना तर आपली गरज नसावी, काय चमत्कार आहे? माझ्याबरोबर यांतील काय यावयाचें आहे? सर्व जेथल्या तेथें! त्यासरशीं तिनें आपला रागाचा आव सोडला आणि मग लाडीगोडीच्या भाषणास सुरुवात केली. बरें झालें बाई, स्वतःचें घर तरी राहायला मिळालें. नको नकोरे देवा हीं भाड्याचीं घरें. त्यापेक्षां मेली धर्मशाळा बरी. इथं केरच टाकूं नका, तिथं खिळाच मारूं नका, इकडनं वहिवाट नको, अन् तिथून वर्दळ कशाला, अशी मेल्यांची जाचणूक सोसावी तरी कशी अन् किती?' असल्याही पुष्कळ वट-वटी चालू झाल्या. त्या संपविण्याकरितां मीं तिला ह्मटलें, कायग मोरोबाचा यजमान फार भला दिसतो. त्याचे उपकार तर आमच्यावर फार होत चालले. आह्मी भटभाई; आह्मांला कोणीं कांहीं दिलें, किंवा कोणीं किती उपकार केले तरी त्यांत मुळीं आह्मांस नवलच वाटत नाहीं, आणि त्यांचे ते उपकार नव्हेत असें आम्ही समजतों; कारण तो धर्म बोलून चालून, व त्याचें फळ त्यास दुसरीकडून मिळावयाचें असतें. पण यांत बाळासाहेबांचा कांहीं मतलब तर नसेलना?

ती—हं आला आहे मतलब. काय तरी बाई चमत्कार! तो कसला भला माणूस आहे! श्रीमंती पुष्कळ, वागणूक चांगली, पदरीं माणसं किती, धर्म करावा ही बुद्धि; आणि

अशा पुरुषाबद्दल कां उगीच आपलं कांहीं तरी ह्मणावं?
इतक्यांत मोरोबा पुनः आंत आले. त्यांनीं हें सर्व भाषण ऐकिलें असावें असें वाटतें. ते आंत येऊन बैठकीवर बसून ह्मणाले, 'काय ह्मटलेंत वहिनी? आमच्या यजमानांची काय निंदा चालली होती? मला ऐकूं द्या तर खरी.'

ती—छेग बाई, तुमच्या हो यजमानांची कोणीं निंदा केली? आणि बिचाऱ्यांची निंदा करणार तरी कोण? हजारांत एक तरी तसा माणूस मिळेल काय?'

'वः एकून तुम्हांस पसंत आले तर आमचे बाळासाहेब? मग द्याना तुह्मी आपली मुलगी त्यांना? बगडीला ते अगदीं जीव का प्राण करतील बघा!' असें किंचित हंसत व थोडें- सें थट्टेवर नेल्यासारखें मोरोबा बोलले. त्यांची ती थट्टाच समजून तिनें उत्तर दिलें ' हो! माझी कबुली. असला जांवई आह्मां दरिद्र्यांना मिळणार तरी कसा? तें मोरोबास खरें वाटलें. एखाद्या वस्तूसाठीं मनुष्य अतिलोलुप झाला ह्मणजे त्याला खरें आणि खोटें सुद्धां कळेनासें होतें, तशांतली गत आमच्या मोरोबाची. पण हें ऐकून मी मात्र मनांत दचकलों. भीत होतों तीच गोष्ट बाहेर पडली. मोरोबाचा यजमान श्रीमंत खरा, आणि सद्गुणी व समंजस असेल, व त्यांचें घराणेंही बालबोध असेल, पण वय चाळि. शीच्या घराला आलेलें, असल्याला का ही आमची बगडी द्यावयाची? असा मीं आपल्या मनाशी विचार केला, आणि मोरोबाला ह्मटलें 'मोरोबा! तुमचें मत बगडी बाळासाहेबांस द्यावी असें का आहे? तुमच्या 'आमच्या सल्ल्यास पसंत पडेल तर ती गोष्ट करावयाची, ह्मणून विचारतों.

तुह्मांला कसें वाटतें ?' या माझ्या वाक्याचा झोंक जाणून घेण्याइतकी मोरोबाच्या अंगीं चाणाक्षता नव्हती, ह्मणून तो ह्मणाला. 'हो ! हो ! खुश्शाल द्यावी. मला तर बुवा तें स्थळ फार नामी दिसतें; आणि तुह्मांला तरी नापसंत पडेल असें त्यांत काय आहे ? येऊनजाऊन वयच कीं नाहीं ? बगडीला दहावें वर्ष असेल, आणि त्यांचें फार झालें तर ३०।३२ च कीं नाहीं ? बगी पहा उद्यां हां हां ह्मणतां वाढेल. ती मोठ्या उफाड्याची बायको आहे.'

मीं ह्मटलें—मोरोबा, सारें खरें, पण वधूवरांत वयाच्या अंतराला कांहीं तरी सीमा असतेना ? वीस पंचवीस वर्षांचें अंतर ?

मोरोबा—उँः, त्याचें नका तुह्मी मनांत आणूं. चाळीस पंचेचाळीस आणि पन्नास वर्षांच्या थेरड्यांनींदेखील लग्नें लहान लहान पोरीशीं लाविलेलीं तुह्मांला किती दाखवूं ?

हें मोरोबाचें भाषण ऐकतांच मला संताप आला, आणि मीं रागावून मोरोबास ह्मटलें: 'मी खाटिक नाहीं, माझी पोर असल्या थेरड्यास द्यायला !.पोटची पोर थेरड्याच्या गळ्यांत बांधण्यापेक्षां बेधडक तिला विहरींत ढकलून देणें बरें ! मुलगी ह्मणजे काय ती परसांतली भाजी, का जनावर, का आहे तरी काय ? चांगलें सुस्थळ बघावें, योग्य वर पसंत करावा, तिला सुख होईल ह्मणून झटावें, हीं आईबापांचीं कामें. आंतड्याचा धर्म आंतड्याला माहीत. आपण हयगय करून किंवा डोळे झांकून चुकारतट्टाप्रमाणें तिला चलतेंसलतें स्थळ पाहून द्यावें आणि तिला दुःख होऊं लागलें ह्मणजे मग आईबापांच्या नांवानें

४ वा.

तिनें अक्षय खडे फोडीत बसावें, हें कोणाला पसंत पडेल? आईबापांवर सर्वस्वी अवलंबून असणारी बिचारी गाय ती !–' अजून मी पुढें बोलणार तोंच मोरोबा ह्मणाले 'पण अण्णा ! मी का बगाडीस विकत द्या ह्मणतों, तुह्मी इतके रागावतां ते ? हुंडादेखील द्यावयास नको ह्मणून मीं आपलें तुह्मांस स्थळ दाखवून दिलें. सर्व गोष्टी एके ठिकाणीं मिळणार कशा ?' ह्या त्याच्या बोलण्यामुळें तर मी फारच खवळलों. राग फार आल्यामुळें माझ्या तोंडांतून शब्ददेखील निघेना; तरी तशांतच ह्मटलें 'आपल्या पोटच्या पोरी थेरड्यांच्या गळयांत नेऊन बांधणाऱ्या मांगांचें नांव ऐकतांच सचैल स्नान करावें ! पोरी विकणाऱ्यांस आईबाप का ह्मणावयाचें ? अहो ते मांग ! कसाब ! ह्मार !' हें माझें बोलणें चाललेंच होतें इतक्यांत मोरोबास कोणी बाहेर हाक मारावयास आलें, ह्मणून ते निघून गेले. नंतर कांहीं वेळानें माझा राग थोडासा शांत झाला, पण जिवाला मात्र अगदीं चैन पडेना. मनांत नाना तऱ्हेचे विचार घोळूं लागले. मोरोबाचा स्नेह, त्यांच्या यजमानाची भलाई, इत्यादि एकूनएक गोष्टीचा संबंध आतां अगदीं बरोबर माझ्या ध्यानांत आला, आणि 'मतलबाशिवाय मनुष्य नाहीं' अशी माझी बालंबाल खात्री झाली.

# प्रकरण ६ वें.

## ' प्रसंगाशिवाय माणसाची खरी पारख कदापि होत नाहीं. '

परम प्रिय, अत्यंत निरपेक्ष आणि माझ्या कल्याणासाठीं सदा दक्ष अशी ज्याविषयीं माझी समजूत तो मोरोबा माझा मित्र काय किंमतीचा, आणि त्याच्यावर पुढें कोणताही भरंवसा आणखी जास्त टाकणें कसें बिलकुल कामाचें नाहीं, या गोष्टीचा मी आपल्याशींच घटकाभर विचार करीत बसलों. मोरोबा आजवर माझ्या कल्याणाविषयीं इतका कां तत्पर असे, व तो माझा परमप्यार मित्र मला वाटेल असेंच आचरण त्याच्या हातून कां घडत आलें, या सर्वांचा संबंध आतां कसा अगदीं नीट जुळूं लागला. माझी पोटची पोर, आणि ती म्यां या एका थेरड्याच्या गळ्यांत, आणि त्याच्याजवळ पुष्कळ पैसा आहे एवढ्यासाटीं, बांधावी हा विचार मोरोबाचा! पण ती किंवा मी अशा गोष्टीला कदापि मान्य होणार नाहीं ही गोष्ट मोरोबाला कशी कळली नाहीं कोण जाणे? मनुष्य एकदां कोणत्याही गोष्टीविषयीं अत्यंत आतुर झाला ह्मणजे सारासार विचार व शक्याशक्यतेचा संभ्रम ओळखणारी त्याच्यांतील अक्कल आधींच आपलें चंबूगवाळें उचलून पार चालती होते, हेंच खरें. मोरोबाला आपल्या यजमानाची मर्जी संपादावयाची असेल, किंवा कदाचित् त्याचे मनोरथ पूर्ण करून कांहीं डल्ला मारावयाचा असेल, पण तेवढ्यासाठीं माझ्या लाडक्या बगडीच्या जन्माचें वा-

टोळें करण्यास उद्युक्त होणें ह्मणजे केवढा हा त्याचा अधमपणा ! आणि त्यांतून मोरोबा ह्मणजे माझा मित्र, प्रत्यक्ष भाऊ मानलेला ! मित्र ह्मणजे स्वतःचाच एक अंश अशी समजूत सर्वत्र आढळते. या प्रपंचांत मित्र असा कांहीं एक पदार्थ आहे, ह्मणून तर कित्येक वेळां समाधान वाटतें. सुखदुःखाच्या चार गोष्टी सांगून व ऐकून खचलेली उमेद सावरून धरणारा मित्राखेरीज अन्य कोण मिळणार आहे ? आपल्या अंगीं काय चारदोन सद्गुण असतील त्यांचा परिमळ फांकविण्याचें काम मित्राशिवाय दुसऱ्या कोणाच्या हातून घडणार ? चुकूनवांकून एखादी गैर गोष्ट घडली तर तिजवर पांघरूण घालणें फक्त एक मित्रच करूं जाणे; आणि संकटकाळ अथवा अडचणीचा प्रसंग ओढवला तर त्या वेळीं हिम्मत देणारा आणि कूर्मदृष्टि राखून आपला खांदा देण्यास पुढें सरसावणारा एका मित्राशिवाय दुसरा कोणी मिळावयाचा नाहीं. अशा अनेक कारणांमुळें मी सदा मित्रासाठीं हपापलेला असें. सुखाचा उपभोग, दुःखाचें निवारण, सद्गुणांचें अभिनंदन, दुर्गुणाचा निषेध, संकटकाळाचा खंबीर आसरा, लौकिकसंपादनाचा आधार, हिताची जोड, पुण्याकडे प्रवृत्ति वळवणारी, फार काय सांगावें, प्रपंचांतील दगदगी व त्रास न भासूं देणारी साक्षात देवता ह्मणजे काय ती एक मैत्री. असा अनभव नसणारे दुर्दैवी या जगांत फारच थोडे असतील. शारीरिक व्यंग किंवा पंचेंद्रियांपैकीं एखाद्या इंद्रियाची वाण एखादे वेळ पत्करेल; पण प्रापंचिक वाण ह्मणजे अर्थात् मित्राचा अभाव खरोखर अगदीं दुःसह होय हें कोणीही

तऱ्हांच कबूल करील. ह्मणूनच मी सदा मित्रांचा भुकेला असें. मित्र ह्मटला कीं त्याला कोठें ठेवूं आणि कोठें नको असें मला होई. पण जेंव्हां ही मित्रांची संख्या बरीच वाढूं लागली, आणि साधारण परिचित मनुष्य असला कीं लगेच त्याला मी मित्र मानूं लागलों, तेंव्हां मला काळजीमात्र जास्त लागत चालली. आज काय अमका मित्र आजारी, उद्यां त्या मित्रावर संकट, परवां त्या तिसऱ्याची ही अशी हानि झाली वगैरे ऐकिलें, ह्मणजे मला चटपट लागून रहावी. असा प्रकार हरहमेश घडत असे, ह्मणून कुटुंब वाढूं लागलें ह्मणजे एकट्या कर्त्याला जशी पंचाईत जास्त पडते, तशीच माझीही मित्रांसंबंधानें स्थिति होऊं लागली. याकरितां आहेत त्या मित्रांपेक्षां जास्त मित्र असणें बरें नव्हे, असा माझा निश्चय पूर्वीच झाला होता. पण मी पडलों भिक्षुक गडी. अठराविश्वे दरिद्र आमच्याकडे ओतप्रोत भरलेलें, आणि त्यांत आणखी आह्मी शिष्ट, तेंव्हां जरासा श्रीमंत, थोडा जास्त खटपटी, थोरामोठ्यांच्या घरीं जाणारा येणारा, असा पाहिला कीं त्याला मित्राच्या माळेंत ओढण्याला मी जसा काय अगदीं तिसऱ्या पायावर तयार. जरा खाऊन पिऊन सुखी गृहस्थ पाहिला कीं त्याच्याशीं घरोबा पाडण्याला आणि त्याची मित्रांत गणना करितां येईल अशी खटपट व दगदग सोसण्याला मी आपला सदा जसा काय हपापलेला. मी मित्र संपादण्यांत तत्पर असें, किंवा तत्संबंधीं माझी अनेक कारणांमुळें उत्सुकता विशेष, ह्मणूनच मित्रांत मला खोटे असे फार लागत, व त्यामुळें कैकवेळां मला वैतागही बराच येई. मी दशग्रंथी ब्राह्मण,

सद्धर्मी, आचारशील, बालबोध, सगळें खरें. पण त्याचें श्रीमंत किंवा सुखी लोकांना काय? मी माझ्यापरी होईल तितका त्यांचा स्नेह संपादन करीं; त्यांचें काम अगदीं बिनखर्ची व्हावें ह्मणून तळमळें; आज नाहीं पण प्रसंगानुसार आपली अडचण लहान मोठी कशीही असली तरी ती दूर होईल या आशेवर अल्पस्वल्प तात्कालिक फायद्याकडे मी दुर्लक्ष करीं. पण त्याचा ऐन वेळेस कांहीं उपयोग होत नसे, असे एकामागून एक पुष्कळ अनुभव आले, तेव्हांपासून मित्रांकरितां माझी हाव बरीच कमती झाली. तथापि एकदां स्वभाव बनला तो बनलाच. त्याप्रमाणें मी मित्र आणि मैत्री एतत्संबंधी माझे पूर्वीचे सर्व अनुभव एकीकडे गुंडाळून ठेवीं आणि मित्र मित्र ह्मणून धडपडत असें. वांई सोडल्यापासून पुण्यास कांहीं मला ह्मणण्याजोगे मित्र मिळाले नाहीं, खरें; पण माझा मोरोबा ह्मणजे मला एक परब्रह्म वाटे. मोरोबा श्रीमंत नव्हता, किंवा ह्मणण्यासारखी उच्च स्थितींतलीही त्याची राहणी नसे. विद्या, कीर्ति, द्रव्य या तिहींपैकीं कोणाचाच मोरोबास पाठिंबा नव्हता, आणि अशाच्या स्नेहापासून ह्मणजे मला कांहीं प्राप्ति होईल अशांतलाही प्रकार नसे. यामुळें मला वाटे, आमचा स्नेह—ह्मणजे मोरोबाचा व माझा—खरा खरा निरपेक्ष. माझा उपयोग त्याला नाहीं, आणि त्याचा मला नाहीं. उगीच जिवाला एक आपली विसांव्याची जागा असावी, ह्मणून मोरोबाला मी अत्यंत प्रिय मित्र समजत असें. पण मोरोबाची मैत्री सहेतुक असेल, ह्मणजे अमुक एक कार्य साधण्यासाठीं त्यानें माझ्याशीं हा असा स्नेह ठेविला असेल, ही कल्पनाही मला

कधीं शिवली नाहीं, पण तें कर्ज, ती दान मिळालेली जागा, बाळासाहेबांची भलाई, इत्यादि चटसाऱ्यांचा संबंध माझ्या बगडीच्या लग्नाशीं येऊन बुटमळतो असें जेव्हां कां माझ्या मनानें घेतलें, तेव्हां मात्र मोरोबाचें कपटजाल एकंदर माझ्यापुढें अगदीं स्पष्ट उभें राहून, मी आतां मोठ्या अडचणींत येऊन पडलों असें माझें मलाच स्पष्टपणें वाटूं लागलें. मोरोबाचें तें थट्टेवर नेलेलें भाषण मला चैन पडूं देईना. नाना प्रकारच्या कुतर्कांच्या वावटळींनें मला भंडावून सोडिलें. अन्न गोड लागेना; झोंपेनें पलायन केलें; देवदेव सुचेना; संध्यादेखील सांग होईना. माझ्या चित्तवृत्तींत ही अशी चलबिचल झालेली माझ्या बायकोच्या ध्यानांत तेव्हांच येऊन चुकली. कारण तिच्याही चेहऱ्यावर टवटवी नव्हती. तिच्या भाषणांत उल्हास कोठेंच दिसेना. या संसारांत जिगजिगीमुळें मनुष्य फार कातावला ह्मणजे तो पराकाष्ठेचा चिरडखोर बनतो. त्याच्या त्या चिरडखोरपणामुळें घरांतला आनंद नाहींसा होऊन घरधनीणही मग कावाकावी करूं लागते. लेकराचा लडिवाळपणा आनंददायक होत नाहीं. त्यांच्या लहानसहान खोड्या भयंकर अपराध वाटून त्यांना शिक्षाही जरब मिळूं लागतात. अशांतला प्रकार ४।५ दिवस माझ्या घरीं झालल्यामुळें नको हें जिणें, आणि नको हा त्रास, असें माझ्या बायकोला वाटलें असेल तर त्यांत विशेषसें नवल नाहीं. मी सदरेवरील ओटींत अगदीं सचिंत असा एकटाच बसलों आहें हें पाहून ती जरा पुढें येऊन अगदीं केंविलवाण्या पण जरा नेटक अशा स्वरांत ह्मणाली, 'काय बाई, आज

तीन चार दिवस पाहतें, मेली काळजी काय असली लागली आहे, कोण जाणें! कालही जेवण चांगलें झालें नाहीं, परवां फराळ केला नाहीं, आणि मुलांशीं बोलणें नाहीं, हंसणें नाहीं, आपलें सदान्‌कदा कपाळास आंठ्या घालून असें बसायचें कां होतें कोणाला ठाऊक? एवढी काळजी तरी जळ्ळी ती कसली? असें ती म्हणते न म्हणते तोंच, तिचें तें अर्धेंच भाषण पुरें झालें असें समजून मीं उत्तर दिलें, 'छे, काळजी कसली? काळजी नाहीं न कांहीं नाहीं; आणि काळजी करून होणार तरी काय? भोक्तृत्व तेवढें भोगलेंच पाहिजे, तें कांहीं कोणाला चुकत नाहीं!' 'ह्मणजे?' ती ह्मणाली ' याचा अर्थ तरी काय? आणि आतां काळजी तरी अशी कोणती आहे?' 'हं. तुमचें ठीकच आहे, आणि तुला सांगून त्यांत काय कमी का व्हायचें आहे? मी काळजींत चूर झालों आहें, तितका पुरे. तुला आणखी कळवून काय करूं? तूं आपली राहीनास आनंदांत?' या माझ्या बोलण्यानें ती जास्तच घाबरली. तिला वाटलें काय संकट नवीन आलें आहे, आणि काय नाहीं. तिनें त्या वेळीं आपला चेहरा असा कांहीं चमत्कारिक केला कीं तो पाहून मला थोडीशी गम्मतच वाटली. 'मन चिंती तें वैरी न चिंती' अशी ह्मण आहे त्याप्रमाणें तिच्या मनानें नसत्या शंभर संकटांकडे धांव मारिली! आणि त्या काल्पनिक संकटांमुळें ती पुनः भेदरून गेल्यासारखी दिसली. घामानें बिचारी डवडवली सुद्धां. तेव्हां मला वाटलें आतां थोडीशी इची गम्मत करून पहावी. माझी काळजी थोडीशी आ-

पोआप बाजूला सरकली, आणि मीं थोड्याश्या उसन्या अवसानावर तिला ह्मटलें, ' तुह्मांला काय ? आह्मी काळजींत चूर असलों कीं संकटांत गर्क असलों, त्याचें तुह्मांला कांहीं तरी आहे काय ? तुमचे आह्मी आधल्या जन्मींचे देणेंकरी आहों. राबराबराबून तुमचें एकदांचें देणें फेडून आह्मांला मोकळें व्हावयाचें आहे. बायको ह्मणजे एक मोठी भयंकर घोरपड आहे. तें पाठीस लागलेलें ब्रह्मकपाल; तें कां आह्मांला आनंदानें स्वस्थ बसूं देणार ?' मी हीं वाक्यें उसन्या अवसानावर बोलतों तों तिकडे तिचा चेहरा अगदीं गोरामोरा होत चालला. तिला कांहीं उत्तर द्यावयाचें होतें. पण मी संतापांत आहें, तेव्हां ही बोलावयाची वेळ नव्हे असें जाणून ती मुकाट्यानें खालीं पहात उभी राहिली. माझ्या तोंडाकडे पाहण्याचा देखील तिला धीर होईना. तिच्या मनांत उडालेली अनेक मनोवृत्तींची धांदल तिच्या चेहऱ्यावर मला स्पष्ट दिसूं लागली, आणि त्यामुळें मला एक प्रकारचा मनांत आनंद वाटला. आणि तेंही खरें आहे. अशा या सर्वतोपरी अत्यंत कष्टमय संसारांत अशी भली बायको, किंवा भावी सुखाशेचे अंकुर जोरानें फुटूं देणाऱ्या मुलांचें वर्तन, हेच काय ते समाधानांचे झरे होत. आणखी बिचारी बायको काय एक गरीब गाय ! तिचें सुख किंवा दुःख सर्वतोपरी नवऱ्याच्या स्वभावावर अवलंबून असावयाचें. नवरा दुःखी कीं बायको दुःखी; तो सुखी तर ही सुखी; आणि अशा बिचारीला मी व्यर्थ चारदोन घटकातरी कां उगीच्याउगीच काळजींत लोटूं, असा विचार मला सुचला; आणि पुनः माझें मन मलाच ह्मणूं

लागलें—' काय! संकटसंकट तरी असें कोणतें आज माझ्यावर आहे? चार पैसे ब्रह्मस्वच कीं नाहीं? आपण बोलूनचालून भटभिक्षुकांचीं लेंकरें, मागूं चार घरें भिक्षा, त्यांत काय इतकें?' तेव्हां अंगावर चालून आलेल्या किंवा आलें असें वाटणाऱ्या संकटास (संकटास कसच्या, साधारण गोष्टींस) शिंगावर उचलून घेण्याचा मीं निर्धार केला. त्यासरशी माझी पहिली उदासीन वृत्ति एकदम आपलें तोंड काळें करीत पळत सुटली! मग नव्या दमानें मीं ह्मटलें, ' कायग आज भाजी आहे का घरांत? का आणूं नसली तर? आज कोठें कांहीं आमंत्रण दिसत नाहीं. त्या कोथिंबिरीची भाजी करशीलना आज?' हे माझे शब्द ऐकतांच तीही मोठी खुशालली आणि ह्मणाली. ' हो आहे घरांत आजच्यापुरती भाजी; आणि मीही काल आणलेल्या त्या कोथिंबिरीची भाजी करणारच होतें.' असें ह्मणून कांहींतरी निमित्त पाहिजे एवढ्याचसाठीं समोरून चाललेल्या मांजराला शुक् शुक् करीत ती एकदांची आंत गेली. मघां काळजी कोणती होती, मी इतका संसारास कां कंटाळतों याची पुढें तिनें फारशी—नव्हे मुळींच—वास्तपुस्त केली नाहीं. कारण न जाणों विसरत चाललेल्या काळजीची पुनः आणखी मला आठवण व्हावयाची. हा तिचा हेतु मीं तेव्हांच ताडला. ती आपल्या घरकामास लागली. पण माझें मन आपलें लागलें त्याच त्या गोष्टी खलायला. माझी सुकुमार बगडी, आणि ती त्या थेरड्याला देऊं? काय मोरोबाची ही अक्कल? बरें देत नाहीं असें स्पष्ट सांगितलें तर मोरोबा आणि त्याचे यजमान माझे दुस्मान बनावयाचे;

आणि बगडीचें कोठें दुसरे ठिकाणीं जुळलें तर साह्य करावयाला कांहीं हे यावयाचे नाहींत, कदाचित् उलट तेथें विघ्नां देखील घालावयाचे. अशा विचारांत मी आहें तों इतक्यांत मोरोबाची स्वारी आली. त्याला पाहतांच मी अगोदर संतापलों. पण पुनः विचार केला कीं–नव्हे असें रागावणें बरें नाहीं! आणि शिवाय मी मोरोबाचा मिंधा, त्यांतून द्रव्यद्वारा. मोरोबाचे सुमारें पंचवीस रुपये मजजवळ होते, ते मीं मोबदला केलेले. तेव्हां जर कां ते त्यानें या घटकेला मागितले तर? आणि आतां येथल्या येथें द्या ह्मटलें, तर मग मी काय करूं? यासाठीं आपण रागावतां कामा नये असा मीं मनांत विचार केला. खरेंच, ही निर्धनता आणि ओढगस्तीचा प्रपंच चांगल्या मर्दासारख्या मर्दाला अगदीं बायको करून सोडतो, अँ? आणि त्या निर्धनतेच्या पायीं आपल्याला सोंगड्यासारखें 'गंगा गये गंगादास, जमना गये जमनादास' बनून ज्यांचें तोंड पाहूं नये अशांच्या खुशामती करण्याचा वखत येतो, व मानभावीपणा पत्करून नसतीं आर्जवें करावीं लागतात? लक्ष्मीच ती, ती वाटेल तें करण्यास काय कमी करणार? असो मनांतल्या या विचारतरंगास बाजूला सारून मीं ह्मटलें 'कसें काय मोरोबा? चार दिवसांत कोठें स्वारी आली नाहीं?' त्याला मोरोबांनीं कांहीं तरी उत्तर दिलें. कारण हा असा प्रश्न अगदीं साहजिकपणें येणार हें त्यांना पूर्वींपासून ठाऊकच; आणि ह्मणूनच त्यांनीं उत्तर काय द्यावें याची योजना आधींपासून केलेली. आमची त्यांचीं इकडलीं तिकडलीं बरींच बोलणीं झालीं. पण खुल्या अंतःकरणानें मीही

बोललों नाहीं, व त्यांच्या भाषणांतही नेहमींचा साहजिक-पणा नव्हता. आणि अशा प्रकारें बोलण्याचे प्रसंग यावे त्यापेक्षां मुकेपणा पत्करता. पण करणार काय? मनांत एक दाखवावयाचें आणि साधावयाचें दुसरें, अशा दुहेरी डाव-पेंचानें बोलणें खरोखर मोठें कठिण काम आहे. मी बिचारा भाबडा. मला कांहीं तें साधेना. पण माझ्या व मोरोबाच्या अंतःकरणांतील धर्म निराळे होत चालले, हें कांहीं घरीं कोणास माहित नव्हतें. बगडी तिच्या घरांत—'मला परकर नेसायची आतां लाज वाटते; एक साडी आणून द्यायला बाबाला सांग कीं ग. मात्र काळी चंद्रकळा, आणि गोमे-कांठी हवी, बरें' असा सारखा तगादा लावीत होती, तो मला ऐकूं आला. तेव्हां तिनें ह्मटलें—'जा बाहेर मोरू-काका आले आहेत, त्यांना सांग' असें तिनें ह्मटलें, आणि बगडी लगेच पळत बाहेर आह्मी बसलों होतों तेथें येऊन मोरोबांच्या अंगाशीं लगट करून 'काका! काका!' करूं लागली. मला मोरोबाचा कंटाळा आला होता, तेव्हां त्याच्याशीं या पोरीनें इतका लाडिवाळपणा केलेला मला पाहवेना. ह्मणून मीं दरडावून ह्मटलें 'कायग बगडे! काय हा त्रास लावला आहेस? चल हो प-लीकडे! बसूं दे त्यांना घटकाभर स्वस्थ!' त्यासरशीं मोरोबांनीं तिला जास्त लडिवाळपणानें जवळ घेऊन—'काय ह्मणतेस बेटा?' असें तिला म्हटलें; आणि मग माझ्याकडे बघत बोलले, 'अप्पा, लेंकरांनाहो काय कळतें? आणि मी का त्यांना परका वाटतों? मुलांचा हा त्रास कधीं का कंटा-ळवाणा असावयाचा? उद्यां ती सासरीं गेली ह्मणजे ये ह्मटलें

तरी सुद्धां जवळ यावयाची नाहीं बरें!' असा त्यांनीं लग्नाचा ओघ अनायासें काढतांच मलाही त्या सर्व गोष्टींची पुनः आठवण झाली, आणि मोरोबाचा मला तिटकारा येऊं लागला. पण तसाच तो मनुष्यामनीं दाबणें मला भाग पडलें, आणि कपटी भाषणास सुरवात करण्यास मी उद्युक्त झालों! मित्राशीं आणि कपटी भाषण—व तेंही कवडीचा फायदा नसतां! जग आहे, झालें. मीं ह्मटलें "मोरोबा, खरेंच मुली जन्मणें मोठें खोटें नशीब. गेल्या जन्मीं मीं काय पातक केलें कोण जाणें, ह्मणून मला या पोरी झाल्या. बगडीच्या लग्नाची रात्रंदिवस मला काळजी लागली आहे. कांहीं सुचत नाहीं. पोरीचा बाप होणें, ही एक यमधर्माची शिक्षा आहे खचित.'

मो०—काय बोलतां अप्पा! अहो मुली न होत्या तर तुह्मांला तरी बायको कोठून मिळती? आणि हा प्रपंच कसा चालता? ही जगाची राहटी आहे. मुलगे मुली हीं व्हावयाचींच. रोज सव्वालाखाची घडामोड आहे, त्यांत मुलग्यांला मुली आणि मुलींना मुलगे नकोत का विधात्याला घडायला? आणि तुह्मीच सांगा, गांठी घालीत ब्रह्मदेव बसतो, तो, मुली नकोत तर काय मुलामुलांच्याच का घालीत बसणार?.

मी—काय असेल तें असो. दुसऱ्यांना होईनात का मुली, पण मलामात्र त्या नकोत बुवा. पदरीं गरीबी, आणि त्यांत ह्या मुली झाल्या ह्मणजे पुरी साडेसातीच ती!

मो०—या तुमच्या बोलण्यांत काय अर्थ आहे? संसार म्हटला म्हणजे तो असा असावयाचाच.

मी–कोणा लेंकाला हा असला संसार हवा आहे? त्यांत काय सुख का आहे? अहो हालांचें माहेरघर तो. तुम्ही बुवा चांगले सुखी!

मो०–खरें आहे; तुम्हांला वाटतें मी सुखी, आणि मला वाटतें तुम्ही सुखी. जगाचा असा हा क्रमच आहे.

मी–कोण, मी सुखीना? अगदीं खरी गोष्ट!

मो०–यांत काय संशय कीं काय? उद्यां बाळ्या रोजगार करूं लागला, ह्मणजे मग मी पाहीन. आतां चार दिवस आहेत वद्य पक्षांतले, ते जातील हां हां ह्मणतां निघून, त्यांचें काय? आतां बगडीची गांठ तर ब्रह्मदेवानें कधींच मारून ठेविली असेल. त्याची कां तुह्मी इतकी काळजी बाळगतां?

मी–कां काळजी बाळगतां? आह्मी मूर्ख ह्मणून. काळजी बाळगूं नको तर काय करूं? घर बसल्या का जांवई मिळणार आहे? बाबा "नहि वंध्या विजानाति गुर्वीं प्रसववेदनाम्" असेंच खरें.

मो०–होय होय–आणि तुह्मी काळजी करून होणार आहे काय? कांहीं तरी बोलावें झालें. अहो देवालामात्र खरी काळजी. तुह्मी काय करणार काळजी, आणि तुमच्या हातून होणार आहे काय—काळजी करून तरी?

मी–मोरोबा या तुमच्या बोलण्यांत कांहीं एक अर्थ नाहीं. बोलायला मात्र सोपें आहे. ईश्वरी माया ह्मणतात ती हीच बरें!

मो०–मी कांहीं वेदांती नाहीं. मला ती तुमची माया आणि तें कांहीं समजत नाहीं.

इतकें मोरोबाचें बोलणें होतें न होतें तों, ती आं-तून हें भाषण ऐकत होती, तिनें मध्येंच येऊन ह्मटलें "पण भावोजी, इतकी काळजी वाहून शेवटीं काय? नाशकाला स्थळ पाहिलें तसेंच ना?" हा तिचा खोंचदार प्रश्न मला समजला; पण मीं ह्मटलें, कशाला तिला तरी रुष्ट भाषणानें दुखवा. मघांची तिची खिन्नता गेली आहे, तर आपण तिला पुन्हां दुखवूं नये. ह्मणून मीं ह्मटलें 'बरें आहे. आह्मीं कांहीं आतां बगडीच्या लग्नाची काळजी करीत नाहीं. ती तुमची तुह्मीच करा, आणि तुमच्या मनाजोगतें स्थळ शोधून काढा, ह्मणजे तर झालें कीं नाहीं?' हा माझा सरळ वाटणारा जबाब पाहून आमचे मोरोबा पण अगदीं हुराळले. त्यांना वाटलें, आतां आपलें येथें साधलें. ह्मणून त्या आनंदभरांत ते ह्मणाले—'कांहीं हरकत नाहीं; वहिनी, ह्मणा बरें आहे ह्मणून; मी तिला असें स्थळ पाहून देतों कीं ज्याचें नांव तें; समजलांत?'

ती काय बोलून चालून बायकोमाणूसच. तिला का माणसांची पारख? का या जगांतील रीती माहीत? बायका आपल्या आमच्या घरकामाच्या उपयोगी. घरांत आणून टाकावें हत्रें तें, ह्मणजे मग त्याची व्यवस्था ठेवण्यांत तेवढ्या त्या पटाईत. पोराबाळांच्या खस्ता सोसतील, दुखण्याबाण्यांत चांगली शुश्रूषा राखतील, खायलाप्यायला असल्यावर देण्याला कमी करावयाच्या नाहींत, झालें; याच्यापलीकडे काय त्यांना करावयाचें आहे? हा माणूस असा, त्याच्या बोलण्याचा अर्थ हा, अशांच्या बोलण्यावर कितपत भरंवसा ठेवावा—इत्यादि का त्यांना कळणार आहे? मोरोबांनीं 'मी

पाहून देतों' ह्मटलें, तों इला वाटलें, मिळालेंच आपल्या बगडीला स्थळ. हें जग ह्मणजे कोण विचित्र! त्यांतील प्रत्येक व्यक्ति कशी पटाईत लब्बाड. आपला मतलब साधण्यास कोणं कसकशी बतावणी करतील, काय काय थापा देतील, आणि एखादी साधारण गोष्ट साधावयाची ह्मणजे किती अडचणी येतात, कसलालीं खेंकटीं मध्येंच उद्भवतात, याचें बिचारीला कांहींएक ज्ञान नाहीं. ह्मणून मींही विचार केला कीं—बरें, आपणही घटकाभर मुकाट्यानें थोडी मौज पाहूं. आपलें काय त्यांत जातें? कळला तर मोरोबाचा स्वभाव आणखीही स्पष्टपणें आपणांस कळेल. ह्मणून मीं ह्मटलें, 'मग नाहीं हां मी आतां या बगडीच्या लग्नाची काडीमात्र काळजी करणार. सारें तुमचें तुह्मीच आपलें पहा. तुमच्याच पसंतीचें स्थळ, तुह्मी कराल तितकाच खर्च, आणि तेथलीच रकम.' असें मी ह्मणतांच ती थोडीशी गोंधळल्यासारखी झाली. कारण खर्चाची घोरपड आली ना मध्यें? आयतें दुसऱ्यास, अमुक हवें, आणि तमुक नको, असें असावें, तसें असूं नये, यंव करा, आणि त्यंव सोडा, हें सांगणें सोपें; तितकें स्वतःवर घेणें कोठें सोपें आहे? ह्मणून ती, थोडी कां, चांगली बरीच काळजींत पडली. पण मोरोबा होताना आपलें कार्य साधण्यास टपलेला. त्याला वाटलें, ही सोन्यासारखी संधि आली आहे, ती आपण कां व्यर्थ दवडावी? मला वाटलें अरेरे! बिचारा मोरोबा मतलबी खरा, पण पुरा भोळा! कारण मीं हा डाव टाकलेला, त्याला कळत नाहीं. बरें, आपण तरी इतकें कपटजाल मित्राभोंवतीं कां पसरावें? मी

अंतःकरणाचा अगदीं सीधा. मला हे असले पेंचपाच जन्मादारभ्य माहीत नाहींत आणि दुसऱ्यांनीं माझ्याशीं असें केलेलें कळलें, तर त्यांचा मला तिटकारा साहजिकपणें यावयाचा. तेव्हां मीं तरी असें कां करावें? पण आतां त्याचा उपयोग काय? हातचा डाव सुटला. मग मजा तरी काय होते ती पाहूं. तिला वाटलें कीं, माझें भाषण झालें तें ठीक झालें. बायकांना काय, ज्या त्या गोष्टीची उतावीळ फार. त्यांतून दागिने, लग्न, आणि जेवणखाणें, कपडेलत्ते घेणें इत्यादि कामांत तर काय विचारायची सोय नाहीं. आणि खरेंच ह्मटलें ह्मणजे आपलें वैभव कसें तरी करून एकदांचें लोकांस दाखवावें एवढाच त्यांचा सदोदित आणि एकच हेतु असतो. आणि तें कामही पण त्या नीट बजावतात हेंही खरें आहे. बायकांचा एक आणि मुख्य विचार आपली फुशारकी लोकांना केव्हां एकदांची दाखवूं? हा जर नसता तर प्रपंचांत थोडें जास्त सुखही पण पुरुषांना मिळालें असतें; आणि मग प्रपंच पण इतका त्रासदायक न होता. असो. ती ह्मणाली, 'मग काय भावोजी, उद्यांच्या माघांत चारपांच मुहूर्त लग्नाचे आहेत, ह्मणे. बघा त्यांतला एक चांगलासा.' मीं ह्मटलें—कारण माझ्यानें उगी राहवेना—'पण स्थळ अगोदर ठरलें का? आणि खर्चाची काय तजवीज केली? मुहूर्तच का अगोदर ठरवायचा?' त्यावर मोरोबा थोडे दरडावून ह्मणाले—त्यांना वाटलें आतां सारी शिकार आपल्या हातीं आली—'तुह्मांला कांहो आतां त्याची पंचाईत? तुह्मी आतांच ह्मणालां ना कीं तुमचें तुह्मी पाहून घ्या ह्मणून. झालें तर, बसा आतां

स्वस्थ. बगर्डी खरोखर मोठी भाग्यवान मुलगी आहे. साखरेचें खाणें त्याला देवाचें देणें.' ह्यावर तर ती फारच फुशारली आणि ह्मणाली–'बरं भावोजी, खरेंच स्थळ कोणतें पसंत करायचें?

मोरोबा–तुह्मांला कसलें हवें तें सांगा. दागदागिने पुष्कळ हवेत, लत्तेकपडे, खायाप्यायाला मुबलक, आणि सासूसासऱ्यांचा नणंदाजावांचा त्रास नसावा, इतकेंच कीं नाहीं?

ती–हो. हो, असें असल्यावर मग काय आणखी हवें?

माझ्यानें कांहीं पुनः स्वस्थ बसवेना. ह्मणून पुनः मध्येंच मीं ह्मटलें–हुंडा किती पडेल? चारदोन हजारांवरच्च भागेलना पण?

ती–पुनः आपलं तेंच. भावोजी ह्मणालेना सगळें आपलें मी पहातों ह्मणून?

मी–असें काय? बरें तसें कां होईना. मी विसरलों होतों तें.

ती–मग काय मुहूर्त मात्र थोडा लांबचा धरा हां भावोजी. कारण इतकीं सगळीं कामें घरांत एकटीला झालीं पाहिजेतना?

मी–पण स्थळ कोणतें कायम केलें?

मो०–अप्पा, तुह्मी आपले स्वस्थ बसा. स्थळाचें हो काय? स्थळ अगदीं तयार आहे.

ती–मग, मुहूर्त उद्यांच्या माघांतला धरला ह्मणून ह्माय बिघडलें?

मी–पण आधीं त्यांनीं मुलगी पाहिली का?

मो०—अहो अप्पा, जरा दम धरा ह्मणतों ना?

ती—होय खरेंच, पण मुलगा कुठला? इथलाच, का दुसरीकडे कोठें आहे?

मी—आणि तो नको का कोणीं बघायला?

मो०—छेः, छेः, काय बाबा या ब्राह्मणाची ही रिकामी गडबड!

ती—पण अंमळ उगें राहून ऐकायला काय होतें बाई कोण जाणें. ज्या त्या गोष्टीची मेली अशी धांदलच.

मी०—होय तेंही खरें. पण आंत स्वयंपाकाची झाली का सुरुवात?

ती०—हो. घातलें आहे आतां नुकतें आधण डाळीला.

मो०—मग काय तुह्मांला आहे का तें स्थळ पसंत?

ती—कोणतें?

मो०—आमच्या बाळासाहेब नेन्यांचें? जसें तुह्मांला हवें तसें आहे. घरीं श्रीमंती आहे; खावयाप्यावयाला कमी नाहीं. सासूसासरे नाहींत. आणखी?—

मी—आणखी वयही पण पन्नाशीच्या बाहेर नाहीं!

माझ्या या थोड्याशा खोंचदार भाषणावर मोरोबा ह्मणाला 'अप्पा मी ह्मणतों तें हेंच. सारें कसें जुळेल? वय का फार ह्मणतां? बत्तीस ह्मणजे कांहीं फार नाहीं.

ती—बिजवर का? मग नकोग बाई तो.

हें ऐकून मात्र मोरोबा थोडासा विरसला. त्याला आशा होती ती नष्ट झाली; आणि हें बराच वेळ चाललेलें चऱ्हाट बंद करावें ह्मणून मीं निक्षून ह्मटलें, 'मोरोबा तुह्मांला मी एकच गोष्ट सांगतों—बगडीला कांहीं तुम्ही म्हणतां त्या

ठिकाणीं द्यावयाची नाहीं, समजलांत? मी गरीब झालों तरी काहीं खाटिक नाहीं. असली ल्हान मुलगी एखाद्या थेरड्या-च्या गळयांत बांधण्याइतका मी निष्ठुर नाहीं. मला माझी पोर-विकावयाची नाहीं. तिचा गळा कापून आपलें पोट जाळणारा मी नव्हें. या पोरीचें आजवर मीं संरक्षण केलें तें माझ्या कल्याणाकरितां नव्हे. समजलां?

ह्या माझ्या भाषणानें मोरोबास चांगला चरका लागला, आणि त्या तिडकींत त्यांनीं ह्मटलें 'अप्पा मी काय बग-डीचे पैसे घ्या ह्मणतों? पोटची पोर विका, तिला दुःखांत लोटून तिच्या संसाराचें मातेरें करून तुह्मी सुखी व्हा, असें का मी म्हणतों? उगीच काहीं तरी आपलें बोला-यचें? मी काय तुमचा दुस्मान आहें? मला काय या बगडीची कींव नाहींच म्हणतां!

मी–कांहीं कां असेना. मोरोबा, माझें ह्मणणें इत-केंच, दहा घरें भीक मागेन, महिनाभर हवा अस-ल्यास उपाशीं राहीन, पण माझ्या पोटीं जन्मलेल्या पोरीचें कल्याण होईल असें स्थळ मी पाहीन. मेरतोंपर्यंत त्यांनीं आपल्या नांवानें खडे फोडलेले पत्करले, त्यांच्या जन्माचे धिंडवडे झाले तरी हरकत नाहीं, आमरणांत त्यांना दुःखाहालांत दिवस काढावे लागले तरी देहेत्तर, पण आपल्याला चार पैसे सध्यां मिळताहेत ते घ्यावे, इतका नीच मांग आणि चांडाळ हा त्रिंबकभट नव्हे. आणि तुह्मीही आतां याबद्दल कांहींएक बोलूं नका. तुमच्या यज-मानाला विवाह कर्तव्य आहे आणि तुह्मी माझ्या बगडीला तेथें द्यावी ह्मणतां, यासाठींच तुह्मीं माझ्याशीं स्नेह केला,

आणि आजवर इतके मजसाठीं तुह्मी आणि तुमच्या द्वारें ते तुमचे यजमान झटले, हें मला आतां पुरें कळून चुकलें. समजलां कीं नाहीं, मला तुह्मीं दिल्लीचें राज्य दिलें, तरी मी ही आपली सोन्यासारखी लेंक, बिचारी अल्लाची गाय, वरपांगी डौलाला भुलून किंवा पैशाच्या लालचीस्तव खाट-काच्या हातीं द्यायला तयार व्हायचा नाहीं. आपल्या पोरी पैशाच्या लालचीनें थेरड्याच्या गळ्यांत बांधण्यास तयार होणाऱ्यांना आईबाप का ह्मणावें? तीं का माणसें? त्यांचें मुखावलोकन केलें तर आधीं सचैल स्नान करावें. अहो हीं कसाबाचीं कामें. रौरव नरक हटकून प्राप्त होण्याचें हे मोठें सुलभ साधन. तुमचे यजमान चांगले चाळिशी उल-टलेले आहेत. त्यांना का ही आठदहा वर्षांची पोर देऊं? बगडी त्यांना नात शोभेल—नात! आणि आलां तुह्मी वरयोजना करायला! लाज वाटत नाहीं तुह्मांला पुनः तोंड काढून बोलायला? या त्रिंबकभटजीच्या जिवांत जीव असे-तोंपर्यंत ही गोष्ट घडावयाची नाहीं, समजलां? दारिद्र्यानें ग्रासलों, नव्हे कोणी मला सुळावर द्यावयाला नेतों अशी धमकी घातली, तरी मी माझ्या पोटच्या पोरीचा—ह्या मां-डीवर मान ठेवणाऱ्या तान्ह्या लेंकराचा—गळा कापण्यास सिद्ध होणार नाहीं. पडेल गरीबाच्या पदरीं तर पडेल. त्या श्रीमंतीला काय नेऊन जाळायचें आहे? गरीबी कांहीं पाप नव्हे. गरीबी हें दुर्व्यसन नाहीं. दोघांची जोडी शो-भेल असें ठिकाण पाहून देईन. मला पडेल चार दिवस त्रास तर पडेल. त्याचें काय इतकें?

ह्या माझ्या संतापाच्या व निकरानें आलेल्या भाषणावर

मोरोबा जास्ती कांहींएक बोलले नाहीं. त्यांचें तोंड मात्र अगदीं उतरलें, आणि ते फक्त एवढेंच ह्मणाले 'अप्पा, तुह्मी कांहीं तरी भलताच अर्थ घेऊन संतापलां झालें. तुमच्या गळ्याची शपथ, माझा तर असा अर्थ नाहीं.'

माझें व मोरोबाचें बोलण्यावरून बोलणें वाढून गोष्ट विकोपाला जाईल अशी माझ्या बायकोला धास्ती पडली, ह्मणून तो प्रसंग टाळण्याकरितां ती ह्मणाली 'जाऊं द्या कीं हो भावोजी. तुह्मी आतां उगीच बसाना कसे? आजच कांहीं नडलं नाहींना? जाऊं द्या. बसा आपले उगीच! सध्यां रागाची वेळ आहे.'

नंतर आमचा वाद तहकूब राहिला. मोरोबा कांहीं कामानिमित्त बाहेर गेले, ती आपल्या घरांतल्या कामास लागली. मी एकटाच बाहेर राहिलों होतों, व 'या दुनयेंत एकसुद्धां असा माईचा पूत नाहीं, कीं ज्याला आपला मतलब सुटलेला आहे. जो तो लोकांचें पागोटें कसें काढून घेऊं आणि आणि आपल्याच पोळीवर तूप कोठून ओतावयास मिळेल, हेंच तेवढें पाहत असतो. आप्त काय, इष्ट काय, मित्र काय, सगळे सारखे. आणि आपण यांच्या दिखाऊपणाला भुलून एखादे वेळीं खड्ड्यांत जाऊन पडावयाचें. मनुष्य ह्मणजे कांहीं चांदी नव्हे, सोनें नव्हे, त्याची खरी पारख करावयाची ह्मणजे प्रसंगच पाहिजेत; नाहीं तर हिणकस आणि वरकस कळावयाचें सुद्धां नाहीं,' इत्यादि माझें चऱ्हाट बराच वेळ चाललें होतें.

# प्रकरण ७ वें.

## ' नारायणाच्या घरचा खेळ कोणास कांहीं कळावयाचा नाहीं. '

मला या जीवित्वाचा अनेक वेळां कंटाळा आला, तो इतका कीं, आतां या वेळेला मरण येईल तर तेंसुद्धां एक सुदैवच असें मला वारंवार वाटे. आणि खरेंच, या अफाट जगांत जगून तरी मला कर्तव्य काय? ईश्वराला कांहीं माझी कींव येत नाहीं; अक्काबाई तर हात धुवून पाठीस लागलेली; जिकडे पहावें तिकडे निराशा; आणि उगवतो तो नवा दिवस नव्या नव्या काळज्या माझ्या अंगावर फेंकून देऊं लागला, मग म्यां बिचाऱ्यानें कोठवर टिकाव धरावा? जन्मून काय या काळज्या आणि संकटें यांशींच झोंबी खेळत बसावयाचें? आणि संकटें, दुःखें, अडचणी, विवंचना, दगदगी, त्रास, क्लेश, संताप, अपमान अशांच्या कंठाळी लादून घेण्यांतच का माझ्या जन्माचें सार्थक? इत्यादि प्रकारच्या विचारांनीं मला अगदीं भंडावून सोडलें. मी वारंवार विचार करीं, कीं या संसारांत सुख तें काय आणि कोठें आहे? कोणाची बायको, कोणाची पोरं, आणि कोणाचे आप्तइष्ट? यांच्यासाठीं मीं अशा चक्रव्यूहांत काय ह्मणून अडकून राहावें? येथें कांहीं सुखाची आशासुद्धां दिसत नाहीं; तेव्हां या जंजाळांतून होईल तितकी लौकर आपली सुटका करून घ्यावी हेंच बरें नव्हे काय? व्यर्थ लोभाला गुंतून फक्त काळजीचा वांटेकरी तेवढा मी होतों

आहें. तेंव्हां माझ्यासारखा मीच ! आजवर भोगलेले सुख-सोहळे तितके पुरे झाले. मागें कितीसें सुख अनुभविलें, तें आतां पुढें मिळणार आहे? तेंव्हां तें कांहीं आतां नाहीं. झालें इतकें बस्स.

अशा तऱ्हेच्या निराशेंत मी गुरफटलों होतों त्या वेळीं मात्र माझ्या मनाला जरासा विसांवा मिळाल्यासारखें झालें. मग मीं निश्चय केला कीं, आतां पुरें झालें हें सुख. माझें मन मला सांगूं लागलें—' त्रिंबकभटजी, आतां नका संसारांत पडूं. आजवर भोगलें तितकें सुख पुष्कळ झालें. आतां करा कांहीं तरी परमार्थाची जोड.' आणि त्याप्रमाणें संसारपाश कसा तोडावा या विचारास मी लागलों. एकदां वाटे—नुसता संसार नको एवढेंच नव्हे, तर हा जीव देखील नको. पण तो जाणार कसा? अफू खावी, का सोमल गिळावा, का विहिरींत उडी मारावी, का करांवें तरी काय? पण पुनः घटकाभरानें वाटे, गतजन्मीं काय पातक केलें त्याचा या जन्मीं झाडा देत बसलों आहें, आणि त्यांत ही आत्महत्या करून नवीन पातक जोडूं काय? तेवढ्यासाठीं पुनः जन्ममरणाच्या फेऱ्यांत पडावयाचें हेंच कीं नाहीं? आणि बरें, केलीच आत्महत्या, तर सारे जण माझी निंदा करतील, मला बायक्या ह्मणतील, आणि माझी 'नसती नालस्ती करूं लागतील. तेंव्हां हें कांहीं ठीक नव्हे. जीव देणें आपल्याला शोभत नाहीं. बरें, कोठें देशांतरीं निघून जावें, तर पुढें तरी काय? पाठीमागची यातना कांहीं चुकावयाची नाहीं; हें पोट पाठीस लागणारच, त्यांची वाट काय? दुखणेंबाणें काय सुटणार आहे? आणि

मग इतके दिवस पोराबाळांची जोड करून अखेरीस कोल्ह्याकुत्र्यासारखें मरावें यांत काय सुख? देशोधडीस गेलों ह्मणून माझ्या बायकापोरांस बोलबोलून लोक पुरेपुरे करून सोडतील; माझ्या निर्भर्त्सनेस सारखी सुरुवात होईल, आणि—तुह्मी कोठले, इकडे कां आलां, तुमचीं बायकापोरें कोठें आहेत, असे कां भटकतां,—इत्यादि प्रश्नपरंपरा, भेटेल त्याच्या तोंडांतून निघावयाची; आणि त्यांना उत्तरें देतां देतां खोटेपणा पदरीं यावयाचा. घरीं मागें काय झालें असेल वगैरेंची आठवण मनास आणखी उद्विग्न करणारच. तेव्हां त्यांतही कांहीं सुख नाहीं. तर मग आतां पुढें करावयाचें तरी काय? हें कोडें कांहीं केल्या मला उलगडेना.

मी या प्रकारचा विवंचनेंत बसलों आहे तोंच धुण्याचे पिळे गंगाळांत ठेवून तें कडेवर घेतलें आहे; आडवें लावून घेतलेलें धोतर बहुतेक भिजून गेलें आहे; धुण्याच्या श्रमानें अगदीं घामाघूम झाली आहे; पण आंता उशीर झाला, आंग धुतलें पाहिजे, या विचारामुळें जिची किंचितशी तारांबळ झालेली आहे; अशी माझी बायको माझ्यासमोरून गेली. मी आज आनंदांत असेन असें बिचारीस वाटलें, ह्मणून गंगाळ आंत ठेवून आल्यावर, ती ह्मणाली—'आवडीला सासरीं जाऊन उभें एक वर्ष झालें असेल नाहीं? मेले हे दिवस तरी कसे हां हां ह्मणतां जातात.' या तिच्या प्रश्नाचा रोंख चटकन माझ्या ध्यानांत आला. माझें मन वैतागांत गुंतलेलें; आज काय तो निश्चय करून त्याप्रमाणें आजपासून वागावयाचें, संसारांतून मात्र मुक्त झाल्याशिवाय

रहावयाचें नाहीं, हा निर्धार माझ्या मनाचा. पण तो जागच्याजागीं राहिला, आणि लगेच तिला मीं ह्मटलें—'बरें मग? पुढें काय ह्मणतेस?' माझी बायको चाणाक्षच. तिनें तत्काळ ओळखिलें कीं, स्वारी कांहीं आज रोजच्या-सारखी नाहीं. तेव्हां ह्मणते 'कांहीं नाहीं, उगीच आठवण झाली ह्मणून विचारिलें, इतकेंच.' असें ह्मणत बिचारी न्हाणीघराकडे मुकाट्यानें गेली. खरेंच, बायका बिचाऱ्या अगदीं अल्लाच्या गाई. पतीच्या सुखदु:खावर त्यांचें सारें जीवित; माझ्या दरडावण्यासरशी बिचारी निमूटपणें गेली. इतका वेळ वैराग्यकाहूर माझ्या मनांत मातलेलें, त्यापुढें या विचारांचें कितीसें चालणार? तेव्हां पुन: वैराग्यचक्र लागलें माझ्या मस्तकांत फिरावयाला. पण विचार कोणताच कायम होईना; आत्महत्त्या, परागंदा, किंवा संन्यास, या तिहींतून कोणता तरी मार्ग स्वीकारावा हाच काय तो विचार ठरला. पण त्याची तरी शाश्वती असती तरी बरें होतें. तथापि इत:पर विनाकारण या संसारसागरांत गटंगळ्या खात हालकष्ट सोशीत पडावयाचें नाहीं हा निर्धार मात्र पुन:पुन्हां मुसांडी मारीत माझ्यापुढें येई; व तो येई तसें त्या वेळीं मनाला थोडें समाधान वाटे. असें होतां होतां मनानें पुन: दुसरा एक विचार असा पुढें ढकलला; 'काय? संन्यास घेणार? पण साऱ्या कुटुंबाचा घात होईल याचें काय? बाळ्या पोरका होईल; बगडीला स्थळ कोण बघून देईल? आवडीचें माहेर कोण करणार? आणि देवा! तिला मग आधार कोणाचा? मी इतक्यांचा असा गळा कापूं? त्यांनीं माझा काय असा अन्याय केला आहे? नको!

नको! छत् हा विचार काय कामाचा?' परागंदा व्हावें तर तेथें तरी काय? आगींतून उठावें आणि फुपाट्यांत पडावें हीच कीं नाहीं स्थिति? तर आतां करावें तरी काय? जिकडे दृष्टि द्यावी तिकडे निराशाच. अशाखालीं घटका दीड घटका गेली, तरी मन कांहीं शांत होईना. विचारांनीं डोकें अगदीं भणाणून गेकें. इतक्यांत आमची बगडी पाण्याचा एक तांब्या आणि ओलें लावून घेण्या-साठीं चांगला पिळलेला पंचा घेऊन मी बसलों होतों तेथें आली आणि ह्मणाली—'बाबा, चला कीं हो पाय धुवा, आणि सोंवळें नेसून वैश्वदेव करून घ्या. दादा खोळंबला आहे.' 'बरें आहे.' ह्मणून मी पुनः स्वस्थ बसलों. विचार आपले चालूच होते. ती पोर, तिला काय माहीत कीं मी आज अशा वैतागांत आहें हें. रोजच्यासारखाच मला समजून बिचारी उठा उठा करीत लडिवाळपणानें जवळ येऊन अंगास खेटूं लागली; तें पाहतांच मीं तिच्या तोंडांत एक सडकून मारिली! मला तो दिवस अजून पक्का आठवत आहे. राग खरोखर वेडेपणाच. त्या आवेशांत मीं तिला मारलें खरें, पण मला अजूनही त्याचा पश्चात्ताप होत आहे. जोरानें तोंडांत भडकावतांच पोर मोठ्यानें ओरडत खालीं जमिनीवर पडली, आणि हातानें गाल चोळीत बसली. आधीं मी दांडगेश्वर आणि त्यांत जोरानें तिच्या थोबाडींत बसली, तेव्हां पोर अगदीं कळवळून गेली. तिची अशी लोळण चालली आहे, तों जणों पोरीनें मोठा अपराधच केला आहे आणि केलेल्या शिक्षेला अनु-रूपच तिची खोडी होती, असें दिसण्यासारखें तिच्यावर

डोळे वटारीत व तिच्याकडे पहात मी पाय धुवावयास जाऊं लागलों.. पोरीचें रडें ऐकतांच भाकरी तव्यावर टाकावयाची ती तशीच हातांत घेऊन 'बगडे, अग झालें काय?' असें ह्मणत ती बाहेर आली. पण मीच बगडीला मारलें आणि माझी अद्याप क्रोधाविष्ट मुद्रा आहे असें पाहून याच कारटीनें कांहीं तरी खोडकरपणा केला असेल असें तिला वाटलें; व तिलाच आपण रागें भरलें ह्मणजे माझाही राग थोडासा शांत होईल या समजुतीनें तीही बगडीलाच रागें भरूं लागली. बगडी आपलें ऐकत नाहीं, जास्त जास्तच आततताईपणा करिते ह्मणून किंवा त्या पोरीला मारिलें या संतापानें कीं काय तें मला ठाऊक नाहीं, पण तीही फारच संतापून आपण सोंवळ्यांत आहों हें विसरून, दांत ओंठ चावीत—'कारटे, उगी राहतेस कीं नाहीं ग?' असें ह्मणून ती बगडीला मारूं लागली. नको नको त्या दिवसाची ती आठवण! आईही मारूं लागली, तेव्हां बिचारी बगडी रडत मोठ्या घाईनें माझ्याकडे धांवून आली. आधीं मीं तिला मारलें हें ती विसरली! त्या वेळीं माझ्या मनाची जी स्थिति झाली ती मी काय सांगूं? माझ्या साऱ्या जन्मांत तो दिवस मोठा वाईट गेला. माझ्या पोटांत भडभडून आलें. मी बगडीस कवटाळून धरिलें; तों ती जास्तच संतापली, आणिं माझी पोर जास्त जास्त हुंदके देऊन रडूं लागली. माझें सारें काळीज पण वितळून गेलें, आणि संतापानें—'अग हो पलीकडे! माणूस का कोण राक्षसीण आहेस तूं!—' ह्मणत मी बायकोवर खूपच रागावलों. जणूं काय मला एकट्यालाच

कायती माया! आधीं शहाणपणा मीं केला हें राहिलें एकीकडे, आणि मीच लागलों रागें भरायला! असो. ह्मणजे ही गोष्ट क्षुल्लक खरी, पण त्याच्यायोगानें माझ्या डोक्याशीं पडलेला वैतागी विचारांचा वेढा मात्र आपोआप उठला आणि मोहानें आपला ताबा पुनः एकदांचा मजवर बसविला. वैश्वदेव नैवेद्य कसा तरी आटोपून घेतला, आणि आह्मी जेवायला बसलों. पण जेवण कांहीं कोणास गेलें नाहीं. मला पश्चात्ताप, तिला संताप, बाळयाला भीति, आणि बगडीला बसलेला मार, यामुळें सारेंच बिघडलें; केलेला स्वयंपाक बहुतेक जसाच्या तसाच राहिला! तात्पर्य, एक माणूस या संसारांत गाफलपणानें संतापलें तर साऱ्यांना अन्न देखील गोड लागत नाहीं एवढें मात्र खरें.

भोजनोत्तर मी वामकुक्षीसाठीं ह्मणून लवंडलों, पण झोंप कांहीं येईना. बगडी, तिला मीं विनाकारण दिलेला मार, तिचें कळवळून निघालेलें तें रडें, हें सारें माझ्या डोळ्यांपुढें सारखें उभें होतें; तें कांहीं केल्या दुसरीकडे सरकेचना. बगडीच्या गालावर मीं चपराक दिली, तीं बोटें जशींच्या तशींच उठलीं होतीं तीं मला दिसत. पण ती पोर तें सर्व विसरून मोठ्या लडिवाळपणानें माझ्याजवळ आली आणि ह्मणाली 'बाबा, मला साखळ्या आणि काप नी बुगड्या करवा कीं हो. त्या रत्नीला काल तिच्या बापानें बघा करून दिल्या, नि मला कां तुह्मीं देत नाहीं?' मी तें तिचें बोलणें ऐकून फक्त स्तब्ध बसलों. माझी नजर पुनः पुनः अजून त्या गालावर दिसणाऱ्या बोटांकडे जाई. माझ्या पोटांत अगदीं ढवळून आलें, आणि इकडे मी

कांहींएक उत्तर देत नाहीं असें पाहून—'मग पंचमीला करवालना?'—असा बगडीनें दुसरा प्रश्न केला. त्यालाही काय उत्तर द्यावें हें मला सुचेना. देवा! या पोरीची तरी कींव तुला येऊं दे असें मनांत मीं ह्मटलें, आणि बगडीच्या पाठीवर हात फिरवीत बोललों 'बेटा! देईन बरें तुला मी सांखळ्या! माझ्याजवळ नाहींत आतां. देवाजवळ तूंही माग; माझी कांहीं देवाला कींव येत नाहीं. मी मागतों तें द्यायचें नाहीं असा त्याचा संकल्पच झालेला आहे कीं काय नकळे.' ह्या माझ्या बोलण्याचा त्या पोरीला काय अर्थ कळणार आहे? 'अं—हं, नाहीं. तुमच्या बटवींत आहेत कीं इतके पैसे त्याचें घ्याना कां? तुमच्या जवळ सगळें आहे. मला वांकी पाहिजेत आणि ते—ते गोंडे मला करवा. देतांना?' असें लडिवाळपणानें बगडी बोलत आहे व मी मनांत आपलें दारिद्र्य आठवून—संतापत नव्हे पण—एक प्रकारें निराश होत आहे, तों इतक्यांत पुनः मी रागावून आणखी बगडीस मारीन कीं काय या मनांतल्या भीतीनें, पण वरकांती ती असें मागते हें बरें नव्हे असें दाखविण्यासाठीं रागानें ती ह्मणाली 'पुरे पुरे; ऊठ आतां चल आतां तांदूळ नीट करायाला! लागली मला हें द्या, न् तें द्या ह्मणून मागायाला. पडलां कीं नाहीं मोठ्या नशीबवान्. दिलें असतें मागल्या जन्मीं देवांजवळ तर नसतें का मिळालें? कारट्या सगळ्याच कशा या अशा नशीबवान. एकाची तरी चांगली पुण्याई! मिळाले आहेत ते बिचारे सगळे सारखे'—असें चुटपुटत, बगडीला पुढें घालून, रागारागानेंच तीहि आंत गेली. मी पुनः आपला

एकटाच! विचारांनीं दिला पुनः वेढा. मग मी अंगावर धोतर घेऊन झोंप येतेशी पाहण्याकरितां निजलों. पण झोंप कशाची येणार?' काळजीनें ज्या बापड्याला आपल्या कह्यांत घेतलें त्याला कोठली झोंप आणि कोठलें अन्न! मी पडल्या पडल्या आपले आजपर्यंतचे गेलेले मागील सारे दिवस आठवीत ईश्वरी कृपा आणि नारायणाच्या घरच्या खेळांतले चमत्कार यांचा विचार करूं लागलों. नको हा जीव आणि नको याउप्पर जिणें, असे कितीक वेळां प्रसंग आले. पण त्यांची चांगलीशी आठवण सुद्धां आतां मला होईना. सारे आजपर्यंत गेलेले दिवस ह्मणजे एक लांबलचक स्वप्न वाटून त्याबद्दल कांहींच विधिनिषेध वाटेनासा झाला. तेव्हां आणखी दोन चार वर्षांनीं—चार दोन वर्षांनीं तरी कशाला?—महिना दीड महिन्यांनीं सुद्धां आज मला वाटत आहे ती स्थिति कांहींच नव्हे असें मीच खास ह्मणणार नाहीं कशावरून? या समजुतीनें मला थोडेंसें समाधान वाटलें. प्रसंग येतात, अडचणी आहेत, संकटें खरीं, पण तीं सर्व भेंकड,—त्यांना पाहून घाबरतांच तीं आपल्या अंगावर येतात, पण त्यांना दटावलें कीं तीं शेंपूट घालून पळत सुटतात! आला दिवस कांहीं राहत नाहीं. धिमेपणानें आल्या प्रसंगाला सादर झालें पाहिजे. कर्मभोगांतून कोणी कधीं सुटला आहे? मोठमोठे युधिष्ठिर, नळ, दाशरथी राम, अशांस वनवास चुकला नाहीं. मग या त्रिंबकभटजीची काय कथा?

असा मीं मनाशीं पुष्कळ विवेक केला; पण आतां माझ्या बगडीला स्थळ कोणतें पाहूं? ईश्वर माझें गाऱ्हाणें

ऐकत नाहीं; तो मजवर रुष्ट झालेला; मोरोबा आणि त्याचे यजमान निराश झाल्यामुळें आतां झाझा छळ करूं लागतील; उद्यां चूल चालेल कशी ? आज सारा दहा-बारा आण्यांचा खुर्दा जवळ शिल्लक; उसने तरी कोठून मिळणार ? देतो कोण ? पैसा कर्जाऊ देणारे, आपला पैसा कांहीं परत येऊं नये, पण त्याच्या मोबदला कुळाची चीजवस्त हातीं यावी या सदिच्छेचे. माझ्याजवळ तर काय ‘ ऊर्ध्वायै दिशे ब्रह्मणे नमः ’ ही स्थिति ! मित्र आहेत कोठें ? आणि ते तरी कां माझ्या उपयोगीं पडतील ? माझा चालता काळ नाहीं तर माझ्याजवळ येणार तरी कोण ? आणि अशा संकटांत जर कां कोणी अजारी पडलें, तर मग काय विचारायालाच नको !. अशा विवंच-नेंत मी गढून गेलों असतां मला भारी गहिंवर आला आणि मी परमेश्वराची अत्यंत करुणेनें मनांतल्या मनांत प्रार्थना केली; आणि ह्मटलें—‘ हे जगदीशा, जगन्नायका ! तूं करुणेचा अर्णव आणि दयेचा सागर ह्मणवितोस; अ-खिल चराचर विश्वाचा तूं धनी; आणि या यःकश्चित पामरावर तुझा इतका रोष कां ? तूं अनाथांचा नाथ, मग मला तूं कसारे आजवर विसंबलास ? मी काय अनाथ नाहीं असें तुला वाटतें ? हृषीकेशा ! हें सारे अवयव तुझी देणगी. हा देह तुझी कृपा. आजवर कसा तरीं संभाळ करून भर आडांत आतां असा दोर कापण्यास, हे जग-न्नायका, तूं काय ह्मणून प्रवृत्त झालास ? मीं असा तुझा कोणता अपराध केला ? आणि केला असेल कांहीं अपराध तर प्रभो जगदीशा, तुझ्याखेरीज त्याची क्षमा करणारा

अन्य कोण समर्थ आहे ? मला या संकटांतून कोण सोडविणार ? मी कोणाला शरण जाऊं ?' इत्यादि प्रकारें मनाशीं विचार चालले असतांनांच माझा थोडासा डोळा लागला. त्यामुळें हें सर्व संकट मी विसरलों. झोंप ह्मणजे ईश्वराची एक कृपाच आहे. आणि या संसारांत ईश्वर आणि ईश्वरावरील भरंवसा आहे ह्मणूनच बरें. नाहीं तर जीव वैतागून गेला असता. संकटकाळीं मन फार गांगरतें त्या वेळीं ईश्वराचा धांवा, किंवा तो आपली उपेक्षा करणार नाहीं हा भरंवसा, आपलें मन कचरूं देत नाहीं. ईश्वर व त्याची परमकारुणिकता यांच्यावर भरंवसा ज्या मानानें कमी अगर जास्ती त्या मानानेंच सुख किंवा दुःख आमच्या वांट्यास कमजास्त यावयाचें हेंही मला ठाऊक होतें. कारण ईश्वर आणि त्याची दयार्द्रता यांजवर माझा भरंवसा नसता तर मी अनुभवीत आहे त्याजपेक्षां जास्त फिकीरींत बुचकळत पडलों असतों. वास्तविक पाहतां ईश्वरावर भरंवसा नाहीं असें जिणें कंठावयाचें ह्मणजे एक भयंकर यातनाच ती. आतां असा चोहोंकडून सारखा गांजून गेल्यामुळें ईश्वरी योजना, त्याचें भक्तवासल्य, इत्यादिकांवरील विश्वास लयाला जाऊन ईश्वराविषयीं क्षणैक हताश त्वेष केव्हां केव्हां येतो हें खरें आहे. पण चोहोंकडे त्याचें भरपूर दृष्टीस पडणारें कौतुक पाहूं लागलों ह्मणजे वाटतें कीं—तें कांहीं नव्हे; ईश्वर सदा जें काय करीत असतो तें मनुष्यमात्राच्या कल्याणाखातरच. अति दुःसह वाटणाऱ्यां संकटपर्वतांतून सुद्धां स्वच्छ सुखाचे झुळझुळ वाहणारे झरे तो सच्चिद्घन दाखवूं शकतो. आह्मी जी

मागतों, इच्छितों, किंवा असावी ह्मणून धडपडतों ती स्थिति, किंवा ते पदार्थ आह्मांला देणें इष्ट नाहीं असें त्या जगन्नायकास वाटत असावें ह्मणूनच तो देत नाहीं; लहानसहान कृमिकीटकांपासून तों थेट मनुष्यापर्यंत सर्वांची सारखी काळजी वाहणारा भगवान् माझा छळ ह्मणजे अगदीं नाहक करीत असेल हें मीं पाहिजे तर खरें मानावें. केव्हां शिकविण्यासाठीं, केव्हां अद्दल घडावी ह्मणून, आणि सदा खऱ्या कल्याणाखातरच ईश्वर मनुष्यास अनिष्ट वाटणारी स्थिति व संकटें देत असतो, यांत संशय नाहीं. ईश्वर जगत्पिता, आह्मी त्याचीं अज्ञ लेकरें, तेव्हां पुढील खऱ्या कल्याणाखातर एखादा पाठ देत असतां सक्तीनें अध्ययन करूं लाविणाऱ्या गुरुप्रमाणें तो आह्मांस वागवीत असेल, तरी त्याच्या कृतींत गैर तें काय? झाडें वाऱ्यानें हालूं लागतात, तेव्हां त्यांच्यावर काय घोरपड आली ही, असें वरवर पाहणारांस वाटतें. पण तेणेंकरून मुळें खोल शिरून झाडांस जास्त जोमच येत असतो. त्यापैकींच या जगांत अनुभवास येणाऱ्या संकटांचें असावें. अशा प्रकारचे विचार ऐन प्रसंगीं चांगलेसे मनावर ठसत नाहींत, हा आमच्या कच्च्या बुद्धीचा परिणाम होय.

मी घटकाभर स्वस्थ निजलों, आणि अशा प्रकारें क्षणमात्र तरी माझ्या डोक्याशीं घुटमळणारी विवंचना दूर झाली. पण लागलेला निदिध्यास झोंपेंत तरी कोठून सुटावयाला? मला एक स्वप्न पडलें. त्यांत मोरोबा यजमानांच्या तर्फे मला कर्जाऊ दिलेले रुपये मागावयास आलेले मीं पाहिले. त्यांना पाहतांच माझ्या तळव्याची आग मस्तकाला गेली! पण हें

सारें स्वप्नांतच. बगडीच्या लग्नासाठीं पसरलेलें जाळें मीं असें भिरकावून दिलें असें पाहतांच त्यांनीं या थरावर गोष्ट नेली, याबद्दल मी मोरोबाची निर्भर्त्सना करूं लागलों, आणि शेवटीं ह्मटलें–' मोरोबा, उद्यांचा दिवस कसा पार पडेल ? विष खाईन ह्मटलें तर सुद्धां जवळ पैसा उरला नाहीं. हीं चार कच्चीबच्ची मी आतां कशी पोसूं ? आणखी दोन दिवसांत तांदूळ सरतील, मग नवीन कसे आणि कोठून आणूं ? या विचारांत मी; आणि तुह्मी या अशा वेळेस दुष्काळांत तेराव्या महिन्यासारखे काय करितां ?–' वगैरे मी बोलत आहें तोंच—

**" रोटी तेरी धूंडत आवे मनने पाव विस्राम।**
**दानेदानेपर लिखा है खानेवालेका नाम॥ "**

असें ओरडत एक बैरागी दाराशीं आला. त्याच्या सवालानें मी दचकून जागा झालों, आणि पाहतों तों मोरोबा नाहीं आणि कोणी नाहीं. तें सारें स्वप्नच, पण ज्याचा मला निदिध्यास लागलेला तोच तो विचार. इतक्यांत भिक्षेकऱ्यानें पुनः ' रोटी तेरी धूंडत आवे ' इत्यादि पूर्वोक्त सवाल ह्मटला. तो ऐकून मीं ह्मटलें, खरें आहे; आपणही मनांत विश्राम पावावा. तों इकडे त्या भिक्षेकऱ्यास मूठभर दाणे घालून तिनें वाटेस लाविलें. मला भिक्षेकऱ्यांस भिक्षा घालणें ह्मणजे मोठें जिवावर येई. कारण त्यांस द्यावयाला आणावें कोठून ? कसें तरी कर्जवाम भिक्षा इत्यादि करून आह्मी जेमतेम गुजराण करितों, त्यांत हें 'व्याह्यांनीं धाडलेलें घोडें' कशाला पाहिजे, असें मला वाटणें साहजिक होतें. ' याचको याचकं दृष्ट्वा श्वानवत् गुर्गुरायते ' अशांतला माझा प्रकार नव्हता हें खरें, पण मी या साऱ्यांना भिक्षा

घालूं लागलों तर एकाच आठवड्यांत त्यांच्या बरोबरीनें जाण्याचा प्रसंग मला स्वतःला यावयाचा; यासाठीं मी भीत असें. आणि मला एकवार अशी शंका येई कीं, आह्मी मागणारे किती तरी जण आणि सर्वांनीं असा उच्छाद मांडला तर देणाऱ्याचा तरी निभाव लागला पाहिजेना? आणि सारे 'द्या' म्हणतात, 'घ्या' असें कोणी म्हणत नाहीं, हा किती तरी चमत्कार आहे! हरिदास गोसावी येतात; कथाकीर्तनें लावून ही लक्ष्मी चंचल, पैशाचा ओढा नको, प्रपंचखड्यांत पडूं नका, इत्यादि सांगून माझी बिदागी द्या म्हणतात, पुराणिक झाले तसेच; स्वामी शंकराचार्य त्यांपैकींच; आह्मी वैदिक त्याच माळेंतले, म्हणजे सगळ्यांचा मतलब लोकांजवळील आपणाकडे ओढून घ्यावयाचें. तेव्हां मला हे भिक्षेकरी पाहतांच मस्तकास तिडीक चढे. म्हणून मीं म्हटलें 'कायग अशी त्यांना भिक्षा घालूं लागलीस तर आपला निभाव कसा लागणार? तुम्हांला काय? मूठभर दाणे मिळवितांनां आमचे काय हाल होतात हें काय तुम्हाला ठाऊक तरी आहे?' त्यावर तिनें सौम्यपणानें म्हटलें—'कोणत्या वेळीं कोण्या वेषानें ईश्वर येत असतो ह्याचा कांहीं नेम आहे? विन्मुख कोणाला करणें चांगलें नव्हे, म्हणून चार दाणे ठेविले; त्यांत बाई इतकें तें काय गैर झालें? असें करणें चांगलें नव्हे. ही वासना नसावी बरें का? गेल्या जन्मीं आह्मीं काय पातक केलें ते या जन्मांत असे भिकारी जन्मलों; आणखी कशाला?'—तिचें तें चऱ्हाट थांबविण्यासाठीं मीं मध्येंच ओरडून ह्मटलें, 'पुरे पुरे, आहे ठाऊक.' हें ऐकतांच तिनें मग जास्त

कांहीं भाषण केलें नाहीं. बिचारी निमूटपणें आंत निघून गेली. मीही स्वस्थ बसलों. माझ्या डोळ्यापुढें दुसरा कांहीं विचार दिसेना. आतां घरांत जिन्नस आणायाला पैसे कोठून आणावे हेंच माझें भ्रमण चाललें होतें. तों एक गृहस्थ रुप्याच्या ताटांत कांहीं ठेविलें आहे आणि वरून सरपोस पसरलेला, असा 'वाईकर भटजीमहाराज कोठें आहेत ?' असें विचारूं लागला. त्यावर मीं म्हटलें, 'कायरे बाबा, हा मी इथें बसलों आहें.' तें ऐकून मोठ्या अदबीनें तो म्हणाला—'शेटजींनीं हें आपणांस पोंचवून यायाला सांगितलें आहे—आणि संध्याकाळीं ते स्वतः येतील. हें घ्या.' असें म्हणून त्यानें ताटावरील सरपोस उचलला तों इतक्यांत तीही दारांत येऊन, 'कोण आहे, कोठून आला, काय आणलें ?' ह्मणून विचारूं लागली. तेव्हां मान उचलून मीं तिच्याकडे फक्त पाहिलें, तशी ती आंत निघून गेली. ताटांत एक धोतरजोडा—नागपुरी रुइफुलकांठी, एक खण आणि पंचवीस रुपये, आणि एक विडा इतके जिन्नस होते. ते काढून घेण्यापूर्वीं मी त्याला म्हटलें 'कशासाठीं रे बाबा हें तुमच्या शेटजींनीं पाठविलें आहे? आणि तुमचे शेटजी ते नेमीनाथ शेटच कीं नाहीं ?' त्यावर गुमास्त्यानें उत्तर दिलें 'होय. नेमीनाथ शेटनींच हें आपणांस पाठविलें आहे. त्यांना मुलगा झाला. तुम्हांस मुलगा होईल, असें तुम्हीं त्यांना सांगितलें होतेंना ? आणखी शेटजी स्वतः तासाभरानें येतील.' असें म्हणून ते जिन्नस आपल्याच हातानें काढून ठेविल्यानंतर जयगोपाळ करून तो चालता झाला. मला थोडेंसें बरें वाटलें, आणि मीं म्हटलें चला एक दोन महिन्यांची तरी गुजराण झाली;

आणि थोडेंसें समाधान झाल्यामुळें, आपल्याला केव्हां हांक मारतील आणि केव्हां एकदां ते जिन्नस पहावयास जाईन म्हणून हपापलेल्या माझ्या बायकोस मीं म्हटलें–' ऐकलेंस काय? काढून ठेव हा धोतरजोडा आणि खण.' त्यासरशीं ती बाहेर आली, आणि हातांत खण घेऊन तो दोन तीन वेळां उलटापालटा करून म्हणाली ' खरेंच हा खण मोठा चांगला आहे. कांहीं नाहीं तरी रुपया सव्वा रुपया पडला असेल नाहीं? मी आवडीला याची चोळी शिवून कशिदा काढून पाठवून देईन; आणि हा धोतरजोडा चांगल्यांतला-च आहे हो! बाळ्याला फार मोठा होईल का?' या तिच्या प्रश्नाला मीं कांहीं एक उत्तर दिलें नाहीं, झटलें चालूं द्या इचें. मी कांहीं बोललों नाहीं, त्यामुळें ती जरा हिरमुसल्यासारखी झाली. इतक्यांत बाळ्या शाळेंतून आला. त्याच्याबरोबर त्याचे चारपांच सोबती, चल दे, पेढे दे, असें म्हणत आले, ते तसेच माझ्याकडे बघत माजघरांत गेले. त्यांपैकीं एका मुलानें मात्र मोठ्या धिटाईनें ह्मटलें ' अहो अप्पा, तुमच्या ह्या बाळ्यास वीस रुपये स्कॉलरशिप मिळाली. परीक्षेंत त्याचा नंबर पहिला आला. आम्हांला पेढे दे म्हटलें तर देत नाहीं, बघा.' हें ऐकतांच मला आनंद झाला तो कांहीं गगनांत मावेना. 'काय? कालरक्षेप आणखी दरमहा वीस रुपये?' असा मीं त्या मुलांस प्रश्न केला. तेव्हां–'होय, वीस रुपयांची स्कॉलरशिप्–'का-ळरक्षेप' नव्हे'–म्हणत तो हांसला आणि ' ए चल, दे पेढे' म्हणत तोही आंत बाळ्याकडे गेला. हें आहे तरी काय? ईश्वरानें हा चमत्कार तरी काय असा घडवून आ-

णला, असें मनांत येऊन घटकाभर मी दंग झालों. हें सगळें आहे तरी काय म्हणून बाळ्याला विचारण्यासाठीं मी आंत जाणार, तोंच आमचे यजमान गोविंदपंत नेने कचेरींतून परभारेंच आमच्या घरीं आले. त्यांना पाहतांच मी उठून त्यांस आपल्या जागेवर बसविलें. त्यांनीं 'तुह्मी बसा, तुह्मी बसा' असें ह्मटलें व मीही मग बसलों. आपले यजमान आज इकडे कां आले असतील बरें, असा मी विचार करूं लागलों. आज आनंदाचा दिवस देवानें दाखविला त्याकरितां आले, का यांच्या घरीं कांहीं हव्यकव्य आहे तेव्हां मला आमंत्रण देण्यासाठीं आले, हें कांहींच मला कळेना. तों इतक्यांत गोविंदरावांनीं बाळ्याकडे बवून बोलण्यास सुरुवात केली. 'कायरे ए बाळ्या! आज कशी काय झाली रे तुझी परीक्षा? किती आणे उतरली?—का नापास?' त्यासरशी बाळ्या त्यांच्याजवळ आला आणि अगदीं तोऱ्यांत ह्मणाला 'नापास कशी? साडेचौदा आणे माझी परीक्षा उतरली.' गोविंद.—'सोळा आणे नाहींना उतरली?' बाळ्या—'उतरली; पण साहेबानें साडेचौदा आणे ह्मणून सांगितलें. आणखी स्कॉलरशिप मिळालीना दर महिन्याला वीस रुपयांची?'

गो०—हं. पण तुझ्या हुषारीमुळें नव्हे कांहीं ती! पाठशाळेवरला सुपरिंटेंडेंट आहे दयाळू ह्मणून मिळाली, समजलास? जा आतां खेळ जा. असाच अभ्यास करावा बरें का?

मी—काय हो ही स्कालर—काय काय ह्मणतात तें—ह्मणजे काय? पगार वीस रुपये ना?

गो०—छे, ह्मणजे अजून त्याला शिकावयाचें आहे. पगार आतांच कोठला? शिकण्याला खर्च लागतो तो सरकार आपण देतें.

मी—मग पगार नव्हेच कां तो? अजून शिकायाचें आहेच ह्मणा.

गो०—अहो लागेल नोकरी. त्याची नका तुह्मी कांहीं काळजी करूं. बाळ्या आतां लागला आपल्या रस्त्याला, आणि तुमची गरीबीही संपली ह्मणून समजा.

मी—तथास्तु. वेदोनारायणाची कृपा! बाकी बाळ्या ह्मणजे इतका बुद्धिमान् आणि अभ्यासी कांहीं नाहीं. ईश्वराला आमची दया आली एवढें खरें!

गो०—ईश्वराच्या घरीं अन्याय का आहे? अहो, गोरगरीबाचें त्याला संरक्षण केलें पाहिजेना? आणखी असें कां ह्मणतां? तुमचा बाळ्या चांगला मेहनती आणि हुषार आहे. पोर पण चांगला निवळला हो. मला नव्हतें वाटलें, कीं बाळ्या हुषार निघेल ह्मणून. जाऊं द्या, चला. कोणीकडून झाली गोष्ट फार उत्तम झाली.

असें हें आमचें बोलणें चाललें होतें तों तिकडे आंत तिला जो कांहीं आनंद झाला तो कांहीं गगनांत मात्रेना. तिच्या मनांत मला आपल्या लेकाची फुशारकी येऊन सांगावयाची होती. आंत जाई बाहेर येई. तिला आतां आपल्या बाळ्याला कोठें ठेवूं आणि कोठें नको, असें होऊन गेलें. पण गोविंदराव बसले होते, तेव्हां निरुपाय झाला. तरी आह्मी बसलों होतों तिकडून कांहीं तरी निमित्त

काढून दोनचार वेळां येऊन गेली. आह्मी काय बोलतों हें तरी ऐकावें हा तिचा हेतु. इतक्यांत गोविंदराव ह्मणाले 'तुमची बगडी कोठें आहे? ती आज दिसत नाहीं कोठें? तिच्या लग्नाचें एकदां जुळलें ह्मणजे तूर्तास तुह्मी झालां काळजींतून मुक्त ह्मणावयाचें.' या त्यांच्या प्रश्नाला उत्तर देण्यापूर्वीं मीं आधीं तिला बोलाविलें, आणि मग– ह्मटलें 'होईल तेंही आतां. नारायणाच्या घरच्या गांठी आहेत. ईश्वरी नियमानियम का कधीं चुकावयाचा आहे?' तों इतक्यांत बगडीही आली. तिला जवळ घेऊन आमचे गोविंदराव कांहींबाही बोलूं लागले. इकडे मीं आपल्या मनाशीं ह्मटलें–चला एकदांचा कसा तरी काळजींतून मुक्त झालों. माझ्या बाळ्या आतां आपलें नशीब काढणार खास, आणि तूर्त एक महिन्याची पुंजी तर हातांत आली आहे. अशा प्रकारें माझें मन आल्हादित झालें खरें. पण त्यांत– हे गोविंदराव कां आले? लग्नासंबंधानें कांहीं मध्यस्ती करावयाला आले कीं काय? मोरोबानें त्यांच्याशीं तर संधान बांधलें नसेलना?–अशा प्रकारची उतावळी जिज्ञासा मला कांहीं स्वस्थ बसूं देईना. गोविंदराव ह्मणजे काय? पुऱ्या कारकुनी बाण्याचा. आमच्यासारखा कांहीं भिक्षुकगडी नव्हे. तोंडास आलें तें बोलून मोकळा होणारा तो भडभड्या नव्हे; आपल्या पोटांत काय आहे त्याचा बिलकुल अंत लागूं न देतां, दुसऱ्याच्या मनांतला भावार्थ काढून घेण्यांत तो अत्यंत पटाईत. सहज प्रश्न करील, दक्षिणेस जावयाचें तर उत्तरेकडे तोंड करील, आपण मात्र जास्त बोलावयाचा नाहीं, पण दुसऱ्याच्या तोंडाला मात्र खळ पडूं

देणार नाहीं हें मला माहीत होतें. ह्मणूनच या स्वारीचें मनोगत कसें कळेल, या विचारांत मी होतों इतक्यांत गोविंदराव ह्मणाले—'कां अप्पा तुह्मांला आतां ह्मणण्यासारखी काळजी उरली नाहींना? चला बरें झालें.' मी—अहो काळजी कधीं कां चुकलेली आहे? आतां ही पोर नाहीं का लग्नास आलेली? तिला मनाजोगतें स्थळ कसें मिळेल?—स्थळ मिळालें तर आमच्या हातून खर्च कसा निभेल?—अशा थोडया का काळज्या आहेत? अहो ईश्वरानें गरीबी आपल्या दुस्मानाला देखील देऊं नये बरें! आणखी गरीबीसुद्धां एखादे वेळ पत्करेल, पण या मुली नकोत.

गो०—असें ह्मणून कुठें चालावयाचें का आहे? त्या तुमच्या वेदांतांतल्या गोष्टी! मूल जन्मास येतें तेव्हांच आपलें अन्न आणि नशीब बरोबर घेऊन येतें, नव्हे का? मग तुह्मी कां अशी उगाचि रिकामी काळजी वाहतां?

गोविंदरावाच्या बोलण्याचा ओघ मोरोबाच्या धर्तीवर जाऊं लागला कीं काय असें मला वाटून मीं मनांत ह्मटलें—'अरे, स्वारी चालली बरें इष्ट मुद्याकडे. पण त्यांना कांहीं तरी उत्तर देऊन या भाषणाचा हा ओघ येथेंच अडवावा हें बरें.' ह्मणून मींही ह्मटलें—अहो, सांगायला गोष्टी जितक्या सोप्या दिसतात तितक्या प्रत्यक्ष व्यवहारांत कोठें असतात? आह्मी धड वेदांती ना धादांती. ही घ्या पानसुपारी. तंबाकू खायची ना?' त्यावर गोविंदराव ह्मणाले 'असूं द्या घेतों मी आतां हळूहळू; मग काय ह्मणतां आणखी नवें जुनें वर्तमान?' मी—नवें जुनें वर्तमान आणखी काय असायचें आहे? संध्याकाळची वेळ झाली, आतां

जावें ह्मणतों देवदर्शनाला. आमच्या कर्मकटकटी आपल्या रोजच्याच आहेत. त्यांला ईश्वरच कंटाळत नाहीं मग आह्मी तरी कंटाळून काय उपयोगी?' अशा प्रकारें मी निसटानिसटी करूं लागलों तरी गोविंदरावाची आणखी बसावयाची इच्छा दिसली. तेव्हां मात्र मला खास वाटलें कीं, बगडीच्या लग्नाकरितां शिष्टाई करावयास ही स्वारी आली खचित्! मनच तें. तें काय चिंतील आणि काय नाहीं याचा नेम कोणीं सांगावा? माझ्या अशा ह्या उडवाउडवीच्या बोलण्यावरून बिचाऱ्या गोविंदरावाला वाटलें असेल—बाळ्याला नुकतीच कोठें स्कालरशिप मिळाली, तें ऐकतांच हा ब्राह्मण आतां आह्मांस कस्पटासारखे मानूं लागला, पण माझ्या मनांत तो कांहीं अर्थ मुळींच नव्हता. मी भीत होतों तो निराळ्याच कर्माला. असो; गोविंदराव कांहीं आपली चिकाटी सोडीना, असें जेव्हां पाहिलें तेव्हां मीही आसनमांडी घालून बसलों. तेव्हां गोविंदराव ह्मणाले—अप्पा, तुह्मांला आतां दिवस चांगले येत चालले. ईश्वराची तुमच्यावर आतां कृपा होऊं लागली, तुह्मांला आतां आमच्यासारख्यांची किंमत कांहींच वाटावयाची नाहीं, हें खरें आहे. मी कांहीं मोरोबा नव्हे. दुधानें तोंड पोळलें ह्मणजे ताक फुंकून खावें लागतें तसें करूं नका. तुमचा मी फार वेळ खोळंबा करीत नाहीं.—तुमची बगडी आहे मोठी भाग्यवान. तिची तुह्मी काळजी करूं नका. शेजारचे रामाजीपंत आहेत नाहीं, त्यांच्या मुलास तुह्मी आपली बगडी द्या.' इतक्यांत मीं ह्मटलें—'ते रामाजीपंत सरंजामे?—आणि ते या भिकारड्या त्रिंबकभटाची मुलगी करणार

मी कांहीं असा दुधखुळा नाहीं. ' गो०—' बरें तसें कां होईना ? सरंजाम्यांचे तुह्मी व्याही झालां ह्मणजे मग काय कराल ? ' हें बोलणें माझी बायको आंतून ऐकत होती. बगडीला—आणि सरंजाम्यांचा बजाबा नवरा मिळणार, ही गोष्ट ऐकतांच तिला जो कांहीं आनंद झाला तो कांहीं सांगून सोय नाहीं. ती तशीच बाहेर आली, आणि ह्मणाली ' सरंजाम्यांचें ना स्थळ ? अगदीं सुरेख. जसें असावें तसें आहे. मुलगा गोरा, रूपानें चांगला, घरीं श्रीमंती पुष्कळ' वय लहान, सासूसासरे चांगले—आणखी काय पाहिजे ? तेवढें जुळेल तर मग—' तिला थांबविण्यासाठीं मी ह्मटलें— ' आणखी नको कांहीं, दहापंधरा हजार रुपये तेवढे खर्चा-वयाला आम्हांस पाहिजेत ह्मणजे झालें !' गो०—'राहूं द्या हो अप्पा, तुमच्या नशीबाचाच जोर असा कांहीं आतां चांगला आहे कीं, बोलून सोय नाहीं. आणि मी तुह्मांला आतांच सांगून ठेवितों, बजाबा तुमचा जांवई खास होणार. मी सांगतों तसें नाहीं घडून आलें तर मग मला विचारा. '

हें ऐकून मी मनांत चकित झालों. एवढें मोठें श्रीमंतांचें घर बगडीला कोठून मिळणार ? पण मुलाला कांहीं खोड बीड तर नसेल ना, असे विकल्प मी मनांतल्या मनांत योजूं लागलों. इतक्यांत गोविंदराव ह्मणाले ' अन्याबापू आहेतना, त्यांच्या मनानें घेतलें आहे कीं, ही तुमची बगडी मोठी सुलक्षण आणि चांगल्या पायगुणाची आहे. त्यांच्या घरीं एक दिवस तन्मणी हरवला होता, आणि तो कांहीं केल्या कोठें मिळेना; इतक्यांत बगडी कशालाशी तेथें गेली. ती घरांत पाऊल टाकते न टाकते तोंच आं-

तून तन्मणी सांपडला अशी ह्मातान्याच्या कानीं बातमी गेली. असेंच कांहीं आणखी चार पांच वेळां झालें. ह्मणून तो ह्मातारा सारखा पाठीस लागला आहे कीं, ही लक्ष्मी घरीं आणा; या नातसुनेच्या पायगुणानें आपलें फार चांगलें होईल असें त्याला वाटतें. परवां एकदां ह्मातान्याची प्रकृति कायशी फार बिघडली होती. तेव्हां ही बगडी तिथें त्याच्या शेजारीं जाऊन, तुमचें दुखणें उद्यां हलकें होईल असें ह्मणाली, आणि त्याप्रमाणें घडून आलें. ह्मातान्यानें फारच नाद घेतला आहे कीं, बगडीला आपली नातसून करा ह्मणून; आणि उमाबाईलाही ही सून मोठी चांगली वाटते. ह्मणून मला हें ठरवायला त्यांनीं सांगितलें आहे. जन्मपत्रिकेचेंही टिपण ह्मणतात अगदीं बत्तीस लक्षणांनीं जुळतें. येत्या माघमासीं लग्न करायचें आणि तेंही मोठ्या कडाक्यानें. कारण ह्मातान्याचा आग्रह. मी त्यांच्याकडचे सर्व ठरवून आलों आहें. आंता आपला विचार तेवढा पहावयाचा, समजलां?' हें भाषण ऐकून आह्मांला काय वाटलें असावें हें कांहीं वर्णन करून सांगतां यावयाचें नाहीं. 'नारायणाच्या घरचा खेळ; तो कोणास कांहीं कळावयाचा नाहीं' एवढेंच मीं ह्मटलें.

## प्रकरण ८ वें.

### 'सुख पाहतां जवापाडें, दुःख पर्वताएवढें।'

दुःखें एकामागून एक, आणि लगेहात येतात तीच गोष्ट सुखांची होते. दुःख एकटें येत नाहीं; आपले संवगडे सोबती असतील नसतील तितक्या सर्वांनिशीं मनुष्यावर चाल करून यावयाचें, हा दुःखाचा परिपाठ; सुखाचाही मला आतां तसाच अनुभव येऊं लागला. दुःखाचा पोटभर अनुभव घेण्यासाठींच माझा अवतार असें वारंवार मला वाटत असे; ईश्वर अखिल जगताचा नियामक आणि दयेचा अर्णव तो मला विसरलेला, मला पाठमोरा आणि मजविषयीं निष्ठुर व निर्दय बसलेला असें मला हमेश वाटत असे; मीं इच्छावें, मीं मागावें किंवा मला हवें असे त्याच्या अगदीं उलट ईश्वराकडून मला मिळावयाचें हा जणूं काय आजपर्यंत एक ठरीव सिद्धांत होता; पण तें सर्व आतां बदललें! ईश्वरानें आजवर उपेक्षा केली त्याचें उट्टें निघण्याची वेळ आली, असा आतां मला अनुभव येऊं लागला. माझ्या बाळ्याला महिना दीडशें रुपयांची इंग्रज सरकारची नोकरी लागली. वर्षभर आपला प्रपंच चालावयाचा तर दोनअडीचशें रुपये सालीना किफायत झाली ह्मणजे चंगळ उडाली असें मला वाटे. पण माझा मुलगा महिना दीडशें रुपये मिळवूं लागला, व दीडशेंचे आठशें रुपये व्हावयाचे असेंही मला कोणी कोणी सांगत. त्यामुळें मी किती तरी फुगत असें. मनोराज्य हांकण्यांत मी दंग होऊं लागलें. या माझ्या मनोराज्यांत मी किती तरी मनःपूबे करीत असे.

माझी बगडी श्रीमंताच्या पदरीं पडली. मला खर्च आला नाहीं. जांवई घराणदार, श्रीमंतींतला व वयानें आणि रूपानें माझ्या मुलील अनुरूप. लग्नसोहळा मोठ्या थाटानें झाला. थोरामोठ्यांचा हा त्रिंबकभट सोयरा. तेव्हां माझें मन रिकाम्या फुशारक्या भारी मारीत असे. संपत्ति माझ्या बगडीच्या सासऱ्याची आणि नवऱ्याची, पण त्यांच्या घरच्या दागिन्यांची, त्यांच्या राहत्या सुंदर व टोलेजंग हवेलीची, त्यांच्या मळ्याटळ्याची आणि इतर जमीनजुमल्याची धन्यता मला वाटूं लागे. मी ह्मणजे आजवर कोणाला महत्वाचा माणूस वाटत नव्हतों, माझ्या विद्वत्तेचें कधीं कोणास कौतुक वाटलें नाहीं. माझ्या बालबोध वर्तनाचे किंवा माझ्या आंगच्या कैक सद्गुणांचे चाहते मला कोणी आजवर भेटले नव्हते. नुसते चाहते भेटले नाहींत एवढेंच नव्हे, तर नुसते गुण पाहणारेही कोणी नव्हते. पण आतां तो मनु बदलला. आपल्या सोयऱ्यांची योग्यता लहानसहान नाहीं, घराणें बालबोध, माणसें सज्जन व कुलीन, इत्यादि गोष्टी माझ्या बगडीच्या सासरचीं माणसें लोकांस सांगत. माझी स्तुती करणारे बरेच लोक भेटूं लागले. असा चोहोंकडे एकदम फेरबदल थोड्याच दिवसांत होऊन गेला. त्यामुळें मला पुष्कळ विचार सुचून या जगांतल्या भोंदूपणाची मोठी मौज वाटे. मनुष्याच्या हातांत मोहबत दाखविण्याचें किंवा भीति वाटावयास लावण्याचें सामर्थ्य नाहीं. तर त्या माणसाचें जिणें केवळ व्यर्थ होय! बाळ्याच्या नौकरीमुळें आणि आमच्या व्याह्यांच्या श्रीमंतीच्या योगानें माझ्या हातीं मोहबत आणि भीती हीं आहे-

त असें लोकांस वाटायला लागलें. आणि खरेंच या जगांतला सर्व व्यवहार मोहबत आणि भीती यांच्या तंत्रावर चालला आहे असें ह्मटलें तरी चालण्यासारखें आहे. पैसा आणि सत्ता यांच्यावर माणसाची किंमत जगांत होत असते ही गोष्ट खरी आहे. मिळून सांगण्याचें तात्पर्य हें कीं त्रिंबकभट व्याह्यांच्या श्रीमंतीमुळें आणि चिरंजीवाच्या नौकरीनें जगांतल्या मान्यतेस पात्र असे ठरूं लागले; त्याच्या दशग्रंथी विद्वत्तेचें किंवा सज्जन स्वभावाचें आणि सरळ व बालबोधी वर्तनाचें कोणांस कांहीं वाटत नव्हतें, तें आतां वाटूं लागलें. इकडे हा असा फरक लोकरीतींत पडला तोंच माझ्या वृत्तींत ही आढळूं लागला. ईश्वराची आठवण होईनाशी झाली. पदोपदीं ईश्वरा, ईश्वरा, अशी हांक माझें मन मारीत असे. पण तेंच मन आतां त्या ईश्वराला विसरूं लागलें. संकटकाळीं विपदवस्थेंत मनुष्य ईश्वराची करुणा भाकतो किंवा आठवण ठेवितो, तितकी अनुकूळ काळांत ठेवीत नाहीं हा मोठा चमत्कार आहे. श्रीभगवान एकदां कुंतीस ह्मणाले—मी प्रसन्न झालों आहें, काय पाहिजे तो वर माग! 'कृष्णा, मागेन तो वर देशीलना?' असें कुंती वारंवार बजावून विचारूं लागली, तेव्हां श्रीकृष्णालाही वाटलें कीं ही काय वर मागणार कोण जाणे? पण मनाचा निर्धार करून परमात्मा कुंतीस ह्मणाला—कांहीं चिंता नाहीं. वाटेल तो वर माग. तेव्हां कुंतीनें मागितलें 'देवा! मला सदा विपत्काळ दे.' हें ऐकून श्रीकृष्णाला फार वाईट वाटलें, आणि निषेधून कुंतीस देव बोलले—कुंती, तुला हवा तो वर देण्यास मी सिद्ध असतां त्वां हें काय मागितलें? कुंती ह्मणाली—

कृष्णा, विपत्काळीं ईश्वराचें स्मरण होतें, आणि त्याची सेवा घडते, तशी सुखाच्या काळांत घडत नाहीं. मला कुंतीचें ह्मणणें अगदीं खरें वाटतें. मी माझ्या मनाला ओढओढून ईश्वरचरणाकडे नेई पण तें तेथें राहतें आहे कशाला? मनोराज्याचा खोटा राज्यकारभार हांकीत बसण्याचा त्या मनाला ओढा; खोट्या आणि दिखाऊ अभिमानाकरितां त्या मनाची धडपड; मीं आपली आशा चेपीत चेपीत आणून तिला अगदीं ताब्यांत ठेविलें होतें. पण ती एकदम आतां तुफान झाली. मीं गर्व वहावा असा मला कधीं ह्मणण्यासारखा प्रसंगच आलेला नव्हता. बिनचूक कधीं कोठें पट्टीचें ह्मणणें माझें झालें, किंवा आदरपूर्वक विद्वान ब्राह्मण ह्मणून मला आमंत्रण आलें, किंवा कोठें सभेंत माझा गौरव झाला ह्मणजे मला धन्यता वाटावयाची. पण आतां काय? जिकडे तिकडे अभिमान वाटणाऱ्या व गर्व वाहूं लावणाऱ्या गोष्टी दिसूं लागल्या. तरी आपल्या परी होईल तितकें करून हे माझे मनोविकार लोकांस दिसूं नयेत ह्मणून ते झांकण्याची मी पुष्कळ खटपट करीं. गर्वाची सावलीसुद्धां मजवर पडावयाला नको असें मला वाटे, कारण गर्वानें मनुष्य फुगूं लागलें कीं समजावें पडत्याकाळाचें निशाण फडकावयास लागलें ह्मणून. असा मला इतरांच्या गर्वावरून अनुभव कळला होता. मी ईश्वराच्या भीतीच्या योगानें, गर्व तराडून उठे त्याला आवरून धरीत असें. आतां मी ईश्वराला विसरूं लागलों तर पुनः न जाणों ईश्वर कोपेल, या भीतीनें ईश्वरसेवेकडे मनाला मी ओढून नेत असें. लोक मला मूर्ख किंवा गर्विष्ठ अगर

पूर्वपद विसरलेला असें ह्मणतील या भीतीनें माझ्या आचरणांत व बोलण्यांत मी मोठा संभाळून वागूं लागलों. ह्मणजे साहजिकपणा माझ्या ठायीं आजवर होता तो आतां नाहींसा झाला आणि ‘ मुद्दामपणाकडे ’ सारें साम्राज्य गेलें.

हा प्रकार माझा स्वतःचा: तिची गोष्ट काय सांगावी ! स्वर्ग केवळ तिला दोन बोटें उरला. पावसाळ्यांतील ओढ्यासारखी ती तट्ट फुगलेली मला वाटे. हा काय माझा दोष, का ती तशी खरोखर बनली हें कांहीं मला कळेना. बाळ्या आणि त्याचा पगार, बगडी आणि तिचें सासर, यांच्याखेरीज ती कोणाशीं आणि कांहींएक बोलतच नसे. रिकामपणा असून देखील माझ्याशीं मन मोकळें करून बोलण्याला तिला फावेना. अमुक हवें आणि तमुक नको या किंवा दुसऱ्या प्रापंचिक गोष्टींविषयीं ती मजजवळ बोलेनाशीच झाली. मी ह्मणजे काय तिला आतां निरुपयोगी निर्माल्य वाटलों, का आतां मला विचारावयाचें तें काय, असें ती समजे, किंवा जांवयाच्या, लेंकीच्या, आणि लेंकाच्या येणाऱ्या जाणाऱ्यापुढें फुशारक्या मारीत बसण्याखेरीज तिला दुसरें कांहीं सुचेनाच कीं काय हें मला कळेना; पण तिची अशी स्थिति झाली खरी. नौकरी लागून एक महिना झाला तेव्हां पहिला पगार दीडशें रुपये आला, तो बाळ्यानें आपल्या शिपायाच्या हातीं कचेरींतून मजकडे पाठवून दिला. त्या वेळीं माझ्या मनाची जी स्थिति झाली ती कांहीं वर्णन करवत नाहीं. ईश्वराचे उपकार आठवण्यापूर्वीं ‘ हं, पहा, मी शहाणपणा करून वांई सोडिली ह्मणून ’ असा मला अहंपणा वाटूं लागला ! चम-

त्कार आहे. वाईट गोष्टीचा बोजा ईश्वरावर काढावयास धांवावयाचें आणि चांगलें तेवढें मीं केलें असा अभिमान बाळगावयास तयारी, हा केवढा मनुष्याचा मूर्खपणा ? असो; बाळयानें पगार माझ्याकडे पाठविला त्याचा एक परिणाम मात्र चांगला असा झाला कीं ती माझ्याकडे पुनः हें करायचें आणि तें सोडायचें, अशीं पूर्ववत् प्रापंचिक खलबतें करावयास आली. तेव्हां मीं ह्मटलें ' कां आज प्रपंचाचा विचारसा करावयाला फावलें ? ' ती—' ह्मणजे मला नाहीं बाई याचा अर्थ कळत. ' मी—' होय. कशाला अर्थ कळेल ? ' माझें हें बोलणें ऐकतांच रागानें फुणफुणत ती आंत निघून गेली. तिला एवढेंही बोलणें खपलें नाहीं. मागें मी रागावें तेव्हां ती माझी मर्जी धरावयास पाही, आणि माझा राग घालविण्याचा यत्न करी. आतां तो मनु बदलला. मींही विचार केला कीं बायकोची जात; मी इतका विचारी, पण माझ्या स्थितींत किती बदल झाला ? तेव्हां तिची काय गोष्ट सांगावी ? असा मी विचार करीत आहें इतक्यांत 'बगुताई, जा ग ह्मणावं, नवसाचे पेढे वांटावयाचे आहेत, सवाष्ण ब्राह्मण सांगायचे आहेतना ? ' असें तिनें रागानें ह्मटलें. तें ऐकून मी लगेच उठलों आणि आंत जाऊन सौम्यतेनें तिला चार गोष्टी समजावून सांगितल्या. गर्व वाहूं नये, लीनता ठेवावी, ईश्वराची कृपा, तेथें आमचें काय वगैरे बहुत सांगितलें तें ऐकून ती पुनः ताळ्यावर आली. हाडाचीच ती सज्जन, आणि जन्मतः भल्या स्वभावाची. तिला माझें सांगणें पटलें. घरांत बायका वागाव्या तशा वागत नाहींत किंवा नसावे ते दोष त्यांच्या भाष-

णांत किंवा वागण्यांत आढळतात तेथें रागावून काम होत नसतें. थंडपणानें आणि विस्तारपूर्वक त्यांच्या दोषांची चर्चा करून त्यावर त्यांचें काय ह्मणणें आहे हें ऐकून घेतलें व त्यांचे दोष त्यांना मोकळ्या मनानें दाखविले तर त्यांची समजूत चांगली पटते असा माझा अनुभव आहे. तिरतिरपणानें रागेजावें आणि मग त्या रागाच्या भरांत वांकडेंतिकडें बोलून गेल्यानें जास्त गैरसमज वाढतो, व परस्परांच्या सलोख्यांत विरजण पडल्याशिवाय राहत नाहीं. गैरसमज होण्याला वाव सांपडूंच द्यावयाची नाहीं, आणि, आपल्याला काय वाटतें व वाटलें, आणि लोकांस काय दिसेल, इत्यादिकांची चांगली फोड करून सांगितली ह्मणजे मग बायकांत दोष राहत नाहींत. रागावण्यापेक्षां समजावून सांगण्याची पद्धत प्रपंचांत जास्त उपयोगी पडते, आणि सुखाला तेंच साधन आहे. माझी बायको तणतणत रागानें निघून गेली ह्मणून मी रागावलों असतों, ह्मणजे तिची झालेली गैरसमजूत दूर होतीना. माझ्या रागावण्यानें तिला त्रास झाला असता, आणि मलाही होणारच. इतकें करून उभयतां खिन्न व त्रस्त. याचें मूळ कारण नाहींसें झालें नसल्यानें त्याच त्या कारणाची पुनरावृत्ति होत गैरसमज झाला. त्याला जास्त जास्त उचल मिळून प्रेम आणि आनंद, संतोष व समाधान यांच्या जागीं तिटकारा आणि त्रास, कंटाळा व धडपड हीं येऊन सुखाला पदच्युत करायचीं आणि दुःखाचें साम्राज्य कुटुंबांत व्हावयाचें. गोडशा भाषेनें नीट समजूत घातली तर उभयतांसही सुखाची जोड होते. माझा स्वभाव हा असा, मला अमुक आवडतें आणि

तमुक नको, या गोष्टी पुरुषानें एकदां बायकोस सांगितल्या व त्या तिला कळल्या, आणि आपल्याला नवऱ्याच्या पसंतीनुसार व त्याला आवडतें त्याप्रमाणें वागावयाचेंच हें बायकांनीं ध्यानांत ठेविलें, व पुरुषांनीं कांहीं साहजिक स्त्रीस्वभावाला अनुरूप अशा क्षुल्लक गोष्टींकडे नजर दिली नाहीं, ह्मणजे प्रपंच सुखावह झाल्याशिवाय राहयचा नाहीं. गैरसमजूत, मनोगत न बोलता झांकून ठेवणें, व परस्परांच्या हक्कांविषयीं अज्ञान, या त्रिदोषानें पुष्कळांच्या प्रपंचांतील सुख आणि समाधान ठार झालेलें आहे. आपल्या समजुती, आपल्या इच्छा, आपल्या आवडी असतील त्या मुक्या ठेवण्याच्या ऐवजीं त्यांना वाचा फुटूं देणें, प्रपंचांत अवश्यक आहे. धोरणाच्या योगानें व सहवासानें त्या कळाव्या ही समजूत खरी, पण तशा रीतीनें कळण्याच्यापूर्वी काय थोडेथोडके अनर्थ होतात? बुडत्याचा पाय खोलांत त्याप्रमाणें गैरसमजुतीची मजल वैराकडे धांवते हा अनुभव ध्यानांत ठेवावयास हवा. सारांश, उपदेशाच्या पोटीं व मोठ्या शांतवृत्तीनें मीं बायकोला तिचे दोष दाखविले, आणि त्याचा परिणामही पण चांगला झाला. सुखाच्या पहिल्या फवाऱ्यामुळें बेहोष झालेली तिची मनोवृत्ति ताळ्यावर आली आपण एकदम श्रीमंतीच्या पायरीवर चढलेले आणि वाघ्याचे पाग्ये झालेले नाहीं, असें आपल्या कृतीवरून जगास वाटूं देणें किती व कसें अवश्य आहे; आपली मूळची गरीबी व तींतली राहणी कायम राहिली तरच ती कशी शोभते; ईश्वरानें आपले पांग फेडले, हे सोन्याचे दिवस त्या जगदीशाच्याच कृपेनें दिसले, ह्मणून त्याचे उपकार मानण्यांत

आपण कसूर कां करूं नये; इत्यादि गोष्टी मीं तिला नीट समजून सांगितल्या, त्याचा उपयोग बराच झाला. काळ चंचळ आहे, सुखाची सावली मध्यान्हकाळची, तिचा भरंवसा धरतां कामा नये, सुख आणि दुःख यांची सर्व सारखी मिसळ करून ती मनुष्याला द्यावयाची हा विधात्याचा नियम, व असा सृष्टिक्रम असतो, इत्यादि सिद्धांत उदाहरणें देऊन तिला मीं चांगले समजून सांगीतले त्याचा परिणाम 'उपड्या घागरीवर पाणी' अशापैकीं झाला नाहीं. परोपदेश करण्यांत पांडित्य पुष्कळ लढवितां येतें, पण तेंच स्वतःवर येऊन बेततांच उपयोगी पडत नाहीं, असाही विचार माझ्या मनांत आला. मीं तिला उपदेश केला, तोच मलाही पाहिजे होता. अस्तु.

आह्मी सुखांत कालक्रमणा करूं लागलों, चारपांच महिने आनंदांत घालविले, पण त्या सुखाचाही मग कंटाळा येऊं लागला असें ह्मटलें ह्मणजे कोणास खरें वाटावयाचें नाहीं. मृत मनुष्याचें दुःख करीत बसणें यांत एक प्रकारचें सुख असतें, त्याचप्रमाणें पूर्वीच्या दारिद्र्याच्या आणि संसारांतील क्लेशांच्या अनुभवांचें फिरून स्मरण करण्यांतही एका तऱ्हेचें समाधान आहे. नुसतें सुख कधींही आनंददायक नसतें असा माझा अनुभव आहे. भूक लागल्याशिवाय अन्नाची गोडी नाहीं, किंवा उन्हांत गेल्याशिवाय सावलीचें सुख कळत नसतें. त्याचप्रमाणें गरीबी चांगली भोगल्याशिवाय श्रीमंतीचें सुख कळणें शक्य नव्हे, हा अनुभव आमच्या कुटुंबास येऊन चुकला. परंतु सर्व दिवस सुखाचा आला तरी तो कंठण्याला जड जातोच. असें

कां हें मला कळेना. प्रपंचांत मला काळज्या जास्त असत. आजचा दिवस गेला, उद्यांचा कसा जाईल ही मला पंचाईत पडे. मीठ आणलें, मिरचीला पैसे कोठून ही माझी विवंचना मागें कधीं चुकली नव्हती. एखाददुसरे कोणी सुखी आहेत ते पाहून ते कां असे सुखी आणि मी कां तसा नाहीं हा विचार मला सदा छळीत असे. गरीबीमुळें माझ्या सद्गुणी स्वभावाचें आणि सच्छील वर्तनाचें कांहीं एक चीज कोणीच करीत नाहीं, व कोठें त्यासंबंधानें चाललेली वाखाणणी मला ऐकूं येत नाहीं, ह्मणून मला वैताग येई, व जगांतील तोंडपुजेपणाविषयीं तिटकारा वाटे; हृदयस्थ अंतरात्मा व वरील जगच्चालक परमेश्वर यांच्या संतुष्टतेपलीकडे व त्याच्या शाबासकीपुढें दुसऱ्या कोणाची मातब्बरी नव्हे, मनुष्याकडून होणारी स्तुति किंवा जगांतली वाहवा कुचकामाची, हा माझा निर्धार अनेक वेळां डळमळे; आणि त्यायोगानें दुःखाचेही पण थोडे बहुत चरके बसत. अशाश्वत मिथ्या आणि पोकळ अशा सुखाच्या आशेच्या पायीं मी विनाकारण दुःखी होत आहें हें मला समजत असे. आणि हल्लीं पाहतों तों प्रपंचाची काळजी नाहीं, बाजार करण्याला अडचण पडेना, लोकांइतका किंबहुना त्यांच्यापेक्षां मी जास्त सुखी असें मला वाटूं लागलें, लोकांत मानमान्यता वाढली, माझें व माझ्या मुलाचें स्तुतिस्तोत्र गाइलेलें कानीं पडूं लागलें, हें पाहून आनंद वाटे. अशा परिस्थितींत मी सहकुटुंब जाऊन पडलों; पण तेथें मागील गरीबींत जें एक प्रकारचें सुख होतें तें कांहीं अनुभवण्यास

मिळेना. मला जास्त जास्तच कंटाळा येत चालला, तो कां हें कांहीं सांगवत नाहीं. सोमलांतल्या किड्यास सोमलांत आनंद वाटतो तो साखरेंत व्हावयाचा नाहीं, अशी माझी स्थिति आहे कीं काय तें मला समजेना. ईश्वरी मायेचाच हा सारा चमत्कार असें ह्मटल्याशिवाय गत्यंतर नाहीं. पाण्यांत माशाला झोंप घेतां येते अशी योजना करणाऱ्या परमेष्ठीनेंच मनुष्यामागें लावून दिलेल्या दुःखांत खऱ्या सुखाचे झरे झुळझुळ वाहत ठेवण्याची तजवीज केली आहे असेंच ह्मटलें पाहिजे; आणि ह्मणूनच 'दिली स्थिती देवांनीं, तींतच सूख मान रे' असा प्राणिमात्रांना साधुसंत उपदेश करीत असतात. पण तिकडे लक्ष जातें आहे कोणाचें? आपल्या स्थितीपेक्षां अन्यत्र सुखाची ठेव आहे या मिथ्या भ्रमानें बिचारा मनुष्य प्राणी आहे त्या सुखास मुकून आशेंत दिसणाऱ्या सुखाला आंचवलेला असतो तो असतोच. आशा! दारिद्र्य किंवा प्रापंचिक जखमा यांवर रामबाण मलम आहे, व आशेंतच काय तें सुख आहे असें वाटतें, या गोष्टी खऱ्या आहेत. तथापि माझा इतक्या दिवसांचा अनुभव इतकाच कीं वाटेल ती स्थिति ईश्वर देवो तींत सुख हें असतेंच; पण तें शोधून पहावयास हवें, आणि मानून घेतलें पाहिजे. परंतु मनुष्याला जी पक्की कळत नाहीं ती गोष्ट हीच. हें तत्व एकीकडे सारून मन सैरावैरा धांवत सुटतें त्याला पुनः आवरून याच तत्वाशीं बांधून घालावयास हवें. मला सुद्धां ही गोष्ट फार उशीरां कळली. ह्मणजे ती इतकी उशीरां कीं त्या कळण्याचा मला फारसा उपयोगसुद्धां नाहीं अशा वेळीं. परंतु मी

पुढचा, मला ठेंच लागली ती पाहून माझ्या मागचे तरी शहाणे होवोत ह्मणून मी ही माझी शुष्क व कंटाळवाणी कर्मकथा सांगत आहें. अद्भुत व असंभवनीय गोष्टी लोकांस ऐकावयाला फार आवडतात, पतिपत्नींच्या प्रेमकहाण्या मनोरंजक वाटतात, राजाराणीच्या गोष्टी ऐकण्याची लहानपणापासूनच संवय असते, व्यवहारांत घडलेल्या, फारशा आढळत नाहींत असल्या हकीकती ऐकण्यांत मन फार रमतें हें मला ठाऊक आहे. माझी ही कर्मकथा तशांतली नाहीं. बोध स्पष्ट व्हावा आणि तात्पर्य काय तें चटकन ध्यानांत यावें इतकाच काय तो माझा मुख्य कटाक्ष हें कृपा करून कोणीं विसरूं नये.

सुख—सुख—ह्मणून मनुष्यप्राणी ज्याकरितां धडपडतो तो पदार्थ सापेक्ष तर आहेच. पण सुख हें मानण्यावर असतें. सुख असा एखादा स्वतंत्र पदार्थ नाहीं. फार दिवसांपासून आपणांस असावी अशी वाटणारी स्थिति मला एकदांची प्राप्त झाली; तींतसुद्धां मला लौकरच सुख वाटेनासें झालें. एकदां का माणसानें संशयित मनानें पाहण्याला प्रारंभ केला, ह्मणजे चोहोंकडे त्याला नको तेंच आढळूं लागतें. कावीळ नांवांचा रोग आहे, त्यामुळें जगांत पहावें तिकडे पिंवळेंच दिसूं लागतें ह्मणतात, तीच गोष्ट संशयाची आहे. संशय—पिशाच्च कोणाच्या एकदां का बोकांडीं बसलें, ह्मणजे त्या बिचाऱ्याची तें पुरी त्रेधा उडवून देतें यांत शंका नाहीं. यास्तव शहाण्या माणसानें होतां होईल तों या संशयापासून दूर राहावें. बायको, मुलगा, व लेंक हीं तिघेंही माझी आतां फारशी परवा बाळगीत

नाहींत, असें एकदां माझ्या मनानें घेतलें, झालें; मग त्यांच्या एकंदर कृतींत मला तेंच जिकडे तिकडे दिसे. पण मोहपाशाच्या योगानें मी पुनः पुनः आपल्या मनाला आवरण्याचा प्रयत्न करीं; बाळ्याच्या कौतुकांत आणि शुश्रूषेंत ती सदा दंग होती; तिला बाळ्याचें काम आधीं करावें असें वाटे, त्यामुळें साहजिकच माझ्या कामाकडे दुर्लक्ष आणि उशीर होऊं लागला. आजवर घरांत मीच एकटा काय तो कर्ता, त्यामुळें माझ्याइतकें वर्चस्व घरांत कोणाचें नसे. आतां बाळ्या कर्ता झाला; आणि तो माझ्यापेक्षां किती तरी पटीनें जास्त पैसे मिळविणारा. तेव्हां माझ्याकडे गौणपक्ष हा सहज आलाच. पुत्र आणि शिष्य यांचा उत्कर्ष आनंददायक असतो इतकेंच नव्हे, तर त्यांनीं आपला केलेला पराभवही दुःखद वाटत नाहीं, ही गोष्ट खरी आहे. पण आजवर मी एकटा कर्ता ह्मणून वागलेला, त्यामुळें साहजिकपणें मला ही तेजहानि सुखावह वाटत नसे. पण ती गोष्ट मीं फारशी मनावर घेतली नाहीं. मुलगा मिळविता झाला तरी तो पगार आणून माझ्या हातीं देई, प्रपंचांतली एक काडीसुद्धां माझ्याशिवाय हालत नव्हती, आणि माझ्यापरी मी आपली सत्ता चालवीतच होतों. परंतु माझ्या एकछत्री साम्राज्यांत जी तिची राहणी किंवा वागणूक होती ती बदलत चालली. ती बदलत चालली ह्मणून कधीं त्याचा मला राग आला नाहीं. सहज विनोदाचा ओघ आणून थट्टेचा आव घालीत तिला मी उपदेश करीं. एकदां सहज कशावरूनशी गोष्ट निघाली तेव्हां मीं ह्मटलें ‘ कायग, तूं आईसाहेब बनलीस,

बगडी ताईसाहेब झाल्या, बाळ्या बाळासाहेब बनले, आणि मी एकटाच कायतो त्रिंबकभट तो त्रिंबकभट!' या माझ्या मर्मभेदी थट्टेचा तिला अर्थ कळला आणि थोडीशी ती प्रथमतः रागावली सुद्धां. परंतु कांहीं वेळानंतर माझ्या आढळण्यांत आलें कीं ती आतांशा माझ्या कामाकडे जास्त लक्ष देते, आणि बाळ्याकडे तिचें दुर्लक्ष होऊं लागलें. बाळासाहेब—बाळासाहेब—ह्मणून तिचें नाचणें इतक्या लौकर कां बंद झालें; आणि पूर्ववत् किंवा जास्त तिचा माझ्या कामाकडे ओढा कां लागला हें मला मोठें गूढ पडलें. तिच्या स्थितींत बदल पडला ही गोष्ट चटकन् माझ्या ध्यानांत आली, पण त्याबद्दल चकार शब्द मीं काढिला नाहीं; ह्मटलें, दम धरावा आणि काय प्रकार आहे तो आपोआप कळेतोंपर्यंत वाट पहावी. पण बायकांना कोठली फुरसत आणि कसचा दम निघावयाला? एके दिवशीं ती हळूच मला ह्मणाली! 'एकदां वांईला जावें असें वाटतें. जायचेंनां?' मीं ह्मटलें 'कां? इतक्यांत येथला कंटाळासा आला?' तीः—कंटाळा नाहीं कांहीं; पण फार दिवस झाले, तेव्हां एकदां ह्मटलें चार दिवस जाऊन यावें. मी—इतकेंचना? पाहतां येईल. त्याचे पुढील दोन तीन महिन्यांचे पगार आले ह्मणजे मग कांहीं थोडेसे पैसे खर्चावयाला घ्यावयाला सांपडतील. तीः—ह्मणजे? खर्चाची अजूनही मेली रड आहेच का? बाळासाहेब पगार सारा आणून हातीं देतोनां? मीः—हो, देतो तर काय झालें? पण खर्चच जरा जास्त आहे. तीः—खर्च जास्त होईल तर काय झालें? मुलांच्या धोरणानेंच सारें नाचायचें; तिला

का कांहीं अक्कल आहे, का भलाई आहे, का आहे तरी काय ? मला नव्हतें कधीं वाटलें ही आमची सूनबाई अशी कृत्त्या निघेल ह्मणून; तिला आतां आह्मी जड वाटूं लागलों हो!'

हे तिच्या तोंडचे शब्द ऐकतांच माझ्या ध्यानांत सर्व कांहीं चटकन् आलें. पुढें मी कांहीं बोलणार तों इतक्यांत तिचे डोळेसुद्धां पाण्यानें भरून आलेले दिसले. मला वाटलें सूनबाई कांहीं तरी इला वर्मी बोलली असेल खचित. ह्मणून तिची मी समजूत करणारा तों इतक्यांत ती डोळे पुशीत आणि सद्गदित अंतःकरणानें आपण होऊनच ह्मणाली! 'चलावें, आपण आपलीं वांईसच जाऊन राहूं. इथें नको मेलें हें मेलेलें अन्न खायाला. मला नाहीं सुनेच्या हाता-खालीं निर्माल्य होऊन राहणें आवडत. भीक पत्करली; पण ही नको सुनेच्या घरची दौलत.' या तिच्या उद्गारां-मुळें घरांत कोठें तरी कलहाग्नि धुमसत आहे असें मला कळून आलें. मीं माझ्यापरी तिची पुष्कळच समजूत केली, पण तेवढ्यानें तिचें कांहीं समाधान झालें नाहीं. ती ह्मणण्यासारखें कांहीं बोलली नाहीं. पण बायका मुक्या राहूनच आपलें मनोगत जास्त व्यक्त करीत असतात. तिचे त्या वेळचे ते डोळे आणि तिचा चेहरा पाहून मला वाटलें कीं, बोलून संपावयाचें नाहीं इतकें हिला दुःख झालें आहे. त्या दुःखाचा परिहार माझ्याहातून होईल या आशेनें ती आली, तेव्हां तिला निराश करणें बरें नव्हे असें माझ्या मनानें घेतलें.

घरांत सूनबाईचा चढेलपणा फाजील झाला ही गोष्ट मला माहीत नव्हती. मला आपणाविषयीं कांहीं तरी तिनें सांगितलें एवढें सुनेस कळलें, तेव्हां माझ्या कानीं आल्या त्या कागाळ्या खोट्या असें दाखविण्याची खटपट सूनबाई करूं लागली. तें मी चटकन् ओळखिलें. मुलाच्या वृत्तींत कांहीं मला फारसा बदल आढळला नाहीं. सूनबाईही मोठ्या आदबीनें आणि आदरपूर्वक माझ्याशीं वागत असे त्यामुळें तिच्याविषयीं माझ्या मनांत कांहींएक आलेलें नव्हतें. पण रोजच्यारोज, आज सून असें बोलली, आज तिनें असें ह्मटलें, ती अमुक करिते इत्यादि प्रकारच्या खंडोगणती कांगाळ्या ती मला सांगूं लागली. चुगलीच ती ह्मणावयाची. चुगलखोराला शासन कोणतें तर, ऐकणाराचे कान कापावे, या न्यायानें पाहतां मीं तिच्या त्या कांगाळ्याच ऐकावयास नको होत्या, आणि त्याप्रमाणें बरेच दिवसपर्यंत त्या कांगाळ्या नुसतें हूं-हूं ह्मणत मी ऐकत होतों, याच्यापलीकडे मीं कधीं कांहीं केलें नाहीं. पण माझें मन मात्र संशयित होऊं लागलें, आणि यांत खरें कितपत आहे याचा शोध लावण्याचें मीं चालविलें. सुना ह्मणजे दुसऱ्याच्या घरच्या मुली. लेक किंवा लेंकी यांना आईबापांची कींव येईल किंवा अगत्य वाटेल तितकें सुनांस वाटावयाचें नाहीं. शक्य नव्हत त्या गोष्टींची अपेक्षा करणें, हाच आधीं मूर्खपणा आहे. सुनांना सासूसासऱ्यांचें अगत्य नवऱ्यामुळें, ही गोष्ट खरी. त्यांना स्वार्थबुद्धि पराकाष्ठेची सुटली, ह्मणजे सासूसासऱ्यांचा 'खर्च' वाटावा यांत नवल नाहीं. पण सुनेची सासूसासऱ्यांपुढें काय सत्ता हा

विचार मनांत आणला ह्मणजे त्यांच्या मूर्खपणाचें किंवा स्वार्थबुद्धीचें महत्वच मानावयास नको. पण इतका विचार सुचतो आहे आधीं कशाला? आणि सुचला तर टिकणार किती वेळ? मानापमानाचा प्रश्न प्राणापेक्षां जास्त महत्वाचा वाटतो. अब्रू प्राणापेक्षां प्यार, त्याचप्रमाणें अपमानापेक्षां उपासमार पत्करते, ह्मणून आह्मांला सुखा-समाधानांत आयतें आणि चमचमीत बिन काळजीचें जेवायास मिळत असे, आणि मुलगा कर्ता होऊन प्रपंच-भार संभाळूं लागला ह्मणून फुशारकी वाटत असे, त्याचें सुख आतां डळमळूं लागलें. बायको मला रोज ज्या तकरारी सांगत असे त्यांचें प्रत्यंतर कधीं कोठें मला स्वतःला आढळलें नाहीं, त्यामुळें वाटे काय कीं बायकांच्या या कांहीं तरी कोरड्या तकरारी आहेत, त्या आधीं आपण ऐकूंच नयेत ही उत्तम गोष्ट; आणि ऐकल्या तर मनावर घेतां कामा नये हें त्यापेक्षांही उत्तम. घरांत एक दोन चाकरमाणसें ठेवलीं त्यामुळें तिला घरांतलें काम फारसें पडत नाहीं, यामुळें आयती फुरसत मिळूं लागली, ह्मणून तिला या तकरारी आठवूं लागल्या असेंही एकवार वाटे. रिकामपणासारखा मनुष्याचा दुष्ट वैरी कोणी नाहीं. रिकामपणामुळें मनुष्याच्या हातून अनेक अनर्थ घडत असतात. भरपूर काम अंगावर असलें ह्मणजे माणसाला सज्जनपणानें वागावयास मिळतें; आणि त्याच्या अंगावर षड्रिपु सहसा चाल करून जात नाहींत. या जगांतील अनेक अनर्थ या रिकाम्या आणि निरुद्योगी माणसांकडूनच ओढवले जातात ही माझी ठाम समजूत. त्यामुळें तिच्या

त्या तकरारी मला आधीं भरंवशालायक वाटतना. पण मग दुसराही एक असा विचार सुचे कीं, ही आपल्या लेकापुढें मलासुद्धां तुच्छ मानीत असे, आणि लेकाच्या गौरवांत तिला मज म्हाताऱ्याच्या शुश्रूषेचीही शुद्ध नव्हती अशी माझी तकरार असतां तीच आतां त्या मुलावरसुद्धां रागावली, त्याचें नांव काढीत नाहीं, त्याला कंटाळली, त्याच्या वैभवाचें तिला कांहींएक वाटेनासें झालें हें कांहीं उगीचच्याउगीच नसेल. सुनेच्या तकरारी तिनें सांगितल्या, तेवढ्यांवर माझ्या मनाची खात्री होत नाहीं या समजुतीनें ती मुलाविरुद्धही कांगाव्या सांगूं लागली. माझ्या देखत सूनबाई माडीवर जाऊन नवऱ्याशीं बोलत बसते, मोठमोठ्यानें हंसते, खिदळते, ही का रीत कीं काय? मला ताडताड बोलते, तोऱ्यानें माझ्याशीं वागते, घरची जशी काय मी बटीक असा सगळा तिचा रोख. या व असल्या तिच्या तकरारी येत त्या मीं निमूटपणें ऐकिल्या. स्वतःवर बेतल्याखेरीज दुसऱ्यास होत असलेल्या अपमानादिकांचें दुःख कळावें तसें कळत नाहीं. 'जाऊं दे ग क्षुल्लक गोष्टी! त्यांचें काय तूं इतकें घेऊन बसलीस? पोरें आपलींच आहेत. त्यांच्या चुका, अपराध हे आम्हीं वडिलांनीं पोटांत घालूं नये तर मग घालावे कोणीं? तूं असल्या लहानसहान गोष्टींकडे लक्ष देऊन स्वतःला मात्र दुःखीकष्टी करून घेतेस; दुसरें तिसरें कांहीं एक नाहीं. त्या क्षुल्लक गोष्टी. तिकडे आपल लक्षच देऊं नये. मग 'आपलें' हें नातें म्हणजे एक परीस आहे. लोखंडाचें सोनें होतें तसें 'आपलें' या नात्यामुळें दोषदेखील गुण

वाटूं लागतात. ईश्वराची कृपा कीं मुलगा कर्ता होऊन आपला संसार संभाळतो आहे. आपल्याला आतां करायचं आहे काय? हरिहरि ह्मणत आयुष्याचे दिवस मोजीत बसावें, आणि त्या जगच्चालकाची सेवा करण्यांत आपला काळ घालवावा, तें सोडून—तिनें अस्सेंच केलें, तो तस्सेंच बोलला, असल्या रडकथा काय गात बसलीस? वेडी नाहीं तर,' इत्यादि माझा उपदेश तिला रुचला नाहीं. 'काल रात्रीं बाळ्या किनई अंगरखा घालूनच जेवायला बसला, पाय धुतके नाहींत, का संध्येचीं आचमनेंदेखील टाकिलीं नाहींत, मीं ह्मटलें, बाळा, हेंरे काय? तर त्याला तो ह्मणे कसा—'आई, अग अशा तुमच्या या सोवळ्याखालीं तर एवढा आमचा हा देश बुडाला, आणि ती पेशवाई गेली.' मी बाळ्याला सांगतें 'अंगरखा काढ आणि पाय धू' ह्मणून, तों इतक्यांत सूनबाईनें त्याला हंसतहंसत वाढायला सुरुवात केली. चित्रावती नाहींत अन् कांहीं नाहीं! मेलें शूद्रासारखें लगेच बाळ्या जेवूंही लागला, आणि दोघेंही माझ्याकडे बघून मेलीं हंसायला लागलीं, जशी काय मी आपली एक वेडीच, आणि घरांत कोणीच नव्हें. मग मीं रात्रीं फराळ केला नाहीं न कांहीं नाही, तशीच जाऊन निजलें. सोंवळें नाहीं, ओंवळें नाहीं, वडील नाहीं, धारें नाहीं, कांहीं एक नाहीं, अशा घरीं पाणी तरी प्यावें का? तो विष्ण्या दादापेक्षां एक कडी जास्त. तो मेला देवाची थट्टा नि धर्माची चेष्टाच करीत बसतो. ह्मणतो काय? मी शाळेंत त्या भिस्त्याच्या हातचें पाणीं प्यालों. काय मेलीं हीं पोरें, का आहे तरी काय? काल सकाळीं उठला आणि 'खि-

स्त माझा तारणार' ह्मणूनच गाऊं लागला. दादा हे असे, आणि अजून धाकट्यांच्या कशास कांहीं ठिकाण नाहीं तोंच त्यांचे हे चाळे. आणखी सांगूं का? बाळ्या नाहीं हो आपलें नांव ठेवावयाचा! काय ह्मणे—लोकांच्या बायका अज्ञान आहेत, मूर्ख आहेत—त्यांना शहाण्या केल्या पाहिजेत, त्यांना शिकविलें पाहिजे. लोकांच्या बायकांची याला हवी आहे कशाला उठाठेव?' तें बरें कां दिसतें? परवां त्याचे तिघे चौघे सोबती वर बसले होते खिदळत आणि बोलत. काय? तर आमचा हा स्त्रीवर्ग—'आमचा' 'आमचा' ह्मणत हो—आधीं सुधारला पाहिजे. त्यांची ती लाज नाहींशी करायाला हवी, आणि त्यांनीं पुरुषांत यायला लाजतां कामा नये, न काय काय मेले बोलत होते; आणि तितक्या मंडळींत ही सूनबाई मध्यें मध्यें लुडबडायला गेली, हें बरें का आपल्याला वाटतें? कां, हें सर्व आपल्याला पसंत आहे? गांवांतल्या बायकांची यांना कांहीं उठाठेव? काय ह्मणे, आमच्या बायका—आमच्या बायका—निर्लज्ज कोठले. लोक थुंकतील तोंडावर अशा गुणांनीं, मी सांगून ठेवतें.' असें कांहीं तरी तिनें रोज माझ्यापाशीं सांगत असावें. तिची नित्य एकेक नवी तकरार ठेवलेली. तेव्हां हा एक माझ्यामागें हृद्रोगच लागल्यासारखा झाला. माझी मात्र स्वतः कांहीं तकरार नसे. बाळ्याचा पगार महिन्याच्या महिन्यास माझ्या हातीं येई आणि खर्च माझ्या हातूनच चालला होता. पण, 'जा रे ग्यानू, त्या बाबांना दुकानदाराचे इतके पैसे द्यायला सांग' असे निरोप, आणि अधेली मागून आण, 'रुपाया हवा ह्मणून सांग' असल्या माग-

ण्या रोज वाढूं लागल्या, त्या इतक्या कीं पगार झाल्याला पंधरावीस दिवस झाले कीं बटवींत एक शिवराई शिल्लक राहावयाचा नाहीं! पुस्तकें, लांकडी खुर्च्या, टेबलें, कांचेचीं भांडीं इत्यादि सामान लागलें घरांत भरायाला. तें कांहीं मला खपेना. वर्गण्यांखालीं पुष्कळ पैसे खर्चेत, पण वैदिक ब्राह्मण, देऊळ किंवा तसें दुसरें कांहीं इकडे कांहीं नाहीं. हा समाज, आणि ती सभा, इकडेच सर्व; तें मला आवडत नसे. पण मी ह्मणें ज्याचा तो मिळविता आहे, करीना खर्च? पण पुनः वाटे हे याचे असे खर्च चालले तर घरांत शिल्लक कशी राहावी? साऱ्या वर्षांत आह्मांला कधीं लागली नाहीं इतकी साखर यांना रोज लागते, चहा–चहा–एकसारखा चाललेला. दूध आह्मी महिन्याला घेत होतों तितकें रोज आतां लागूं लागलें; हे प्रकार मला खपत नसत. माझा जीव कावराबावरा होई. बरें सून तरी हात राखून खर्च करील, व नवऱ्याला कांहीं सांगेल ह्मणावें तर तेंही नाहीं. तिला वेणीफणीला खोबऱ्याचें तेल चालेनासें झालें. कसलेंसें सुवासाचें तेल ती आणवी. खोबऱ्याचें तेल पांच पैशाचें पुरे असे, तेथें ती महिन्याला दोन रुपयांची बाटली आणवी. नवऱ्याच्यामागें लागून कांहीं दागदागिने ही करवील ह्मटलें तर हिला दागिन्यांचा कंटाळा. असे अनेक प्रकार घरांत चाललेले. डोळ्यावर कातडें ओढून मी आपला स्वस्थ बसत असें. मी ह्मणें, नवी विटी आणि नवें राज्य, त्यांत आपल्याला काय कळतें? संध्याकाळीं मी देवदर्शनाला जाई, त्या वेळीं सूनबाई गाडींत बसून नवऱ्याच्या कचेरीकडे जावयास लागली, हें मला पांहल्यानें कळलें,

तेव्हां थोडें वाईट वाटलें. वाईट वाटलें याचें कारण आमची आतां भीड मुरवत यांना राहिली नाहीं, आह्मांला तसले प्रकार खपणार नाहींत, याची धास्ती त्यांना आतां उरली नाहीं, आणि आमचा राग ह्मणजे कांहींच नव्हे असें त्यांना आतां वाटावयास लागलें हें होय. बाकी तरुणपणा आहे, ईश्वरानें अनुकूळता दिली, आणि नवराबायको आनंदानें व प्रेमानें वागतात, विलास करण्याचें वय व साधन आहे, तर त्यांनीं कां करूं नये? हे विचार मनांत येऊन मला किंचित बरेंही वाटे. पण त्यांत आमचा उपमर्द होतो आणि शिवाय लोकरीतीविरुद्ध, या गोष्टीमुळें त्यांचें करणें मला पसंत वाटेना. मी देवदर्शनाहून आलों त्यासरशीं मजकडे येऊन एक दिवस मला ती ह्मणाली—'पाहिलं, सूनबाई गाडींत बसून एकटी कचेरीकडे गेली! मला कुठें जाणार हें तिनें सांगितलेंसुद्धां नाहीं बरें' मी तिचें बोलणें ऐकून थोडासा आणि सहज हंसलों, त्यासरशी ती रागावली आणि ह्मणाली, 'ही अशी आपलीच फूस आहे. राघूनें ह्मटलें होतें, तुह्मी एकट्या गाडींतून कचेरीकडे येणार, पण आईसाहेब रागावतील, तेव्हां तुमची सूनबाई ह्मणाली, 'होय रागावताहेत. रागावयाला त्यांचें काय जातें? आह्मांला त्याच पोसताहेत कीं नाहीं?' असें ह्मणाली बरें' हें तिचें बोलणें मी मुकाट्यानें ऐकून घेतलें. रात्रभर मला कांहीं चैन पडलें नाहीं. मुलाच्या संसारांत मला सुख वाटत होतें तेथें दुःख वाटावयास आतां प्रारंभ झाला. आयतें बसून आणि चमचमीत खावयाला मिळतें, कसली काळजी नाहीं, आणि दगदग नाहीं, सुखानें राहावयाचें, पण तेथें आमची सम-

जूत, चालरीत, मानअपमान आणि संवय यांनीं माझ्यावर आतां शस्त्र धरिलें! एकदां एखादा माणूस मनांतून उतरला ह्मणजे त्याच्या चांगुलपणालाही वाईटपणाचें रूप येतें. माझा मुलगा आणि सून आजवर मला मोठ्या कौतुकाचें स्थान वाटत असे; पण तो मनोधर्म बदलूं लागला. माझ्या सुखाच्या आड मीच येऊं लागलों. त्यांचीं कैक भाषणें सहज असत, तीं कधीं माझ्या ध्यानांतसुद्धां राहत नव्हतीं. तींच आतां घेऊन मी घोळीत बसूं लागलों. मी इतका विचारी, पण माझी ही दशा; मग तिचें काय विचारावें? एके दिवशीं सकाळच्या प्रहरीं मी बसलों होतों तेथें ती आली आणि ह्मणाली, 'वाईला जायचं लौकरच करा बरें.' इतकेंच ती बोलली तों टपटप टिपें तिच्या डोळ्यांतून गळूं लागलीं. पुढें ती एक शब्दही बोलली नाहीं, डोळे पुशीत ती तशीच आंत निघून गेली. तिचा तो त्या वेळचा चेहरा आणि तें रडें पाहून मी अगदीं गहिवरलों. तिच्या दुःखाचें कारण काय हें तिनें मला सांगितलें नाहीं. पण तिला रडूं कोसळलें तेव्हां तिला खरोखरच असह्य दुःख झालें असेल यांत संशय नाहीं, अशी माझी खात्री झाली. गरीबींत इतके दिवस मीं काढिले, इतके हाल सोसले, पण एक दिवस सुद्धां डोळ्यांतून आंसवें ढाळतांनां मीं तिला पाहिलें नव्हतें. ती मोठ्या धीराची ह्मणून मला अभिमान होता. ती कशाला डगमगणारी नव्हे असा माझा अनुभव. सदा संतुष्ट वृत्ति आणि हांसत मुख तिचें असावयाचें; आणि आतांच हें तिला कसलें दुःख झालें मला कळेना. तिचें रडें पाहून माझें काळीज कसें खळबळून गेलें. तिच्या त्या

स्थितीचें मला फारच वाईट वाटलें आणि माझा संताप एकदम खडबडून जागा झाला. मनाला वाईट वाटून संताप येई तो मोठा विलक्षण. श्रीकृष्णाची भगिनी द्रौपदी हिची विटंबना कौरवसभेंत तिच्या पतींसमक्ष झाली ती पांडवांनीं कशी बरें सहन केली असेल? हा विचार माझ्या डोळ्यापुढें उभा राहिला. पण त्या विचाराच्या योगानें माझा संताप कांहीं कमी झाली नाहीं. सून आणि लेक यांच्यासाठीं आह्मीं किती कष्ट सोसले हें सर्व आठवून माझा संताप जास्तच भडकूं लागला. मी संतापलों हें माझ्या बायकोनें पाहिलें, तेव्हां ती बिचारी घाबरून गेली. तिचें दु:ख कोणीकडच्या कोणीकडे पळालें. ती येऊन माझें सांत्वन करूं लागली. त्यांत काय आहे. आपलीं लेंकरें तीं, त्यांचें कशाला इतकें मनावर घ्यावयाला हवें? अशी माझी समजूत ती करूं लागली. तिची ही स्थिती पाहून मला हंसूं आलें. मी हंसलों हें पाहतांच तिला आनंद झाला. तिच्या दु:खामुळें मी संतापलों, आणि माझाच संताप घालविण्यासाठीं ती माझें समाधान करिते, काय चमत्कार? असें वाटून मला हंसूं आलें. पण या गोष्टीवरून माझी अशी खात्री झाली कीं प्रपंचांत बायको ह्मणजे खरें खरें सुख आहे. तिचा एकेक गुण अगदीं असा बिनमोल. स्वत:चा मानापमान, किंवा आपल्या जिवाचें जलाल दु:ख अगर आपली कसलीही गैरसोय, इत्यादिकांची पर्वा पतीच्या सुखापुढें बिलकुल करायची नाहीं अशी समजूत बायकांत आहे, हें प्रत्यक्ष उदाहरणानें आपण पाहूं लागलों ह्मणजे त्या वेळेच्या समाधानाला पारावार नसतो! या प्रपंचांतील असंख्यात

काळज्या आणि त्रास, दगदगी व संकटें यांना साफ धुवून काढणाऱ्या पाण्याचे झरे ब्रह्मदेवानें स्त्रियांत ठेवून दिले आहेत यांत बिलकुल संशय नाहीं. सुखासमाधानांत मी काळक्रमणा करीत आहें त्यांत आपल्यामुळें बिघाड येणार हा विचार माझ्या बायकोच्या मनांत प्रथमच आला होता, पण तिचें दुःख तिला सहन होईना म्हणून माझ्यापुढें तिनें तें सांगितलें. परंतु त्यामुळें मला त्रास झाला हें पाहतांच माझें दुःख मी आपलीं मुकाट्यानें गिळतें कशी—असा तिनें वर्तनक्रम ठेविला. दुसरे दोघे धाकटे मुलगे विष्णु व गोपाळ हे शाळेंत अभ्यास करीत. पण त्यांचा ओढा आम्हांकडचा सुटून वडील मुलाकडे लागला; आणि तें साहजिक होतें. आमचें कांहीं काम हीं दोन मुलें ऐकेनात. तीं ह्मणत आमच्या अभ्यासाची खोटी होईल. पुस्तकें घेऊन देणें, कपडेलत्ते, इत्यादि सर्व त्यांचा दादा पहात असे. त्यामुळें आह्मांला तीं फारसा आणि कोणताच त्रास देत नसत. सूनबाईही त्या मुलांना चांगलें वागवीत होती, कां तर तीं दोन्हीं मुलें माझ्याशीं किंवा तिच्याशीं फारसा लळा ठेवीत नव्हतीं. त्यामुळें मला वाटे आह्मी उभयतां आतां मोकळीं झालों. यात्रा करण्यांत कालक्षेप करावा, आणि देवदेव करीत बसावें, हेंच आतां नीट आहे; आणि मुलांपासून चार पावलें दूर राहावें यांत आपला आब राहून मुलाला व सुनेलाही खरा मोकळेपणा वाटेल. वडील मुलगी आवडी, तिला एकदां चार दिवस माहेरीं आणवावें, ह्मणजे भावाचें वैभव पाहून ती खुशालेल, आणि सुनेला व मुलांला चार गोष्टीही समजावून सांगेल. आह्मांला पु-

सकळ गोष्टी बोलतां येत नाहींत, त्या आवडी बोलेल. तिलाही आवडी आली ह्मणजे थोडी तरी करमणूक होईल. मग चार दोन महिन्यांनीं आपण वांईस जाऊन चार दिवस राहावें, आणि मग काशीयात्रेला जाऊन गंगाबाईचें स्नान आणि विश्वेश्वराचें दर्शन करीत स्वस्थ राहावें असा विचार मीं ठरविला. आवडीला माहेरीं आणविणार हें तिला कळतांच तिला मोठें समाधान वाटलें. आपली आवडी येणार तेव्हां तिला घरांत काय चाललें आहे हें कळूं नये, त्याबद्दल तिला वाईट वाटूं नये, आणि देवानें दाखविलेले सोन्याचे दिवस पाहून आवडीला आनंद वाटावा ह्मणून ती लेकाशीं आणि सुनेशीं जरा जास्त सलोख्यानें वागूं लागली हें माझ्या दृष्टोत्पत्तीस आलें. जगांत एकंदरीनें पाहतां स्वार्थपरायणतेशिवाय दुसरें कांहीं एक नाहीं हेंच खरें; आणि आपलें नेहमींचें आहे तें लपवून दुसरें चांगलें दिसेल तेवढेंच लोकांस दाखविण्याचा प्रयत्न याच्याशिवाय दुसरी कसलीच धडपड नसते. आपली श्रीमंती दाखवावी, आपले सद्गुण दाखवावे, आपली भलाई दाखवावी, आपला शहाणपणा मिरवावा, आपण दुःखी असलों तरी सुखी असें दाखवावें, आपण कंजूष असलों तरी उदारपणाचा लोकांना भ्रम पाडावा, आनंदी नसलों तरी आनंदी असें दाखवावें, असें सर्वत्र वस्तुस्थितीच्या विपरीत लोकांना दाखविण्याचा प्रयत्न मनुष्य कां करीत असतो कळत नाहीं. मला तर या गोष्टींची मोठी चीड आहे. आपण सचिंत अंतःकरणानें असावें, आणि कोणी भेटला कीं हास्यमुख करून जसें काय आपण मोठे आनंदांत आहों असें

त्यांच्यापुढें मिरवावयाचें, या अशा खोट्या व्यवहारांत लभ्यांश तरी कोणता हें कांहीं मला कळेना. पण अशी जनरीत आहे खरी. लेंकीला आपल्या घरची सुखावह स्थिति कशी आहे हें दाखविण्याच्या तयारीला ती लागली, त्यामुळें घरांतल्या तिच्या बऱ्याच तकरारी मिटल्या हें त्यांतल्यात्यांत बरें असें माझ्या निदर्शनास आलें. पण खरें फार दिवस लपून राहत नाहीं. खोट्याचें सोंग तत्काळ उघडें पडतें, हा अनुभव मनुष्यमात्राला पदोपदीं येत आहे. तरी भास लोकांपुढें मांडण्याची प्रवृत्ति कमी होत नाहीं, ही गोष्ट मात्र खरी. आवडी माहेरीं येऊन आठदहा दिवस होतात न होतात तों हीच आपण होऊन आपलें रडगाणें तिच्यापुढें सांगत बसेल ही माझी खात्री होती; पण अगोदर भास उठवून देण्याच्या तयारींत कमतरता पडावयाची नाहीं, यांत मात्र शंका नव्हती. आवडी आली ह्मणजे माझ्यापुढें आपलें गाणें गावयाला ती यावयाची नाहीं. आवडीजवळच सर्व कर्मकथा सांगत बसेल, ह्मणजे अनायासें माझ्या मागची तिची पिरपिर संपेल आणि मी थोडा तरी सुखानें राहीन अशी माझी समजूत. तिची कर्म-कथा ऐकावयाला कोणी नाहीं त्यामुळें सगळा भार माझ्या वरच पडतो तो कमी होईल, अर्थात निमा अधिक त्रास माझ्या मागचा चुकेल असें मला वाटे. सासरच्या अडच-णीमुळें बगडीच्या लग्नाला आवडीला येतां आलें नाहीं, तेव्हां तिच्या सासरचें कौतुक आवडीपुढें गात बसण्यांत माझ्या बायकोचा वेळ जाईल, त्यामुळें मुकाबद्दलच्या आणि सुनेबद्दलच्या कुरकुरी फारशा माजणार नाहींत यांत कांहीं

संशय नाहीं. तेव्हां सुखासमाधानाच्या काळांत जें मध्येंच असें विरजण पडतें तें टाळण्याला हा मार्ग बरा आहे, असा मीं विचार केला, आणि आवडीला आणण्यासंबंधानें मीं स्वतःच मुलाजवळ गोष्ट काढिली. त्यानें मोठ्या आनंदानें आणवा असें ह्मटलें. फार दिवस झाले ती भेटली नाहीं, वगैरे बोलून 'पण तिच्या सासरचीं माणसें महा मूर्ख आहेत, तीं ऐकावयाचीं नाहींत,' असें मुलगा ह्मणाला. मुलाचे हे शब्द मला आवडले नाहींत. मी ते ऐकून चरकलोंच. कारण ते मूर्ख का शहाणे हें यानें कधीं पाहिलें होतें, आणि पाहण्याचा याला प्रसंग कोणता आला होता? बरें, असतील मूर्ख; ह्मणून तसें ह्मणण्याचा याला काय अधिकार? असा माझ्या मनानें मला प्रश्न केला. लोक मूर्ख, ह्मातारीं माणसें गाढव, देव खोटे, धर्म निरुपयोगी, अशीं कांहीं तरी विधानें तो भराभर ठोकीत असे ह्मणून ती मला कधींपासून सांगत होती, त्यामुळें ब्याह्यांना असें चटकन कांहीं तरी हा बोलला याचें मला आश्चर्य वाटेना. पण मुलांत मनस्वी उद्दामपणा आला आहे, आणि अर्ध्या हळकुंडानें तो पिवळा झाला आहे, याचें मला फार वाईट वाटलें. मर्यादा आणि नम्रता या दोन्ही गोष्टींचा गंध या इंग्रजी शिकलेल्या माणसांत नसतो, असें बाळ्या आणि त्याचे दुसरे सोबती यांना पाहून मला वाटूं लागलें. जुनीं मराठी माणसें ह्मणजे जनावरें असें देखील एके दिवशीं बाळ्या आपल्या सोबत्यांजवळ बोलला होता तें मीं ऐकलें होतें. तें त्याचें बोलणें मला अनुलक्षून नव्हतें, यांत शंका नाहीं. परंतु त्या बोलण्याचा मला राग येईल किंवा

तें मी आपल्यास लावून घेऊन त्याला रागें भरेन याची त्याला शुद्ध नव्हती. असो. सांगण्याचें तात्पर्य—त्याचे शब्द मुकाट्यानें गिळून आवडीला माहेरीं आणवावें असें मीं ठरविलें, आणि त्याप्रमाणें नाशिकाला कोणी तरी पाठवावें अशा योजनेंत मी होतों. तिसरे प्रहरीं वामकुक्षी करून मी उठतों इतक्यांत एक मुलगा धांवत धांवत आला आणि ह्मणाला ‘ अप्पा, तुमच्या बोडसानें कीं नाहीं बघा आज त्या पाद्री साहेबाजवळचीं बिस्कुटें खाल्लीं !’ मीं ह्मटलें—कोणीं ? तो—अहो तुमच्या बोडसानें. मी—बोडस कोण ? तो—अहो तुमचा तो—व्ही. टी. बोडस. मी—ह्मणजे कोण ? तो—अहो तुमचा मुलगा तो. मी—विष्णूनें ? तो—हो हो विष्णूनें, बोडसानें—असें ह्मणून तो निघून गेला. मीं ह्मटलें भिस्कुटें तीं काय ? आणि पाद्र्याकडचीं हा खावयाला गेला कशाला ? शाळेंत काय शिकतात, का हे खातच बसतात ? असा माझा विचार चालला. मुलांवरील आपला ताबा ढिला होत चालला ह्मणजे मग मुलांस बुद्धिवाद सांगायला जाणें, ह्मणजे त्यांत अपमानाखेरीज कांहीं एक साधत नाहीं; यास्तव आपण मुकाट्यानें बसावें हें बरें. पुष्कळसा पैसा ज्यानें सांठवून ठेविला नाहीं किंवा जो स्वतः प्रपंच चालवीत नाहीं अशा बापाचें मुलें कधीं कांहीं ऐकत नसतात. ह्मणजे, या जगांतला सर्व व्यवहार पैशाच्या जोरावरच चाललेला असतो; बायका नवऱ्याचें, मुलें वडिलाचें, बहिणी भावाचें, ऐकतात किंवा त्यांच्या बोलण्याला मान देतात केव्हां ?—तर त्यांच्याजवळ पैसा असेल तेव्हां. एरवीं कोणी कोणाला विचारीत नाहीं. अनुभव, शहाणप-

णा आणि चतुराई किंवा सज्जनता यांतील कशाचीही मातब्बरी पैशापुढें नाहीं. मनुष्याजवळ पैसा नाहीं ह्मणजे तो आधीं माणूसच नव्हे, येथून तयारी; असा अनुभव आपण हरहमेश पाहतों. यास्तव आपण कोणाला उपदेश करण्याच्या किंवा कांहीं सांगण्याच्या भानगडींत पडूं नये, ज्याचें जसें कर्म तसें घडून येतें, आपण कां व्यर्थ धडपड करा, हा विचार माझा कायम झाला. पण अशा विचारानें समाधान किंवा शांति होणार आहे थोडीच. जीव पुष्कळ त्रासला. आणि मीं आपल्या मनाशींच ह्मटलें 'त्रिंबकभटजी, आतां पुरे झाला प्रपंच. दारिद्र्य मागें होतें तें फिटलें. मुलगा कर्ता झाला. नांवलौकिकही त्याचा होत आहे, तेव्हां एवढ्यावरच आतां कारभार आटोपता घ्या.' पण मरण का कधीं माणसाच्या स्वाधीनचें आहे? आणि तें बोलावलें ह्मणून का कधीं येत असतें? संन्यास घेऊन ही प्रपंचांतली उपाधी तोडावी ही माझी इच्छा; पण तिची कांहीं तरी सोय लाविली पाहिजे. मुलाचें आणि तिचें किंवा सुनेचे आणि तिचें पटते ह्मणजे बरें झालें असतें. पण तो प्रकार कसा होता हें मला नुकतेंच कळूं लागलें होतें. तथापि या प्रपंचांतल्या लाथाळ्यापेक्षां निरामय वनवास पत्करला, या माणसांच्या सहवासापेक्षां झाडेंझुडपें आणि पशूपक्षी यांची सोबत बरी, असा माझा ग्रह होत चालला, आणि त्या तयारीस मी लागलोंच ह्मणावयाचा. बेत बसविण्याला मीं प्रारंभ केला, पण तो सिद्धीस जाणें माझ्या हातचें काम नव्हतें. 'मनसा चिंतयेत् कार्यं विधिरन्यद्विचिंतयेत्' हा नियम माझ्या डोळ्यांपुढें उभा राही. अशा एका प्रकारच्या

विवंचनेंत मी आहें तों इतक्यांत ती आंतून मजकडे जरा साचिंत मुद्रेनें येऊन ह्मणाली, 'नाशकाहून कांहीं पत्र वगैरे आलें आहे कां ? तिकडे मनस्वी वाखा उठला आहे ह्मणतात. त्या गंगूबाईची नणंद आली, ती ह्मणत होती, नाशकाला मोठा कहर उसळला आहे. पत्र नसलें आलें तर लिहावें तरी त्यांना एक.' मींही देवळांत काल तसें कांहीं ऐकिलें होतें. मुलगी, जांवई, व्याही, नाशकास असल्यामुळें आह्मांला काळजी वाटणें साहजिक होतें. पण काळजी करून होणार काय ? 'होष्यमाण' कधीं कांहीं चुकणारें नाहीं. काळजी करा, किंवा न करा व्हावयाचें तें होतच असतें, आणि न व्हावयाचें तें घडून येतच नाहीं. परंतु काळजीनें चूर मात्र होण्यांत कधीं कमतरता नसते. पुढें अमुक होईल आणि तमुक होईल याची फाजील काळजी करण्यासारखा दुसरा मूर्खपणा नाहीं. ईश्वरावर भार टाकून स्वस्थ राहावें हाच प्रापंचिकाचा खरा शहाणपणा. ईश्वरावर निष्ठा असली ह्मणजे काळजी फारसा त्रास देत नाहीं, इत्यादि विचार मी करीत आहें इतक्यांत मुलाकडून शिपाई कचेरींतून आला आणि त्यानें निरोप सांगितला कीं 'नाशकाला जाण्याची तयारी करा. ताईसायबाचे यजमान बेजार आहेत, अस मला कळवाया रावसायबानी सांगीतलय.' 'ह्मणजे ?' इतकाच माझ्या तोंडांतून उद्गार निघाला इतक्यांत मुलगाही लगेच आला. त्यानें सांगीतलें 'आवडीचा नवरा वाख्यानें आजारी आहे. तुह्मीं एकदम नाशकास जाण्याचें करावें.' झालें, माझी कंबर खचली. काय करावें हें सुचेना. मनांत शंभर तर्क यावया-

ला लागलें. वैरी चिंतणार नाहीं त्या गोष्टी चिंतून मन मोकळें होई. निरोप कळवून मुलगा माडीवर गेला. मी खालींच होतों. तिला हें वर्तमान कळलें. तीही घाबरून रडूं लागली. मीं ह्मटलें—अग अशी रडतेस कां? थांब वर्तमान काय तें पक्कें कळूं दे तर खरें. ईश्वराच्या कृपेनें सर्वांच्या खुशालीचें वर्तमान येईल. बाळ्याला हें कसें आणि कोठून कळलें हें मला विचारावयाचें होतें ह्मणून त्याला हांक मारून मीं विचारलें. त्यानें आपल्या स्नेह्याकडून पत्र आलें असें सांगितलें. माझी गडबड उडाली. नाशकाला गेलें पाहिजे, तेव्हां त्या तयारीस मी लागलों. तयारी कसची? कांहीं सुचेना आणि कांहीं आठवेना. एकदां आंत जावें, आंतून बाहेर यावें, माडीवर मुलांकडे जावें, तेथून खालीं यावें, असें कांहीं वेळ चाललें होतें. इतक्यांत तार घेऊन एक शिपाई आला. ती त्यानें मुलाला नेऊन दिली तारेंत काय आहे तें ऐकण्याला जीव उतावळा झाला, छाती धडधड उडूं लागली. उभें देखील राहवेना, ह्मणून मटकन खालीं बसलों. 'बाळा काय आहे तारेंत?' असें बसल्या बसल्याच खालून विचारलें. तो उत्तर देईना. तेव्हां मीं मनांत ह्मटलें कांहीं तरी घोटाळा आहे. पुन: मोठ्यानें विचारलें, त्याला नुसतें 'ओ' एवढेंच उत्तर आलें. त्याच्या त्या आवाजावरूनच वाटलें कीं, वर्तमान कांहीं चांगल्यांतलें नाहीं. ह्मणून स्वत: जाऊन त्याला विचारण्यासाठीं मी माडीवर जावयास निघालों. तों दारांतच मुलगा डोळ्यांतून अश्रु ढाळीत हातामध्यें तारेचा कागद घेऊन उभा होता. मला पाहतांच 'नाशकाला आतां कांहीं जाण्याचं कारण नाहीं, झालें, संपलें सर्व,' ह्मणून तो

सांगणार इतक्यांत त्याला दुसरा हुंदका आला. एखादी जलाल विषानें माखलेली तीक्ष्ण कट्यार मोठ्या जोरानें छातींत कोणीं खुपसावी, तसें दुःख मला झालें. तरी त्यांत-त्यात्यांत अवसान आणून मुलाला मीं विचारलें, 'आहे तरी काय त्या तारेंत?' मुलानें सांगितलें, 'ताईचा नवरा सकाळींच कैलासवासी झाला; आतां कांहीं अप्पाला पाठवूं नका. जास्त हकीकत मागाहून पत्रद्वारें.' माझ्या सोबत्याची तार आहे. हें ऐकतांच मोठ्यानें सुसकारा टाकून मी परत खालीं यावयास निघालों. तिला हें सर्व कळलें, आणि तिनें आंत रडण्याचा आकांत मांडला. हें वर्तमान आमच्या व्याह्यांस कळलें. ते आमच्या घरीं आले. मोरोबाला समजतांच तोही भेटावयास आला. आंत बायका जमूं लागल्या. जिकडे तिकडे आकांत झाला. नको ती कर्मकथा आतां सांगावयाला. एकंदरींत या जगामध्यें सुख ह्मणून जें आहे तें जवाएवढें, आणि दुःख मात्र डोंगराएवढें यांत कांहीं संशय नाहीं.

## प्रकरण ९ वें.

**'स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः।'**

संकटें स्वतःवर आलीं ह्मणजे मनुष्याला विचार सुचतात व वेदांत आठवतो. दुसऱ्याचें दुःख पाहून दुःखी होण्याला त्या दुःखाचा एकदां तरी स्वतः मारा सहन केलेला असायला पाहिजे; एरवीं 'परदुःखेन दुःखिता विरलाः' हेंच खरें. माझ्यावर हें प्रापंचिक दुःख कोसळलें.

माझ्या कन्येवर वैधव्यप्रसंग आला, या दुःखामुळें मी अत्यंत विव्हळ होई. त्या दुःखाची जखम असह्य होऊं लागली. ईश्वराला मी बोल लावूं लागलों. मनानें नाना प्रकारच्या कल्पना करीत मला भीति घातली; अब्रू, लौकिक, लोकापवाद हीं आतां कशीं धड राहतील, या एकाच भीतीचें प्राबल्य माझ्यावर सध्यां कोसळलेल्या दुःखांत होतें. मनुष्यमात्राच्या दुःखाचें खरें आणि एकच कारण 'स्व' ला धक्का; दुसरें तिसरें कांहींएक नाहीं; अशी माझी खात्री झाली. स्वतःच्या नुकसानीची बाब हेंच खरें दुःख. मरण असह्य दुःख कां, तर त्यांत स्वतःचें कांहीं तरी नुकसान असतें ह्मणून. 'मृतकरितां रडायचें नव्हे, तर विशेषतः त्याच्या मृत्यूमुळें झालेल्या किंवा होणाऱ्या स्वतःच्या हानीमुळें, अशी विचारपरंपरा मनांत घोळूं लागली, ह्मणजे 'दुःख' हें केवळ स्वार्थामुळें होतें, अशी बालंबाल खात्री पटल्याशिवाय राहत नाहीं. पण असल्या विचारांचा ताबा माझ्या मनावर टिकेना. मी भीतीनें भेदरणारा नव्हें, तरी दुःखानें होरपळून गेलों. माझ्या लाडक्या आणि सद्गुणी कन्येवर हा प्रसंग, आणि त्याचें निवारण करण्याचें सामर्थ्य माझ्या हातीं बिलकुल नाहीं, यामुळें मला संताप येई! अपत्यवात्सल्य हा मोठा नाजूक मनोधर्म आहे. त्याच्यावर ही जोरानें हाणलेली कुऱ्ह[illegible] माझा प्राण कासावीस करून सोडी. पण काळाचें व[illegible]य अजब असल्यामुळें असल्या दुःखाच्या वेदनाही हळूह[illegible] आणि आपोआप कमी होऊं लागल्या. घटका गेली, तास संपला, दिवस लोटला, आठवडा झाला, 'महिना सरत आला, तशा माझ्या शोका-

ग्नांच्या ज्वाळा आपोआप दबत चालल्या. मधून मधून शोकाग्नि भडके. पण लगेच तो शांत होई. पुढें पुढें त्या दुःखाची आठवणही बुजत चालली. आणि मग विचार सुचूं लागले कीं, या दुःखाचा बोल ईश्वराकडे काय आहे? आपण आपल्या हातानें परिपाठ पाडला, आणि बंधनें केलीं त्याचा परिणाम आपला आपणास भोगावयाला हवा. एकच स्थिति किंवा एकच गोष्ट सदा सारखी राहावी, हें या जगाच्या राहटींत शक्य नाहीं. ईश्वरी योजनेच्या तडाक्यांत सर्वांस सांपडलेंच पाहिजे. आपले पाय आपण बांधून घ्यावयाचे, आणि त्याचा बोल ईश्वरावर लादावयाचा, ही रीत कोठली? आणि आला प्रसंग तो काय रडल्यानें, हाय हाय आणि हुश्श हुश्श केल्यानें, टळावयाचा आहे थोडाच? असले लोकांना उपदेश करण्याच्या कामीं भराभर सुचणारे उपाय मला कमी आठवूं लागत. परोपदेशांतलें पांडित्य कोणीकडे पार निघून गेलें! निरुत्साही मन, वैतागलेली उमेद, आणि कंटाळलेली प्रपंचबुद्धि यांत बरेच दिवस गेले, तरी आशेच्या लगामांत मी सांपडलों होतों तो होतोंच. दुसरी कन्या, दुसरा मुलगा, वाढती श्रीमंती व वाढता लौकिक यांविषयींची माझी हपाप कांहीं कमी होईना. काय या मोहजालाचा प्रभाव? असें वारंवार वाटत असे. पण कृति काय? त्रिंबकभटजी! हा येथला कारभार असाच टाकून अगदीं खचित आज ना उद्यां तुह्मांला जावयाचें, असें माझें मन मला कधींच सांगत नसे. तो मेला, हा मरणार, हें मला कळे; पण मी मरणार या गोष्टीचें मला सदा विस्मरण. धर्मराजाला यक्षानें प्रश्न

केला कीं, या जगांत अतिशय मोठें असें आश्चर्य कोणतें? ह्या प्रश्नाला त्या अजातशत्रु धर्मराजानें उत्तर दिलें, 'लोक मरतात हें पाहत असून आपल्याला मरावयाचें आहे, ही गोष्ट मनुष्य विसरतो, यापेक्षां दुसरें आश्चर्य कोणतेंच नाहीं.' किती तरी खरी गोष्ट ही!

मुलगा कर्तासवरता झाला, प्रपंच त्याचा तो संभाळूं लागला, तेव्हां आपण आतां स्वस्थ हरि हरि करीत उरलेलें आयुष्य कंठावें हा विचार आधीं मला सुचेना, आणि सुचला तर टिकेना, अशी स्थिति झाली. माझा मुलगा प्रपंच संभाळूं लागला ह्मणजे मी असें करीन आणि तसें वागेन ह्मणून मी बेत करीत होतों त्याची आतां आठवणसुद्धां होईना. बाळ्यानें प्रपंच संभाळिला कीं ईश्वरभजनाशिवाय क्षण जाऊं द्यावयाचा नाहीं हा निर्धार मीं किती वेळां केला असेल. पण त्याची आठवण होते आहे कशाला? जग मिथ्या आणि हा प्रपंच नुसतें स्वप्न असें किती जणांस आणि केवढ्या आवेशानें मीं सांगितलें असेल; पण माझी कृति ही अशी प्रपंचलोभ्याची. तेव्हां मनाचा निर्धार केला कीं आतां आपण वांईस जाऊन ईश्वरभजनांत सर्व काळ घालवावयाचा. त्याप्रमाणें तयारीस लागलों. तिला हा बेत कळविला. तिचा रुकार कांहीं मिळेना. मुलीबद्दल इतकीं गाऱ्हाणीं ती सांगत असे; पण तिला ह्मटलें, चल आपण वांईस जाऊं, तर तिला तें आवडेना. ह्मणे मुलगा लहान. आणि हें अस्सें अन् तें तस्सें! तेव्हां आपण एकटेंच जावें असा मीं विचार केला. पण मुख्य अडचण माझ्या जेवणाची. स्वयंपाक

कोण करून घालील ही अडचण मोठी. तों इतक्यांत सास्वासुनांचें एके दिवशीं भांडण फारच विकोपाला गेलें, तेव्हां तिनेंच आतां येथें घटकाभर सुद्धां राहणें नको, वांईस चला, असा एकसारखा तगादा लाविला, आणि त्याप्रमाणें लगेच मग मुलाला विचारून व त्याच्याकडून खर्चावयास घेऊन आह्मी उभयतां वांईस राहण्याला गेलों. तेथें महिना पंधरा दिवस बरें वाटलें. प्रपंचाची काळजी नव्हती. ईश्वरसेवा ईश्वरसेवा ह्मणून धडपड चाललेली; पण मन प्रपंचांत. मुलांचें कौतुक गा, आणि त्यांचा लौकिक सांगत बसा, हें माझ्यानें होत नसे. तें ती करी. पण लोकांनीं माझ्या मुलांची धन्यता गाइलेली ऐकावी ही भारी हपाप मला सुटलेली. कोणीं मुलाची स्तुती केली व मला पुण्यवान ह्मटलें कीं मला आंतून आनंद होई, पण तो लपविण्यासाठीं—त्यांत काय आहे ? ईश्वराची दया—इत्यादि ओझरतें आणि ढोंगी भाषण माझ्या तोंडून निघत असे. लोकांना आपलें ऐश्वर्य दाखविण्यासाठीं जी हपाप सुटली होती तिच्या दहाव्या हिश्शानें ईश्वराराधनेकडे लक्ष नसे, याचें मला राहून राहून आश्चर्य वाटे. फुरसुतीच्या वेळीं स्वतःच्या स्वभावाचा मनुष्य आपल्याशींच विचार करूं लागला, ह्मणजे त्याच्या वर्तनक्रमांत चांगला फरक पडूं लागतो, हा माझा अनुभव होता; त्यामुळें आपली वृत्ति, राहणी, इत्यादिकांविषयीं पुष्कळ वेळां बारीक निरीक्षण करण्याचा माझा परिपाठ असे. कितीही केलें तरी मी माणूसच; त्यामुळें हातून अपराध घडण्याला कांहीं कमतरता होत नसे. प्रमाद घडला ह्मणजे मग क्षणभरानें वाईट

वाटून पुनः असें करावयाचें नाहीं हा मी निर्धार करीं. माझ्या घरच्या काहण्या लोकांपुढें सांगण्यांत मला कांहीं फायदा नाहीं, हें मला सुद्धां कळतें. परंतु अनुभवानें चांगले टक्केटोणपे खाऊन मला पुष्कळ गोष्टी कळून आल्या. परंतु त्याचा उपयोग होण्याला अवकाश उरला नाहीं किंवा तसले प्रसंग पुनश्च येण्याचा संभव कमी, यामुळें शिकलेली अक्कल माझ्याबरोबरच भस्म होऊन जाणें बरें नव्हे; एवढ्याचसाठीं गत गोष्टींची आठवण करीत बारीकसारीक कल्पना, विचार, व समजुती यांचें चऱ्हाट मी वळतों आहे. आपल्या गुणावगुणाचें आपण निरीक्षण करणें ही अतिमहत्वाची बाब आहे असें पक्कें समजावें हें माझें सर्वांस सांगणें आहे. अस्तु.

वांईस ईश्वरसेवेंत दिवस कंठावे ह्मणून पुण्याहून मी आलों खरा. पण माझें लक्ष प्रपंचांतील घाणींमध्यें लुडबुडावयाचें तें लुडबुडतच होतें. प्रपंचाची दगदग नाहीं ह्मणून रिकामें असलेलें मन लोकांच्या उठाठेवींकडे धांवावयास लागलें. मला सुख मिळतें, मी भाग्यवान, मी कर्ता, मी थोर, अशी लोकांनीं माझी कीर्ती गावी ही माझी धडपड एरवीं पाहतां कांहीं गैर नव्हे. परंतु त्या धडपडीमुळें लोकांच्या दोषांचीही उठाठेव करावयाला मी लागलों. अमक्याचा मुलगा असा, तमक्याची रीत तशी, तो असा वागतो आणि त्यानें ते तसें केलें या भानगडी मला कशाला हव्या? पण नाहीं. फडद्या आडच्या गोष्टीसुद्धां मी आपली मान उंच करकरून पहावयास लागलों. लोकांचे ऐकीव खरे खोटे दोष ऐकण्याची मला इच्छा व त्यांची चर्चा करून धिक्कार प्रद-

शित करण्याची घाई. आणि तीही कां? तर, इतरांपेक्षां आपणांत कांहीं तरी अधिक असें लोकांस दिसावें, आणि आपल्याला वाटावें ह्मणून. धिक्कार असो या असल्या छिद्रान्वेषी जिण्याला! शेजारी, पाजारी, आप्त, इष्ट किंवा स्वकीय मात्र जितके, त्यांच्या वैगुण्याकडे माझ्या मनाची धांव. त्यांच्या दोषाची व्यंगाची किंवा उणेपणाची चर्चा मोठ्या आढ्यतेनें करण्यांत आपली फुशारकी. कसला हा अधम स्वभाव आणि कोण ही नीचता? न कळत आणि हळूहळू माझ्या मनाचा ओढा अशा या अधम वृत्तीकडे धांवूं लागला. मी वारंवार ह्मणें, आपल्या शेजाऱ्यांच्या दोषांची कींव यावी, त्यांच्या व्यंगाचें वाईट वाटावें, तें एकीकडेच राहून माझा हा असा प्रकार कां? परक्यांच्या व्यंगानें हर्ष कां होतो? अपराध व अवगुण यांवर झांकण घालणें हा आपला धर्म. दुस्मानगिरी नसतां दुस्मानासारखें कां वागावें? रिकामपणा मिळाला किंवा चारचौघे जमले कीं चालू झाला हल्ला आपल्या ओळखीच्या व शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या अब्रूवर. ही संवय आंगवळणीं पडली कीं मग ती सुटणें कठिण. मला हा दोष असें वाटत असे, पण ती खोडच मला लागली. निंदा करीत बसल्याशिवाय मला चैन पडेनासें झालें. लोकांच्या व्यंगाची चर्चा ऐकावयाला मिळाली नाहीं कीं वाईट वाटूं लागे. लोकांच्या अवगुणांची खें खें खिदळत वाच्यता करावयास मिळाली नाहीं, ह्मणजे धन्यता वाटेना व सुख होईना असा प्रकार होऊं लागला. फुरसतीच्या वेळच्या गप्पा चारचौघे जमलेल्या वेळीं इकडल्या तिकडल्या गोष्टी, आणि

मोठ्या आनंदानें सांगावयाचें वर्तमान ह्मणजे शेजाऱ्यापाजाऱ्यांची निंदा, असें होऊन बसलें. या नीच वृत्तीला आळा राहीनासा झाला. पण माझे डोळे चटकन उघडण्यासारखा एक प्रसंग आला. त्या दिवसाची आठवण मला अद्याप आहे. त्या दिवशीं मला पश्चात्ताप झाला त्याचा मला अद्याप आनंद वाटतो. आमच्या शेजारीं एक बचंभट ह्मणून फारच गरीब ब्राह्मण राहत असे. बिचारा भारी गरीब आणि सात्विक ब्राह्मण, दारिद्र्यानें सारखा गांजलेला. त्याची थट्टा आह्मीं कधीं कोणीं केली नाहीं असा दिवस जात नसे. एके दिवशीं त्याला काय वाटलें कोण जाणे. मोठ्या पहांटेस तो माझ्याकडे आला. मीही नामस्मरणादि आटोपून प्रातःस्नानाच्या तयारींत होतों. नमस्कार चमत्कार संपतात न संपतात तोंच मीं मोठ्या आढ्यतेनें ह्मटलें, 'कां बचंभट आज प्रातःकाळींशी स्वारी इकडे आली?' त्यानें उत्तर केलें 'नाहीं, एरवींच.' मीः—'मग पाठवून द्यावयाचें ठरलें कां मुलीस सासरीं?' हा माझा प्रश्न ऐकतांच त्यानें तोंड वेडेंवांकडें केलें, आणि त्याचा कंठ एकाएकीं दाटून आला. त्याला कांहींएक बोलवेना. मीही जरा चपापलों आणि मनांत आलें कीं आपण बोललों तें याला लागलें कीं काय कोण जाणे. आणि विषय बदलावा ह्मणून मीं ह्मटलें, 'त्या नगरकरांच्या घरचें प्रयोजन उद्यां कीं परवां हो?' त्याला उत्तर 'मला माहीत नाहीं' एवढेंच बचंभटानें दिलें. आणखी दोन तीन प्रश्न मीं इकडले तिकडले केले, पण त्यांलाही तशींच उत्तरें. मीं पुनः ह्मटलें :—'बचंभट, कां, तुह्मांला वाईट कां वाटलें?

मला काय माहीत? मीं सहज विचारलें,' त्यावर बचंभट ह्मणाला 'नाहीं, अप्पा! आतां जगण्यांत कांहीं अर्थ नाहीं. येथें कोणी कोणाचा नाहीं बरें! शेजारी काय, पाजारी काय, आप्त काय, इष्ट काय, सारे चालत्या काळाचे. संकट पडलें, अडचण आली, प्रसंग गुदरला तर थट्टा करायला—टर उडवायला—सारे तयार. फाटूं लागलें तर सारे जण जास्त फाडणारे. टांका घालणारा कोणीही नाहीं. उघडें अंग करावयाला साऱ्यांना हवें. पांघरूण घालणारा कोणी नाहीं, अशा लोकांत राहण्यापेक्षां जंगलांत फत्तर होऊन पडलेलें बरें.' हें त्याचें बोलणें मला अगदीं खरें वाटलें, आणि चटकन मी शुद्धीवर आलों. मग पुढें त्याच्या घरगुती अडचणींची त्यानें कर्मकथा सांगितली व त्याला मला काय सांगावयाचें तें अगदीं मनोभावानें मीं कळविलें. 'अप्पा! आतांच्या काळीं घरोबा, ऋणानुबंध, स्वकीयपणा हीं सगळीं नातीं बाजारबसवीच्या प्रेमासारखीं झालीं आहेत बरें,' असें बचंभट मला ह्मणाला, तें वाक्य मला एकसारखें आद्याप आठवत आहे. त्या दिवसापासून मी तर कानाला खडाच लावून घेतला कीं अतःपर दुसऱ्याच्या निंदा ह्मणून ऐकावयाच्या नाहींत. हा माझा निर्धार कदाचित ढासळताही. पण मला स्वतःला अशा चुगलखोरीचें आणि रिकाम्या निंदेचें दुःख काय याचा अनुभव यावयास लागला, आणि तिनें तर मला एके दिवशीं चांगलेंच शुद्धीवर आणिलें. मी इकडे फुरसतीच्या वेळीं आपला काळ लोकांच्या निंदा आणि चुगल्या श्रवण करण्यांत घालवूं लागलों तों लोक माझ्याही निंदा व चुगल्या करूं लागले

असें मला समजलें. 'लोक ह्मणतात, लेकाचें आणि यांचें जमेना ह्मणून इकडे हे निघून आले' 'सात्रेची डाळ सून शिजूंच देईना' 'लेकाशीं भांडून हे आले आतां वाईला, असें लोक ह्मणतात ह्मणून रोज एक एक वर्तमान ती मला सांगूं लागली. तिच्या त्या गोष्टी ऐकून मला संताप यावयास लागला.' काय हे रिकामटेकडे लोक? यांना कशाला आमच्या उठाठेवी हव्या? यांचें काय जातें आह्मीं कांहीं केलें ह्मणून? इत्यादि प्रश्न आतां मला सुचूं लागले. मी तिच्या अंगावर वस्सदिशीं जाई आणि तिला ह्मणें—'ह्मणेनात काय हवें तें, तूं कशाला ऐकून घेतेस?' असा तिला मी बुद्धिवाद सांगें. पण त्यामुळें तिचें कधीं कांहीं समाधान झालें नाहीं, व माझ्या मनाला चुटपुट लागावयाची ती बंद पडली नाहीं. एवढें मात्र झालें कीं आपण लोकांच्या निंदा करितों त्या ऐकून त्यांना किती दुःख होत असेल याची आतां मला चांगली कल्पना आली. आणि तेव्हांपासून लोकांच्या चुगल्या ऐकण्यांत किंवा निंदा करण्यांत एक प्रकारची मला हौस वाटत असे ती वाटेनाशी झाली. एके दिवशीं पुनः तिनें लोक आपल्याला असें असें ह्मणतात ह्मणून कांहीं सांगितलें, तें ऐकतांच मात्र मी फार संतापलों व तिला रागें भरलों. तेव्हां 'लोकांच्या निंदा आणि उठाठेवी करतांनां कसें गोड लागतें? आणि लोकांनीं निंदा केली ह्मणजे हें असें' असें ह्मणत ती निघून गेली. त्या दिवशीं मात्र मला पक्कें समजून आलें कीं 'द्यावें तसें घ्यावें आणि करावें तसें भरावें.' लोक माझी कधीं आजवर निंदा करीत नव्हते, आणि ती आतांच कां

करूं लागले, हेंही पण माझ्या ध्यानांत येऊन चुकलें. लोकांत चर्चा होते ती अगदीं खोटी अशी कधींच असत नाहीं. मूळांत कांहीं तरी खरें हें असतेंच, आणि कितीही गुप्त ह्मणून आपण एखादी गोष्ट ठेविली, तरी ती लोकांत आल्याशिवाय राहत नाहीं. हें कसें काय याचा मला अद्याप आचंबा वाटत आहे. तें असो. लोकांच्या निंदा करण्याचें पाप माझ्या हातून इतःपर होईनासें झालें. लोकांस रिकाम्या चकाट्या पिटतांना पाहून त्यांस मी सांगत असें, कीं 'बाबांनो नकोरे तुह्मी असे गरीब बिचाऱ्या स्वकीयांच्या अब्रूवर नाहक हल्ले घालीत बसूं; त्यांत तुमचा फायदा कवडीचाही नाहीं, आणि दुसऱ्यांसमात्र विनाकारण दुःख होतें.' पण ते कसचे माझें ऐकायला ? लोकांच्या उठाठेवींत मौज वाटते आणि फुकटफाकट करमणूक होते ती कां सोडा, हा त्यांचा विचार. मला त्यांचे ते चाळे आवडत नाहींत, असें त्यांना कळतांच माझ्या घरीं भरत असलेला तो चकाट्या पिटण्याचा आखाडा बंद झाला. माझ्या घरीं मंडळी येईनाशी झाली. माझा वेळ मग जाईना. वेळ कसा काढावा हा विचार पडला, तेव्हां मी तिच्याशींच प्रपंचाच्या गोष्टी बोलत बसें. केव्हां पोथी काढून वाचावी, असा क्रम चालला. मला वारंवार वाटे कीं लोकांनीं मला मान द्यावा, माझे उपकार लोकांनीं मानावे, मला आपल्या हितगुजांत घ्यावें, माझा सल्ला विचारावा. असें कां वाटावें याचें कारण मला कळेना. लोकांना मोहबत दाखवावयाचें माझ्या हातीं नाहीं किंवा माझें भय वाटावें अशी स्थिति नव्हती; तेव्हां लोकांना माझी पर्वा वाटूं नये हें साहजिकच आहे. माझी गरीबी

होती तोंवर माझ्या विद्वत्तेची ते तारीफ करून विद्वान ब्राह्मण विद्वान ब्राह्मण असें ह्मणत, पण मुलाला नौकरी लागल्यापासून तसेंही कोणी मला ह्मणेनात. मग काय माझी विद्वत्ता मुलाच्या नौकरीमुळें नाहींशीं झाली. कां माझ्या सुसंपन्नतेचा लोकांना हेवा वाटावयास लागला हें कांहीं मला नीटसें समजेना. बरें, लोकांनीं माझा गौरव करावा ही माझी इच्छा; पण लोकांच्या उपयोगी पडावें ह्मणून पदराला कांहीं खार लावून घेण्याची इच्छा नाहीं. फक्त शब्दब्रह्मानें लोकांवर उपकार करण्याची इच्छा, शरीर कष्टवावयाला नको, पैसा खर्चण्याची तर गोष्टच बोलावयास नको. मग हें व्हावें कसें? खोट्या आशा, पोकळ थापा, रिकाम्या बडेजावी या गोष्टी तरी हव्या. पण त्यांचा मला गंध नाहीं. जन्माला आल्याचें सार्थक कायतें द्रव्यार्जन लौकिक किंवा ईश्वरसेवा; आणि मनुष्यमात्राचे यच्चयावत् प्रयत्न चालू असतात ते फक्त तीनच हेतूंखातर. मनुष्यपणांत कीर्ति, द्रव्य, किंवा ईश्वराची प्रीति यांच्यापलीकडे दुसरें कांहीं साधावयाचें नसतें. मला आतां द्रव्य मिळणें बहुतेक अशक्यच, आणि स्वतः मिळवून तरी काय करावयाचें? मुलगा प्रपंच संभाळीत आहे आणि त्याला पैसे मिळतात, झालें. लोकांत स्तुति व्हावी ही मात्र इच्छा माझी प्रबळ असे. ईश्वराची प्रीती संपादण्यापेक्षां माणसांच्या स्तुतीची किंमत मला जास्त वाटे. काय हा मूर्खपणा? नीट रस्त्यानें बैल चालेनासा झाला, त्याचें लक्ष दुसरीकडे गेलें ह्मणजे त्याला चाबूक मारलाच पाहिजे असें त्या बैलाच्या धन्यास वाटतें, व वाटलें तर त्यांत कांहीं नाहीं; तोच प्रकार ईश्वर आणि मनुष्यें यांत

असावा. जरा मदोन्मत्तपणा आला, कीं खास समजावें कीं आतां एखादा चाबूक खावा लागणार! तो चाबूक बसला ह्मणजे दुःख होतें, आणि चाबूक लगावणाराचा राग येतो. पण आपला अपराध कधीं आपणाला कळून येत आहे काय? नाहीं. हाच प्रकार ईश्वर संकटें देतो त्यांचा, अशी माझी बालंबाल खात्री झालेली आहे. एवढें दुःसह दुःख मला नुकतेंच झालेलें, जांवई वारला हें वर्तमान ऐकून माझी कंबरच खचली होती, मुलाच्या ओंजळीनें त्याच्या घरीं पाणी पिणें दुःसह झालेलें, आणि येथें वांईस आल्यावर हीं सर्व दुःखें विसरून पुनः आपला माजावयास लागलों. ईश्वराची आठवण तितकी कळकळीनें होईना. कारण मुलाकडून महिन्याच्या महिन्याला खर्चावयाला मिळे. मुलाबाळांच्या दुखण्याबाण्यांचा त्रास नाहीं, आला कांहीं प्रसंग तर तो मुलगा पार पाडील हा भरंवसा, इत्यादिकांमुळें ईश्वराची तितकी गरज वाटेना. ओढून ताणून मन ईश्वरचरणीं लावावें; पण आंतून आंच नाहीं, त्यामुळें लगेच तें तिकडून परत वळे. पण ही गोष्ट मनाला सदा लागून राही. पुढील जन्मीं त्रास नको; आपला जन्ममरणाचा फेरा आतां सुटेलच ही खात्री नाहीं, त्यामुळें ईश्वराचा प्रसाद बराच मधून मधून आठवत होता. अशा स्थितींत कांहीं दिवस लोटतात न लोटतात तों दुसरा एक दुःखाचा तडाका पाठीवर बसला. त्या दुःखामुळें मात्र माझें सर्व अवसान खचलें आणि उमेद ह्मणून जी कांहीं होती ती पार आणि अगदीं कायमची नष्ट झाली. ह्मातारपण शरीराला आलें होतें तरी आशा

भरल्वानींतल्याप्रमाणें मुसमुसत होती; पण या संकटापुढें तिनेंही हात टेंकून जमीन धरिली. माझा दुसरा मुलगा गोपाळा इंग्रजी शिकत होता. बाळ्यासारखी त्यालाही एक मोठी चाकरी लागेल हा माझा भरंवसा. तसेंच तो नशीब काढणार असें लोकांनाही वाटे. त्याचें लग्न गतवर्षीच केलें होतें, बाळ्या ह्मणे लहानपणीं लग्न करूं नये. त्यानें असें होतें आणि तसें होतें, ही त्याची बडबड. मीं त्याचें तें वाक्पांडित्य ऐकलें नाहीं. इंग्रजी शिकलास ह्मणून काय झालें? लग्न लहानपणींच करावें लहानपणीं करावयाच्या गोष्टी त्या लहानपणींच झाल्या पाहिजेत असा माझा हट्ट, तसाच तिचाही. आह्मीं बाळ्याच्या मर्जीविरुद्ध गोपाळाचें लग्न करून टाकिलें. बालविवाह—बालविवाह—ह्मणून त्यानें चालविलेली चर्पटपंजरी आह्मीं मनावर घेतलीच नाहीं. बाळ्या ह्मणे ज्याची बायको त्यानें पसंत करावी. लहानपणीं लग्न करण्याच्या दुष्ट चालीमुळें बायकांना लहानपणींच वैधव्य येतें. लहानपणीं लग्न केलें ह्मणजे अभ्यासाला हरकती येतात. लहानपणीं लग्न करण्याच्या दुष्ट चालीमुळें आमचा देश बुडाला आणि पेशवाई गेली, असें कांहीं तरी तर्कट तो चालवीत असे. त्याचें ह्मणणें मला त्या वेळीं बिलकुल पसंत पडलें नाहीं. पण आतां वाटतें कीं बाळ्या ह्मणत असे तें ऐकिलें असतें तर बरें होतें. लोकांच्या मुली आपण फसविल्या असें होईल हें बाळ्याचें ह्मणणें खरें, असें आतां वाटूं लागलें. मुलगा कसा निपजेल हें लहानपणीं कांहीं समजत नाहीं. नशीब नशीब ह्मणून डोळे असून आंधळ्यासरखें चालणें हा मूर्खपणा आहे. लहानपणीं मरणा-

चा संभव ज्यास्त असतो. ज्यांची जन्मभर गांठ अशांची पारख एकमेकांची एकमेकांनीं केलेली बरी. गोपाळाचें लग्न लहानपणीं करून दिल्यानें तो आपल्या बायकोला पोशील ही हमी मीं आणि बाळ्यानें घेतल्यासारखी होते, असें बाळ्या माझ्या कानीं कपाळीं ओरडला. ती गोष्ट खोटी नव्हे. प्रपंचाचें लचांड अगदीं पोरपणीं मागें लागलें ह्मणजे तें एकंदरींत वाईटच, इत्यादि बाळ्या सांगत होता तें आतां मला खरें वाटूं लागलें. पण त्याचा उपयोग काय? गोपाळा पाद्री लोकांच्या शाळेंत शिकत होता. त्याला रोज ख्रिस्ती बायबल वाचावें लागे. त्याचा कोणी पाद्रीसाहेब होता. त्यानें त्याला काय भुरळ घातली कोण जाणें. मी बाटणार आणि किरिस्तांव होणार असें गोपाळा ह्मणूं लागला. तो भिरकुटें खातों, भिस्त्याचेंच पाणी पितो, ओवळ्यानें जेवतो, जोडाच काढीत नाहीं, अंडीं खाऊं लागला, दारूच पितो असे बोभाटे वाईंत येत; पण ते मला खरे वाटेनात. मनाला वाईट वाटे कीं हीं ब्राह्मणाचीं मुलें आणि असा कसा भ्रष्टकार करितात? पण त्याचें कौतुकच लोकांना वाटे. केव्हां केव्हां हे भ्रष्टाकार ऐकूंत मला संताप येई. पण मीच आपलें समाधान करीं कीं, जशीं त्यांचीं कर्में तशीं फळें ते भोगतील. ही माझी उदासीनता मला पुढें चांगलीच भोंवली. मीं उपेक्षा केली नसती किंवा आशेला भुललों नसतों, तर मी इतका दुःखी होतों ना. वेळींच सावध राहतों तर हा असला प्रसंग टळता. पण 'होष्यमाण' कधीं कोणाला चुकवितां यावयाचें नाहीं.

आह्मी जेवण करून इकडच्या तिकडच्या गप्पा मारीत

बसलों, तों इतक्यांत टपालाचा शिपाई आला. त्यानें माझ्या नांवचें पत्र माझ्या पुढें टाकलें. हीं पत्रें कशीं कोठून येतात, कोण आणतो, इतक्या लवकर आणि इतक्या थोड्या खर्चांत हें काम कसें होतें ह्मणून मी त्या टपालवाल्याशीं बोलत आहें तों इतक्यांत 'पुण्याकडचें का पत्र?' असें तिनें विचारलें. मीं तिला ह्मटलें, पाहतों, थांब. असें सांगून पत्र फोडून वाचावयास लागलों. वाचणें संपलें तेव्हां कपाळावर हात मारून घेतला, आणि तिला ह्मटलें 'ऐकलेंस, आपला गोपाळ बाटला. ख्रिस्ती झाला. त्याचा बाप्तिस्मा झाला, ह्मणे'! असें मी दुःखानें बोललों तें ऐकून ती रडूं लागली, आणि भराभर तोंडाला येतील तशा शिव्या पाद्र्यांस देत सुटली. मीं ह्मटलें 'अग आपलेंच नाणें खोटें, मग लोकांशीं झगडा कां? त्या पाद्र्यांना कशाला शिव्या देतेस? आपल्या नशीबाला बोल लाव. बाळयानें लिहिलें आहे 'तुह्मी देखतपत्र पुण्यास यावें ह्मणजे कांहीं इलाज होतो कीं काय तो पाहतां येईल.' मग येणार काय तूं? असा मीं प्रश्न केला. त्यावर 'हो, मी त्याला परत आणतें; पाहतें माझें कसें ऐकत नाहीं तो,' इत्यादि ती आपल्याशीं पुटपुटत उभी राहिली. इतक्यांत पांचपंचवीस लोक 'काय हो हें खरें काय? असें कसें झालें! ह्मणून विचार विचारून आह्मांला बेजार करावयास जमले. त्या सर्वांना मी एकटा कोठवर उत्तरें देणार? त्या जमलेल्यांतील कित्येक जण मोठ्या हर्षानें माझी थट्टा करावयास लागले. माझ्या देखत मर्मभेदी भाषणांचा वर्षाव करण्यांत त्यांना मोठा पुरुषार्थ वाटलासा दिसला 'असा कसा हो तो बाटला? त्याला तुह्मीं

कशाला त्या पाद्र्याच्या शाळेंत घातलें?' या प्रश्नांच्या आवृत्ती किती तरी झाल्या. तों इतक्यांत आमचे व्याही–गोपाळाचे सासरे–गोविंदपंत मोठ्या आवेशानें व संतापानें माझ्यापुढें येऊन उभे राहिले आणि ह्मणाले, 'काय अण्णा कापलात माझ्या पोरीचा गळा? छे: छे:, असलें हें खोटें घराणें आह्मांला कोठून मिळालें? इत्यादि त्यांचा मजवर भडिमार चालला तो मीं निमूटपणें ऐकून घेतला; न ऐकून करितों काय? लग्नांत मिरविण्याची मला हौस होती. माझ्या डोळ्यांदेखत त्याचे दोहोंचे चार हात करण्यांत मला पुरुषार्थ वाटला होता. लग्न आतांच करूं नका असें कानींकपाळीं बाळ्या ओरडला तें मीं ऐकिलें नाहीं, त्याचीं भोग आतां फळें, असें मींही आपल्या मनास संतापूनच ह्मटलें. मी बोलत नाहीं असें पाहून आमचे व्याही जास्तच चवताळून ह्मणाले, 'आतां इथें असे रडत कशाला बसतां? जा, चला पुण्याला, आणि चार गोष्टी सांगा आपल्या लेंकाला समजावून, आणि आणा त्याला शुद्धीवर.' हें त्यांचें बोलणें ऐकून दुसरा एक गृहस्थ त्या जमलेल्या मंडळींत होता तो ह्मणाला, 'आतां जाऊन काय करणार? डोकें भादरलें, शेंडी कापली; जान्हवें तोडलें, मांस खाल्लें, सर्व कांहीं झालें; बाप्तिस्मा होऊन आज तिसरा दिवस. तिसरा एक होता तो ह्मणाला, मुलगा चार अक्षरें शिकला, ब्राह्मणाचें दारिद्र्य फेडलें, आणि त्यानें कुळही चांगलें उद्धरिलें. असें कोणी कांहीं बोले तें माझ्यानें ऐकवेना देखील. मी गांगरून गेलों. माझा धैर्यनग कोसळला. विवेक जागच्या जागींच नष्ट झाला. काय करावें हें मला सुचेना. मग मोकळा गळा करून बायकोसारखा

मी रडूं लागलों! पुरुषासारखा मी पुरुष, पण साऱ्या उभ्या जन्मांत या वेळीं मी अक्साबोक्शीं रडलों. बाळयाचा सासरा इतक्यांत घाईघाईनें आणि अगदीं गहिंवरलेला असा त्याच वेळीं आला, आणि त्यानें मंडळीस दटावून ह्मटलें, 'काय बेशरम लोक तरी. मर्मीं बोलण्याची का ही वेळ? पाजी लोक,' असें ह्मणत माझ्याजवळ ते व्याही आले, आणि बोलले, 'अप्पा, काय, हें काय? अहो असें का कोठें गांगरावयाचें? कोठें आहे पाहूं पत्र, काय आहे त्यांत? असें ह्मणून ते पत्र घेऊन वाचूं लागले. वाचून होतांच 'अहो असें भ्यावयाला काय झालें? अजून तो कांहीं पक्का बाटला नाहीं. साहेबांच्या घरीं आहे. बाटविण्याचा विधि अद्याप व्हावयाचा आहे. संध्याकाळीं होणार असें लोक बोलतात पण आमच्या जांवईबुवांनीं कांहीं तजवीज केली असेल. तुह्मी मात्र आतां असेच पुण्यास चला. तुह्मीं उभयतांनीं चार गोष्टी सांगीतल्या ह्मणजे येईल तो शुद्धीवर.' इत्यादि समाधान व्याह्यांनीं केलें त्यामुळें मलाही बराच धीर आला, आणि त्याच रात्रीं आह्मी उभयतां पुण्यास जावयाला निघालों. बरोबर बाळाचा सासराही आला. तुह्मीही चला, असें मीं त्यांस ह्मटलें, व त्यांनीं माझें सांगणें ऐकिलें. पुण्यास जातांच अद्याप मुलाचा बाप्तिस्मा कांहीं झाला नाहीं, असें वर्तमान कळलें त्यामुळें मला अंमळ उमेद आली. मी, बाळा, त्याचा सासरा आणि बाळाचा एक स्नेही असे चौघे जण त्या पाद्रीसाहेबाच्या बंगल्यावर गेलों. आह्मांला पाहतांच साहेब पुढें आला. त्यानें आमचें काम काय आहे असें विचारिलें. मी त्या साहेबावर रागावून बोलूं

लागलों—निर्लज्जा माझ्या पोराला बाटविलेंस, तुझें नि-संतान होईल, तूं नरकांत जाशील, इत्यादि मीं ह्मटलें. ' बावा! असें बोलूं नये. जरा दम धरा. असा उतावळेपणा नको.' 'जा—मूर्खा—उतावळेपणा नको ह्मणजे? माझ्या पोराला बाटवावयाला याला लाज वाटली नाहीं? पातकी कुठला! ब्रह्मघातकी! त्या पोरीचा काय तूं साहेबा गळा कापणार? मला हाय हाय करीत मरावयास लावणार? रौरव नरकांत जाशील. तुझा सत्यानास होईल.' असें मी पुनः पुनः संतापून बोलें, तरी तो कोडगा नुसता हंसे, रागाला येत नसे; आणि ह्मणे 'आकाशांतील बाप तुमच्या-वर प्रकाश पाडो; सैतानाच्या पाशांत तुह्मी अडकतां याचें आह्मांला भारी भारी दुःख वाटतें.' पुढें मला एकीकडे गप्प बसवून बाळा आणि त्याचा मित्र हे त्या साहेबाशीं इंग्रजींत बोलूं लागले. बाळाचा सोबती बरोबर होता तो वकील होता. बाळाचे सासरे मला ह्मणाले 'अप्पा, तुह्मी आतां जास्त बोलूं नका. बाळासाहेब इंग्रजींत त्या साहे-बांचा असा नक्षा उतरीत आहेत. पहा मजा. आतां गोपाळा आपल्याबरोबर येईल! मला थोडा धीर आला पण दोघांचें इंग्रजींत चाललेलें गुऱ्हाळ संपेना. अखेर तुह्मी त्याच्याशीं खिडकींतून बोला अशी साहेबानें परवानगी दिली. आह्मी सारे गोपाळा होता त्या खोलीजवळ गेलों. तों इकडे दुसऱ्या दारानें तो गोरा आधींच आंत जाऊन त्याला कांहींसें शिकवीत होता. आह्मी जातांच 'गोपाळा' ह्मणून मीं त्याला हांक मारली, 'अरे हें असें कायरे बावा केलेंस?' त्याला गोपाळानें उत्तर दिलें 'माझें वय १९

वर्षांवर आहे. मी आतां अज्ञान नाहीं. माझ्यावर तुमचा कायदेशीर हक्क आतां उरला नाहीं.' त्याचें बोलणें थांबवून मीं मध्येंच ह्मटलें, 'गोप्या, अरे चांडाळा, माझें सारें कुळ बुडविलेंसना? त्याची कांहीं शुद्ध? अरे लाज सारी कोठें टाकलीस?' गोपाळा:—'बाबा मला दुःख होतें कीं तुह्मी अज्ञानांत बुडत आहां. येशू प्रीति आहे; त्याच्या उजेडानें या तुमच्या पोटांतला सैतान बाहेर निघो!' हें ऐकतांच माझ्या तळपायाची आग मस्तकाला गेली, व 'अरे अधमा, तूं मला मूर्ख ह्मणतोस? तुझी अक्कल कोठें गेली? कोणत्या नरकाचें हें साधन त्वां आरंभिलें?' असें मी त्या पोरावर चरफडत बोलूं लागलों. माझा अनिवार संताप पाहून मला बाळानें व त्याच्या सासऱ्यानें बाजूला एकीकडे नेलें. मला नेतांनां पाहून गोपाळा ह्मणाला, 'हे आकाशांतल्या बापा, तुझी प्रीती दे, आणि उजेड कर, या पाप्याचा आत्मा तार.' हें त्याचें बोलणें ऐकून तर माझें देहभानच गेलें. 'अरे चांडाळा महापातक्या तुझा हा मी जिवंत बाप, त्याची तूं ही अशी अवज्ञा करितोस? तुला तो आकाशांतला बाप कोण काय करणार? जन्मलास तेव्हांच रे चांडाळा तूं कसा मेला नाहींस? तुला लहानाचा थोर करून सर्पाला दूध पाजल्यासारखें कीं रे मीं आजवर केलें!' इत्यादि मी बोलत होतों तोंच मला त्यांनीं बाजूला नेलें. बाळा मग पुढें गेला. त्याचेंही कांहीं चाललें नाहीं. मग बाळानें तिला बोलावूं पाठविलें. ती गेली, रडली, भेकली, परोपरीनें तिनें त्याची विनवणी केली; पण सारें उपड्या घागरीवर पाणी! ती त्याच्या पायांसुद्धां पडली, तरी त्या

काळ्या फत्तराला दया आली नाहीं ! राक्षस, चांडाळ, अधमाधमच तो, माझा शत्रु होऊन माझ्या पोटीं जन्मला. माझा संताप अनावर झाला. मला कांहीं एक सुचेना. इतका संताप मला यावज्जन्मांत आला नव्हता. दोन प्रहर झाले, बारावर दोन वाजण्याची वेळ झाली, तेव्हां गाडींतून आतां परत जावें असा सर्वांनीं बेत केला. माझ्या मनांत गोपाळाला सोडून परत घरीं जावयाचें नव्हतें. तेथें जीभ हांसडून प्राण सोडावा, आणि ब्रह्महत्त्या साहेबाच्या डोक्यावर आणि पितृघात मुलाच्या डोक्यावर बांधावा असा माझा विचार. पण तसें करावयाला गेलों तर सरकारांतून शिक्षा होते, साहेब त्याचीदेखील पर्वा करणार नाहीं, असें मला सर्व जण सांगूं लागले. मीं ह्मटलें, 'काय? सरकाराचें यांत काय जातें? माझ्या प्राणाचा मी मालक. सरकार कोण मला विचारणार? नाहीं तर सरकाराला ह्मणावें माझा मुलगा मला परत आणून द्या.' हें माझें ह्मणणें सर्वांना चमत्कारिक वाटलें. मी, बाळ्या आणि ती अशीं तिघे पुनः एकदां गोपाळाला विचारावयास गेलों. मला बाळा पुनः पुनः बजावून सांगे, 'बाबा, तुह्मी उगीच संताप करून घेऊं नका. उणाअधिक शब्द त्या साहेबाला बोलण्यांत अर्थ नाहीं.' आह्मी दाराशीं आलों असें पाहून गोपाळा खिडकीजवळ येऊन उभा राहिला. त्याच्या मनाची चलबिचल झालेली मात्र या वेळीं दिसली, ह्मणून मला वाटलें कीं कदाचित आतां हा वळला तर वळेल. मी त्याच्याशीं बोलणार, तों इतक्यांत तिनेंच त्याला ह्मटलें 'गोपाळा, तुला आह्मां ह्मातार्‍यांची देखील कींव येत नाहीं ना? तुझें नऊ

मास ओझें वाहिलें तें तूं असें आमच्या देखत आमच्या कुळाचें नांव बुडवावें एवढ्याचसाठीं काय? परोपरी आजवर तुझ्या इतक्या खस्ता सोशिल्या, त्या काय तूं बाटून शेवटीं आह्मांला पाणीदेखील देण्यास राहूं नयेस ह्मणून? आह्मीं डोळे मिटल्यावर मग तूं वाटेल तें करतास, तर तुला कोण बोलायला येत होतें? अंतकाळीं घोटभर पाणी तरी तुझ्या हातचें मिळतें ह्मणजे मला किती बरें वाटतें? माझा गुणाचा बाळ तूं, असें करूं नकोस; चल कसा घरीं. तुला काय खायाला कमी आहे? का प्यायला? का कपडलत्ते? बाळानें तुझें कांहीं सुद्धां कमी केलें नाहीं. बिचारी ती तुझी बायको—तिनें हें तूं असें केलेंस ह्मणजे पुढें करावें तरी काय? सासू-सासरे आहेत, त्यांच्याकडून तुला काय हवें तें मिळेल, माग; पण बाळा हें असें करूं नको, बरें. चल बाळा, घरीं चल.' अशी त्याला विनवीत आहे तों इतक्यांत मी पुढें सरकलों आणि मोठ्यानें 'गोपाळ, हा मी तुझ्या पायां पडतों, तुझ्यापुढें हात जोडतों, माझ्यावर एवढी दयां कर आणि घरीं चल. माझ्या कुळाला असा बट्टा लावूं नको, तूं नरकांत ढकलूं नको. काय तुझी सेवा असेल ती सांग, मी करितों, पण माझ्यावर एवढी कृपा कर, असें ह्मटलें. पुढें माझ्यानें कांहींएक बोलवेना. डोळ्यांतून नुसता अश्रूंचा लोट चालला. माझी ही स्थिती पाहून बाळ्याला फार वाईट वाटलें. तो गहिंवरला; त्याला बोलवेना; तरी माझा उजवा हात धरून मला बाजूला सारीत तो गोपाळाला ह्मणाला, 'गोपाळा विचार कर, आई बाबा यांच्यासारखीं माणसें तुला पु : मिळावयाचीं नाहींत. त्यांचे उपकार

तुझ्यावर अगणित असून तूं त्यांना हें असें दुःख देतोस ही गोष्ट नीट नाहीं. तुझ्यासाठीं पहा ते किती विव्हळ झाले आहेत ते.' त्याच्यानें पुढें जास्त बोलवेना. माझे व्याही बाळाचे सासरे त्याला कांहीं चार गोष्टी सांगूं लागले, तों कोणी दुसरा एक बाव्या तेथें आला आणि मोठ्या ताठ्यानें आह्मांला ह्मणाला, 'अहो भटजीमहाराज, आतां कशाला तुह्मी त्या मुलाची आशा धरितां? झालें, तो बाटला! कालच प्रभुभोजन झालें. गाईचें मांस, डुकराची तंगडी, कोंबडें, सारें काल त्यानें झोडलें आहे. आमचें पाणी प्याला, जान्हवें तोडलें, आणि आतां त्याला तह्मी घरीं घेऊन जाऊन काय करणार?' हे त्याचे शब्द ऐकतांच तिनें मोठ्यानें हंबरडा फोडून, 'गोप्या, कायरे मेल्या ही तुझी करणी? माझ्या पोटीं जन्मास येऊन, कारव्या, माझें तोंड असें काळें कां केलेंस? उपजतांच कां मेला नाहींस? असें बोलून ती विलाप करूं लागली. तिचें रडणें पाहून माझी स्थिति काय झाली तें मला सांगतांच येत नाहीं. माझा संताप जास्तच भडकला, आणि आंग लटलट कांपूं लागलें. तोंडांतून शब्द निघेना. उभें राहावयास देखील शक्ति उरली नाहीं. माझी कंबर खचली. मीं बसकण घेतली, आणि त्या साहेबाला शिव्या देण्याचा सपाटा चालविला. माझ्या इतक्या उमरींत लोकांना शिव्या देण्याचा मला प्रसंग काय तो एवढाच आला. मी शिव्या हांसडूं लागलों, ह्मणजे बाळानें मला आवरून धरावें, बाबा असें नका बोलूं असें ह्मणावें. पुढें मलाही मग गोप्याचा कंटाळा आला. ह्मटलें, कशाला आतां येथें बसून जास्त कंठशोष

करा? तो आतां बाटला खरा. समजावें तो मेलाच. असें ह्मणून रागाच्या आवेशांत मी घरीं जावयास निघालों. जातांनां गोप्या, नाहीं बरें हें तूं चांगलें केलेंस. पितृघातकी, मातृघातकी तूं माझें कुळ बुडविलेंस, ब्राह्मणाचें नांव खराब केलेंस. रौरव नरकांत अक्षय पडशील. हाल हाल होऊन मरशील. कुत्रीं कोल्हीं तुला फाडफाडून खातील.' इत्यादि माझें बोलणें चाललें होतें तें थांबवून गोप्या मला ह्मणाला, 'बाबा प्रभु तुमचें अज्ञान पळवो. तुमच्या अंतःकरणावर प्रकाश पाडु अशी आकाशांतील बापाची मी प्रार्थना करीन, आणि तुमची आणि आईची मी प्रार्थनेंत आठवण ठेवीन.' 'गाढवाच्या धसा' इत्यादि शेलक्या शिव्यांचे वर्षाव मग माझ्या तोंडांतून सुरू झाले. एक साहेब पुढें येऊन मला ह्मणाला 'भटजी, प्रभु तुह्मांलाही कळपांत लौकरच आणो. आकाशांतील बाप प्रीति आहे. ती तुमच्यावर पसरो.' असें कायसें त्याचें भाषण चाललें होतें तें मला ऐकवेना! 'साहेब, प्रत्यक्ष आईबापांला आणि भावाला न जुमानतां हा कारटा तुमच्याकडे येऊन बाटला आहे. आपल्या धर्माची आणि जातीची त्याला चाड नाहीं. आह्मी त्याला इतकें विनवितों तरी त्या फत्तराला घाम नाहीं, असा हा मांग तुह्मीं आपल्यांत घेतला, विचार करा. तुमच्या डोक्यावर मिरीं वाटील. बाळानें त्याचें काय थोडेथोडके लाड चालविले होते? आणि त्याचे उपकार हा असे फेडीत आहे. मी प्रत्यक्ष बाप त्याच्या पायां पडलों! तरी ऐकत नाहीं. ही त्याची जन्मदाती आई, लहानाचा थोर इनें त्याला केला, तिचें तरी त्यानें ऐकावें खरें? 'न

मातुः परदैवतम्' कोठला ख्रिस्त आला आहे आणि काय तुह्मी सांगतां? अहो हे राक्षस! पिशाच्च! मांग!' इत्यादि बोलून आह्मी जावयाला निघालों. तिला गोपाळाला सोडून येववेना. त्यानें आमचा इतका अंत पाहिला तरी, गोपाळा, गोप्या, ह्मणून त्याची तिनें विनवणी परोपरीनें चालविली होतीच. यामुळें माझा संताप उसळून मला तिचाही या वेळीं राग आला. मीं तिला ह्मटलें, पुरे, पुरे, चल; असल्या पिशाचाला प्रसवलीस, आणि आतां त्याची करीत सुटली आहेस मनधरणी! चल मेला तो कारटा असें समज! हें माझें भाषण तिच्या दुःखावर डागणीसारखें झालें. ते ऐकून ती भ्याली, आणि गोपाळाकडे पुनः पुनः मागें पहात पहात पुढें चालूं लागली. तिची त्या वेळची स्थिति व मुद्रा वर्णन करून कळावयाची नाहीं. आह्मी परत चाललों हें पाहतांच इकडे गोप्याचें मन ताळ्यावर आलें, त्यानें रडवें तोंड केलें, आणि आई—आई—अशी त्यानें आरोळी ठोकलेली माझ्या कानीं पडली, असें मला वाटलें! पण तें निवळ वाटणेंच. आह्मी गाडींत बसलों, तीही येऊन रडत बसली, आणि आतां गोप्याला परत आणण्यांत अर्थ नाहीं, तो बाटलाच, अशा विचारानें खिन्न होऊन आह्मी परत घरीं आलों. तीन वाजायचा अंमल झाला होता. तोंवर स्नानसंध्या जेवणखाण कांहींएक आणि कोणाचेंच झालें नव्हतें, आणि तें आतां मला नकोही असें वाटे. आह्मी घरांत गेलों न गेलों इतक्यांत गोपाळाचा सासरा आणि त्याची ती लहान बायको आणि सासू आणि मेहुणा हे सगळें लटांबरच्या लटांबर येऊन थडकलें. वांईहून येतांना

त्यांना आह्मीं बोलविलें नाहीं, तसेच निघून आलों याचा त्यांना राग आला होता. माझ्याकडे व्याह्यांनीं नुसतें पाहिलें, नमस्कार केला नाहीं, किंवा एक अक्षरही ते बोलले नाहींत. त्यांचीं इतर सर्व माणसें दारांतच उभीं राहिलीं. सुनेनें मात्र येऊन मला नमस्कार केला. त्यासरशीं माझ्या पोटांत भडभडून आलें, आणि त्या पोरीला पोटाशीं धरून मीं ह्मटलें, मुली, तुझा त्या चांडाळानें गळा कापला बरें! माझ्या डोळ्यांतून सारख्या अश्रुधारा वाहत होत्या. मला कांहींएक बोलवेना. ती अगदीं लहान पोर, तिला त्यांतलें कांहींच कळलें नाहीं. विहीण आली, तिला या, बसा, ह्मणावयाला आतां मी कोणत्या तोंडानें पुढें जाऊं हा विचार तिचा. विहीण या बसा देखील ह्मणत नाहीं, काय चमत्कार, ही समजूत गोपाळाच्या सासूची. व्याहीतरी माझ्यावर संतापलेलेच. कावऱ्याबावऱ्या मुद्रेनें ते मजकडे पहात. असा तो त्या वेळेचा अति अद्भुत देखावा सांगून कळावयाचा नाहीं. बाळासाहेब, अहो बाळासाहेब, अशी व्याह्यांनीं माझ्या मुलास हांक मारली. मुलगा माडीवरून खालीं आला. नमस्कार चमत्कार झाले. त्याच्यापेक्षां जास्त कोणी कांहींच बोलेना. बाळा बिचारा गांगरून गेलेला. त्याला कांहींएक सुचेनासें झालें. लेंकरूंच तें. त्यानें कधीं असले प्रसंग पाहिलेले होते थोडेच. इतक्यामध्यें आमचे पुराणे मित्र मोरोबा आले. त्यानीं 'बाळासाहेब, चोरीची फिर्याद गोपाळावर, व ती चोरी लपविल्याची फिर्याद त्या पाह्यांवर केली तर कसें काय? असा प्रश्न केला, व मीं ही काय नामी शक्कल काढली, अशा आविर्भावाच्या चेहऱ्यानें

मोरोबा मजकडे पाहूं लागले. त्याह्यांनीं मोरोबास उत्तर दिलें 'हं, असें कांहीं तरी कोडें त्या साहेबापुढें टाकावयास हवें, आणि मुलालाही पण भेवडावलें पाहिजे.' परंतु बाळानें कांहींच उत्तर दिलें नाहीं. 'चला, वर या,' असें ह्मणून त्याही व मोरोबा यांसह बाळा माडीवर गेला. मी विहीणबाईला 'चला आंत' वगैरे सांगितलें. विहिणीला पाहतांच ती रडावयास लागली. बायकांनीं रडण्याचा गोंधळ चालविला. मुलगीही आंत जाऊन आपल्या आईपाशीं बसली. इतक्यांत बगडीचा नवरा—जांवई—आला व थेट तसाच माडीवर बाळाकडे लगबगीनें गेला. मीं विचारिलें, 'कांहीं नवें जुनें वर्तमान?' 'कांहीं नाहीं. संगमावर बाप्तिस्मा उद्यां होणार ह्मणतात; पण गोपाळाचें मन जरा बदललें आहे असें ऐकतों. आलों आतांच, अंमळ वर जाऊन येतों' असें सांगून जांवईबुवा बाळाकडे गेले. वर काय खलबतें झालीं तीं मला कळलीं नाहींत. इतक्यांत एक शिपाई पत्र घेऊन बाळाकडे आला. त्यांत काय लिहिलेलें होतें तें कांहीं कळलें नाहीं; पण गोपाळासंबंधीच कांहीं मजकूर असावा. चिठ्ठी पाहतांच बाळा गाडींत बसून बाहेर निघून गेला. मोरोबा मजकडे आले आणि ह्मणाले, 'गोपाळाचें वय किती आहे? जन्मपत्रिका असेलच?' मीं सांगितलें, 'अठरावें सरून एकोणिसावें वर्ष त्याला लागलें.' मोरोबानें नाक मुरडून विचारिलें 'पंधरावें किंवा सोळावें नाहींना?' या वयाशीं काय करावयाचें हें मला मग मोरोबानें समजावून सांगितलें. अल्पवयस्क—अज्ञान—मुलाला काढून नेल्याबद्दलची फियाद मांडावयाची आहे,

शाळेंत वय काय लाविलें हें पाहून येण्याला बाळासाहेब गेले आहेत. चोरीची फिर्याद मोठी नामी युक्ति, पण खोटें काम नको, असें बाळासाहेब ह्मणतात. तेही सरकारी कामदार पडले, उगी भलतीच घोरपड गळ्यांत यावयाला नको, असें त्यांचें ह्मणणें. असें पुष्कळ बोलणें झालें. मी ह्मणें, तो बाटलाना? आतां खटपटीचा काय उपयोग? झालें, संपलें. तसें घडावयाचें आमच्या नशीबीं; आणि त्याप्रमाणें घडलेंही.

त्या दिवशींची सारी रात्र आह्मीं अशीच काढिली. सकाळीं उठून सर्व जणांनीं पुनः एकदां गोपाळाकडे जावयाचें असें ठरलें होतें, त्याप्रमाणें भाड्याचे तीन तांगे आणिले. गाडींत मंडळी बसूं लागली. माझ्या मनांत कांहीं जावयाचें नव्हतें; मी कांकूं करीत होतों; इतक्यांत एक साहेब आणि गोपाळा गाडींत बसून आमच्या घरावरून गेले. आह्मांस पाहतांच गाडींतला एक माणूस खालीं उतरून आला, आणि त्यानें सांगितलें, 'तुमच्या मुलाचा आज सकाळीं बाप्तिस्मा झाला. आतां तुह्मी स्वस्थ रहा, व्यर्थ कांहींएक धडपड करूं नका. इतकें बोलून तो मनुष्य चालता झाला. नंतर घरांत कोण रडारड उडाली इत्यादि सांगण्यांत अर्थ नाहीं. गोपाळाला दुखणें येऊन तो मरता तर आह्मांला इतकें वाईट वाटतेंना. त्याच्या मरणामुळें आह्मांस लोकांत तोंड दाखविण्याची लाज वाटली नसती. त्याच्या मरणामुळें आमच्या तोंडाला काळोखी लागली असें वाटतेंना. तो अंथरुणावर पडून मरता तर त्यांत आमच्या घराण्याला, कुळाला, बट्टा लागला असें ह्मणतां आलें नसतें. त्याच्या

लहान बायकोच्या संसाराचें हें असें नाहक मातेरें झालें ह्मणून आह्मांला दुःख होई, तें निराळेंच. त्या तान्ह्या अर्भकानें अहेवपणांत वैधव्यासारखे दिवस काढावे, किंवा नवऱ्याबरोबर राहण्यास आपणही बाटावें, याशिवाय दुसरा मार्ग उरला नव्हता. आपण होऊन तूं बाट असें आईबापांना आणि सासूसासऱ्यांना सांगतां यावयाचें नाहीं. मुलगी विधवा झाली, तर तें दुःख मोठें खरें, यांत शंका नाहीं. पण ती जवळ तरी राहते, बसते, खाते. पण ती बाटली ह्मणजे तेंही नाहीं, अशा तऱ्हेच्या अडचणी मुलीसंबंधी. मला लोकांत तोंड दाखविण्याला लाज वाटूं लागली, त्यामुळें आतां बाहेर तोंड न काढितां अजी घरींच पडून राहण्याचा वखत आला. मुलाचें इतके दिवस आणि इतक्या परोपरीनें संरक्षण केलें, कल्याण चिंतिलें, त्याच्यासाठीं दगदगी सोशिल्या, त्रास भोगिले, आशा धरिल्या, त्याचे उपकार त्या मुलानें मला असें कैदेंत टाकल्यासारखें हालांत, अप्रतिष्ठेंत आणि ह्मातारपणीं खितपत लोळत पडावयास लाविलें! धन्य बिचाऱ्याची! माझ्या पोटीं जन्मून माझ्या तोंडास काळोखी लाविली! कोण भयंकर पातक हें! ती सारखी रडत भेकत बसलेली. तिच्या दुःखाचें वर्णन करणें कठिण आहे. तिचा आनंदी स्वभाव, तिचा हंसतमुख चेहरा कायमचाच कोमेजला! तिच्या तोंडावर हंसूं असें मला यानंतर कधींच दिसलें नाहीं. ती या प्रसंगानंतर कोठें कधींच बाहेर—देवदर्शनाला सुद्धां—पडली नाहीं. कोणी तिच्या भेटीस आलें तर तिला दुःखाचें भरतें नवें येई, आणि रडल्याखेरीज तिनें कोणाशीं कांहीं भाषण कधीं

केलेंच नाहीं. 'गोप्या! कायरे तुझा मीं मागील जन्मीं अपराध केला ह्मणून या ह्मातारीचा सूड तूं घेतलास?' असें ती वारंवार ह्मणत असे. तिचें अन्न तुटलें; ती कृश होत चालली; सदा दुःखीकष्टी असून हाय हाय आणि हुश्श हुश्श करीत ती बसे. तिची ती दशा पाहून मला फारच वाईट वाटे. माझ्याशीं त्या प्रसंगानंतर ती एक वाक्य सुद्धां बोलली नाहीं. मी आपण होऊन तिच्याशीं बोलावयास लागलों तर ती तेथून चालती होई, किंवा रडावयास लागे. गोप्याकरितां दुःख करीत करीतच शेवटीं तिचा अंत होणार अशी माझी खात्री झाली. मला दुःखें तिहेरी भोगावीं लागत! एक स्वतः माझें, दुसरें बायकोचें, आणि तिसरें सुनेचें! वयानें मी आधींच वृद्ध झालेला; पण माझी ताकद आजवर चांगली होती, ती या दुःखामुळें गेली, आणि मी अशक्त झालों, गोपाळा चांगले रे बाबा हे तूं आमचे उपकार फेडलेस. अरे अशा उपकारकर्त्यांशीं तुझें हें आचरण, मग तूं आतां जगांत लोकांशीं कसा वागणार? आणि हे मूर्ख लोक अशा कृतघ्न, पातकी, अधम, निर्दय चांडाळाचा भरंवसा धरणार? जगांत तरी काय चमत्कार आहे! जन्मदात्या आईबापांशीं प्रतरणा कर ह्मणून सांगणारे खरोखर महापातकी चांडाळ होत! आणि आईबाप, बंधूभगिनी, आप्तइष्ट, सगेसोयरे इतक्यांना दुःखांत लोटून कुळाच्या नांवास बट्टा लावणाऱ्या नराधमांला खिस्ती धर्म मोक्ष देतो ह्मणून सांगणारा त्यांचा आकाशांतील बापही राक्षस किंवा पिशाच्च असला पाहिजे! इत्यादि संतापाचे उद्गार मीं कितीदां तरी काढिले; पण त्याचा उपयोग

काय? दिवसेंदिवस मी थकत चाललों; व—हे महाप्रतापी यमराजा मला चटकन उचलून आतां ने कसा, अशा मीं कैक वेळांप्रार्थना केल्या. अरे गोपाळा, तूं आह्मां सर्वांना अशा दुःखांत लोटून बाटलास, त्या तुला ह्या जन्मांत तरी कधीं सुख होईल काय? ब्राह्मणासारख्या उच्च कुलांत जन्मास येऊन नीच म्हारामांगांत धेडाभंग्यांच्या सोबतींत जाऊन बसलास? सुग्रास अन्न आणि स्वच्छ पाणी ब्राह्मणाच्या घरीं, त्याचा तुला कंटाळा आला होय? नरपिशाचा, तूं कशाला रे आमच्या कुळांत जन्माला आलास? तूं दुखण्यानें पडशील, उपाशीतापाशी राहशील, तेव्हां तुला मायेचा शब्द बोलून, हें घे, खा, ह्मणणारा कोण आहे? पातकाच्या अखंड राशी सांठवून शेवटीं रौरव नरक भोगावयास जाशील त्या वेळीं तुझ्या पातकी देहाला उचलून खांद्यावर घेणार देखील कोणी मिळणार नाहीं! नीचा, अधमा, पातक्या, स्वधर्मात मरतास तरी बरें होतें. अरे ह्या परधर्म तुला मरेतोंपर्यंत पश्चात्तापांत खितपत पडावयास लावील! इत्यादि किती तरी प्रकारें मी मनच्या मनींच गोपाळाला अनुलक्षून बोलत असें. पण त्याचा उपयोग काय? गोपाळा बाटला यामुळें स्वधर्मी निधन बरें, पण परधर्मातला मोक्ष कां नको याची मला चांगली खात्री पटली, यांत मात्र कांहीं संशय नाहीं.

# प्रकरण १० वें.

## 'जुने डोळे आणि नवे चाळे', जिवाला व्यर्थ शीण!

आतां माझी जन्मकथा लोकांना सांगण्यासारखी अशी कांहींच उरलेली नाहीं. माणूस पाहिला कीं त्याच्यापासून चार पावलें दूर राहावें अशी माझी अलीकडे मनोवृत्ति होऊन बसली. अहंपणाचा टेंभा मिरविण्यासाठीं किंवा आपली स्तुति ऐकावयास मिळावी ह्मणून, किंवा आपली मानमान्यता कशी आहे याची प्रतीति लोकांस दाखवावयाला मिळावी एवढ्यासाठींच मनुष्य पुढें पुढें करून लोकांत मिसळण्याला हपापलेला असतो. पण माझा मुलगा बाटला त्या दिवसापासून मी घराबाहेर मुळींच पडलों नाहीं, किंवा कोणी माणूस भेटला तर त्याच्याशीं चार शब्द बोलावे अशी कधीं मला इच्छा झाली नाहीं. कोण कोठें माझ्या मुलाच्या बाटण्याबद्दल उद्गार काढीत असेल अशी मला सदा भीति वाटत असे. ही मनोवृत्ति कच्चया दिलाच्या माणसाला अनुरूप, ही गोष्ट खरी. जगांत राहावयाचें ह्मणजे प्रसंगविशेषीं लोकचर्चेला किंवा लोकनिंदेला पायां-खालीं तुडवीत जावें लागतें; लोकांच्या बाष्कळ निंदेपेक्षां हृदयस्थ अंतरात्मा आणि कैलासपति जगन्नायक यांची जास्त पर्वा बाळगावयाला हवी, इत्यादि माझा सर्व वेदांत या वेळीं कोणीकडल्या कोणीकडे सैरावैरा धांवत सुटला. माझा मुलगा बाटून ख्रिस्ती झाला यांत वास्तविक पाहतां माझा दोष किंवा अपराध असा कांहींच नव्हता. पण एखाद्या महापातक्याप्रमाणें मी मनांतल्या मनांत सुरू

लागलों! 'हायरे! कारट्या आपल्या उपकारकर्त्या जन्मदात्यांचा फारच सुरेख सूड तूं घेतलास' असें ह्मणून मी त्या पोराला किती तरी वेळां शापिलें असेल! मुलाचें कल्याण बापानें चिंतावें, मुलाला आशीर्वाद बापानें द्यावे, असें असतां मी असा निष्ठुर व निर्दय बाप बनलों कीं आपल्याच मुलाला मी शापूं लागलों! धिक्कार असो माझ्या या जिण्याला. ती तिकडे अशाच स्थितींत दुःखानें होरपळत होती. तिला माझ्यापुढेंसुद्धां येणें दुःखदायक वाटे. त्यामुळें मीच केव्हां तरी आपण होऊन तिच्याशीं च्यार शब्द बोलावयास मिळतील तर पहावें ह्मणून जात असें. पण मी आलों असें पाहतांच तिच्या दोन्ही डोळ्यांतून सारख्या अश्रुधारा वाहूं लागाव्या! मी रागावेन, तिला एखादा अधिकउणा शब्द बोलेन अशी तिला धास्ती वाटे ह्मणून ती आपलें दुःख असें बाहेर हांकून लावीत आहे कीं काय असें मला वाटे. पण तें कांहीं नव्हे. तिला तें दुःखच असह्य झालें.

अशा रीतीनें आह्मी दोघें सारखीं पण हळू हळू दुःखाच्या आंचेंत जळत होतों. मुलानें बाटून केलें काय? तर जन्मदात्या आईबापांस दुःखाच्या चितेवर सावकास भाजत ठेविलें! याखेरीज माझी जन्मकथा आतां पुढें सांगण्यासारखी कोणतीच नाहीं, असा मनांत विचार येतो. पण आरंभिलेलें काम अर्धा अधिक पल्ला गांठून तेथें तसेंच अपुरें टाकणें प्रशस्त नव्हे, अशा दृष्टीनें पाहतां यथाशक्ति काम तडीसही लावलेंच पाहिजे, असा निर्धार

करून आतां पुढील वृत्त संक्षेपतः सांगून मी एकदांचा मोकळा होतों.

प्राणाचें ओझें कसें तरी वहात एकएक दिवस मोठ्या कष्टानें आह्मी उभयतां ढकलीत होतों. एके दिवशीं सकाळीं भल्या पहांटेस आमच्या घरीं काशीहून आमच्या फार ओळखीचा एक पाहुणा आला. तो विद्वान, दशग्रंथी, शिवाय तीन शास्त्रांचें अध्ययन केलेला, महा तपस्वी, आणि मोठा कर्मठ ब्राह्मण. त्याला पाहतांच आह्मांला वास्तविक-पणें किती तरी आनंद व्हावयाचा. पण नाहीं. माझ्या अंतःकरणांत दुःखाचा एकदम भडका पेटला आणि त्या दुःखाच्या चौपट वेगानें मनाला लाज उत्पन्न झाली. सोम-दीक्षित काशीकर पाहुणे आले आहेत इतकें कळतांच मी एकदम पुनः अंथरुणावर लवंडून कण्हूं लागलों, जसा काय मी सहा महिन्यांचा दुखणेकरीच. सोमदीक्षितांजवळ माझ्या बाळ्याच्या नोकरीची आणि त्याच्या श्रीमंतीची थोडीबहुत तरी बढाई मारण्यासाठीं जीव हपापे. पण दुसरा पोरटा बाडगा निघाला हें त्यांना कसें सांगूं? ह्मणून वाईट वाटे. अशा दुहेरी पेंचांत मी अडकलों. सोमदीक्षि-तांसारखा विद्वान, घरोब्यांतला, चांगला ऋणानुबंधी ब्राह्मण घरीं पाहुणा आला ह्मणजे त्याला कोठें ठेवूं आणि कोठें नको असें मला व्हावयाचें; पण तोच अशा प्रसंगीं आला, तेव्हां त्याला भेटूंसुद्धां नये असें वाटे. विपत्कालामध्यें प्रिय माणसाचें दर्शन अग्नीशिवाय शरीर दहन करितें ह्मणतात तें कांहीं खोटें नव्हे. टाळीन ह्मटल्यानें सोमदीक्षित टळ:-वयाचे नव्हेत हें मला पहिल्यानें कळलें नाहीं. त्यांना टाळ-

ण्याचा लहान मुलासारखा मीं वेडसर प्रयत्न केला यामुळें मागून माझें मलाच हंसूं आलें. पडशी वगैरे ठेवून 'अप्पा! अहो अप्पा!' असा हांका मारण्याचा सोमदीक्षितानें सपाटा चालविला, तेव्हां निरुपायास्तव मीं 'ओ' ह्मटलें. गाय रानांतून हंबरडा फोडीत येते त्या वेळीं वासरूं धांवत आई-कडे जातें तसा प्रकार सोमदीक्षिताचा दिसला. माझी हांक ऐकतांच शब्दाच्या धोरणानें मोठ्या लगबगीनें अप्पा! अप्पा! अशा हांका मारीतच दीक्षित माझ्या खोलींत आले. त्यांच्याशीं आतां काय बोलूं, हें दुःख व संकट मला; आणि केव्हां एकदां अप्पाला भेटेन ही सोमदीक्षिताला घाई. मित्रप्रेम या जगांत मोठी अजब चीज आहे. ती पैशानें मिळत नाहीं. शेतांत पिकत नसते, पावसाबरोबर पडणारी वस्तु नव्हे. मला पाहतांच, कां कोण जाणें, सोमदीक्षितांस एकाएकीं गहिंवर दाटून आला. 'अप्पा! येवढेंच उद्गारून ते स्वस्थ राहिले. मला वाटलें माझी हकीकत त्यांना कळून ते माझ्या दुःखानें कष्टी झाले असतील. पण तें कारण खोटें. प्रातःकाळच्या समयीं उमलत चाललेली रविप्रभा दृष्टीस पडावी ह्मणून मीं खिडकी उघ-डली, तों आंत चांगलाच प्रकाश आला. त्या प्रकाशांत मी सोमदीक्षितांकडे चांगलें न्याहाळून पाहावयास लागलों, तेव्हां त्यांचे डोळे पाण्यानें थबथबलेले माझ्या दृष्टीस पडले. त्यांच्या डोळ्यांत अश्रुपूर आहे असें पाहतांच माझ्या डोळ्यांतही अश्रु सांठावयास सुरुवात झाली. आतां पुढें कांहीं बोलावयाचें; पण आधीं कोणीं बोलावें हीच उभय-तांस पंचाईत पडली. जिव्हा पुढें सरसावणार तोंवर डोळे एकमेकांशीं दृष्टादृष्टीनेंच बोलताहेत असें कांहीं वेळ भासलें.

सोमदीक्षितांच्यानें कांहीं बोलवेना. मग मींच पुढाकार घेतला. ' दीक्षित ! सर्व मुलेंबाळें खुशाल ना ? ' हा माझा प्रश्न ऐकतांच सोमदीक्षितांनीं एकदम मान खालीं घातली. पाण्यानें थबथबलेले डोळे त्यांनीं हा वेळपर्यंत त्यांतिल अश्रू खालीं येऊं नयेत ह्मणून वर केलेले होते, पण माझा हा प्रश्न ऐकतांच एकदम आपल्या अंगावरील धोतराच्या पदरांत मस्तक घेऊन ढसाढसा आणि लहान मुलासारखें रडण्यास सोमदीक्षितांनीं प्रारंभ केला. अज्ञान जनाप्रमाणें त्यांच्या दुःखास व शोकास स्पष्ट वाचा मात्र नव्हती. त्यांचे तें अनिवार दुःख पाहून मला वाटलें कीं या ब्राह्मणावर शोकाचा पर्वत कोसळलेला आहे. ह्मणून मी त्यांच्या शेजारीं बसून जास्त पूसतपास सुरू केला. ' अप्पा, माझ्या दुःखाचें गांठोडें आजवर कसें तरी बांधून ठेविलें होतें, तें आतां तुमच्यापुढें सोडावयास मी आलों. ' असें ह्मणून ब्राह्मणानें पुनः आपलें तोंड अंगावरील धोतराच्या पदरांत झांकून घेतलें. त्यांजवर प्रसंग आहे कोणता आणि दुःख कसलें हें मला कांहींच कळेना. मला माझ्याच दुःखाचें ओझें हा वेळपर्यंत वाटत असे; पण मी तें दुःख विसरलों, आणि माझ्या मित्राच्या दुःखाचा पूसतपास करण्यास लागलों. ' दीक्षित, अहो हें काय ? तुह्मी विद्वान, शास्त्री, नैय्यायिक, वेदांती; आणि सामान्य जनाप्रमाणें असे काय दुःख करितां ? ' या माझ्या प्रश्नाला सोमदीक्षित ह्मणाले, ' अप्पा, दुःखाला भिणारा हा गृहस्थ नव्हे, बरें ! ' हें ऐकतांच मग मी जास्तच बुचकळ्यांत पडलों, आणि विचा-

रिलें, ' मग झालें काय तुह्मांला ? असा शोक पुरुषानें का करावयाचा ? '

सो०—अप्पा ! 'न भीतो मरणादस्मि केवलं दूषितं यशः' आतां हें तोंड कसें दाखवूं ?

मी०—ह्मणजे ? झालें काय तें सांगाल तर खरें ?

सो—सांगू तरी किती ? आणि कोणत्या तोंडानें ?

मी—दीक्षित, तुमच्यापुढें बोलण्याची आमच्यासारख्याची प्राज्ञा नाहीं. तुमचा अधिकार मोठा, विद्वत्ता केवढी, प्रत्यक्ष सूर्यासारखे तुह्मी; आणि—

सो०—अप्पा, होय हो, पण त्याच सोमदीक्षिताला आतां जगांत तोंड दाखवावयाला जागा नाहीं समजलां ? जलसमाधि किंवा अग्निकाष्ठभक्षण याशिवाय दुसरी तोड नाहीं.

मी—ह्मणजे ? असा काय आज तुह्मांवर प्रसंग आला आणि त्याला असे भितां काय ह्मणून ?

सो०—होय प्रसंगच तसा आहे. काय करणार ?

भी—तो कसा काय ?

सो०—सांगूं तरी मी तें कोणत्या तोंडानें ? तोंडानें उच्चारवत देखील नाहीं. आणखी दुःखें कोणकोणतीं ह्मणून सांगूं ? थोरल्या मुलाला ९ वर्षें कैद झाली ! चोरीचा आरोप ! धाकटी मुलगी उठून गेली ! थोरल्या सुनेनें तोंडास काळें लाविलें. '

' अरेरे ! ' इतकेंच ह्मणून मी स्वस्थ राहिलों. माझें

दुःख या ब्राह्मणाच्या दुःखापुढें 'डोंगरापुढें राई' आहे असें मनांत येऊन एक प्रकारची अंगांत हुषारी आली, आणि सोमदीक्षिताची साद्यंत हकीकत त्यांस विचारून घेतली. तेव्हां माझ्या मनाला पराकष्ठेचें दुःख झालें खरें, पण एक मात्र मोठा फायदा झाला, तो हा कीं माझें स्वतःचें दुःख ह्मणजे कांहींच नव्हे असें मला वाटावयास लागलें. सोमदीक्षितांची ही हकीकत ऐकून तिचें दुःखही पार कोणीकडल्या कोणीकडे निवून गेलें. काय चमत्कार आहे! आपल्यापेक्षां जास्त दुःखी मनुष्य पाहतांच आपलें दुःख नाहींसें व्हावें हा काय मनुष्यस्वभाव ? पण या मनुष्यस्वभावामुळेंच या जगांत दिवस कंठतां येतात आणि कष्टमय संसार सुखाचा वाटतो. सोमदीक्षित भेटल्यापासून आह्मां उभयतांस आह्मांवर आलेलें दुःख दुःख नव्हे असें वाटूं लागलें, आणि आह्मी उमेद गोळा करीत काळक्रमणाच्या मार्गास थोड्या जास्त उल्हासानें लागलों. सोमदीक्षितांच्या भेटीमुळें एक नवा प्राण आह्मां उभयतांत आला ह्मटलें तरी चालेल; पण प्रथमदर्शनीं काय वाटलें हें पाहिलें ह्मणजे मनुष्याच्या मूर्खपणाची चांगली खात्री वाटते. तो जगच्चालक परमेश्वर प्रत्येक गोष्ट केवळ मनुष्यमात्राच्या कल्याणासाठीं घडवून आणीत असतो; मात्र ती कल्याणमय आहे हें जाणण्याइतकी मनुष्यांत अक्कल नसते. वाईट गोष्ट किंवा हानिकारक प्रसंग, यांत सुद्धां मानवी कल्याण कोठेंना कोठें असतेंच; पण तें धुंडाळून काढून त्याबद्दल संतोष मानणें हें कांहीं कोणाच्या हातून घडत नाहीं. सारी धांव कायती ईश्वराच्या नांवानें खडे फोडण्याकडे किंवा आपल्या

फुटक्या नशीबाला बोल लावण्यांत, हा मनुष्यस्वभाव पडला. असो. सोमदीक्षित या वेळीं आह्मांस येऊन भेटले, त्यामुळें आमचें दुःख आह्मांला आपोआप हलकें वाटावयास लागलें. घरांत आजवर कोणाशीं न बोलतां आपल्याच दुःखांत ती चूर होती. पण सोमदीक्षित आल्यापासून तिलाही बरीच उमेद आली, असें निदान मला तरी आढळून आलें. हें असें कसें झालें? त्याचें कारण काय? इत्यादि प्रश्न करीत तिनें सोमदीक्षितांच्या अनिर्वाच्य दुःखांची आणि संकटांची एकंदर साग्र माहिती विचारीत सुटावें. हें तिचें करणें मला बिलकुल आवडत नसे. सोमदीक्षितांच्या तोंडून त्यांच्या संकटांची हकीकत वदवावयाची ह्मणजे त्या ब्राह्मणाला विनाकारण सर्व दुःख आठवावयाचें. हिची अशी चौकशी ह्मणजे हिच्या एका नीच मनोवृत्तीची अनायासें परिस्फुटता होते ही माझी समजूत. सोमदीक्षितांच्या दुःखाची काहणी ऐकल्यानें आपलें दुःख ह्मणजे त्यांच्या दुःखापुढें कांहींच नव्हे असें तिला घडोघडीं वाटूं लागावें, आणि त्यामुळें तिच्या चर्येत एका प्रकारच्या आनंदाची झांक मारूं लागे. तें मला खपेना. आमचा मत्सरी स्वभाव आहे असें सोमदीक्षितांस वाटेल, ही मला शंका येई. ह्मणून मग मीही आपलीं इतर दुःखें सांगावयास लागें. माझ्या घरांत काय काय होतें ह्याची वाच्यता करण्याचें मला कांहीं एक प्रयोजन नव्हतें, किंवा तें माझें शील नव्हतें; परंतु सोम दीक्षित दुःखी ह्मणून आमच्या दुःखाचें ओझें थोडेंबहुत हलकें झालें तर झालें, अशा विचारानें कांहीं असेल नसेल

तें दुःख सोमदीक्षितापाशीं सांगावें ह्मणजे त्या बिचाऱ्याला थोडें समाधान होईल ही माझी कल्पना. पण, गृहच्छिद्र लोकांपुढें दाखवीत सुटणारासारखा महामूर्ख दुसरा कोणी नव्हे, आणि किरकिऱ्या स्वभावामुळें हरघडी त्रासच व्हावयाचा, तसेंच दोषैकदृक् माणसांच्या कपाळीं 'रडकथाच' सदा ठेविलेली, इत्यादि माझ्या समजुती कायम झालेल्या. क्षुद्र गोष्टींचा विधिनिषेध आपण बाळगूं लागलों किंवा सटरफटर बाबतींत मन घालून, तें असेंच, हें असेंच, करीत सुटलों, तर आपण होऊन समाधानाला किंवा तृप्तिसुखाला आंचवतों हें खास समजावें. माणसानें आपली नजर जास्त सढळ ठेवावी हा त्याच्या मनाचा थोरपणा, आणि त्याच्या सुखाचेंही तें एक लहानसें साधनच ह्मटलें पाहिजे. बारीकसारीक गोष्टींत सदा डुंबत बसण्याची मनास संवय लावतां कामा नये. माझ्या मतें तो स्वभावाचा अत्यंत क्षुद्रपणाच होय. शिवाय आपल्या घरच्या गोष्टी लोकांपुढें सांगत सुटण्यांत फायदा तरी कोणता? या जगांत विचित्रपणा अति विलक्षण आहे. माझा स्वभाव थोडा जास्त खुला, त्यामुळें मनांतल्या किंवा माहीत असलेल्या अनेक गोष्टी मी आपल्या स्नेही मंडळीपाशीं बोलत असें. कारण मनुष्याला कांहीं तरी करमणूक लागतेच. स्नेही मंडळीपाशीं बोलतांनां मला वाटत असे काय कीं हे भले गृहस्थ आहेत; बाणा संभाविती दिसतो; त्यांनीं निष्कपटी स्नेहाचा आवही आणिलेला; तेव्हां गुह्य ह्मणा किंवा एखादी महत्वाची गोष्ट ह्मणा, यांच्यापाशीं बोलण्याला वास्तविक पाहतां कांहीं प्रत्यवाय नसावा; आणि त्याप्रमाणें मी बोलत पण असें. परंतु पुढें

पुढें मला असें आढळून आलें कीं हे लोक माझ्या या स्वभावाचा विपरीत उपयोग करून घेऊं लागले. मोरोबा एके दिवशीं मला ह्मणाले, 'तुमचा स्वभाव फार वाईट आहे. तुह्मी लोकांपाशीं गोष्टी बोलतां आणि त्यांची मग वाच्यता फार होते. लोक तुह्मांला त्याबद्दल नांवें ठेवितात.' हें मोरोबाचें बोलणें ऐकून मी अगदीं चकित होऊन गेलों. मला गप्प राहवेना, तेव्हां मग मींही मोरोबाला उत्तर दिलें, 'मोरोबा! तर मग एकूण हें जग चांगलेंच मूर्ख दिसतें ह्मणावयाचें! अहो माझ्या गोष्टी संथपणानें ऐकून घेतल्यानंतर त्यांचा स्फोट करणारे लोक पाजी आणि मूर्ख ह्मटले पाहिजेत; आणि तेच मूर्ख लोक मला उलट नांवें ठेवितात काय—कीं माझा स्वभाव वाईट ह्मणून? या गाढवाच्या लेकांनीं आपण आपला हा असा गाढवपणा मिरवावयाचा, आणि माझ्याच स्वभावाला नांवें ठेवावयाचीं होय? आणि तुह्मी आलां मोठे शहाणे मला सांगावयाला! तुह्मांवर विश्वासून मी एक गोष्ट समजा तुमच्यापाशीं बोललों, आणि तिची वाच्यता गांवभर तुह्मीं केली, तर हा दोष माझा असें का ह्मणावयाचें? तुमचा अपराध, आणि दोष माझ्याकडे हा न्याय मात्र मोठा खासा. हो, मीं तुमच्यावर विश्वास टाकिला, किंवा तुमच्या स्वभावाची नीटशी पारख केली नाहीं, याबद्दल मला बेसावध असें पाहिजे तर ह्मणा; पण माझा स्वभाव खोटा किंवा वाईट असें नाहीं तुह्मांला ह्मणतां यावयाचें.' असें मीं त्याला पुष्कळ समजावून सांगितलें; पण त्याचा उपयोग कांहीं एक झाला नाहीं. जगाची ही रीतच अशी. एखाद्या मनुष्याची ओळख

व्हावी, आणि आपकें हद्दत काढून घेऊन त्यानें आपलें गांवभर कांहीं तरी बोलत सुटावें, यापेक्षां त्याची ओळख न झालेली बरी, असें मला कळून आलें. त्याचप्रमाणें आपण कांहीं बोलावें आणि त्याचा विपरीत अर्थ काढावयाला लोकांना सवड द्यावी, त्यापेक्षां आपण मुळींच न बोललों तर बरें; अशा माझ्या कल्पना होत चालल्या होत्या. पण कल्पना झाली, समजूत बनली, विचार ठरला ह्मणून हातून तसें वठतेंच असा नियम नाहीं. या जगांत शहाणा कोण तर जो आपलें मनोगत बेमालूमपणानें चोरून लोकांच्या कलानुसार 'गंगा गये गंगादास; मथुरा गये मथुरादास' बनतो तो. वाः काय या जगांतली ही मौज! पण ती मौज मुकाट्यानें पहात बसणें भाग पडतें. तें असो. सोमदीक्षिताच्या सहवासामुळें आणि त्यांच्या भेटीच्या योगानें आमचें असह्य दुःख हलकें झालें. घरीं पाहुणा आला किंवा कोणी इष्टमित्र भेटला ह्मणजे त्याची आपण मोठे सुखी, शहाणे आणि श्रीमंत व लौकिकवान आहों अशी खात्री पटावी ह्मणून प्रत्येक प्रापंचिकाची सारखी धडपड चाललेली असते. तशी जनरूढिच पडली ह्मटलें तरी चालेल. त्यांतल्या त्यांत बायकांची तशी धडपड जास्त असते. पाहुणा आला कीं जेवणांत फरक, कपड्यांत बदल, दागिन्यांचें प्रदर्शन, गप्पागोष्टींचें गुऱ्हाळ, इत्यादि कामांत, बायका दंग असावयाच्याच. मला मात्र हा प्रकार बिलकुल आवडत नसे. आंतबाहेर एक असावें. झांकणें, लपविणें, किंवा सोंग उठवून देणें, मला बिलकुल खपत नव्हतें. पण माझ्या या स्वभावाचा अर्थ लोक भलताच करीत. ते ह्मणत याला रीतभातच कळत नाहीं. हा अड-

मुद्दाच आहे. याला सभ्यता समजत नाहीं. पण त्याची मीं कधीं पर्वा केली नाहीं. कारण मला नांवें ठेवण्याला लोकांना अधिकार पोंचतो, तसा मलाही त्यांना नांवें ठेवण्याला अधिकार पोंचतो. मलाही त्यांना नांवें ठेवितां येणार नाहींत कीं काय? मला ते मूर्ख ह्मणतील तर मी त्यांना शतमूर्ख समजतों. माझ्या तोंडावर बोलण्याची त्यांची छाती नाहीं, आणि तसें त्यांस बोलण्यास मागेंपुढें पाहणारा मी नव्हें; तेव्हां त्यांच्यापेक्षां मीच जास्त श्रेष्ठ असें माझें मला वाटे. असो.

सोमदीक्षित घरीं आले, ते पाहुणे माझे मोठे ऋणानुबंधी. तेव्हां त्याच्यापुढें आपला मोठेपणा मिरविण्यासाठीं सूनबाई झटत होतीच. ती अंथरुणावर पडलेली, दुःखानें खंगलेली; पण या वेळीं तिला वाटलें आपण सुखी, शहाणे आणि लौकिकवान हें दाखविण्याचा 'पर्वकाळ' आला, तो फुकट जातो, हें कांहीं बरें नव्हे. ह्मणून सुनेच्या बरोबरीनें आपणही 'दिखाऊपणा' माजविण्याच्या खटपटीस ती लागली! यामुळें आपलें दुःख तिला थोडें तरी विसरावें लागलें. आपला थोरपणा दाखवावयाचा म्हणजे बोलावयाचें नाहीं, जवळ उभें राहायचें नाहीं, जसें काय आपण अगदीं नवखे परके, असें तुसडेपणानें माणुसघाण्यासारखें वागणें हाच आपला पुरुषार्थ, ही तऱ्हा आमच्या बाळयाची. दोनतीन दिवस राहून जाणारा पाहुणा असला ह्मणजे या सोंगाची बतावणी बरीच चांगली साधते, ह्मणजे उसना आणलेला हा थाटमाट आहे असें कळून येत नाहीं. पण तोच पाहुणा जर कां ४–८ दिवस सारखा राहि-

ला कीं मग आपलें अवसान सर्व आपोआप हळूहळू कळाव-
यास लागतें. या धोरणाला अनुसरूनच मीं एके दिवशीं
जेवतांनां ह्मटलें, ' सोमदीक्षित कांहीं परके पाहुणे नाहींत.
घरचेच ते, आज चार दिवस त्यांची ही बडेजाव चालली
आहे, पण उद्यां पर्वां इतक्यांतच त्यांच्यापुढें काहण्यांचें पुराण
सुरू होण्यांत कांहीं कमी व्हावयाचें नाहीं. ह्मणजे मग दुहेरी
फजीती.' ह्या माझ्या बोलण्याचा रोंख सूनबाईच्या किंवा
तिच्या कांहीं त्या वेळीं ध्यानांत आला नाहीं, आणि ती कांहीं
तरी उत्तर देईल असें वाटलें होतें, पण तिनेंही तें दिलें नाहीं.
तथापि चारपांच दिवस लोटले, आणखी हे पाहुणे किती
दिवस राहणार याचा कांहीं अदमास लागेना, तेव्हां पाहु-
ण्यापुढें 'मांडणावळ' करण्याची प्रबळ इच्छा आपोआप
आणि एकदम ढिली पडली. तें पाहतांच मला हंसू आलें,
पण मी कांहीं बोललों नाहीं. पुढें एके दिवशीं मुलगा हा
तुसड्यासारखा व माणुसघाण्याप्रमाणें वागतो ही गोष्ट पाहुण्या-
च्या ध्यानांत आली, तेव्हां हें कांहीं चांगलें नव्हे असें सम-
जून, व हा दोष आपल्या मुलाचा कांहीं नव्हे हें दाखविण्या-
साठीं ती हळूच ह्मणाली, 'या इंग्रजी राज्यांत मेलें सगळेंच
चमत्कारिक झालेलें आहे; अन् ती इंग्रजी विद्या केली ह्मणजे
तर कांहीं विचारूंच नये; रीतभात सगळी सुटते.' या
तिच्या ह्मणण्याचा रोंख माझ्या ध्यानांत आला, पण ह्मटलें,
जरा जास्त मौज बघावी. 'कां सोमदीक्षित, समजला काय
तुह्मांला हा मजकूर?' असा मीं प्रश्न केला. त्यावर तो
बिचारा काय उत्तर देणार? इतक्यांत अकस्मात मोरो-
बांची स्वारी आली. ते गप्पाप्रियच; आणि त्यांना थोडीशी

नारदी दीक्षा मिळालेली किंवा आवडती. त्यांतून रिकामटेकडे-पणा त्यांना यथेच्छ. शिवाय थोडेसे, कां चांगलेच, टवाळ आमचे मोरोबा. घटकाभर गप्पा मारीत आह्मी बसलों; तेव्हां मोरोबा ह्मणाले, 'कां दीक्षित, बाळासाहेब–अप्पांचे चिरंजीव पाहिलेतना? कसा, शाहणा व कर्ता निघाला आहे?' सोमदीक्षितांनीं 'हो हो वाः वाः' असें ह्मणून अर्घ्या दिलानें कचरत शाबासकी व्यक्त केली. त्याला पुण्यास आणून ठेवण्याला कारण मी बरें इत्यादि मोरोबानें फुशारकी मारली. असें इकडचें तिकडचें बोलणें होतां होतां, आह्मी दिसतों इतके सुखी नाहीं, मनस्वी कष्टी आहों; असें सांगण्याला तिनें प्रारंभ केला. भाबडी जात बायकांची, यांत शंका नाहीं. आपलें सुखीपणाचें सोंग थाटण्याची एकीकडे तयारी चालली आहे, आणि लगेच आपण होऊन सून माझें ऐकत नाहीं, माझी प्रतिष्ठा मुळींच ठेवीत नाहीं, माझ्या देखत नवऱ्याशीं बोलते, हंसते, खिदळते; मोहर-वाशीण भावाशींसुद्धां मोकळेपणानें वागणार नाहीं इतका चपळपणा आमच्या देखत नवऱ्याशीं करिते; हवा खावयाला च नवऱ्याबरोबर एकटी जाते; घरीं धर्म नाहीं, सोवळें नाहीं, शुभ नाहीं अशुभ नाहीं अशी वागते, आणि नवऱ्यालाही असाच भ्रष्टाकार करावयाला लाविते; ह्मणून तिनें जी काहणी सुरू केली ती कांहीं सांगून संपावयाची नाहीं. 'नवऱ्याला ग हीं कशी शिकविते?' ह्मणून मीं विचारिलें, तेव्हां ती ह्मणाली, 'अहो पुरुषांना काय? त्यांतून बाळासाहेब कीं नाहीं भोळा शंकराचा अवतार! त्याला ओवळ्यानें जेवायला हीच अवदसा लावते. सारा भ्रष्टाकार

आणि नाचरेपणा याच वयेचा. तो काय ? असें, बरें असें; तसें, तर तसें. पुरुषाला सोंवळें ओवळें करावयाला लावणें बायकांचें काम. आपण नाचरेपणा करून दुसऱ्यालाही नाच· रेपणाला लावायचें याला काय ह्मणावें ?' असें तिनें गुऱ्हाळ चालविलें होतें. तिचा मुख्य रोंख आपला मुलगा भला आणि सून कायती अपराधी असें दाखविण्याचा होता. तें तिचें बोलणें मला पटलें नाहीं. पण सोमदीक्षिताला आह्मी सुखी ह्मणून स्वतःच्या दुर्दैवाचा खेद होऊं नये एव-ढ्यासाठीं आह्मी खरोखर सुखी नाहीं असें केंव्हां तरी मला एकदां कळवावयाचें होतें, तेंव्हां ही संधि बरी आहे ह्मणून थोडथोडें माझें दुःख मी सांगूं लागलों. पोटांतलें सर्व भड-भड ओकत सुटावयाचें नाहीं, असा माझा चांगला निर्धार होता; पण जें कां एकदां माझें तोंड सुटलें तें मग कांहीं केल्या राहीना. सारा दुःखसागर खवळून गेला. दुःखा-खालीं चांगला दडपलेला संतापही पण याच वेळीं एकदम आणि मला न कळत भडकला. भान राहावें तितकें राहीना आणि सहज लीला होतां होतां गोष्ट विकोपासच गेली. उतरणीवरली गाडी ती, ती काय सहजासहजीं आटपायची ? बाळ्या जसा कांहीं पुढें उभा आहे, आणि त्याच्याशीं मी बोलतों आहें, अशा तऱ्हेनें माझा संताप भडकला. सहज हळूहळू गोष्टी सांगत होतों तो प्रकार बंद होऊन चावा घ्यावयाला धांवण्याइतकी मनोवृत्ति बेताल झाली, आणि जें काय किल्मिष आजवर सांचलें व मीं मुद्दाम कसें तरी करून कोंडून ठेविलें तें सर्व भराभर बाहेर पडूं लागलें. 'या अशा मेलेल्या अन्नावर उपजीविका करण्यापेक्षां पोटांत कांटे

भरलेले काय वाईट ? माझ्या डोळ्यांदेखत हा पोर इतका नाचेरपणा व असला भ्रष्टाकार करीत सुटला याचें कारण दुसरें काय असणार आहे ? आह्मीं कोठें तरी काळें करून जावें ह्मणजे यांना मनसोक्त वागण्याला चारी दिशा मोकळ्या ! काय बोलणें ? कोण खिदळणें ? कसली रीत आणि काय हे चाळे ? आणि देवानें तरी पहा मला कसलें लांबलचक आयुष्य दिलें आहे ? ह्मटलें मिटतील एकदांचे डोळे तर मोकळा तरी होईन ! एक पोर बाटला आणि हा असे भलतेसलते चाळे करीत आह्मां उभयतांना पोतेऱ्यासारखें घरांत वागवितो. ' अशी माझी तुफान जीभ सुटली तेव्हां तिला मोठी काळजी पडली. दीक्षितांस फारच वाईट वाटलें. 'मीच फुटक्या कपाळाची' असें ह्मणून रडतरडत ती आंत गेली, तेव्हां मात्र माझा अनावर संताप एकदम थंडा झाला. ' गरीब बिचारी ! तिचा काय ह्मणून हा छळ ? ' असा विचार मनांत येऊन मी समाधानाच्या गोष्टी बोलूं लागलों. पण तिचें दुःख कांहीं केल्या तिला आवरेना. मोरोबा ह्मणाले, ' अप्पा, विनाकारण तुह्मी आपल्या हातानें आपलें दुःख वाढवीत आहां, दुसरें कांहीं नाहीं. या वेळीं तुह्मांला समजुतीच्या गोष्टी सांगण्यांत अर्थ नाहीं. तुह्मांला सर्व विपरीतच वाटायाचें. तुमच्यासारख्या शहाण्या व समाधानी पुरुषानें दुधाला किंवा अमृताला विष मानावें असें झालें, याला काय करणार ? या मोरोबाच्या ह्मणण्याला मीं उत्तर दिलें, ' होय, तुह्मी ह्मणतां तेंच खरें; मी थेरडा मात्र गाढव, आणि तुह्मी सर्व नव्या तऱ्हेचे लोक अकलेचे खंदक निघालांत. सोंवळें नाहीं, ओवळें नाहीं, पूजा नाहीं,

पुनस्कार नाहीं, लाज नाहीं, मर्यादा नाहीं, भीड नाहीं. मुरवत नाहीं, वडील नाहीं, धाकटें नाहीं; बोलणें काय, करणें काय, सर्व येथून तेथून भ्रष्टाकार! अशा चांडाळांच्या घरीं घोटभर पाणी सुद्धां पिऊं नये; पण आमचें पोट जळेनाना कोठें दुसरीकडे लागून पडलों आहों कुत्र्यासारखे' असें पुनः माझें चऱ्हाट चाललें. तिनें आंतून गप्प राहण्याविषयीं मोरोबाला व मला दोघांना बरेंच खुणावलें; पण आह्मी खाशी कोठले ऐकावयाला? पूर्वीच्याच नमुन्यावर आमचें आणखी बराच वेळ भाषण चाललें होतें. तेव्हां अखेर सोमदीक्षितांनींच मग मोरोबाला स्वस्थ बसवून दुसऱ्या गोष्टी काढण्याची बरीच खटपट केली. पण माझें चालावयाचें तें हळूहळू चाललेंच होतें. पाऊस पडून गेला तरी झाडाखालीं ठिबकणें चालावयाचेंच. सोमदीक्षित एकदां मध्येंच ह्मणाले 'एकंदरींत या जगामध्यें सुख ह्मणून कांहीं कोठें दिसत नाहीं. ईश्वरानें सुख दिलें तर मनुष्याच्या बुद्धीला तें दुःख भासूं लागतें. ईश्वरी मायेचा खेळ आहे, झालें!' या दीक्षितांच्या उद्गारानें मी बराच चपापून ह्मणालों, 'काय? तुह्मीदेखील मला मूर्ख ह्मणतां? दोष सारा माझाच? आतां मात्र कमाल झाली.' पुढें मी आणखी कांहीं बोलणार तों इतक्यांत आमच्या ठ्याह्याच्या घरची कुळंबीण मोठ्या लगबगीनें तिला बोलवावयास आली, आणि तीही तशीच तिच्याबरोबर निघून गेली. काय झालें ह्मणून मीं विचारलें, तर ती नीटशी बोललीसुद्धां नाहीं. पण मग कळलें कीं धाकटी मुलगी बाळंत होणार होती, तिकडे बोलावणें आल्यावरून ती

गेली. त्यामुळें माझें सारें लक्ष तिकडे लागलें. कदाचित् दोन जिवांचा निकाल व्हावयाचा प्रसंग; पहिलटकरीण. इकडे माहेरीं पाठवा ह्मणून मीं पुष्कळ आग्रह केला, पण ह्यातान्यापुढें इलाज चालेना. माझें सारें लक्ष आतां पोरीकडे लागलें. दुसरें कांहीं सुचेना. संताप तुफान झाला होता तो जागच्या जागीच निवाला. याच संधीला आमच्या मोरोबांनीं आपलें ब्रह्मज्ञानाचें घोडें पुढें ढकललें. त्यांनीं मला उपदेश करण्याचा भला भक्कम आव घातला. माझी समजूत खोटी, माझें ह्मणणें गैरशिस्त, कल्पना खऱ्या नव्हत, इत्यादि त्यांची चर्पटपंजरी ऐकण्याकडे माझें लक्ष लागेना. सारें मन मुलीच्या प्रसूतीसंबंधाच्या विवंचनेंत गुंग. इतक्यांत वर्तमान आलें कीं मुलगा झाला; सर्व खुशाल. त्यासरसा जिवाला एक मोठा आनंद झाला. मी व्याह्यांच्या घराकडे जाण्यास निघालों, आणि मुलगा घरीं आला कीं त्याला व्याह्याच्या घराकडे पाठव असें आंत जाऊन सुनेस सांगीतलें आणि ह्मटलें, मोरोबा चला जाऊन येऊं. सोमदीक्षितांसही बरोबर घेतलें. पण तिघे ब्राह्मण, जावें कसें, ही अडचण. ती मोरोबानें चटकन ओळखिली आणि आमच्या पुढें तो थोडासा गेला. मी मोठ्या खुशालींत आहे असें पाहतांच मोरोबांनीं वाटेंत पुनः 'हें पहा अप्पा, तुह्मीं असा विचार केला पाहिजे—' वगैरे उपदेश चालविला; - पण माझें कांहीं तिकडे लक्ष लागेना. मी ह्मणें हा ब्राह्मण पुनः पुनः खरूज खाजवून कां काढितो ? पण त्याची चिकाटी कांहीं निराळीच. तेव्हां मीं त्याला ह्मटलें, 'मोरोबा तुह्मांला कांहीं काळवेळ समजतो का ? अहो आतां पुरे. जास्त

नको. तुह्मी किती ह्मटलें तरी जुने डोळे आहेत, तोंवर नवे चाळे दुःखदायक वाटावयाचेच.

# प्रकरण ११ वें.

## 'ही दुनिया केवळ झूटी आहे.'

मला नातू झाला हा आनंद गगनांत मावेना. प्रपंच खोटा, एकंदर मायेचा पसारा, दुःखाशिवाय इतर कशाची येथें समृद्धि नाहीं, आणि मनुष्याचा जन्म केवळ दुःखें उपभोगावीं एवढ्याचसाठीं इत्यादि वैतागाच्या उद्गारांचा खरेपणा कसा मानावा? मुलाचा वर्ग नाशिकास झाला. पगार महिना पांचशें रुपये. माझ्या बाळ्याला कोठें ठेवूं आणि कोठें नको असें मला झालेलें. सर्व दुःखें दूर पळालीं. पण तीं दुःखें तरी कशाचीं? रिकाम्या मनाच्या चोंचलेखोरपणाचें तें प्रायश्चित्त. पुण्यांतला संसार आतां नाशकास आला. मुलाला केवढा तरी मोठा अधिकार. दोन वर्षें सजा द्यावयाची सत्ता! लोकांत केवढा वचक? कोण दरारा लोकांना! आणि त्या मुलाबद्दल मी कुरकुरतों. काय चमत्कार? तिलाही मोठा आनंद झाला. पांच तोळे सोनें बाळलेण्याकरितां मुलानें तिला दिलें. बाळंतविड्यासाठीं १२५ रुपये स्वाधीन केले. मग काय तिला बाळ्या ह्मणजे परब्रह्म विष्णु साक्षात वाटावयास लागला. तिच्या कुरकुरी पार कुणीकडल्या कुणीकडे गेल्या आणि सारा आनंदच झाला. घटकेंत आनंद घटकेंत दुःख असें माझेंही चाललें होतें. वयाला ७० वर्षें झालीं,

शक्ति उरली नाहीं, पण संसाराची ओढ अगदीं तरणी बांड. काय चमत्कार आहे ?

पुण्याहून नाशकास प्रयाण, तेथल्या गोष्टी इत्यादिकांचें कथन आतां माझा मुलगा करील. त्याला सर्व ठाऊक आहे. मला जास्त अशक्तता येत चालली, 'अंगं गलितं पलितं मुंडं,....वृद्धो याति गृहीत्वा दंडं' हें वर्णन मजविषयीं सार्थ होऊन गेलें; तसेंच 'तदपि न मुंचति आशापिंडं' हेंही कांहीं खोटें नाहीं. आतां मी पिकलेलें पान झालों, माझा भरंवसा काय ? ह्मणून नाशीक मुक्कामीं मुलाला माझ्या जुन्या समजुतीप्रमाणें प्रपंचसंबंधी बऱ्याच गोष्टी सांगीतल्या, अनेक उपदेश केले, ते सर्व तोच आपण कथन करील. याच्यापेक्षां मी आतां कांहीं जास्त सांगत नाहीं.

समाप्त.